**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी, परीक्षा फी व अन्य फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत**

**(१) * ४२२८४ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. प्रकाश शेंडगे** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक फी, परीक्षा फी व अन्य फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबतच्या योजनेची व्याप्ती वाढवून ती शासनाच्या मान्यताप्राप्त, विनाअनुदानित व कायमस्वरुपी विनाअनुदानित संस्थामधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू करण्याचा निर्णय शासनाने अलिकडेच घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण शुल्क समितीने मान्यता दिलेल्या फी संरचनेला अनुसरुन फी ची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्या कायम विनाअनुदानित संस्थांना माहे मार्च, २००८ पर्यंत अशा फी ची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, फी ची प्रतिपूर्ती करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (१) होय.

(२) होय.

(३) बुलढाणा जिल्ह्यातील खालील विना अनुदानीत संस्थांना फी ची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे :

१) होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज ऑफ ॲड हॉस्पिटल, खामगांव.

२) व्दारका इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी माळविहिर, बुलढाणा

३) अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय, चिखली

४) श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव.

५) कृषि अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालय, जळगांव जामोद

माहे फेब्रुवारी, २००८ पुर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्रतिपुर्ती करण्यात आलेली असून माहे फेब्रुवारी २००८ नंतर आलेल्या प्रस्तावावर कार्यवाही चालु आहे.

(४) प्रस्ताव फेब्रुवारी, २००८ नंतर प्राप्त झाल्याने प्रलंबित असून त्यांच्या प्रतिपुर्तीची कार्यवाही चालू आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्र.क्र. ४२२८४

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय,वितरीत केल्याप्रमाणे परंतु मी आपल्या अनुमतीने प्रश्नाच्या ३ व ४ च्याउत्तरामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. ज्या पाच संस्थांमधील अर्ज आले होते त्यांना फीची प्रतिपूर्ती दिलेली आहे. उर्वरित ज्या पाच संस्था आहेत त्यामध्ये कृषी अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालय, जळगांव जामोद, सुनील रामसिंग पुनावाला आयुर्वेद महाविद्यालय, चिखली, सौ.प्रमिलाताई तेजराव देशमुख कृषी महाविद्यालय,अमरापूर, शरद पवार कृषी विद्यालय,जळगांव जामोद, महालक्ष्मी कृषी विद्यालय, माथडगांव, जी.आय.कृषी विद्यालय, जळगांव जामोद या संस्थांचे माहे मार्च २००८ पूर्वी प्राप्त .....२



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ४२२८४...

डॉ. विजयकुमार गावित....

झालेल्या प्रस्तावांची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. तसेच चौथा उपप्रश्न विचारला आहे त्याचे उत्तर "प्रश्न उद्‌भवत नाही" असे वाचावे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, शैक्षणिक फी देण्याची प्रतिपूर्ती झालेली आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे.पाच आणखी कॉलेजचा याठिकाणी उल्लेख केला. या योजनेची व्याप्ती वाढवून ती शासनाच्या मान्यताप्राप्त, विनाअनुदानित व कायमस्वरुपी विनाअनुदानित संस्थांमधील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय असा प्रश्न मी विचारला होता त्याला होय असे उत्तर दिलेले आहे. यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, शासनाने हा निर्णय केव्हा घेतला ? निर्णय जर उशिरा घेतला असेल तर फेब्रुवारी 2008 पूर्वी प्रस्ताव प्राप्त झालेल्या संस्थांना फी देण्याची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे. फेब्रुवारी 2008 नंतर आलेल्या प्रस्तावावर कार्यवाही चालू आहे असे सांगितले आहे. कार्यवाही चालू आहे म्हणजे नेमकी कोणती कार्यवाही चालू आहे ? निर्णय डिसेंबरमध्ये घेतला असेल तर प्रस्ताव साहजिकच उशिरा येणार. सर्व महाविद्यालयांना फीची सवलत सर्व अभ्यासक्रमांना लागू केलेली आहे त्याची त्वरित प्रतिपूर्ती केली आहे काय वा कधी करणार आहात ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व संलग्न शिक्षण आहे त्यातील खाजगी संस्थांना शिष्यवृत्ती आणि त्यांची जी फी आहे ती समितीने ठरवून दिलेली आहे त्यानुसार देण्याचा निर्णय 3 मार्च 2004 रोजी पहिल्यांदा घेतला. त्यानंतर दुसरा निर्णय असा घेतला की, बाकी मान्यताप्राप्त विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित संस्थांमधील अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क आहे त्याची प्रतिपूर्ती देण्याचा निर्णय 16 मार्च 2007 रोजी घेतलेला आहे. तोच निर्णय आदिवासी विद्यार्थ्यांच्या बाबतीत पुढे चालू ठेवला. बाकीचे जे विभाग आहेत म्हणजे समाजकल्याण विभाग किंवा इतर विभागांचा एकत्रितपणे फी प्रतिपूर्ती करण्याबाबतचा निर्णय झालेला आहे. तो निर्णय 9 जुलै 2008 रोजी केलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यानुसार जितक्या काही संस्था होत्या त्या संस्थांनी ज्या ज्या मुलांचे अर्ज दाखल केले होते त्या सर्वांना फीची प्रतिपूर्ती देण्यात आलेली आहे. जर कोणी चुकून राहून गेले असेल तर त्यांनी अर्ज सादर करावेत त्यांच्याही फीची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

.....3

ता.प्र.क्र. 42284...

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, शासनाने 2004 मध्ये निर्णय घेतला. हा निर्णय सरकारने 2003 मध्ये घेतला अशी माझी माहिती आहे. 2003 सालापासून आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना फी परत केलेली आहे. केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? दुसरा एक महत्वाचा प्रश्न असा आहे की, हा जो निर्णय राज्य शासनाने यापूर्वी घेतला आहे तो निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे काय ? माझ्या माहितीप्रमाणे हा निर्णय रद्द करुन विद्यार्थ्यांना कर्ज म्हणून द्यावयाचे आणि त्यावरील व्याज शासनाने भरावयाचे असा काही निर्णय घेतलेला आहे काय ? याची माहिती मंत्रीमहोदयांनी द्यावी.

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 10:05

ता.प्र.क्र.42284...

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, कर्ज द्यायचे अशा पध्दतीचा निर्णय झालेला नाही. 2004 सालापासूनची प्रतिपूर्ती करण्याबाबत हे आदेश काढले होते आणि तेव्हापासूनची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. बुलढाणा जिल्हयाशी संबंधित प्रश्न असल्यामुळे बुलढाणा जिल्हयाबाबतची माहिती देण्यात आली आहे. जे अर्ज आले होते त्यांची प्रतिपूर्ती केलेली आहे. अजूनही अर्ज प्रलंबित असतील तर त्यांनाही प्रतिपूर्ती दिली जाईल.

श्री.प्रकाश शेंडगे : हा प्रश्न फक्त एकाच जिल्हयाशी संबंधित नसून संपूर्ण महाराष्ट्राचा हा प्रश्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातीचा देखील असाच प्रश्न निर्माण झाला आहे. बुलढाणा जिल्हयासाठी 184 लाख रुपये तरतूद प्राप्त झाली. परंतु त्यापैकी फक्त 24.97 लाख रुपये खर्च झाले. अर्ज प्रलंबित राहण्याचे कारण काय दिले? तरतुदीअभावी प्रतिपूर्ती केलेली नाही. एका ठिकाणी तरतूद केली जाते आणि दुसरीकडे रक्कम खर्च होत नाही. अकोला जिल्हयासाठी 236 लाख रुपये तरतूद प्राप्त झाली आणि त्यापैकी फक्त 12 लाख रुपये खर्च झालेले आहेत. त्याबाबतही असेच उत्तर दिले आहे. तरतुदीअभावी खर्च झालेला नाही. व्याप्ती वाढविण्याचा शासनाने निर्णय घेतला म्हणजे नेमके काय केले? व्याप्ती केव्हा वाढविली?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हा प्रश्न अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांबाबतचा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती, विशेष मागासप्रवर्ग या सर्वांशी संबंधित प्रश्न आहे. हा राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : शासन निर्णय हा अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती, विशेष मागासप्रवर्ग या सर्वांसाठी लागू आहे.

**सभापती** : मंत्रीमहोदयांनी अन्य माहिती उपलब्ध असल्यास ती सभागृहास देण्यास हरकत नाही. अन्यथा हा प्रश्न फक्त अनुसूचित जमातीविषयी मांडलेला आहे.

..2..

ता.प्र.क्र.42284...

श्री.पांडुरंग फुंडकर : मग माझा प्रश्न असा आहे की, अनुसूचित जमातीसाठी बुलढाणा आणि अकोला जिल्हयासाठी किती तरतूद प्राप्त झाली आणि त्यापैकी किती रक्कम खर्च करण्यात आली?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला आहे तो बुलढाणा जिल्हयासंबंधी होता. त्यामुळे बुलढाणा जिल्हयाविषयीची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. अकोला जिल्हयाची माहिती उपलब्ध करुन घेतली जाईल व सन्माननीय सदस्यांना आवश्यक असल्यास देता येईल. बुलढाणा जिल्हयासाठी अग्रीम रक्कम रु.2.17,783/- इतकी दिली आहे. 34 विद्यार्थ्यांसाठी मागणी केली होती. त्या सर्व विद्यार्थ्यांना रु.6,97,014/- इतकी रक्कम दिलेली आहे. बुलढाणा जिल्हयामधून ज्या संस्थांमार्फत अर्ज प्राप्त झाले त्या सर्वांची प्रतिपूर्ती झालेली आहे. जर कोणाचा अर्ज प्रलंबित असेल तर त्यांनी फॉर्म भरुन दिल्यानंतर त्यांना प्रतिपूर्ती दिली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, फेब्रुवारी, 2008 पर्यंत जेवढे अर्ज प्राप्त झाले, त्या सर्व संबंधितांना प्रतिपूर्ती दिली आहे. फेब्रुवारी, 2008 नंतर जे अर्ज आले त्यांच्या अर्जाचा विचार चालू आहे असे म्हटले आहे. त्याबाबतचा निर्णय केव्हा घेतला जाईल?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी उत्तरामध्ये दुरुस्ती करताना हेच सांगितले आहे की, 5 संस्थांचे अर्ज प्रलंबित राहिले होते. फेब्रुवारी, 2008 पूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42284....

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, विद्यार्थ्यांचे अर्ज आल्यानंतर प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर किती दिवसामध्ये प्रतिपूर्ती करावी यासंबंधीचे आदेश शासनाने काढलेले आहेत का ? यासंबंधी शासनाने मर्यादा ठेवली आहे काय किंवा ठेवणार आहे काय ? तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाची देखील प्रतिपूर्ती करण्याचे ठरविले आहे. आपण ॲग्रीकल्चरल कॉलेजेस असे देखील म्हटलेले आहे. तेव्हा प्लेन ॲग्रीकल्चरल कॉलेज असेल तर शासन त्याची प्रतिपूर्ती करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, ॲग्रीकल्चर कॉलेजेची फी देखील प्रतिपूर्ती करण्यात येत आहे. सर्वसाधारणपण असे अपेक्षित आहे की, प्रतिपूर्तीसाठी मुलांनी जुलै पर्यंत अर्ज भरून द्यावेत. ते अर्ज संस्थेने आमच्याकडे ऑगस्ट पर्यंत पाठवावेत. ते आमच्याकडे आल्यानंतर डिसेंबर पूर्वी सर्व पैसे देण्यात येतात. मागच्या वर्षी जेवढा खर्च झाला असेल त्याच्या 90 टक्के रक्कम ॲडव्हान्स म्हणून देण्यास सुरूवात केली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, तिसरा लेखी उप प्रश्न हा बुलढाणा जिल्ह्याशी संबंधित आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, बुलढाणा जिल्ह्यामध्ये कायम विनाअनुदानित ज्या संस्था आहे, त्यांना या सवलतीचा फायदा मिळू शकतो. तेव्हा अशा सर्व संस्थांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फीची प्रतिपूर्ती आपण केली आहे काय ? शासनातर्फे अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रतिपूर्ती देण्यात येते. परंतु प्रतिपूर्ती विद्यार्थ्यांना वर्षानुवर्षे मिळत नाही. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासन करीत आहे. ती त्यांना देय असेल तर प्रवेश घेतानाच अशा विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेऊ नये अशा प्रकारचे आदेश शासन काढणार आहे काय ?

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42284....

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अशा प्रकारचे आदेश देऊ असे बैठकीमध्ये मान्य केले होते. अशा प्रकारचे आदेश काढले आहेत, असे परवा ज्यावेळी मी बैठक बोलाविली होती, त्यावेळी मला सांगण्यात आले. तरी पण ही बाब मी तपासून घेतो. ही प्रतिपूर्ती व्यवस्थित करण्यासाठी दोन सचिवांची समिती नेमण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमामी , व्हीजेएनटी, ओबीसी या सवंर्गातील विद्यार्थ्यांची फी परस्पर कॉलेजेसना जाईल. त्यामध्ये काही अडचणी येणार नाहीत. म्हणूनच तशाच प्रकारचे निदेश देण्यात आले आहेत. ज्यांनी ज्यांनी म्हणून अर्ज केले आहेत, त्या सर्वांना पैसे दिले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, संत गजानन महाराज शिक्षण संस्थेला अजून ऑर्डर मिळालेली नाही. ऑर्डर न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना लाभ झालेला नाही. तेव्हा याची चौकशी करून ताबडतोब प्रकल्प अधिकाऱ्याकडून ऑर्डर मिळेल याची व्यवस्था शासन करणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : माननीय सभापती महोदय, दिनांक 4.4.2008 रोजी आपण रूपये 4,09870/- अंतिम अग्रिम पोटी दिलेले आहेत. जर कॉपी मिळाली नसेल तर ती देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रा.वैद्यनाथन समितीच्या अहवालानुसार सहकार कायद्यात दुरुस्ती करण्याबाबत**

**(२) * ४३४८९ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहकार क्षेत्राच्या पुनरुज्जीवनासाठी प्रा.वैद्यनाथन समितीच्या शिफारशीनुसार राज्यामध्ये माहे जून, २००८ अखेर किती निधी प्राप्त झाला आहे,
(२) सदर निधीचा विनियोग कसा करण्यात आला आहे,
(३) सदरच्या मदतनिधीचा फायदा किती सहकारी संस्थांना झाला आहे ?

**श्री.जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) अल्प मुदत पतपुरवठा संस्थाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी प्रा.वैद्यनाथन समितीच्या शिफारशीनुसार प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या संस्थाचे तोटे भरुन काढण्यासाठी केंद्र शासनाकडून रु. ५१०.७१ कोटी व राज्य शासनाकडून रु.२१.९३ कोटी इतका निधी प्राप्त झालेला आहे.
(२) नाबार्डच्या सूचनेनूसार राज्य बँकेने जिल्हा बँकांच्या राज्य बँकेतील चालू खाती रु. ५२७.४४ कोटी इतकी रक्कम जमा केली आहे.
(३) सदर निधीचा अ वर्गातील ८०३५ व ब वर्गातील २०२३ इतक्या प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांना फायदा झाला आहे.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, वैद्यनाथन समितीचा अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे किंवा नाही ? असल्यास, जिल्हा मध्यवर्ती बँकेला अंमलबजावणी करण्यासंबंधी शासनाने कधी आदेश दिले आहेत ? वैद्यनाथन समितीमुळे कोणकोणत्या जिल्ह्यातील कोणकोणत्या जिल्हा मध्यवर्ती बँकाना किती निधी मिळाला आहे ? शासनाने वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारला नसेल तर काही केडरमध्ये बदल करण्यासंबंधीची गरज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस भासल्यास ते करण्यास शासनाची परवानगी आहे काय ?

यानंतर श्री.पी खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 43489.......

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, वैद्यनाथन् समितीचा अहवाल शासनाने स्वीकारलेला असून त्याप्रमाणे "अ" वर्गातील 8035 संस्थांना 494 कोटी, "ब" वर्गातील संस्थांना 597 कोटी आणि "क" वर्गीय संस्थांना 440 कोटी अशी एकूण 1525 कोटीची रक्कम उपलब्ध होणार असून त्यापैकी 942 कोटी एवढया रकमेला आपण मान्यता दिली आहे आणि त्यापैकी 500 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी बँकवाईज माहिती मागितली त्यानुसार ती यादी मी पटलावर ठेवत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, वैद्यनाथन् समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील जिल्हा सहकारी बँकांना हे धोरण लागू आहे तसे अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकांनाही लागू आहे. अशा बँकांचाही विचार यासाठी शासनाने केला आहे काय ? असल्यास ती रक्कम किती ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, राज्यातील कृषी पत संस्था व जिल्हा सहकारी बँका ज्या कृषी पतपुरवठा करतात एवढ्यापुरतीच ही योजना लागू आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, यामध्ये "अ" वर्गाच्या संस्थांना फायदा मिळाला आहे अशा संस्थांची संख्या सांगितली आहे. परंतु "ब" वर्ग आणि "क" वर्गाच्या सोसायट्यांना त्याची किती मदत होणार आहे ? आणि कर्जमाफीसंबंधीचे जे धोरण आहे त्यामुळे ह्या सर्व सोसायट्या "अ" वर्गात येतील, त्या सोसाट्यांनाही तातडीने ही योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, कट ऑफ डेटपर्यंत ह्या "क" वर्गीय संस्था या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र नव्हत्या. कर्जमाफीचा निर्णय त्यानंतर झालेला आहे. आता पुन्हा 50 टक्के वसुलीपर्यंत ज्या संस्था येतील त्यांना हा फायदा कसा मिळेल यासाठी शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, जागतिकीकरण के जमाने में क्या महिला बचत गट के लिए कुछ खास पेकेज शासन की तरफ से रहने वाला है ? क्या सरकार जिला महिला सहकारी पत संस्थाओं के लिए अलग से कुछ खास निधि दे सकती है ? बंगलादेश के ग्रामीण बँक की लाईन पर महिला बचत गटों को मायक्रो क्रेडिट देने के लिए क्या सरकार की तरफ से विशेष प्रयत्न किए जाएंगे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 43489.......

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली बाब ही वैद्यनाथन् समितीच्या परव्ह्यूमध्ये येत नाही. तरी देखील महिला बचत गटांसंबंधीचा प्रश्न असल्याने त्याचा विचार शासन जरुर करील.

श्रीमती उषा दराडे : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी प्रश्न विचारलेला आहे अशा प्रकारचा महिला बचत गटांच्या 33 पतसंस्था राज्यात आहे, यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांबरोबर चर्चाही झालेली आहे. या संस्था "अ" वर्गात आहेत. म्हणून अशा संस्थांचा सर्व्हे किती दिवसात पूर्ण करण्यात येईल आणि या योजनेचा लाभ या संस्थांना शासन किती दिवसात मिळवून देणार आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : महोदय, राज्यातील महिला बचत गटांच्या संस्थांची यादी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही, ही माहिती मी पटलावर ठेवणार आहे. तसेच सहकारी कृषी पतपुरवठा संस्था आणि महिला बचत गटांच्या पतसंस्था ह्या वेगवेगळ्या असल्यामुळे या योजनेत त्यांचा विचार करता येणार नाही.

-------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्यासाठी शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत**

**(3) * 42830 श्री सुभाष चव्हाण , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्यासाठी राज्य शासनाने काही निधीची तरतूद केलेली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आजतागायत किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व त्यातील किती निधी किती लाभार्थींना वितरीत करण्यात आला आहे,

(3) अद्याप उक्त निधीचा विनियोग करण्यात आला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री.चंद्रकांत हंडोरे** : (1) अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

(2) व (3) सन 2003-04 पासून आजतागायत रु.1998.34 लाख निधीची तरतूद करण्यात आली असून त्यातील रुपये 1028.38 लाख इतका निधी 113 लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आला आहे. सन 2008-09 मध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात येत आहे.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 42830.

श्री. चंद्रकांत हंडोरे : महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो.

प्रश्न क्र. 2 व 3 ला दिलेल्या उत्तरात "113 लाभार्थ्यांऐवजी 72 लाभार्थी" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घ्यायला जाण्यासाठी शासनाने किती रकमेची तरतूद केली आहे ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, अनुसूचित जाती या प्रवर्गामध्ये बौध्द, महार, चर्मकार, मेहतर अशा बहुसंख्य जाती देखील मोडतात. अशा लाभार्थ्यांची वर्गवारी शासनाने केली आहे काय ? असल्यास ती संख्या किती ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : महोदय, सन 2003 पासून 2008 पर्यंत एकूण 19 कोटीची तरतूद आपण परदेशात उच्च शिक्षणाला जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने केली आहे. त्यापैकी 10 कोटी रुपये आतापर्यंत खर्च झालेले आहेत. तसेच या योजनेचा लाभ जवळपास 72 विद्यार्थ्यांनी घेतला आहे. त्यानुसार सन 2003-04 मध्ये 10, 2004-05 मध्ये 10, 2005-06 मध्ये 10, 2006-07 मध्ये 25 आणि 2007-08 मध्ये उर्वरित अशा 72 विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये जे विद्यार्थी मेरिटमध्ये असतील त्यानुसार प्रत्येक फॅकल्टीज त्यात आर्ट, कॉमर्स आणि सायन्ससह या विभागांतील त्यांच्या मार्क्सप्रमाणे त्यांना पाठविण्यात आले आहे. तसेच या विद्यार्थ्यांची वर्गवारी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. E-1/..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 42830** ......

श्री. मुझफ्फर हुसेन : या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, फक्त 72 विद्यार्थ्यांना परदेशात पाठविण्यात आलेले आहे व त्यासाठी 1028.32 लक्ष रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, प्रत्येक विद्यार्थ्यामागे किती निधी उपलब्ध करुन दिला जातो तसेच यावर्षी उच्च शिक्षणासाठी परदेशी जाणा-यांविद्यार्थ्यांसाठी किती निधीची तरतूद करण्यात आलेली आहे?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या कोर्सेस प्रमाणे फी आकारली जात असते त्यामुळे ही फी वेगवेगळी आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये असे म्हटले आहे की, सन 2008-2009 मध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात येत आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, यावर्षी किती लाभार्थ्यांना परदेशी शिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे व जे विद्यार्थी परदेशी शिक्षण घेण्यासाठी जातात त्यांच्याकडून बंध पत्र लिहून घेतले जाते काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन 2008-2009 मध्ये यासंदर्भात जाहिरात देण्यात आली होती व मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांचे अर्जही आमच्याकडे आलेले आहेत. अर्ज आल्यानंतर त्यातून मार्कवाईज विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी परदेशी पाठविले जाते त्यांच्याकडून बंध पत्र लिहून घेतले जाते. हे विद्यार्थी परदेशातून शिकून आल्यानंतर त्यांचा फायदा महाराष्ट्रातील जनतेला व्हावा म्हणून त्यांनी शासकीय सेवेत कमीतकमी 3 वर्षे सेवा द्यावी यासंदर्भात त्यांच्याकडून बंध पत्र लिहून घेतले जाते.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षण घेण्याची संधी मिळालेली आहे अशा लाभार्थ्यांची जातनिहाय माहिती सभागृहाला मिळेल काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, लाभार्थ्यांची निवड मार्क्स आणि मेरीट प्रमाणे केली जाते. ज्या लाभार्थ्यांना परदेशी शिक्षण घेण्याची संधी मिळालेली आहे अशा लाभार्थ्यांची यादी सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, परदेशी शिक्षण घेण्यासाठी दर वर्षी किती विद्यार्थ्यांची निवड केली जाते ? परदेशी शिक्षण घेण्यासाठी दर वर्षीची संख्या निश्चित केलेली आहे काय ? परदेशी शिक्षण घेण्यासाठी दर वर्षीची संख्या निश्चित केलेली नसेल तर भविष्यात या संख्येमध्ये वाढ केली जाईल काय ?

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 42830** ......

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन 2003 पासून ही योजना लागू करण्यात आली असून सन 2003-2004 मध्ये ही योजना 10 विद्यार्थ्यांसाठी होती. आता ही योजना 25 विद्यार्थ्यांची झालेली असतांना देखील ही संख्या कमी पडत आहे. त्यामुळे यासंख्येत वाढ करण्याच्या संदर्भात शासन निश्चितपणे विचार करीत आहे.

श्री. संजय दत्त : सन्माननीय सभापती महोदय, या योजनेचा लाभ देण्यासाठी निवडण्यात येणा-या विद्यार्थ्यांच्या निवड कोणत्या निकषाद्वारे करण्यात येते ? सन 2008-2009 मध्ये या योजनेसाठी किती निधीची तरतूद करण्यात आली होती? पूर्वीचा अनुभव बघता या निधीमध्ये वाढ करण्याचा विचार शासन करणार आहे काय?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, शिष्यवृत्ती देण्यासाठी जो निकष लावला आहे त्यामध्ये विद्यार्थ्यांना परदेशात पाठविण्यासाठी एक समिती असून या समितीमध्ये प्रधान सचिव सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, उच्च तंत्र शिक्षण, संचालक आरोग्य सेवा, संचालक समाज कल्याण, संचालक तंत्रशिक्षण अशा सहा अधिका-यांचा समावेश असून विद्यार्थ्यांच्या मार्क्स प्रमाणे त्यांची निवड करुन विद्यार्थ्यांना परदेशी पाठविले जाते.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जसा अनुसूचित जाती जमातींना फायदा दिला जातो तसाच फायदा भटक्या विमुक्त जातीला दिला जाणार आहे काय ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, अनुसूचित जाती आणि नवबौध्दांसाठी ही विशेष घटक योजना आहे. ही योजना अनुसूचित जाती आणि नवबौध्दांसाठी मर्यादित असल्यामुळे या योजनेत तशा प्रकारची तरतूद करता येणार नाही.

--------------

यानंतर श्री. गायकवाड....

अस्थारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथमश्री.जुन्नरे 10.25

**राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती काळात बसविलेली**
**बिनतारी यंत्रणा देखभालीअभावी बंद पडल्याबाबत**

**(४) * ४५०७१ श्री. अरविंद सावंत , श्री.किरण पावसकर , श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. दिवाकर रावते , श्री. सुरेश जेथलिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाला कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर झाला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात बिनतारी संदेश यंत्रणा बसविली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक जिल्ह्याच्या उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात बेसस्टेशन सुरु करण्यात आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, काही उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या वाहनांवर वायरलेस सेटही व मोबाईल सेट बसविण्यात आले हे खरे आहे काय,
(५) असल्यास, आपत्ती निवारण यंत्रणा काही महिने व्यवस्थित कार्यान्वित होती परंतु आता ती देखभालीअभावी बंद पडली आहे हे खरे आहे काय,
(६) असल्यास, आपत्ती निवारण यंत्रणा अत्याधुनिक करण्याबाबत व सतत सज्ज ठेवण्याबाबत शासनाने खास अशी काही उपाययोजना केली आहे काय ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे,डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता**: (१) हे खरे नाही.
(२) सन १९९३ च्या प्रलंयकारी भूकंपानंतर महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रमा अंतर्गत (MEERP) राज्यात बिनतारी संदेश यंत्रणा बसवलेली आहे.
(३) महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रमा अंतर्गत (MEERP) राज्यात सन १९९६-१९९७ मध्ये सुरु करण्यात आलेले होते.
(४) महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रम (MEERP) अंतर्गत मोबाईल व्हीएचएफ स्टेशन्स उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.
(५) वार्षिक देखभाल करार (AMC) मुदतीत केलेला नसल्याने व्हीएचएफ नेटवर्क काही जिल्ह्यामध्ये काही वेळ खंडीत झालेले होते/आहे.
(६) आपत्ती दळणवळण यंत्रणा सुरु ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यास रु. ३ लाख एवढा निधी देण्यात आलेला आहे. स्थानिक रित्या किंवा सिमोको कंपनीच्या सहाय्याने सदर यंत्रणा पुर्नजिवीत करण्यासाठी आवश्यक त्या सुचना निर्गमित केलेल्या आहेत सदर कार्य प्रगति पथावर आहे. मुंबई शहर येथील दळणवळण यंत्रणा बृहन्मुंबई महानगरपालिका हस्तांतरीत करण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45071....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयाच्या संदर्भात मी मूळ विचारला होता परंतु त्या प्रश्नाला संदिग्ध उत्तर देण्यात आलेले आहे. पहिला प्रश्न असा विचारला होता की " केन्द्र शासनाच्या नॅशनल डिझॉस्टर मॅनेजमेन्ट योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाला कोटयावधी रुपयांचा निधी मंजूर झाला हे खरे आहे काय ? " त्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आले आहे . त्यानंतर मी दुसरा प्रश्न असा विचारला होता की, "असल्यास, सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात बिनतारी संदेश यंत्रणा बसविली आहे हे खरे आहे काय ? या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, " सन 1993 च्या प्रलंयकारी भूकंपानंतर महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रमाअंतर्गत राज्यात बिनतारी संदेश यंत्रणा बसवलेली आहे."म्हणजे प्रत्येक जिल्हयात ही यंत्रणा बसविण्यात आली आहे किंवा नाही या प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले नाही. तेव्हा पहिल्या तीनही प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी मला प्रत्येक जिल्हयाच्या संदर्भात माहिती द्यावी. त्यानंतर मी असा प्रश्न विचारला होता की, आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रमाअंतर्गत मोबाईल व्हीएचएफ स्टेशन उपलब्ध करुन दिलेली आहेत काय? तेव्हा वाहनांवर बिनतारी संदेश यंत्रणा बसविण्यात आली होती काय? तर या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. त्या प्रश्नाची उत्तरे देण्यात यावीत. त्याचप्रमाणे् मला माननीय मंत्रिमहोदयांना शेवटी असे विचारावयाचे आहे की, आपत्ती दळणवळण यंत्रणा सुरु ठेवण्यासाठी प्रत्येक जिल्हयास तीन लाख रुपयांचा निधी केव्हा देण्यात आला होता, त्याचबरोबर स्थानिक रित्या किंवा सिमोको कंपनीच्या सहाय्याने सदर यंत्रणा पुर्नजीवित करण्यासाठी आवश्यक त्या सूचना केव्हा निर्गमित केल्या आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील लातूर आणि उस्मानाबाद या जिल्हयामध्ये 1993 साली भूकंप झाल्यानंतर संपूर्ण राज्यामध्ये अशा प्रकारची यंत्रणा बसविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. 1996-1997 सालापासून सदर निर्णयाची अंमलबजावणी सुरु केली होती आणि महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयामध्ये महाराष्ट्र आपत्कालीन भूकंप पुनर्वसन कार्यक्रमाअंतर्गत अशा प्रकारची यंत्रणा बसविण्यात आली होती. ही यंत्रणा 2000 सालापर्यन्त नियमितपणे सुरु होती . या यंत्रणेच्या माध्यमातून एस.डी.ओ.च्या गाडयांवरसुध्दा अशा प्रकारचे बिनतारी यंत्रणांचे सेटस बसविण्यात आले होते . जिल्हयामध्ये कोठे काही घटना घडली असेल तर त्याची माहिती ताबडतोबीने त्यांना मिळावी याकरिता हे सेटस त्यांच्या गाडयांवर लावण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आले होते परंतु काही जिल्हयामध्ये ही यंत्रणा 2005 नंतर खंडित झाली होती सिमको कंपनी बरोबर जो करार केला होता तो करार संपुष्टात आला होता त्यामुळे हे काम थांबले होते. आता मदत आणि पुनर्वसन कार्य विभागाने हे संपूर्ण काम स्वत:कडे घेण्याचे ठरविले आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्हयामध्ये ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी तसेच भूकंप पूनर्वसन कार्यक्रमाअंतर्गत जो कार्यक्रम आपण राबवतो त्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी तीन लाख रुपये देण्याचे शासनाने ठरविलेले आहे आणि मागच्या वर्षापासून प्रत्येक जिल्हयासाठी तीन लाख रुपये देत आहोत. 2005 नंतर काही जिल्हयातील यंत्रणा खंडित झाली होती त्यानंतर सिंधुदूर्ग, कोल्हापूर, वर्धा नागपूर या जिल्हयात हे काम पूर्ण् झाले असून उरलेल्या जिल्हयामध्ये एक महिन्यात ही यंत्रणा कार्यान्वित होईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, 1996-97 साली ही बिनतारी यंत्रणा बसविण्यात आली होती त्या यंत्रणेच्ी दुरुस्ती करण्याच्या संदर्भात या कंपनीने त्या त्या जिल्हयात जाऊन सेवा दिली नाही हे खरे आहे काय, नवीन यंत्रणा बसविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे तेव्हा ती यंत्रणा बसविणारी कंपनी दर्जेदार आहे काय आणि त्या यंत्रणाची देखभाल करणारी कंपनी उपलब्ध आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सुरुवातीला उत्तर देतांना मी सांगितले होते की हे काम मदत आणि पुनर्वसन विभागाकडून केले जाणार आहे या विभागाच्या मार्फत प्रत्येक जिल्हयासाठी तीन लाख रुपये खर्च करुन ही यंत्रणा कार्यान्वित करीत आहोत त्यामुळे या कामावर आपल्या विभागाचे नियंत्रण राहणार आहे मुंबईच्या शहरात जी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे त्या यंत्रणेचे देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम महानगरपालिकेने स्वत: करण्याचे ठरविले असल्यामुळे मुंबईच्या यंत्रणेचे देखभाल आणि दुरुस्तीचे काम मुबई महानगरपालिकेकडे सोपविलेले आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 45071...

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पहिला प्रश्न असा विचारण्यात आला होता की, केंद्र शासनाच्या नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट योजनेंअंतर्गत महाराष्ट्र शासनाला कोटयवधी रुपयांचा निधी मंजूर झाला हे खरे आहे काय? त्याला "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंटने काहीच पैसे दिले नाहीत काय? याबाबत मागणी केल्यानंतर पैसे मिळतात काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या सी.आर.एफ. मधून पैसे मिळतात त्यामध्ये 25 टक्के निधी महाराष्ट्र शासनाचा असतो. केंद्र शासनाचा 75 टक्के निधी आणि आपला 25 टक्के निधी मिळून भूकंप पुनर्वसनाची कामे किंवा दुष्काळाची जी जी कामे असतील ती सर्व नैसर्गिक आपत्तीच्या हेडखाली करीत असतो. त्या माध्यमातून प्रत्येक जिल्हयाला 3 लाख रुपये देण्यात आले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयाला देण्यात आलेली 3 लाख रुपयांची रक्कम तुटपुंजी आहे असे आपणास वाटत नाही काय? याठिकाणी आपण वार्षिक देखभाल करार केला आहे. त्यासाठी नवीन यंत्रणा बसविण्यात येणार आहे काय? कोणतेही नवीन उपकरण बसविल्यानंतर त्याच्या देखभालीकरिता एक वर्षाचा वार्षिक करार असतो. परंतु पुढील 5 ते 10 वर्षाकरिता आपण करार केला आहे काय?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मागील वर्षीपासून प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे 3 लाख रुपये निधी दिला आहे. हा निधी कमी पडत असल्यामुळे तो वाढवून देण्यात यावा अशाप्रकारची तक्रार करण्यात आलेली नाही. यापुढे मदत आणि पुनर्वसन विभागामार्फत हे काम पूर्णपणे पाहिले जाणार आहे. त्यामुळे आपण म्हटल्याप्रमाणे यापुढील काळात जर काही अडचणी उद्भवल्या तर या विभागामार्फत तज्ज्ञांचा सल्ला घेऊन त्या अडचणी सोडविण्यात येतील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

**सातारा व सांगली येथील पवनचक्क्या कंपन्यांनी**
**जमीन मालकांची फसवणूक केल्याबाबत**

**(५) * ४१९८५ डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. अरविंद सावंत , श्री.परशुराम उपरकर , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. किसनचंद तनवाणी , श्री. अनिल परब** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्रीच्या पठारावर सातारा व पाटण तालुक्यात ठोसेघर, चाळकेवाडी, चिखली, जांब, वनकुरुवडे या गावांच्या परिसरातील पठारावर तसेच सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील वायमळे,बिरणवाडी,गौरगाव धोंडेवाडी येथील चौऱ्याच्या डोंगरावर सुलझॉन, इनरकॉन, आर.आर.बी. मिडा, टाटा मोटर्स या विकासकांच्यावतीने विविध उद्योजकांनी व शेकडो पवनउर्जा कंपन्यांनी मूळ जमीन मालकांची फसवणूक करुन पवनचक्क्या उभारल्याचे माहे मे, २००८ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवनचक्की उभारताना अनेक ठिकाणी मूळ जमीन मालकांना विश्वासात न घेता बोगस खरेदी विक्री-व्यवहार करण्यात आल्याच्या तक्रारी जमीन मालकांनी जिल्हाधिकारी, सातारा प्रांतअधिकारी तेथील तहसिलदार, मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांच्याकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपनिर्दिष्ट कंपन्यांच्या पवनचक्क्यांना तेथील शेतकऱ्यांनी दिनांक ७ मे, २००८ रोजी वा त्या सुमारास टाळे ठोकले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) सातारा जिल्ह्यात अशी बाब नाही. परंतु जिल्हा सांगली येथील कवठेमहाकांळ, तासगाव, शिराळा व खानापूर तालुक्यात पवनचक्क्या उभारण्यात आल्या आहेत. त्याची चौकशी चालू आहे.

(२) नाही. अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

(३) खरे आहे. परंतु कंपनी व्यवस्थापन व शेतकरी यांच्यात आपसात तोंडी तडजोड होऊन लावण्यात आलेली कुलुपे काढण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

ता.प्र.क्र.41985....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या पवन चक्क्यांचा प्रश्न अनेक वेळा विविध माध्यमाव्दारे या सभागृहात मांडण्यात आला. दुर्दैवाने जर सातारा जिल्हयातील प्रश्न असेल तर तो सांगलीकडे वळवावयाचा, आणि साताऱ्यातील शेतकऱ्यांच्या झालेल्या फसवणुकीबाबत काहीच उत्तर द्यायचे नाही याचा मी दोन-तीन वेळा अनुभव घेतला आहे. तुळजाभवानी विंड फार्मने सातारा जिल्हयातील 35 प्रकल्पांसाठी भू विज्ञान खनिकर्म विभागाकडून खोटे ना हरकत प्रमाणपत्र मिळविले म्हणून महा ऊर्जा विभागाने त्यांना काळया यादीत टाकावयाचे ठरविले होते. ही शासनाची स्वत:ची तक्रार नाही काय? तुळजा भवानी विंड फार्म ही कंपनी आपण काळया यादीत टाकली काय? आणि याठिकाणी उत्तरात शासन म्हणते की, "तक्रारी प्राप्त नाहीत." दैनिक सकाळमधील बातमीमध्ये ढेबेवाडी येथे विष्णु दादू चोरगे यांनी पाटण पोलीस स्टेशनला केलेल्या तक्रारीत मृत व्यक्तिच्या नावासमोर अन्य लोकांची छायाचित्रे लावली आणि सहया मृत व्यक्तिच्या नावाने केल्याचे छापून आले आहे. शासन म्हणते की, तक्रार नाही तरमग 5 मृत व्यक्तिच्या नावाने मुखत्यारपत्रे केली अशी तक्रार आली नाही काय? तसेच, विजय दगडू म्हसकर यांनी अशी तक्रार केली की, दुय्यम निबंधक रजनी कुमठेकर यांनी 65 वर्षाच्या वृध्दाऐवजी 25 वर्षाचा खातेदार ग्राह्य मानला. त्याबाबत सुध्दा पोलीस स्टेशनला तक्रार आहे.....

**सभापती** : माननीय सदस्यांनी वैयक्तिक तक्रारीबाबत मंत्री महोदयांना भेटून त्यांच्याकडे लेखी तक्रारी सादर कराव्यात.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये शासनाने "अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त नाहीत" असे म्हटले असल्यामुळे त्याबाबतचा तपशील मला सांगितला पाहिजे. म्हणून मी सभागृहापुढे उदाहरणे देत आहे. त्या संदर्भात मंत्री महोदय उत्तर देतील काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी पवन चक्क्यांच्या संदर्भात हा प्रश्न विचारला आहे. तो विचारतांना सातारा, सांगली या दोन जिल्हयांतील गावांचा उल्लेख केला. त्याचप्रमाणे त्यांनी ढेबेवाडीचे उदाहरण दिले ते खरे आहे. सातारा जिल्हयामध्ये पवन चक्क्या कंपनीने शेतकऱ्यांकडून बोगस जमीन खरेदी केल्याचे आढळले नाही, आणि तशाप्रकारची तक्रार आलेली नाही हेही खरे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 10:35

ता.प्र.क्र.41985 . . . .

डॉ.राजेंद्र शिंगणे . . . .

परंतु काही ठिकाणी म्हणजे उदाहरण द्यावयाचे तर सातारा जिल्ह्यातील चिखली येथे कंपनीने शेत जमिनीचे दर वाढवून द्यावेत यासाठी लोकांनी आंदोलन केले होते आणि पवनचक्क्या बंद केल्या होत्या. आता पवनचक्क्यांचे मालक आणि शेतकरी यांच्यामध्ये तडजोड झाल्यानंतर सदरहू आंदोलन मागे घेण्यात आले. ठेबेवाडी येथे बोगस खरेदीचे व्यवहार झालेले होते. याबाबतीत सब रजिस्टार, पाटण यांच्याकडे करण्यात आलेल्या फिर्यादीवरुन 19 जणांवर गुन्हे दाखल झालेले आहेत आणि त्याबाबतची माहिती माझ्याकडे आहे. या गुन्ह्यामध्ये एकंदर 149 आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी 2 आरोपी मयत झाले असून 11 आरोपी फरार आहेत. त्यांना अटक करावयाची आहे. म्हणून याबाबतीत ज्या तक्रारी आलेल्या आहेत, त्या शासनाने गंभीरपणे घेतलेल्या आहेत. ज्यांच्या-ज्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार झालेली आहे, त्यांच्या बाबतीत चौकशी सुरु आहे. इतर शेतकऱ्यांच्या ज्या तक्रारी होत्या, त्याबाबतीत एस.डी.ओ.यांनी चौकशी करुन त्या बाबतचा अहवाल शासनाकडे पाठविलेला आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना, अगोदर आपले उत्तर वाचले असते तर बरे झाले असते. मघाशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दुसऱ्या प्रश्नामध्ये विचारले आहे की, याबाबतीत काही तक्रारी आलेल्या आहेत काय ? तर याबाबत असे उत्तर देण्यात आले आहे की,"सातारा जिल्हयात अशी बाब नाही." आणि पुढे दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "नाही, अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त नाहीत." मग पोलीस स्टेशनमध्ये ज्या तक्रारी करण्यात आलेल्या आहेत, त्या या संदर्भातील नव्हत्या काय ? पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "सातारा जिल्हयात अशी बाब नाही. परंतु जिल्हा सांगली येथील कवठेमहांकाळ, तासगाव, शिराळा व खानापूर तालुक्यात पवनचक्क्या उभारण्यात आल्या आहेत. त्याची चौकशी चालू आहे." मग कसली चौकशी सुरु आहे ? तर खरे म्हणजे या पवनचक्क्या संबंधितांनी अनधिकृतपणे सुरु केल्या आहेत, विना परवाना सुरु केल्या आहेत आणि मूळ जमीन मालकांची फसवणूक केलेली आहे म्हणून चौकशी सुरु आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही चौकशी कोणत्या बाबतीत सुरु आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्या

. . . .एच-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बाबतीत सांगावयाचे तर सांगली, तासगाव, कवठेमहांकाळ, शिराळा येथील पवनचक्क्यांच्या बाबतीत बोगस खरेदीखत करणे, अतिक्रमण करणे, योग्य दर न मिळणे असे प्रकार घडलेले आहेत आणि तेथे पवनचक्क्या उभारलेल्या आहेत आणि त्यामुळे जमिनीतील पाणी खोल जाणे इ.तक्रारींच्या बाबतीत चौकशी चालू आहे. तसेच कवठेमहांकाळ येथे बोगस खरेदीचे एक प्रकरण निदर्शनास आले असून त्याबाबतीत पोलीस कारवाई सुरु आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, पवनचक्क्यांची ऊंची आणि पवनचक्कीच्या पात्यांची लांबी किती असावी याविषयी प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही नॉर्म्स् तयार केलेले आहेत काय ? असतील तर ते कोणते आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, याठिकाणी जो प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे, त्याच्याशी सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा काही संबंध नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माळरानावरील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत जिव्हाळयाचा आहे. हा विषय प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित करण्यात येतो आणि शासन त्याला थातुरमातूर उत्तर देत असते. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, कवठेमहांकाळ येथे एकच तक्रार प्राप्त झालेली आहे. परंतु एकंदर साडेतीन हजार तक्रारी आल्याचे माननीय अपारंपारिक ऊर्जा मंत्री श्री.विनय कोरे यांनी मागील अधिवेशनामध्ये मान्य केलेले आहे आणि त्याची चौकशी सुरु आहे. परंतु शासन याबाबतीत एक वर्ष झाले तरी देखील धोरण जाहीर करीत नाही, काही निर्णय घेत नाही आणि या तक्रारींच्या बाबतीत घोळ घालण्याचे काम सुरुच ठेवलेले आहे. त्यामुळे कोणत्याही कंपनीच्या विरोधात कारवाई झालेली नाही. कलेक्टर, सांगली यांच्याकडे साडेतीन हजार तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्या कवळेमहांकाळ, तासगाव तालुक्यातील आहेत. या सर्व तक्रारींच्या बाबतीत निर्णय केव्हा घेण्यात येणार आहे ? मी यासंबंधात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेब यांना सांगितले होते की या सर्व तक्रारींची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावी. तर तशा प्रकारे चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी

. . . .एच-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ 10:35

ता.प्र.क्र.41985 . . . .

श्री.नारायण राणे . . . .

सदरहू प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी प्रश्न विचारताना असे सांगितले की, "शासन थातूरमातूर उत्तर देत आहे." सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, हे वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले आहे की, याबाबतीत एकच तक्रार आली आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आता उत्तर ऐकावे. तसेच सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, तो आपण तपासून पहावा. त्यांनी सांगली, सातारा जिल्ह्यातील काही गावांच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या गावांचा उल्लेख केला, त्यासंबंधी माननीय राज्यमंत्र्यांनी उल्लेख केला आहे की, त्या गावात तक्रारच नाही. अन्य गावात तक्रारी आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 41985 ....... श्री. नारायण राणे .....

त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी काही शेतकऱ्यांच्या बाबतीत बोगस कागदपत्रे केलेली आहेत. त्यांची संख्या माझ्याकडे आहे. चिखलीमध्ये काही बोगस कागदपत्रे केली होती. तेथील प्रांत अधिकाऱ्यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन ते परत शेतकऱ्यांच्या नावावर केलेले आहे. अशी प्रकरणे झ ालेली आहेत. काही प्रकरणे कोर्टामध्ये आहेत. 29 प्रकरणांची चौकशी सुरु आहे. ज्यांनी बोगस केलेले आहे किंवा शेतकऱ्यांची फसवणूक केलेली आहे त्यासंबंधीची प्रकरणे चालू आहेत. यामध्ये कोणालाही पाठीशी घालावयाचे नाही. सभापती महोदय, आपण त्या भागातील आहात. त्या ठिकाणी कोणालाही सोडणार नाही. मी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे की, एकालाही वाचवले तर मी सोडणार नाही. या कोणत्या कंपन्या आहेत त्याची माहिती माझ्याकडे आहे. यामध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये हा जो उद्देश आहे त्याच्याशी तडजोड केली जाणार नाही. जी गावे या ठिकाणी नमूद केलेली आहेत त्या ठिकाणी तक्रारी नाहीत. परंतु सांगली आणि सातारा जिल्ह्यातील अन्य गावात तक्रारी आढळून आलेल्या आहेत. त्यांची चौकशी सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे कोणालाही सोडण्याचा किंवा पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही. त्या ठिकाणी रीतसर परवानगी आहे. शासनाच्या धोरणानुसार त्यांना परवानगी दिली जाते. ज्या कंपन्या किंवा त्याची जी माणसे शेतकऱ्यांची फसवणूक करतात त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम शासनातर्फे सुरु आहे.

श्री. दिवाकर रावते : या ज्या पवनचक्क्या आहेत त्यामध्ये कोणत्या आजी आणि माजी मंत्र्यांच्या नावावर पवनचक्क्या आहेत ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आजी आणि माजी मंत्रिमहोदयांसबंधीची यादी माझ्याकडे नाही. याबाबत माहिती घेऊन, तसे असेल तर ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांकडे कोणाची यादी आहे ?

श्री. नारायण राणे : माझ्याकडे कंपन्यांच्या नावांची यादी आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

**कर्नाटकच्या सीमाभागातून आलेल्या हत्तींच्या हैदोसामुळे कोल्हापूर, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतपिकांचे अतोनात नुकसान झाल्याबाबत**

**(६) * ४४१६८ श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. फौजीया खान , श्री.परशुराम उपरकर , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटकच्या सीमाभागातून आलेल्या हत्तीच्या हैदोसामुळे कोल्हापूर, सिंधुदूर्ग जिल्ह्यातील शेतपिकांचे अतोनात नुकसान झालेले असल्याने परराज्यातून येणाऱ्या हत्तींचा बंदोबस्त करण्याच्या उद्देशाने राज्यात हत्ती प्रकल्प उभारण्याच्या प्रस्तावासंदर्भात निर्णय घेण्यात आलेला आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१), (२) व (३) कर्नाटक राज्यातून महाराष्ट्र राज्याच्या हद्दीत शेतीपिके/फळबागायती पिकांची नुकसानी करणाऱ्या वन्य हत्तींचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी हत्तीग्राम प्रकल्प राबविणेबाबत एका पर्यायाचा विचार करण्यात येत आहे. ह्याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. सदर पर्यायामध्ये एका विशिष्ट क्षेत्रामध्ये वन्य हत्तींना बंदिस्त करुन त्यांच्या हालचाली नियंत्रित करण्याचे विचाराधीन आहे.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात आज हत्तींची संख्या किती आहे ? हत्तीग्राम प्रकल्प राबविण्याचे विचाराधीन आहे असे म्हटले आहे. ती संकल्पना काय आहे ? त्याच्यासाठी जी जागा आरक्षित करण्याचा विचार आहे त्यात फॉरेस्टची जमीन आरक्षित करणार की, खाजगी जमीन आरक्षित करणार ? यासाठी केंद्र सरकारकडे काही पाठपुरावा करणार काय ? त्यासाठी परवानगी लागणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर "5" असे आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर "सरकारी जमीन" असे आहे. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर "तिल्लारी प्रकल्प" असे आहे. फॉरेस्टची जमीन आपल्याकडे उपलब्ध आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवलेला आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, गेल्या पाच वर्षापासून हा हत्तींचा प्रश्न आहे. आतापर्यंत किमान आठ बळी गेलेले आहेत आणि अनेक लोक जखमी झालेले आहेत. त्या ठिकाणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

ता. प्र. क्र. 44168 ....... श्री. राजन तेली ....

शेतकऱ्यांच्या पिकाचे आणि शेती-बागायतीचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. या ठिकाणी सातत्याने असेच उत्तर येते. यावर कायमस्वरुपी उपाययोजना शासन करणार की नाही ? या हत्तींना बंदिस्त करुन त्यांच्या हालचाली नियंत्रित करण्याचे विचाराधीन आहे असे म्हटले आहे. या हत्तींचा बंदोबस्त करण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे की नाही ? अजून किती बळी घेणार आहेत ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, याप्रमाणे निश्चितपणे उपायोजना चालू आहे. यासाठी प्रयत्न चालू आहेत. परदेशातील यासंदर्भातील जे अभ्यासक आहेत त्यांना बोलविलेले आहे. श्री. माईक पांडे यांनी स्वत: जागा पाहिलेली आहे. हत्तीग्राम करण्याची योजना आहे. पावसाळा संपल्यानंतर कार्यवाही होईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, यापूर्वी शेतकऱ्यांना जी मदत करण्यात आली त्यामध्ये सन 2006-07 मध्ये 843 शेतकऱ्यांना 1 कोटी 44 लाख रुपये मदत करण्यात आली आहे. सन 2007-08 मध्ये 1 कोटी 49 लाख रुपये मदत करण्यात आली आहे. परंतु नारळ आणि पोफळीच्या झाडांना कमी मदत करण्यात आली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.44168.... श्री.किरण पावसकर...

या नारळ व पोफळीच्या झाडांच्या नुकसान भरपाईपोटी 200 व 1200 रुपये मदत दिली आहे. मागील 5-7 वर्षांपासून या शेतक-यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान झालेले आहे. त्यामुळे सरकार ही मदत वाढवून देणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : मदत वाढविण्यात येणार नाही. कारण संपूर्ण भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वाधिक मदत दिली जात आहे.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

## उल्हासनगर तहसिलदार कार्यालयातील एका लिपिकाने गौण खनिजाच्या रॉयल्टीचे सुमारे १ लाख ४५ हजार स्वत:च वापरल्याबाबत

**(७) * ४२२३१ श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत , श्री सुभाष चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर, तहसिलदार कार्यालयातील एका लिपिकाने गौण खनिजाच्या रॉयल्टीचे सुमारे १ लाख ४५ हजार सरकारी तिजोरीत जमा न करता गेली सहा वर्षे स्वत:च्या फायद्यासाठी वापरल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रक्कमेचा अपहार केल्याप्रकरणी सविस्तर अहवाल लेखापरिक्षकांनी तत्कालीन तहसिलदार यांना सादर केला होता हे ही खरे आहे काय, असल्यास, तत्कालीन तहसिलदार यांनी या अहवालाच्या अनुषंगाने कारवाई करण्याकडे दुर्लक्ष केले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत नेमके काय आढळून आले व त्यानुसार सर्व संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) हे खरे आहे.
(२) व (३) लेखापरिक्षकांच्या अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन तहसिलदार यांनी उपकोषागार अधिकारी, उल्हासनगर यांच्याकडून अभिप्राय मागविले होते. तसेच संबंधित लिपिकाकडून रु.१,४५,६३६/- शासनजमा करुन घेण्यात आलेली आहे. तसेच संबंधित लिपिकांविरुद्ध विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, लेखी उत्तरातील शेवटच्या वाक्यामध्ये "संबंधित लिपिकांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे" असे नमूद केलेले आहे. हा गैरव्यवहार सन 2001-02 मध्ये आढळून आलेला आहे. आज आपण 2008 मध्ये आहोत. पण अद्याप या लिपिकांविरुध्दची विभागीय चौकशी चालू आहे. या लिपिकाने 1 लाख 45 हजार रुपये सरकारी तिजोरीमध्ये जमा केले नाहीत. त्यांना संबंधित तहसीलदारांनी पाठीशी घातले आहे. हे पैसे त्या लिपिकाने जमा केले असले तरी त्या तहसीलदारांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय आणि लिपिकाविरुध्दची डी.इ.किती दिवसामध्ये पूर्ण होईल ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, संबंधित लिपिकाने दिनांक 22.9.2001 ते दिनांक 25.1.2002 पर्यंतची 1 लाख 45 इतकी रक्कम शासकीय तिजोरीत जमा केली नाही. ती रक्कम त्यांनी अनेक वर्षे वापरली आहे.सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे त्या लिपिकाची चौकशी केलेली आहे.त्यांना दिनांक 20.11.2007 रोजी पहिली नोटीस दिली होती.त्यानंतर 9 टक्के दराने

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42231... डॉ.राजेंद्र शिंगणे....

व्याजासह पैसे भरण्याची नोटीस दिली होती. त्यांनी पैसे जमा केलेले असले तरी त्या लिपिकाला ताबडतोब निलंबित केले जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रशासनाचा कारभार कसा चालला आहे त्याचे हे एक उदाहरण आहे. हा भ्रष्टाचार सन 2001-02 मधील आहे. परंतु नोटीस मात्र 2007 मध्ये दिली आहे. दरम्यानच्या काळामध्ये त्यांना नोटीस का दिली नाही ? आज 8 वर्षे झाली आहेत. या खात्याचे कोण मंत्री आहेत, यापेक्षा या सरकारचा कारभार कसा चालला आहे ते दिसून येते. मधल्या काळामध्ये कार्यवाही करण्यास ज्यांनी हलगर्जीपणा केला आहे त्यांच्यावर शासन जबाबदारी निश्चित करणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आल्यावर मी स्वत: ब्रिफिंगमध्ये या लिपिकास ताबडतोब निलंबित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सन 2001 मध्ये साधारणपणे 1.50 लाख रुपये या लिपिकाने शासकीय तिजोरीत भरले नाहीत. त्यांच्यावर 2007-08 मध्ये नोटीस बजावून पैसे भरुन घेऊन त्यांना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचे माझ्या लक्षात आले आहे. त्यामुळे या कार्यवाहीला ज्यांनी विलंब केला आहे त्यांच्याविरुध्द सुध्दा नियम 79 मधील कलम 10 प्रमाणे कारवाई करण्यास सांगितले आहे आणि तशी कारवाई सुरु केलेली आहे.

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

## सन २००८ च्या येत्या हंगामापासून साखर हंगाम नियंत्रण मुक्त करण्याबाबत

**(८) * ४२३२३ श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००८ च्या माहे सप्टेंबरपासून साखर हंगाम नियंत्रण मुक्त करण्यात येणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साखर हंगाम नियंत्रण मुक्त केल्यास साखर कारखान्यांना स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे हे खरे आहे काय, असल्यास, खुल्या स्पर्धेला तोंड देण्याबाबत राज्यातील काही साखर कारखाने सक्षम नाहीत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, साखर हंगाम नियंत्रण मुक्त केल्याने या व्यवसायाला राज्य शासनाचे असलेले आर्थिक मदतीवर नियंत्रण येणार आहे हे खरे आहे काय,

(४) या एकंदर प्रकरणाची नेमकी वस्तुस्थिती काय आहे व याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहेत ?

**श्री.जयप्रकाश दांडेगांवकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता :** (१) शासनाकडे याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी विचारू इच्छितो की, त्यांना या प्रश्नात काही दुरुस्ती करावयाची आहे काय ? कारण आपण साखर हंगाम नियंत्रण मुक्त करण्याबाबत प्रश्न विचारला आहे तर साखर हंगाम नियंत्रण मुक्त करता येत नाही.

श्री.दिवाकर रावते : मला माझ्या प्रश्नामध्ये दुरुस्ती करावयाची नाही. हंगामाध्ये साखर उद्योगच चालतात. हंगामामध्ये इतर उद्योग चालत असतील तर आपण सांगावे. ऊस गाळपाच्या हंगामामध्ये साखरच तयार होते. त्यापूर्वी मळी तयार होते. त्या मळीची विक्री कशाप्रकारे होते हा नंतरचा भाग आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:50

(ता.प्र.क्र. 42323.... (श्री. दिवाकर रावते....

माननीय पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीने साखर उद्योग नियंत्रण मुक्त करण्याची शिफारस केलेली आहे. साखर उत्पादन करणारे महाराष्ट्र हे देशामध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. यामुळे राज्यातील साखर उद्योगावर कोणता परिणाम होईल ? या सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केल्यानंतर, याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नाही असे उत्तर शासनाकडून अपेक्षित नाही. या प्रकरणी मे महिन्यापासून चर्चा होत आहे. देशाच्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे काय ? अहवालाच्या अनुषंगाने साखरेच्या बाबतीत शासनाचे काय धोरण राहणार आहे ? साखर उद्योग नियंत्रण मुक्त करण्याचे धोरण केन्द्राने स्वीकारले तर त्याचे साखर उद्योगावर कोणते परिणाम होणार आहेत ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : छापील उत्तरामध्ये सांगितल्याप्रमाणे याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नाही. तरीही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यासंबंधीची माहिती घेऊन त्याबाबत राज्य शासनाचे मत दिले जाईल. येत्या एक-दोन वर्षामध्ये देशामध्ये आणि जगामध्ये साखरेचा तुटवडा राहणार आहे. यावर्षी पाऊस कमी झालेला आहे. अतिरिक्त ऊस गाळपाविना राहिलेला आहे. पुढील दोन वर्षामध्ये साखर उद्योग तेजीत राहिला आणि साखर उद्योग नियंत्रणमुक्त राहिला तरी कमी गाळपामुळे साखरेचा तुटवडा राहील आणि साखरचे भाव वाढतील असा अंदाज आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**साखर कारखाने अडचणीत असल्याचे सांगून शासनाकडून कोटयावधी रुपयांचे पॅकेज मिळविणाऱ्या राज्यातील 20 कारखान्यांवर प्रशासक नेमण्याबाबतची प्रक्रिया सुरु असल्याबाबत.**

**(9) * 42725 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री सुभाष चव्हाण , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्रीमती मंदा म्हात्रे** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) साखर कारखाने अडचणीत असल्याचे सांगून शासनाकडून कोट्यावधी रुपयाचे पॅकेज मिळविणाऱ्या राज्यातील 20 कारखान्यांवर प्रशासक नेमण्याबाबतची प्रक्रिया सुरु असून ती लवकरच केली जाईल अशी माहिती राज्याचे सहकार आयुक्त यांनी दि. 31 जानेवारी, 2008 रोजी किंवा त्या सुमारास दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणाचे स्वरुप काय आहे राज्यातील अडचणीतील साखर कारखान्यांना राज्यशासन प्रत्येक वर्षी पॅकेज देते तेव्हा राज्य शासनाने राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना गेल्या चार वर्षात कोणकोणत्या साखर कारखान्यांना किती रुपयांचे पॅकेज दिले आहे असल्यास, राज्यातील साखर कारखान्यांनी घेतलेल्या पॅकेज बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर, डॉ.पंतगराव कदम यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) मित्रा समितीच्या शिफारशीनुसार नाबार्ड पॅकेजअंतर्गत प्रस्तावांची फेर छाननी व पुनर्रचना तांत्रिक समितीमार्फत करण्यात आली असून, 88 सहकारी साखर कारखान्यांच्या रुपये 1844.53 कोटी रक्कमेच्या पुनर्रचनेचे प्रस्ताव शिफारशीसह नाबार्डकडे पाठविण्यात आले आहेत.

केंद्र शासनाने दिनांक 7 डिसेंबर, 2007 रोजी जाहिर केलेल्या साखर कारखान्यांना अर्थसहाय्य 2007 योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने 43 सहकारी साखर कारखान्यांना रुपये 33,266.06 लाख व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी 53 कारखान्यांना रुपये 48,997.27 लाख इतकी कर्जाची उचल दिलेली आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : मित्रा समितीच्या शिफारशी नुसार नाबार्ड पॅकेज अंतर्गत प्रस्तावाची फेर छाननी व पुनर्रचना तांत्रिक समिती मार्फत करण्यात आली आहे काय ? हा पुनर्रचनेचा प्रस्ताव नाबार्डकडे केव्हा पाठविण्यात आला ? नाबार्डकडून या कारखान्यांना मदत न दिल्यास त्याबाबतीत शासनाची काय भूमिका राहाणार आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : नाबार्ड आणि केन्द्र शासनाने मित्रा समितीपूर्वी व्ही.एस.आय. महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती नियुक्त केली होती. त्या समितीने 91 साखर

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारखान्यांची शिफारस केली होती. त्यानंतर पॅकेजच्या फेर आढाव्यासाठी मित्रा समिती गठित करण्यात आली. राज्य सहकारी बँकानी कर्ज दिलेले 53 राज्य सहकारी साखर कारखाने, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी कर्ज दिलेले 31 कारखाने आणि नागरी सहकारी बँकांनी कर्ज दिलेले 4 कारखाने असे एकूण 88 कारखाने पात्र आहेत. या व्यतिरिक्त अजून 34 कारखान्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत. याबाबतीत शासन सकारात्मक भूमिका घेऊन त्यांना मदत करील.

श्री. जयंत प्र. पाटील : नाबार्डकडे प्रस्ताव पाठविलेला आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. ही पुनर्रचना करताना ज्यांनी मागील व्याज भरले नाही त्यांना मान्यता दिलेली नाही. अपेक्स बँकांनी ज्या साखर कारखान्यांना कर्ज दिले ते कारखाने सुप्रीम कोर्टाने लिक्विडिशनमध्ये काढलेले आहेत. ज्या जिल्हा मध्यवर्ती बँकांनी, नागरी बँकांनी या कारखान्यांना पैसे दिलेले आहेत त्यांच्या पैशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या बँकांचा पॅकेजमध्ये समावेश करण्याचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : पूर्वी दोन वर्षाचा मॉर्टोरियम पिरिअड होता तो आता 5 वर्षाचा करण्यात आलेला आहे. व्याजाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भात आयडीबीआय, आयएफसीआय, आयसीआयसीआय, एनसीडीसी, एफसीएफ अशा पाच बँका पॅकेजमध्ये फायनान्स करतात. 3टक्के व्याजाच्या प्रतिपूर्तीसाठी 138 कोटी रुपये केन्द्राने दिलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-1

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 10:55

ता.प्र.क्र.42725....

श्री. जयप्रकाश दांडेगावकर....

सन्माननीय सदस्यांनी अवसायनात गेलेल्या सहकारी साखर कारखान्यांना अडचणी निर्माण झाल्या आहेत अशा अनुषंगाने प्रश्न विचारला आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेली बाब तपासून घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

----------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे इंदापूर (ता. महाड, जि. रायगड) येथे मुसळधार पावसामुळे उन्हाळी भातशेतीचे व वीटभट्टीचे मोठ्या प्रामणात झालेले नुकसान**

**(१०) * ४२६३३ श्री.भास्कर जाधव , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इंदापूर ( ता.महाड, जि. रायगड) येथे दि. २० मे, २००८ रोजी वा त्या सुमारास मुसळधार पाऊस पडून उन्हाळी भातशेतीचे व वीटभट्टी मालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, असल्यास, नैसर्गिक आपत्तीतून शेतकरी व वीटभट्टी मालकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच आर्थिक मदत केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे,डॉ. पतंगराव कदम** : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मौजे इंदापूर (ता.महाड,जि.रायगड) येथे दिनांक 20 मे, 2008 रोजी वा त्या सुमारास मुसळधार पाऊस पडून उन्हाळी भातशेतीचे व वीटभट्टी मालकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे काय? अशा प्रकारचा प्रश्न विचारला होता व त्या प्रश्नास शासनाने "नाही" असे लेखी उत्तर दिले आहे. शासन या गोष्टीची फेरचौकशी करुन तेथील भात उत्पादक शेतक-यांना आणि वीटभट्टी मालकांना न्याय देण्याचा प्रयत्न करील काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नासंबंधी मी आजच सकाळी अधिक माहिती संबंधित अधिका-यांकडून घेतली आहे. मौजे इंदापूर या ठिकाणी दिनांक 20 मे, 2008 रोजी फक्त 3 मिलीमीटर पाऊस पडल्याची नोंद झालेली आहे. या पावसामुळे तेथील भात उत्पादक शेतक-यांचे आणि वीटभट्टी मालकांचे नुकसान झाले आहे अशा प्रकारची तक्रार विभागास प्राप्त नव्हती. तरी देखील आमच्या विभागाच्या अधिका-यांनी त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्षात तपासणी केली

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. त्या तपासणीमध्ये भात शेती उत्पादक शेतक-यांचे आणि वीटभट्टी मालकांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याचे आढळून आले नसल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

-------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील कोतवालांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(११) * ४२११० श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री.अरुण गुजराथी , श्री.विक्रम काळे , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्रीमती उषाताई दराडे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , डॉ. एन. पी. हिराणी : तारांकित प्रश्न क्रमांक ४१११० ला दिनांक १० एप्रिल, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोतवालाची एकूण किती पदे मंजूर आहेत,

(२) त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,

(३) कोतवालांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा येत आहे,

(४) तसेच सदरची पदे न भरण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता**: (१) एका सजास एक कोतवाल या शासनाने घेतलेल्या धोरणानुसार राज्यात एकूण १२,६३७ कोतवालांची मंजूर पदे आहेत.

(२) दिनांक ३१.८.२००७ अखेरपर्यंत एकूण २३७३ कोतवालांची रिक्त पदे आहेत.

(३) व (४) दिनांक ३१.८.२००७ अखेरपर्यंत कोतवालांची रिक्त असलेली २३७३ पदे भरण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. सदर रिक्त पदे भरण्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यात येत असून ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर रिक्त पदे भरण्यासंबंधीचे आदेश निर्गमित केले जातील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील कोतवालांची रिक्त असलेली पदे भरण्यासंदर्भात शासनाने कार्यवाही सुरु केलेली असून, त्यासाठी पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद देखील करण्यात आली आहे. शासनाने दिलेल्या उत्तराने माझे समाधान झाले आहे.

श्री. नारायण राणे : धन्यवाद.

-----

५....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृहांच्या इमारतीकरीता जमीन उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१२) * ४४९४३ डॉ. वसंत पवार , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान : तारांकित प्रश्न क्रमांक ४१५३५ ला दिनांक २४ एप्रिल, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती आणि राजुरा तालुक्यातील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृहांच्या इमारतीसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करुन देणेसंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री. नारायण राणे यांच्याकरिता** : (१),(२) व (३) राजुरा तालुक्यातील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतिगृहांच्या इमारतीसाठी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी सर्व्हे क्र.१४९/१ मधील १.२९ हे.आर जमीन सन १९९२ मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे.

जिवती तालुक्यातील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृहांच्या इमारतीसाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांनी मागणी केलेली जागा ही शासकीय नसल्याची बाब स्थळ निरीक्षणामध्ये आढळून आल्याने अन्य जागेचा प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांना तहसिलदार, जिवती यांचेकडून कळविण्यात आलेले आहे. तथापि, अद्याप संबंधित विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक ४४९४३.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. जिवती तालुक्यातील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतिगृहांच्या इमारतीसाठी

६...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांनी मागणी केलेली जागा ही शासकीय "नसल्याची" म्हटले आहे. सदरहू जागा शासकीय "आहे", तथापि सदर जागेचे वाटप यापूर्वीच झालेले असल्यामुळे ती जागा वाटपास उपलब्ध नाही असे वाचावे.

**सभापती** : ठीक आहे.

( उपप्रश्न नाहीत.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

७....

**पुणे शहरातील स्वारगेट येथील सोलापूर-सातारा जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातून जातवैधता प्रमाणपत्राचा गठ्ठाच चोरीला गेल्याबाबत**

**(१३) * ४२९०९ श्री.मोहन जोशी , श्री. संजय दत्त , श्री सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील स्वारगेट येथील सोलापूर-सातारा जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातून जातवैधता प्रमाणपत्राचा गठ्ठाच चोरीला गेल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २००७ च्या सुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत हंडोरे** : (१) होय.

(२) होय, १०० प्रमाणपत्रे असलेली १ प्रमाणपत्र पुस्तिका कार्यालयात आढळत नसल्याचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने स्वारगेट पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली. संबंधित उमेदवारांच्या कार्यालयांना याबाबत अवगत करण्यात आले. तसेच या उमेदवारांच्या नस्तींच्या आधारे पुन्हा प्रमाणपत्रे तयार करुन संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक ४२९०९.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे.

डॉ. नीलम गो-हे : पुणे शहरातील स्वारगेट येथील सोलापूर-सातारा जिल्हयात जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयातून जातवैधता प्रमाणपत्राचा गठ्ठाच चारीला गेल्याबाबत स्वारगेट पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे. या अनुषंगाने विभागाने पुढची कार्यवाही केली आहे. कार्यालयातून जातवैधता प्रमाणपत्राचा गठ्ठाच चोरीला गेला याचा अर्थ तेथील अधिका-यांनी यासंदर्भात पुरेशी सुरक्षितात घेतलेली दिसत नाही. ज्या अधिका-यांनी सदरहू कागदपत्रांची

8...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ४२९०९..... डॉ. नीलम गो-हे

सुरक्षिततेची काळजी घेतली नाही त्या अधिका-यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे ? या कार्यालयात पुन्हा अशा प्रकारे चोरीची पुनरावृत्ती होणार नाही म्हणून सुरक्षिततेच्या बाबतीत शासनाने कोणती दखल घेतली आहे ?

श्री. चंद्रकांत हंडारे : सभापती महोदय, त्या दिवशी सदरहू कार्यालयात प्रचंड गर्दी होती. त्यात जात प्रमाणपत्राचा एक गठ्ठा गहाळ झाला आहे. यासंदर्भात या कार्यालयातील संबंधित कमर्चारी श्री. निलेश इखे यांच्याकडून खुलासा घेण्यात आला आहे.

-------

9.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आटगाव, पुणधे, आसनगाव इतर परिसरातील हजारो एकर वनजमिनीवर परवानगी न घेता कंपन्या उभारल्याबाबत

**(१४) * ४४९८९ श्री.सुमंत गायकवाड , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. वसंत पवार , प्रा. फौजीया खान :**

सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आटगाव, पुणधे, आसनगाव इत्यादी परिसरातील हजारो एकर वनजमिनीवर परवानगी न घेता कंपन्या उभारण्यात आल्याप्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी शहापूर पंचायत समितीच्या सदस्यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ३ ऑगस्ट, २००७ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

सन २००६ मध्ये पुनस्थापित व चौकशीनुसार प्रलंबित अशा मानीव राखीव वनक्षेत्रावर वनेतर कामे झाली आहेत किंवा कसे याबाबत पाहणी करण्यात आली असता त्यात पुणधे, आटगाव व आसनगांव येथे सुमारे ७५ कंपनीधारकांच्या ११८ कंपन्या अनाधिकृतपणे वसलेल्या निदर्शनास आल्या, प्रस्तुत प्रकरणी वनसंवर्धन अधिनियम १९८० तसेच भारतीय वन अधिनियम, १९२७ व त्यातील तरतुदींचा भंग झाल्यामुळे संबंधित कंपनीधारकांना त्यांचेविरुध्द कारवाई का करण्यात येऊ नये याबाबत कारणदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. तसेच सदर कंपनीधारकांनी महसूल विभागाकडून घेतलेली बिनशेती परवानगी रद्द करणेबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांना कळविण्यात आले. तसेच सदर प्रकरणी वनजमिनीवरील अनियमितता झाल्यामुळे आणि अशी प्रकरणे सत्यशोधन समितीपुढे आणून देणेबाबत कंपनीधारकांची यादी जिल्हाधिकारी यांना पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

श्रीमती फौजिया खान : याबाबतीत काय कार्यवाही करण्यात आली ?

१०...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------X-------

यानंतर श्री. कानडे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉइंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एका अत्यंत गंभीर अशा विषयाकडे मी सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. सदनाचे माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांना ठार मारण्याची सुपारी देण्यासंबंधीचे एक पत्र पार्टीच्या प्रमुखाला आलेले आहे. हिरामण चेतन शहा, लक्ष्मी सदन, कोकणनगर, भांडूप यांनी त्यांना पत्र दिलेले आहे. ते पत्र मी आपणांस वाचून दाखवितो.

"Hiraman Chetan Shan,
7/1, Laskhmisadan,
Kokan Nagar, Bhandup (W),
Mumbai.
Dt.- 21/07/2008.

To,

Shri Vasant Shankar Davkhare, Dy. Speaker,
A-3, Bunglow, Opp. Mantralaya,
Madam Kama Road, Churchgate,
Mumbai, 400 032.

Sub :- Benami Cars of MCOCA accused Arun Gawali and Kiran Pujari and Legislative Assembly Protocol Sticker.

Sir,

At present Arun Gawli and Kiran Pujari are arrested in two different cases of MCOCA. Both are friends and share close friendship with Bhandup MLA Sanjay Patil.

It is well known fact that MLA Sanjay Patil shelters Criminals of different gangs. Two months ago one Pramod Pawar and three Bhandup Rashtravadi Office Bearers, all gangsters of ABU SALEM, were arrested in Fire-Arms Haul case by Anti Terrorist Unit, Mumbai wherein imported weapons were seized and they had planned to kill Rashtravadi Leader MLA Vasant Davkhare. Then also MLA Sanjay Patil had visited ATS to get VIP

...2..



Shri Pandurang Fundkar contd...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

treatment to the accused. Pramod Pawar was seen at every function alongwith Sanjay Patil for last two years alongwith Kiran Pujari who is member of Arun Gawali gang.

Kiran Pujari was given supari to kill MLA Vasant Davkhare of Thane, but before he could do it, he was arrested in Suresh Bhagat case."

सभापती महोदय, गंभीर असा हा मुद्दा आहे. माझी आपणांस आग्रहाची विनंती आहे की सन्माननीय उपसभापतींना मारण्याची सुपारी देण्यात आल्यानंतर त्यामध्ये अशा पध्दतीने काही लोकांचा समावेश असेल तर अतिशय गंभीर असे प्रकरण आहे. सदनाचे नेते आणि राज्याचे गृहमंत्री यांनी खरे तर सभागृहात येऊन या पत्राची दखल घेऊन यासंबंधात शासन काय करणार आहे याचा खुलासा केला पाहिजे. माननीय उपसभापतींच्या जिवाला धोका असेल तर बाकीच्या सन्माननीय सदस्यांच्या जिवाचे रक्षण या राज्यात कसे होणार आहे हा प्रश्न निर्माण होतो. राष्ट्रवादी पक्षाच्या ऑफीस बेअररच्या माध्यमातून हे चालले आहे. सदरहू पत्र मी आपणांकडे देत आहे. याची चौकशी झाली पाहिजे आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात येऊन यासंदर्भात स्टेटमेंट केले पाहिजे. कारण ही अतिशय गंभीर अशी बाब आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक अत्यंत गंभीर असे पत्र पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून याठिकाणी सादर केले.या सभागृहाचे उपसभापती सन्माननीय श्री.वसंत डावखरे यांना जिवे मारण्याची दिलेल्या धमकीच्या या अनुषंगाने या पत्रामध्ये उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राष्ट्रवादी पक्षाच्या ऑफीस बेअररकडून हे घडलेले आहे. फार गंभीर प्रश्न आहे. उपमुख्यमंत्री महोदयांनी याठिकाणी सदनात येऊन स्टेटमेंट केले पाहिजे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय,या सदनाचे उपसभापती श्री. वसंत डावखरे यांच्या बाबतीत अशा प्रकारची जिवे मारण्याची धमकी देणारे पत्र माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब

...3..



श्री. रमेश शेंडगे...

फुंडकर यांच्याकडे येणे ही अतिशय गंभीर बाब आहे. याबाबतीत आपण स्वत: जातीने लक्ष घालावे. माननीय उपसभापतींना जिवे मारण्याची धमकी आल्यानंतर गंभीरता दाखवून ताबडतोब कारवाई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली नाही तर उद्या सभापतींच्या आणि नंतर कदाचित यासभागृहातील सदस्यांच्या बाबतीत सुध्दा बरेवाईट होऊ शकते.

...यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे......

त्यापुढे जाऊन मी विनंती करतो की, यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या आमदाराचा उल्लेख झाला आहे. म्हणून या पत्रासंबंधी चौकशी करण्यात यावी. जाणीवपूर्वक कोणी पक्षाची बदनामी करण्याचा, आमदारांची बदनामी करण्याचा प्रयत्न केलेला आहे का? याची पडताळणी करावी. अशा प्रकारे आलेली खुनाची धमकी ही बाब अतिशय गंभीर आहे. याची गंभीर दखल घेत असताना खुनाची धमकी देणाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी अशी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेच आहेत. त्यांना मारण्याची धमकी देण्याबाबतचा हा विषय आहे. सन्माननीय विधानसभा विरोधी पक्षनेते श्री.रामदास कदम यांनी हे पत्र माझ्याकडे पाठविले आहे.

**सभापती** : या ठिकाणी जे पत्र वाचून दाखविले आणि जी बाब माझ्या आणि सभागृहाच्या निदर्शनास आणली आहे ती अत्यंत गंभीर आहे. माननीय उपसभापतींना दिलेली धमकी ही अत्यंत गंभीर बाब आहे. मी सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि या सभागृहाचे नेते श्री.आर.आर.पाटील यांनी आणि गृह विभागाने या संदर्भात सखोल चौकशी करावी अशी सूचना देत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशन उद्या संपणार आहे. याठिकाणी सभागृहाच्या नेत्यांना बोलावणे आवश्यक आहे.

**सभापती** : मी या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे अशी सूचना केलेली आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी वस्तुस्थिती सभागृहासमोर येण्यासाठी आज किंवा उद्या निवेदन करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनामध्ये निवेदने केली जात नाहीत.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशानुसार गृह विभागामार्फत याची चौकशी करण्यात येईल आणि चौकशी करुन त्या संदर्भातील निवेदन करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : गृह विभागाला आजच निवेदन करण्यास सांगावे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांकडून ज्या ज्यावेळी याठिकाणी एखादी बाब मांडली जाते तिचा आदर केला जातो. मी ही अत्यंत गंभीर बाब मानलेली आहे. राज्याचे गृहमंत्री या संदर्भात सखोल चौकशी करतील. शासनातर्फे आज शक्य झाल्यास आज किंवा उद्या या संदर्भात निवेदन करावे. आज या संदर्भात प्राथमिक निवेदन करावे.

श्री.अनिल देशमुख : होय.

-------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ प्रोसीजरसंबंधी</u>**

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय सभापती महोदय, काल प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहात कायम विनाअनुदान तत्वावरील शाळांबाबत निवेदन करण्यास सांगितले होते. सभागृहामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री उपस्थित होते. यासंबंधीचा प्रश्न राखून ठेवण्यात आला आहे. काल विधानसभेत माननीय शिक्षण राज्यमंत्र्यांनी याच प्रश्नासंबंधी निवेदन केलेले आहे. या प्रश्नासंबंधी विधानपरिषद सभागृहात अगोदर चर्चा झाली होती, त्यामुळे आज शासनातर्फे निवेदन केले जावे अशी विनंती करतो.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, यवतमाळ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी विद्यार्थी आमरण उपोषणास बसले आहेत.......

**सभापती** : मी अद्याप औचित्याच्या मुद्याचा विषय पुकारलेला नाही. योग्य वेळी सन्माननीय सदस्यांना संधी दिली जाईल.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.बबनराव पाचपुते (वनेमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 22 जून, 2000 रोजी जळगाव येथे पोलिसांनी केलेला बळाचा वापर व गोळीबार या घटनेबाबतचा न्या.एस.व्ही.जोशी यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल व अहवालावर शासनाने करावयाच्या कार्यवाहीचे ज्ञापन सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : दिनांक 22 जून, 2000 रोजी जळगाव येथे पोलिसांनी केलेला बळाचा वापर व गोळीबार या घटनेबाबतचा न्या.एस.व्ही.जोशी यांच्या चौकशी आयोगाचा अहवाल व अहवालावर शासनाने करावयाच्या कार्यवाहीचे ज्ञापन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------

(नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

......

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमती महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007 चा 41 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला.

.......

**दिवसाच्या कामकाजासंबंधी.**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज आपण शासकीय कामकाज घ्यायचे ठरवले नव्हते. तरी पण आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेमध्ये शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहेत. आज बरेच कामकाज दाखविण्यात आलेले आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये आज अशासकीय कामकाज घ्यावयाचे ठरले होते. आजच्या कामकाज पत्रिकेवरील कार्यक्रम आज पूर्ण होऊच शकत नाही.

**सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये कालचे व आजचे शासकीय, अशासकीय कामकाज करायचे असे ठरले होते. 2-3 शासकीय विधेयके मांडायची अशी देखील चर्चा झाली होती. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये सुरूवातीला म.वि.प.नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दाखविण्यात आला आहे, त्यानंतर म.वि.प.नियम 97 अन्वयेचा प्रस्ताव व तद्नंतर शासकीय विधेयके दाखविण्यात आली आहेत. त्यानंतर अशासकीय कामकाज आहे.

....

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, राज्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. यासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये आहे. तसेच माननीय वित्त मंत्र्यांच्या अर्थसंकल्पावरील भाषणात देखील आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी विधान सभेला अर्थसंकल्प सादर करताना केलेल्या भाषणात असे म्हटले होते की, "राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या जन्मतिथीस एप्रिल 2009 मध्ये 100 वर्षे पूर्ण होत असल्यामुळे सन 2008-09 हे वर्ष शासनाने राष्ट्रसंताचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्याचे योजिले आहे." श्री तुकडोजी महाराज यांची जन्मशताब्दी एप्रिल पासून सुरू झालेली आहे. ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीविरूद्ध एल्गार पुकारून समस्त भारतीय जनता ज्या महाराजांनी जागृत केली त्याचा परिणाम म्हणून चिमूर, आष्टी, बेनवडा, यावली येथे झालेला संग्राम संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. इंग्रजांनी राष्ट्रसंताना अटक करून रायपूर व नागपूर येथील तुरुंगात स्थानबद्ध केले. चीन, पाकिस्तान युद्धाच्या वेळी सीमेवर जाऊन लढणाऱ्या जवानांना प्रोत्साहित केले व लोकांना सैन्यात भरती होण्यासाठी प्रोत्साहित केले. संपूर्ण देशाचा विचार करणारे ते संत होते. या भारतात बंधू-भाव नित्य असू दे असे म्हणून सर्वांना एकत्रित आणण्याची भावना असणारा संत होते. त्यांनी ग्रामगीता लिहून माणसाने जीवन कसे जगावे याचा उपदेश केला. अशा या राष्ट्रसंताची जन्मशताब्दी एप्रिल पासून सुरू झाली. सरकारने अर्थसंकल्पात जाहीर करून सुद्धा कुठल्याही प्रकारची मदत किंवा कार्यक्रम घोषित केलेला नाही. मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा गुरूकुंज आश्रम आहे. या आश्रमाने शासनाकडे निधीची मागणी केली. यासंबंधीची माहिती माननीय वित्त राज्यमंत्र्यांना माहिती आहे. परंतु, शासनाकडून कुठल्याही प्रकारचे उत्तर आश्रमाला मिळालेले नाही. एवढेच नव्हे तर शासनाच माध्यमातून कुठलाही कार्यक्रम घोषित झालेला नाही. येथे माननीय वित्त राज्यमंत्री आहेत, त्यांनी यासंबंधी खुलासा केला तरे बरे होईल असे मला वाटते.

यानंतर श्री.पी.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला आहे. या निमित्ताने मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पाचे काम सुरु असताना अर्थसंकल्प पूर्ण होत येण्याच्या टप्प्यात असताना सर्वप्रथम मी माननीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात एक पत्र देऊन अशी विनंती केली होती की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे हे जन्मशताब्दी वर्ष सुरु झालेले आहे. तोपर्यंत त्याची फारशी चर्चा झालेली नव्हती. परंतु मी पत्र दिल्यानंतर, अर्थसंकल्प अगदी शेवटच्या टप्प्यात असताना अशाच प्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेकांच्या विनंतीला मान देऊन त्याबाबत मान्यता दिली व अर्थसंकल्पामध्ये त्या बाबीचा विशेष उल्लेख केला. त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी याबद्दल काही लोकांबरोबर चर्चा करण्याचा प्रयत्न केला. तसेच सभागृहात अमरावती जिल्ह्याचे माननीय पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख हे उपस्थित आहेत म्हणून सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत योग्य आहे. त्यादृष्टीने जन्मशताब्दी जेव्हा सुरु होते त्या कालावधीत राज्यात कोणकोणते कार्यक्रम घ्यावयाचे यासंबंधी त्यांनी एक बैठक घ्यावी, अशी विनंती मी त्यांना कालच केली होती. आणि गुरुकुंज हा जो त्यांचा आश्रम आहे तेथे जाऊन अथवा त्या लोकांना बोलावून याबाबत तातडीने कोणते कार्यक्रम आखावे याबाबतचा कार्यक्रम त्यांनी तयार करावा, अशी माझी विनंती आहे.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्मशताब्दी निमित्ताने शासन कोणते कार्यक्रम आयोजित करणार आहे आणि त्यादृष्टीने काय तयारी केली आहे याबाबतीत अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी त्या जिल्ह्याचा पालकमंत्री या नात्याने सांगू इच्छितो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची व्याप्ती खूप मोठी होती. त्या अनुषंगाने काही जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्मगावातील लोकांनाही त्यात समाविष्ट करुन घेण्यासाठी माझ्याच अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली असून या लोकांना आपण बोलाविलेले आहे. त्यानुसार हे अधिवेशन संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत या समितीची बैठक घेण्यात येईल व कोणकोणते कार्यक्रम राबवावयाचे तसेच यासाठी आर्थिक व्यवस्था कशी करावयाची यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल. ते झाल्यानंतर वर्षभर हे कार्यक्रम राबविले जातील अशी ग्वाही मी माननीय विरोधी पक्षनेते आणि माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्यासह सभागृहालाही देऊ इच्छितो.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सहार विमानतळाच्या विकाससंदर्भात जीव्हीके या कंपनीला केंद्रशासनाने जे अधिकार दिलेले आहेत त्यासंबंधी मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, हा विषय जरी केंद्राच्या अखत्यारित असला तरी मुंबईतील सहार विमानतळावर सध्या अस्तित्वात असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविण्यासंबंधी या कंपनीने जो निर्णय घेतला होता त्याबाबतीत आपल्याच अनुमतीने सभागृहात मुद्दाही उपस्थित झाला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, काहीही झाले तरी मुंबईतील सहार विमानतळावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलवू देणार नाही. परंतु जीव्हीके या कंपनीने आता अशा प्रकारे पवित्रा घेतलेला आहे की, हा विषय केंद्रशासनाच्या अखत्यारित असल्यामुळे ही जमीन आता केंद्राच्या ताब्यात आहे, येथे केंद्राचाच निर्णय चालतो, येथे राज्याचा संबंध नाही आणि हा पुतळा हलवावयाचा की ठेवावयाचा हा अधिकार संपूर्ण केंद्रशासनाचा, पर्यायाने या कंपनीचा आहे. केंद्राने काहीही ठरविलेले असले तरी माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण जी भूमिका घेतली होती त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, मुंबईतील हे अधिवेशन संपल्यानंतर कदाचित त्यांचे पुतळा हलविण्यासंबंधीचे प्रयत्न होतील. म्हणून आमची अशी विनंती आहे की, या राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या संदर्भात राज्याने घेतलेल्या भूमिकेला अशा प्रकारे खाजगी कंपनी आव्हान देणार असेल तर जनता जनतेच्या पध्दतीने या पुतळ्याचे रक्षण करील, फक्त शासनाने आपल्या पोलिसांना तेथे पाठवू नये. या कंपनीमध्ये एवढी क्षमता येणे ही राज्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे. म्हणून शासनाची याबाबतची ठाम भूमिका सभागृहाला कळलीच पाहिजे. अरबी समुद्रातील छत्रपतींच्या स्मारकाची उंची किती करणार आहात, खाजगीकरणातून उभारणार की कसा अशा गमजा मारण्यापेक्षा अस्तित्वात असलेला पुतळा कसा वाचववयाचा याचा विचार करणे त्यापेक्षा महत्वाचे आहे. एवढा गंभीर विषय असताना जीव्हीके कंपनीच्या संदर्भात शासनाची कोणती भूमिका आहे हे सभागृहाला समजणे आवश्यक आहे.

-------------

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात आश्वासन दिलेले आहे. जीव्हीके कंपनीचा तसेच केंद्रशासनाचा कितीही दबाव आला तरी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सहार विमानतळावरुन हलणार नाही यासंदर्भात शासनाने निवेदन करावे अशी माझी औचित्याच्याद्वारे सूचना आहे.

श्री. अनिल देशमुख ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, हा प्रश्न सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मागच्या अधिवेशनात उपस्थित केला होता त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले होते की, हा प्रश्न जरी केंद्रशासनाच्या अखत्यारीत असला, विमानतळ जरी केंद्रशासनाच्या अखत्यारीत असले, तेथील जागा जरी केंद्रशासनाच्या अखत्यारीत असली, त्या ठिकाणी केंद्रशासन जरी नुतनीकरण करीत असले तरी त्या ठिकाणावरुन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलवू दिला जाणार नाही अशा प्रकारचे निवेदन या सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवेदनाप्रमाणे निश्चितपणे कार्यवाही होईल.

----------

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्द आहे. राज्यामध्ये 16 जून, 2008 पासून शैक्षणिक वर्ष सुरु झाले आहे. नव्याने अभ्यासक्रम सुरु झालेल्या कामामध्ये शिक्षकांनी आपल्या अध्यापनाच्या कामाला सुरुवात केलेली आहे. परंतु शाळा सुरु झाल्यानंतर 8-10 दिवसात सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील शिक्षकांना तालुक्यांच्या तहसीलदारांनी एक परिपत्रक पाठवून प्रत्येक शाळेतील 4-4, 6-6 शिक्षकांना निवडणुकीच्या याद्यामध्ये घरोघरी जाऊन तपासणी करण्याचे तसेच दुरुस्ती करण्याचे काम लावून दिलेले आहे. खरे म्हणजे अध्यापनाचे काम सोडून

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

शिक्षकांना निवडणुकींच्या याद्यामध्ये दुरुस्ती करण्याचे काम लावलेले आहे. यासभागृहात माननीय शिक्षणमंत्र्यांनी मान्य केले आहे की, अशा प्रकारचे कोणतेही काम शिक्षकांना दिले जाणार नाही. तसेच यासंदर्भात आदेश सुध्दा काढण्यात आलेले होते. परंतु तहसीलदार ऐकत नाही व पर्यायाने प्रत्येक शाळेतील 4-4,6-6 शिक्षक निवडणुकींच्या याद्यांच्या कामामुळे शाळेत उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे मी सन्माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, त्यांनी तातडीने यासंदर्भात संबंधितांना आदेश काढावे व आमच्या शिक्षकांची मुक्तता करावी.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, शाळा सुरु होण्यापूर्वी किंवा शाळा सुरु झाल्यानंतर काही शिक्षकांना अशा प्रकारचे काम देण्यात आलेले आहे. परंतु हे काम अतिशय थोडया तासासाठीचे आहे. सदर काम हे राष्ट्रीय काम असल्यामुळे मी सर्व शिक्षक बांधवांना विनंती करतो की, सदर काम एक आठवडयात पूर्ण होणारे आहे, अकारण या कामाचा बाऊ करण्यापेक्षा राष्ट्रीय कामामध्ये शिक्षकांनी आपला सहभाग दर्शवावा अशी माझी विनंती आहे.

-----------

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतक-यांनी शेतीसाठी बँकामधून आणि पतपेढीमधून कर्जे घेतलेली आहेत. आताच जाहीर झालेल्या कर्जमाफी मध्ये शेतक-यांचे कर्ज माफ झालेले आहे. परंतु ज्या शेतक-यांनी नियमित कर्ज भरले त्या शेतक-यांना कर्जमाफीतून वगळण्यात आलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात चौकशी होणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे ज्या पतसंस्थांनी शेतक-यांचे कर्ज रिन्यूअल केले ते कर्ज त्या शेतक-यांच्या नावावर दिसत नसल्यामुळे त्यांना कर्जमुक्तीचा फायदा मिळत नाही. पतसंस्थेतून कर्ज घेतलेल्या शेतक-यांची पाहणी केली तर कागदावर एक आणि प्रत्यक्षात एक अशी परिस्थिती असल्याने यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन कर्ज घेतलेल्या सर्व शेतक-यांना कर्जमाफीचा फायदा मिळून द्यावा या उद्देशाने मी औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, मंत्रालयात आमदारांच्या पीएंना प्रवेश मिळत नाही त्यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा या ठिकाणी मांडलेला आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी आमदारांच्या पीएंना मंत्रालयात 10 ते 2.00 या वेळेत प्रवेश मिळत नाही यासंदर्भात औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे तसेच माझाही तोच मुद्दा आहे.

महोदय, गेली 47 वर्षे आमदारांच्या पीएंना मंत्रालयात प्रवेश मिळत होता परंतु आता आमदारांच्या पीएंना सकाळी 10.00 ते दुपारी 2.00 या कालावधीत प्रवेश दिला जाणार नाही, आमदारांच्या पीएंनी दुपारी 2.00 वाजता इतर नागरीकांप्रमाणेच प्रवेश करावा अशा प्रकारचे आदेश मंत्रालयाकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत. मंत्रालयात जाऊन आमदारांच्या पीएंना जी काही कामे करावयाची असतात ती कामे यापुढे त्यांना करता येणार नाहीत. आमदारांच्या पीएंना मंत्रालयात प्रवेश मिळण्यायाच्या संदर्भात मंत्रालयाद्वारे जे निर्बंध घालण्यात आलेले आहेत ते काढावेत व मंत्रालयात आमदारांच्या पीएंना सकाळी 10.00 वाजेपासून प्रवेश दिला जावा अशी विनंती मी औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 12.25

**सभापती** : माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांची अनेक कामे मंत्रालयाशी ंसबंधित असून त्या कामासाठी सन्माननीय सदस्यांचें स्वीय सहाय्यक मंत्रालयात जात असतात. त्यामुळे सकाळी 10.00 ते दुपारी 2.00 या कालावधीमध्ये जर त्यांना मंत्रालयात प्रवेश दिला गेला नाही तर सन्माननीय सदस्यांची अनेक कामे मार्गी लागणार नाहीत. तेव्हा याबाबतीत आपण स्वत: लक्ष घालावे. या स्वीय सहाय्यकांकडे ओळखपत्रे असल्यामुळे त्यांना मंत्रालयात प्रवेश देण्याच्या बाबतीत काही प्रश्न येणार नाही. या प्रकरणी मी देखील संबंधित मंत्र्यांशी बालेन व आपण देखील यामध्ये लक्ष घालावे

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, यामध्ये मी स्वत: लक्ष घालीन आणि सामान्य प्रशासन विभागाला सूचना देईन.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

पृ.शी : डेक्कन ओडीसी ट्रेनसाठी रेल्वे प्रशासनाने हॉलेज चार्जच्या नावाखाली 30 लाख रुपयांची केलेली मागणी

मु.शी : डेक्कन ओडीसी ट्रेनसाठी रेल्वे प्रशासनाने हॉलेज चार्जच्या नावाखाली 30 लाख रुपयांची केलेली मागणी याबाबत श्री.सजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" परदेशी नागरिकांना पर्यटनासाठी आकर्षित करणारी डेक्कन ओडीसी ट्रेन रेल्वे प्रशासन व महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या विद्यमाने सुरु असून या ट्रेनच्या उत्पन्नातून 50-50 टक्के फायदा दोघांना मिळत असून या ट्रेनच्या प्रत्येक ट्रीपमागे 15 ते 20 लाख रुपये एम.टी.डी.सी.ला मिळत असणे, मात्र नवीन धोरणानुसार रेल्वे प्रशासनाने एम.टी.डी.सी.ला याट्रेनच्या प्रत्येक ट्रीपमागे हॉलेज चार्ज ( वाहनकर ) या नावाखाली रु. 30 लाखाची मागणी करणे, परंतु प्रत्यक्षात नफा 15 ते 20 लाख रुपये असतांना 30 लाख रुपये हॉलेज चार्ज देणे एम.टी.डी. सी.ला परवडणार नसल्याने डेक्कन ओडीसी ट्रेन बंद पडण्याच्या मार्गावर असणे, यासाठी त्वरित रेल्वे प्रशसनास या संदर्भात पुर्नविचार करण्यासाठी राज्य शासनाने करावयाची कार्यवाही या सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय,एका बाजूला शासन आणि त्या विभागाचे मंत्री पर्यटनाचा विकास व्हावा, पर्यटन क्षेत्र वाढावे याकरिता विशेष प्रयत्न करीत आहेत. परदेशी पर्यटकांना पर्यटनासाठी आकर्षित करण्यासाठी डेक्कन ओडीसी ही लक्झुरीअस रेल्वे गाडी एम.टी.डी.सी आणि रेल्वे प्रशासनाच्या विद्यमाने चालविण्यात येत असून एम.टी.डी.सी. आणि रेल्वे प्रशासन यातून होणारा फायदा 50 -50 टक्के घेत आहे. यातील वाहन कर (हॉलेज चार्ज ) रेल्वेने वाढवून तो 30 लाख रुपये करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे.परदेशी पर्यटक आपल्याकडे आकर्षित होतात त्यावर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे . संबंधित खात्याचे मंत्री या बाबतीत प्रयत्न करीत आहेत तेव्हा यासंबंधी काय प्रयत्न करण्यात आलेले आहेत याची माहिती त्यांनी सभागृहाला द्यावी.अशी माझी त्यांना विनंती आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री): सभापती महोदय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि इंडियन रेल्वे यांच्या सहकार्याने राज्यामध्ये डेक्कन ओडीसी ही ट्रेन परदेशी पर्यटकांसाठी चालविली जाते . सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितले की, रेल्वे मंत्रालयाने हॉलेज चार्ज वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. हे खरे आहे.या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, डेक्कन ओडीसी ट्रेन चालविली जाते असून बरेच परदेशी पर्यटक या ट्रेनमधून प्रवास करतात त्यामुळे आपल्याला बराच फायदा झाला आहे. हा चार्ज वाढविण्याचा जो निर्णय रेल्वे मंत्रालयाने घेतलेला आहे तो फक्त महाराष्ट्र राज्यापुरताच आहे असे नव्हे तर देशभर ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या लक्झुरीअस ट्रेन्स चालविल्या जातात त्या बाबतीत तो लागू करण्यात येणार आहे. राजस्थान मध्ये दोन, महाराष्ट्र राज्यामध्ये एक, कर्नाटक राज्यामध्ये एक या प्रमाणे लक्झुरीअस ट्रेन्स चालविल्या जात असून त्यावर या चार्जेस वाढीचा परिणाम होणार आहे.एक महिन्यापूर्वी केन्द्रीय पर्यटन मंत्री श्रीमती अंबिका सोनी मुंबईला आल्या होत्या. त्यावेळी मी त्यांना एक पत्र दिले होते. त्याचबरोबर कालच्या कॅबिनेटच्या बैठकीमध्ये या विषयासंबंधी चर्चा झाली असून माननीय मुख्यमंत्री स्वत: रेल्वे मंत्री श्री.लालू प्रसाद यादव यांना पत्र लिहिणार आहेत त्याचबरोबर श्रीमती अंबिका सोनी यांनी अशा प्रकारचे आश्वासन दिले आहे की, चार राज्याच्या पर्यटन मंत्र्यांचे शिष्टमंडळ रेल्वे मंत्र्यांकडे नेऊन त्यांच्याकडे या विषयासंबंधी चर्चा करण्यात येईल. .हा चार्ज लावण्याचा रेल्वे मंत्रालयाने निर्णय घेतला असून त्याप्रमाणे जर तो लावण्यात आला तर या मुळे लक्झुरिअस ट्रेनची फिजिबिलीटी न राहता त्यातून नुकसान होणार आहे. त्याचा परिणाम केवळ महाराष्ट्रावर न होता चार राज्यांवर होणार आहे. यासाठी माननीय मुख्यमंत्री प्रयत्न करणार आहेत ,त्याचबरोबर केन्द्रीय पर्यटन मंत्रीसुध्दा प्रयत्न करणार आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याचा मुद्दा

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे,तो मी मांडू इच्छिते. सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ इतर मागास प्रवर्गाला आर्थिक सहाय्य करण्यासाठी नेहमीच कार्यरत असून महाराष्ट्र शासनाकडून त्यांना ठोस हमी दिलेली आहे. शासनाने 2001-2004 पर्यंत 75 कोटी रुपयांची हमी दिलेली आहे त्या पोटी तसेच 31.33 कोटी रुपयांच्या परत फेडी पोटी मंहामंडळाने 90 कोटी रुपयांची रक्कम राष्ट्रीय महामंडळाकडून प्राप्त करुन कर्जरुपाने वितरित केली होती. या हमीची मुदत 31. 3.2007 रोजी संपली आहे शासनाकडून पुढील हमी प्राप्त न झाल्यामुळे कर्ज वितरणामध्ये अडचणी येत आहेत अशा प्रकारचे पत्र चेअरमनकडून मला प्राप्त झालेले आहे. त्या आधारे मी या ठिकाणी औचित्याच्या मुद्दा व्दारे विनंती करते की मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी जी महामंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत त्यांना हमी देण्याकरिता, विलंब न लावता ताबडतोब हमी देण्यात यावी.

---

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहामध्ये माननीय अर्थ व नियोजन राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख उपस्थित आहेत. त्यांनी या औचित्याच्या मुद्दयाबाबत नोंद घ्यावी.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, याबाबत नोंद घेण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, कायम विना अनुदानित शाळांना अनुदान देण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी गेल्या 3-4 अधिवेशनामध्ये सातत्याने आवाज उठविण्यात येत आहे. कायम विना अनुदानित शाळांच्या कृती समितीने प्रत्येक अधिवेशनामध्ये या विषयासंबंधी आंदोलन केले आहे. दिनांक 22 जुलै रोजी पुणे येथील शिक्षण संचालकांच्या कार्यालयापुढे कृती समितीने आंदोलन केले. त्यावेळी 5 हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. काल मुंबईमध्ये 200 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आंदोलनासाठी आले असून त्यांनी शुक्रवारपासून याठिकाणी धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. सभापती महोदय, हे अधिवेशन उद्या संपणार आहे. माननीय शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या विषयावरील तारांकित प्रश्नोत्तरावरील चर्चा आपण राखून ठेवली आहे. सभापती महोदय, या मागण्यांबाबत माननीय शिक्षण मंत्र्यांनी आज किंवा उद्या निवेदन करण्यासंबंधी आपण माननीय शिक्षण मंत्र्यांना निदेश द्यावेत अशी माझी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे विनंती आहे.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी या संबंधी योग्य ती नोंद घ्यावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, या राज्यातील अनेक विद्यापीठांना मान्यवर महान व्यक्तिंची नावे देण्याची प्रथा आहे. सोलापूर येथील विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यासंबंधी मागील अधिवेशनामध्ये सूचना केली होती. तेव्हा त्या विद्यापीठाला अहिल्यादेवींचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करावा. अशी या औचित्याच्या मुद्याव्दारे मी पुन्हा मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी दोन औचित्याचे मुद्दे दिले आहेत. त्यांनी पुन्हा अशाप्रकारे दोन औचित्याचे मुद्दे देऊ नयेत असे मी त्यांना सांगतो. आता त्यांनी आपला दुसरा औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील वारकऱ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या यात्रेच्या निमित्ताने सोहळयावरुन परत येत असतांना वारकऱ्यांच्या वाहनांना दोन ठिकाणी अपघात होऊन त्यामध्ये जवळ जवळ 7 वारकरी मृत्युमुखी पडले व अनेक वारकरी जखमी झाले. ह.भ.प.बोदलेकर महाराजांनी मला फोन करुन सांगितले की, विधानसभेमध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात आला असून विधानपरिषदेमध्ये सुध्दा तो उपस्थित करण्यात यावा. तेव्हा या अपघातामध्ये मृत पावलेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 2 लाखाची व जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत तातडीने देण्यात यावी अशी या औचित्याच्या मुद्याव्दारे मी विनंती करीत आहे.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत नोंद घ्यावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. संपूर्ण भारतात आणि खासकरुन महाराष्ट्रातील रायगड जिल्हयात गेल्या वर्ष दीड वर्षापासून अगदी रक्तपात होईपर्यंत आंदोलन झाले. रायगड जिल्हयात महामुंबई सेझच्या प्रकल्पान्वये सुरु असलेले सक्तीचे भूसंपादन थांबवावे आणि सिंचनाखालील क्षेत्र त्यामधून वगळावे याकरिता विधानसभा, विधानपरिषदेमध्ये प्रश्न मांडण्यात आला. त्यानंतर शासनाने त्याबाबत आश्वासन दिले. विशेष करुन दिनांक 24 जुलै 2007 रोजी माननीय प्रा. एन.डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली महामुंबई सेझ क्षेत्रातील हेटवणे प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील सिंचनाखालील क्षेत्र वगळण्याबद्दल शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्वरीत कार्यवाही करु असे आश्वासन दिले होते. तसेच, सेझसाठी रायगड जिल्हयामध्ये सुरु असलेली भूमी संपादन कायद्याच्या कलम 6 ची प्रक्रिया थांबविण्याचे आश्वासन दिले होते. तरीसुध्दा गेल्या एक वर्षामध्ये त्या आश्वासनाबाबत अजून कारवाई करण्यात आलेली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे...

नाही. शेतकऱ्यांच्या आंदोलनाला कृतीची जोड म्हणून दिनांक 24 जुलैपासून माननीय प्रा. एन.डी.पाटील हे उपोषण करीत आहेत. आज त्यांचे वय 80 वर्षाचे असून ते आत्मक्लेष करीत असतांना त्यांना जे.जे. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले आहे. उद्या हे अधिवेशन संपणार आहे. म्हणून मला या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करावयाची आहे की, पुणे जिल्हयातील शेतकऱ्यांनी सेझ प्रकल्प रद्द केला. गोवा राज्याने आमच्याकडे सेझ नको असे जाहीर केले. तेव्हा माननीय प्रा. एन.डी. पाटील यांचे उपोषण शासनाने सोडवावे. तसेच, त्यांच्या मागण्यांबाबत ताबडतोब अंमलबजावणी होण्यामध्ये ज्या अडचणी आहेत, त्याबाबत माननीय सभापतींनी आम्हाला संरक्षण देऊन त्या संदर्भात शासनाला निदेश द्यावेत. असे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे, त्याबाबतीत मला बोलावयाचे आहे. या सदनामध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, जी गावे सिंचनाखालील आहेत, ती वगळण्यात येतील आणि ती जमीन सक्तीने घेतली जाणार नाही. एकीकडे या राज्याचे माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये अशा प्रकारचे आश्वासन देतात आणि दुसरीकडे अधिवेशन संपल्यानंतर वेगळयाच प्रकारचे आदेश काढले जातात, हे प्रकार थांबले पाहिजेत. अशा शेतकऱ्यांच्यावतीने ज्येष्ठ माजी सन्माननीय सदस्य श्री.एन.डी.पाटील हे उपोषणासाठी बसलेले आहेत. त्या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे जो विषय उपस्थित केलेला आहे, त्याला मी पाठिंबा देतो आणि शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन ज्येष्ठ माजी सन्माननीय सदस्य श्री.एन.डी.पाटील यांचे उपोषण कसे सुटेल यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती करतो.

**सभापती** : मी सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री.सुनील तटकरे यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून ज्येष्ठ माजी सन्माननीय सदस्य श्री.एन.डी.पाटील यांनी सुरु केलेल्या उपोषणाच्या बाबतीत लक्ष वेधलेले आहे. ज्येष्ठ माजी सन्माननीय सदस्य श्री.एन.डी.पाटील यांचे उपोषण सुटले पाहिजे. तसेच सी.आर.झेड.च्या संबंधात शेतकऱ्यांची सातत्याने जी मागणी केली जात आहे, ती पूर्ण करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी सदनामध्ये राज्य शासनाचे जे धोरण सांगितलेले आहे, त्याचा पाठपुरावा झाला पाहिजे यादृष्टीने आपण स्वत: लक्ष द्यावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. माझी अशी माहिती आहे की, मुंबईमध्ये आजपर्यंत मलेरियाच्या आजाराने 55 लोक मृत्युमूखी पडलेले आहेत. परंतु दुर्दैवाने राज्य शासन आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यामध्ये कोणताही समन्वय नाही. आज मुंबईमध्ये मलेरियाची साथ आहे, मात्र राज्य शासन आणि महानगरपालिका प्रशासन ते मानण्यास तयार नाही. तसेच सध्या औषधांचाही तुटवडा आहे. राज्य शासन आणि महानगरपालिका प्रशासनाने सांगितले आहे की, 15 ऑगस्ट नंतर फॉगींग मशिन्स् येणार आहेत. म्हणजे आजपासून 15 ऑगस्टपर्यंत या मलेरियाने आजारी असलेल्या लोकांना मरणासाठी सोडणार आहात काय ? याबाबतीत माझी अशी

. . . .टी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

विनंती आहे की, कृपा करुन राज्य शासनाने आणि महानगरपालिका प्रशासनाने एकमेकांमध्ये समन्वय साधून फॉगींग मशीन उपलब्ध करण्याच्या बाबतीत त्वरित व्यवस्था करावी आणि मुंबईमध्ये मलेरियाची साथ आहे असे कमीतकमी जाहीर करावे.

**सभापती** : याठिकाणी वैद्यकीय शिक्षण विभागाचे माननीय राज्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबईमध्ये मलेरियाच्या साथीमुळे लोकांचे मृत्यू झाले आहेत, त्यासंबंधात महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी माननीय राज्य मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांना सांगू इच्छितो की, त्यांनी याबाबतीत स्वत: लक्ष द्यावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मेरा औचित्य का मुद्दा है. कल अधिवेशन समाप्त होने वाला है इसलिए मैं सदस्यों की सुविधा से संबंधित दो-तीन सुझाव रखना चाहती हूं. अधिवेशन काल में सभागृह में आने के लिए आमदार निवास से विधान भवन तक आमदारों के लिए बस की सुविधा प्रदान की गई है. लेकिन एक ही बस की व्यवस्था होने की वजह से आमदारों को विधान भवन तक समय पर पहुंचने में दिक्कत होती हैं. इसलिए मेरा यह सुझाव है कि 4 आमदार निवास के लिए 4 बसों की व्यवस्था की जाए.

दूसरा मुद्दा यह है कि आकाशवाणी भवन के पास के आमदार निवास में जो लिफ्ट लगाई गई है वह हर दो दिन बाद बिगड़ जाती है. लिफ्ट चलते चलते बंद पड़ जाती है जिससे लोग लिफ्ट में फंस जाते हैं. इसलिए मेरा यह सुझाव है कि जल्द से जल्द वहां की लिफ्ट दुरुस्त करने के संबंध में व्यवस्था की जाए.

तीसरा मुद्दा यह है कि सदन में जब माननीय मंत्री जी उत्तर देते हैं तो कभी कभी माननीय आमदार, माननीय मंत्री जी आपस में बातचीत करते रहते हैं जिसकी वजह से कुछ सुनाई नहीं आता है इसलिए मेरा यह सुझाव है कि यहां पर हम सब के लिए ईयर फोन का इंतजाम किया तो अच्छा होगा.

..3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आदिवासी उप योजना क्षेत्रातील 29 शाळा अडीच वर्षापासून अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत. पण मध्येच विभागाने याबाबतीत जी.आर.काढून त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. याबद्दल दि.26-3-2008 रोजी सदनामध्ये चर्चा झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत ताबडतोब कारवाई करावी आणि या शाळांना मूळ जी.आर.प्रमाणे लाभ द्यावा असे सांगितले होते. पण याबाबत अजूनही कार्यवाही झालेली नाही. म्हणून यवतमाळ जिल्हयामध्ये 21 जुलै पासून 100 ते 150 लोकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केलेले आहे. म्हणून शासनाने या विषयाच्या बाबतीत ताबडतोब निर्णय घेऊन सदनामध्ये निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. 21 तारखेला याच सदनामध्ये माननीय ऊर्जा मंत्र्यांनी असे सांगितले की, औद्योगिक पट्टा असलेल्या भागामधील भारनियमनाविषयी विचार केलेला नाही. सदनामध्ये जाहीर केल्यानंतर त्यांनी दुपारी 4.00 वाजता जाहीर केले की, औद्योगिक पट्टयामध्ये भारनियमन चालू झालेले आहे. तेथील प्रत्येक फॅक्टरीमधील किंवा औद्योगिक कारखान्यामधील कर्मचाऱ्यांचे दोन दिवस बुडणार. त्यामुळे नो वर्क नो वेजेस या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना त्याची झळ बसणार आहे. ही झळ संबंधित मालकांकडून कॉन्ट्रिब्युट करावी किंवा त्या कर्मचाऱ्यांचे नुकसान होणार नाही याकडे शासनाने लक्ष द्यावे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नवी मुंबईतील ज्या शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी जमिनी दिल्या त्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल मी या सभागृहामध्ये आवाज उठविलेला आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे तसेच सर्व सन्माननीय सदस्य या शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल विविध स्तरावरुन आवाज उठवित असतात. उद्या हे अधिवेशन संपणार आहे. नवी मुंबईमध्ये ज्या शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्या प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक संस्थांसाठी भूखंड मिळण्याच्या संदर्भात या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यांच्यासाठी जाहिरात काढू नका असे सांगितले होते. माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले होते की, आम्ही जाहिरात काढणार नाही. तशा प्रकारचे आदेश या सभागृहामध्ये दिले होते. तरीही सिडकोने जाहिरात काढली. त्या जाहिरातीमध्ये त्यांनी अट घातलेली आहे की, प्रकल्पग्रस्तांच्या एखाद्या शिक्षण संस्थेला एक भूखंड शाळेसाठी दिला तर कॉलेजसाठी भूखंड देणार नाही किंवा कॉलेजसाठी भूखंड दिला तर शाळेसाठी देणार नाही. काही संस्थांना मात्र 8-9 भूखंड दिलेले आहेत. माझी अशी विनंती आहे की, संबंधित माननीय मंत्रिमहोदयांना सांगून ही जी अट आहे ती काढून टाकण्यात यावी,अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

**सभापती** : सिडकोमधील जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांच्या संस्थेला शैक्षणिक कामाकरिता प्राधान्याने भूखंड द्यावा अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना सांगेन की, सन्माननीय सदस्यांनी या औचित्याच्या मुद्याव्दारे जी मागणी केलेली आहे ती नगरविकास विभागाच्या लक्षात आणून द्यावी.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज मुंबईच्या रस्त्यांवर जे होर्डीन्ग लागलेले आहेत त्यामध्ये अमुलची जाहिरात आहे. त्यांच्या होर्डीन्गमध्ये क्रियेटिव्हिटी असते त्याबद्दल त्यांचे कौतुक करतो. परंतु ती क्रियेटिव्हिटी जेव्हा एखादी मर्यादा ओलांडते आणि हीन पातळीवर जाते त्यावेळी शासनाने त्यामध्ये लक्ष घातले पाहिजे, असे मला वाटते. दिल्लीमध्ये घडलेल्या घटनेच्या आधाराने आज जे होर्डीन्ग लावलेले आहे त्यामध्ये माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना "बिचारा" असे दाखविले आहे आणि श्री. लालकृष्ण अडवाणी आणि श्री. प्रकाश करात यांना "गिधाडे" असे दाखवून ते डॉ. मनमोहन सिंग यांना टोचत आहेत असे दाखवले आहे. माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग तसेच श्री. अडवाणी, श्री. करात यांना या पध्दतीने रंगवणे बरोबर नाही. ते होर्डींग ताबडतोब उतरवावयास लावले पाहिजे. क्रियेटिव्हिटीच्या बाबतीत आमचा आक्षेप नाही. त्यांना प्रतिभा स्वातंत्र्य आहे हे मान्य आहे परंतु ज्यावेळी मर्यादा ओलांडतात त्यावेळी शासनाने कारवाई केली पाहिजे. तशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाला करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, यासंदर्भातच माझा मुद्दा असा आहे की, सध्या टी.व्ही. वर एअर टेलची एक घाणेरडी, अश्लील जाहिरात येते ती ताबडतोब बंद झाली पाहिजे. यासंदर्भात आपण नोंद घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी हे बघावे. या अनुषंगाने काय करता येणे शक्य आहे ते तपासून घ्यावे.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, होय. याची दखल घेऊ. संबंधितांना कळवू.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, टी. व्ही. ची बाब आपल्या हातामध्ये नाही पण होर्डीन्गच्या बाबतीत कारवाई करणे आपल्या हातामध्ये आहे. आजच्या आज ते होर्डीन्ग उतरवावयास लावावे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना सांगू इच्छितो की, टी.व्ही.किंवा अन्य माध्यमातून सभागृहाच्या कामकाजासंबंधीच्या बातम्या प्रसिध्द केल्या जात असल्या तरी त्याबाबत ज्या मर्यादा आहेत ते पाळतील. परंतु त्यासंबंधी काय करता येईल यासंबंधी आपण जरुर लक्ष घालावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी आपल्यालाच विनंती करतो की, प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया यासंबंधी चर्चा करण्यासाठी आपण एक दिवस बसून गांभीर्याने चर्चा करणे आवश्यक आहे. या बाबीबद्दल सगळयांनीच गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. मी यासंबंधी नोंद घेतली आहे.

**सभापती** : मंत्रिमहोदयांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मला एक महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मला आपण औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी उपस्थित करीत असलेला मुद्दा सामान्य वाटत असला तरी तो सर्वांच्या जिव्हाळयाचा व महत्वाचा असल्यामुळे मी तो मांडत आहे.

आपण सर्वोच्च स्थानावर बसला आहात. या राज्याचे हे अधिवेशन चालू असताना या सभागृहात विविध प्रश्नांवर चर्चा होते. चर्चेमध्ये दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य भाग घेत असतात. त्या चर्चेला मंत्रिमहोदयांकडून उत्तरे दिली जातात, काही वेळेला त्यातून शासनाचे धोरण स्पष्ट होत असते. त्यामुळे प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियाकडून सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे अशी आपल्याला नम्र विनंती करतो. यासंदर्भात हक्कभंगाचा प्रस्ताव दाखल करणे योग्य होणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी काल परवा एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला होता. त्याला शासनाकडून धोरणात्मक उत्तर मिळाले होते. त्यासंबंधीचे वृत्त वर्तमानपत्रातून छापून आले आहे. पण त्या वृत्तामध्ये श्री.छाजेड यांचे नावच नव्हते. वर्तमानपत्रामध्ये नाव छापून आणण्याची कला राजकारणामध्ये सर्वांना अवगत होत नाही. ती फार मोठी गोष्ट आहे. ते सर्वांना जमत नाही. सभापती महोदय, या सभागृहाने जनरल माणेकशॉ,परम

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.उल्हास पवार....

पूज्य नानासाहेब धर्माधिकारी यांना श्रध्दांजली वाहिली होती. त्यासंबंधी 1-2 दैनिके सोडली तर इतर कोणत्याही वर्तमानपत्रात त्याबाबतची बातमी छापून आली नाही. त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहातील कामकाजात सहभागी होणा-या सर्वांना समान न्याय मिळावा या मुद्याची कशाप्रकारे दखल घेता येईल असे आपण पहावे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी मांडलेला औचित्याचा मुद्दा अतिशय महत्वाचा व योग्य आहे. मी स्वत: टी.व्ही.पाहताना माझ्या असे लक्षात आले की, सभागृहाच्या कामकाजासंबंधी वाहिन्यांवरुन बातम्या दाखविल्या जातात त्यामध्ये समानता नसते. भारतीय जनता पाटील, शिवसेना, शिक्षकांचे प्रतिनिधी यांचे शॉटस् दाखविले जात नाहीत. ही बाब छोटीशी वाटते, परंतु सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे. वाहिन्यांवरुन कामकाजाच्या क्लीप दाखवित असताना सर्व पक्षाला समान न्याय मिळाला पाहिजे, सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय मिळाला पाहिजे ही आमची साधी भावना आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सभागृहाच्या कामकाजाच्या प्रक्षेपणाच्या संदर्भात विविध वाहिन्यांवरुन क्लीप्स प्रसारित केल्या जातात. त्याबाबत त्यांना कोणत्याही पध्दतीने सूचित करणे आपल्याला शक्य नसले तरी याठिकाणच्या कामकाजाचे समानतेने प्रक्षेपण होईल यादृष्टीने काय करता येईल याबाबत मी स्वत: लक्ष घालतो. सभागृहात जो कॅमेरा आहे तो काही वेळेला सभापतीकडेही येत नाही आणि त्यामुळे आपल्याकडेही कॅमेरा येत नाही असे म्हणण्यामध्ये तथ्य आहे. त्यामुळे संबंधित सर्वांना मी माझ्या दालनामध्ये बोलवून याबाबत काय करता येईल हे जरुर पाहीन. परंतु त्यांनी कक्षा न ओलांडता प्रक्षेपण कसे होईल असे पहावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आम्ही देखील वाहिन्यांवरुन कामकाजाच्या क्लीप्स पाहतो. सभागृहामध्ये मी आज उत्तर दिले असले तरी ते मात्र जुन्याच क्लीप्स दाखवितात. माननीय मुख्यमंत्री दिल्लीला गेले असले तरी त्यांना एखाद्या क्लीपमध्ये दाखविले जाते. क्लीप त्याच दिवसाची दाखविली पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सर्वांना समान न्याय द्यावा असे म्हटले आहे. त्यांच्या सद्भावनेबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पण सर्वांना समान न्याय दिल्यावर भगिनींवर अन्याय होण्याची शक्यता आहे.

नंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, चंद्रकांत पाटील, मुधकर चव्हाण व विनोद तावडे यांनी "राज्यात आदिवासी आश्रमशाळांना शासनाने दिनांक 2 एप्रिल 2008 रोजीच्या शासन निर्णयान्वये परीक्षा अनुदानात रुपये 500 वरुन रुपये 630 दरडोई वाढ केली असून इतर विभागामार्फत चालविल्या जाणा-या शाळांना दिनांक 1 एप्रिल 2007 पासून वाढ करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. प्रकाश शेंडगे, विनोद तावडे, मधुकर चव्हाण व रामनाथ मोते, यांनी "सांगली जिल्हा प्रशासनाने नद्या जोड प्रकल्पाचा आराखडा तयार करणे, सदर आराखड्यास जिल्हा नियोजन आराखड्यातून या वर्षी एक कोटीची तरतूद करणे, सदर प्रकल्पास 12 कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल असे पालकमंत्र्यांनी जाहीर करुनही त्यावर कार्यवाही न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "अन्न व औषध प्रशासन विभागाच्या ठाणे येथील अधिका-यांनी मे. सुभिक्षा ट्रेडिंग सर्व्हिसेस लि.च्या मानकोली नाका, ता. भिवंडी येथील गोदामावर छापा टाकून सदर कंपनीने 5 परवाने वेगवेगळया पेढीच्या नावाने घेतल्याचे आढळणे, तसेच सदर अन्न पदार्थाच्या लेबलवर अनेक त्रुटी आढळल्याने सदर कंपनीवर कार्यवाही करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "सेवा आश्रम विद्यालय, बोयसर, ता. पालघर, जिल्हा ठाणे या विद्यालयातील सुमारे 800 आदिवासी गरीब विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनाची सुमारे 3 लाख रुपये रक्कम सदर विद्यार्थ्यांच्या खोट्या सह्या करुन व मयत विद्यार्थ्यांचे नाव दाखवून मुख्याध्यापक व संस्था चालकांकडून अपहार झाल्याबाबतची तक्रार स्थानिक पोलिसात

..2..

(सभापती...

दाखल करण्यास गेले असता तक्रार दाखल न करुन घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, चंद्रकांत पाटील व संजय केळकर यांनी "अस्तित्वात नसलेल्या एका इमारतीचे बनावट कागदपत्रे बनवून सुमारे 24 जणांना संक्रमण शिबिरातील गाळे वितरित करण्याचा म्हाडातील अधिका-यांनी केलेला प्रयत्न, सदर अधिका-यांवर कार्यवाही करण्याची रहिवाशांकडून होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

आज आलेल्या नियम 93च्या अन्य सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतक-यांचे पैसे खाऊन भ्रष्टाचार केल्या प्रकरणी मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. हा विषय फार गंभीर आहे.

**सभापती** : त्या सूचनेला मी अनुमती नाकारलेली आहे. आज मी 5 सूचना स्वीकारल्या आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शेतक-यांची फसवणूक केलेली आहे, भ्रष्टाचार केलेला आहे, शेतक-यांचे पैसे खाल्लेले आहेत. फार गंभीर विषय आहे. तरी देखील आपण ती नाकारली... धन्यवाद, मला काही बोलायचे नाही...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. कोणत्या विषयावरील नियम 93 अन्वयेच्या सूचना स्वीकारायच्या यासंबंधीचे नियम आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी भ्रष्टाचाराच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिलेली होती. या सदनामध्ये भ्रष्टाचारासंबंधीची चर्चा दोन्ही बाजूकडून झालेली आहे. अशा प्रकारे सदनामध्ये एखादा कागद आपटून आपली प्रतिक्रिया ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी दाखविण्याचा प्रयत्न करणे योग्य आहे असे मला वाटत नाही.

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे बहिर्गमन करतात.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आता जो प्रकार मी सदनामध्ये पाहिला तो काही योग्य नाही असे मला वाटते. आपण बोलत असताना एका पक्षाचे गटनेते कागद आपटतात हे योग्य नाही. शेवटी चेअरला रिस्पेक्ट आहे की नाही ? हे सार्वभौम सभागृह आहे. आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करण्याचा हा जो प्रकार मी पाहिला तो योग्य नाही असे मला वाटते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मला बोलण्याची परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, हा जो प्रकार या ठिकाणी घडला तो कोणालाही शोभा देणारा नाही आणि याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. या निमित्ताने मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, नियम 93च्या सूचनांचे जे विषय येतात त्यासंबंधी आपणास विचारणा करण्याचे ब-याच दिवसापासून माझ्या मनामध्ये होते. नियम 93 अन्वये सूचना देण्याचा विरोधी पक्षाचा हक्क आहे त्याबद्दल दुमत नाही. परंतु 2-2 वर्षा पूर्वी घडलेल्या घटनासंबंधी 93च्या सूचना दिल्या जातात, तसेच जे विषय प्रश्नाच्या माध्यमातून, लक्षवेधीच्या माध्यमातून या सदनामध्ये येऊन गेलेले आहेत त्या विषयावर देखील 93च्या सूचना दिल्या जातात. त्यावर निवेदने आली की पुन्हा चर्चा होते. सत्ताधारी पक्षाला या ठिकाणी कोणती संधी आहे ? नियम 93 अन्वये कोणते विषय मांडले जावेत यासंबंधी डेफिनिशन ठरवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सदनाला सांगू इच्छितो की, कालच नियम समितीची बैठक घेण्यात आली होती, त्या बैठकीमध्ये वेगवेगळया मुद्यांवर चर्चा झाली आहे. नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने देखील या बैठकीत सविस्तर चर्चा झाली आहे. अपवादात्मक परिस्थिती निर्माण झाली, राज्यावर नैसर्गिक आपत्ती आली, सदन चालू असताना दुर्देवाने पोलिसांकडून गोळीबार झाला व त्यात लोक मृत्यूमुखी पडले, अशा विविध गंभीर विषयांच्या अनुषंगाने विरोधी पक्ष सदस्यांकडून नियम 93 ची सूचना देण्यात येत असते. सन्माननीय सदस्यांकडून देण्यात आलेल्या 93 च्या सर्व सूचना स्वीकारणे शक्य नसते. महत्वाची व तातडीची घटना घडली तर त्या अनुषंगाने एखादी 93 ची सूचना स्वीकारली जात असते. ज्या सूचना गंभीर आणि महत्वाच्या वाटतात त्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या मंत्र्यांना सभागृहात निवेदन करण्यासंबंधीचे मी निदेश देत असतो. जे विषय नियम 93 च्या सूचनेचे होत नाहीत अशा सूचनांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारतो. काल झालेल्या नियम समितीच्या बैठकीत माननीय विरोधी पक्ष नेते तसेच प्रा.बी.टी.देशमुख, व अन्य सिनियर सदस्य उपस्थित होते. नियम 93 च्या अनुषंगाने कालच्या बैठकीत सविस्तर चर्चा केली आहे. नियम 93 च्या अनुषंगाने शासनाकडून निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली जातात. ज्या सदस्यांचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवले जाते त्या सदस्यांस फक्त एकच प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी. अपवादात्मक परिस्थितीमध्ये दुसरा प्रश्न विचारण्याची परवानगी द्यावी अशा पध्दतीने बैठकीत चर्चा झाली आहे. सभापती यांनी दिलेला निर्णय एखाद्या सन्माननीय सदस्याला व्यक्तिगत आवडला नाही तर त्या सदस्यांनी दालनात येऊन माझ्या बरोबर चर्चा केली तर ती गोष्ट योग्य हाईल असे मला वाटते. या विषयी यापेक्षा जास्त काही सांगणे योग्य आहे असे मला वाटत नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांच्याकडून जो काही प्रकार घडला That was a spurt of movement. त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यास दुसरा पर्याय होता असे आपण सांगितले. सभागृहात झालेल्या प्रकाराबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या भावना कृपया आपण समजून घ्याव्यात. मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्या अनुषंगाने त्यांनी नियम 93 ची सूचना दिली होती...

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने ज्या बाबी असतात, त्या बाबी सन्माननीय सदस्यांकडून गांभीर्याने मांडल्या जातात. राज्यावर नैसर्गिक आपत्ती आली तर तो विषय नियम 93 चा होऊ शकतो. राज्यात दुर्देवाने पोलिसांकडून गोळीबार झाला व त्यात कोणी व्यक्ती मृत झाल्या तर त्या अनुषंगाने नियम 93 ची सूचना स्वीकृत होऊ शकते. अन्य सूचनांमधील विषय हे नियम 93 च्या निकषात बसत नाहीत म्हणून मी त्या सूचनांना माझ्या दालनात अनुमती नाकारतो. एखादी गंभीर घटना घडली असेल, एखादी तातडीची व महत्वाची बाब असेल, नैसर्गिक आपत्तीची बाब असेल तर अशा विषयांसंबंधीची सूचना स्वीकारीत असतो आणि त्यावर सभागृहात चर्चा करीत असतो. सन्माननीय सदस्यांकडून नियम 93 अन्वये सूचना देण्यात येतात, त्या सूचनेतील विषय महत्वाचे असतात परंतु ते 93 च्या निकषात बसणारे नसतात म्हणून त्या सूचनासंबंधी शासनास निवेदन करण्याचे निदेश देत असतो. कोणत्या सूचना स्वीकारावयाच्या आणि कोणत्या सूचनांना अनुमती नाकारावयाची यासंबंधी सभापतींना संपूर्णत: विशेषाधिकार आहेत. कालच्या बैठकीत नियम 93 च्या बाबतीत सविस्तर चर्चा झाली आहे. त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे देखील उपस्थित होते. सन्माननीय सदस्यांना माझ्या निर्णयाबद्दल काही मत व्यक्त करावयाचे असेल तर त्यांनी माझ्या दालनात येऊन व्यक्त केले पाहिजे, त्यास माझी काही हरकत असणार नाही. नियम 93 अन्वये जी सूचना दिली असेल त्या प्रत्येक सूचनेला मी रिझनींग द्यावे अशी त्यांची अपेक्षा असेल तर ते संसदीय लोकशाही पध्दतीत योग्य नाही असे माझे मत आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ SBT/ KGS/ MMP/ MMP/ 12:00

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल नियम समितीची बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये काही गोष्टी ठरवून घेतल्या आहेत. त्यानुसार सार्वजनिक महत्वाच्या प्रश्नांवर विशेष करुन जोर दिला जाईल. तसेच अधिवेशन काळात जर दुसरे काही महत्वाचे प्रश्न निर्माण झाले किंवा उद्‌भवले असतील तर ते प्रश्न उपस्थित करावेत असे ठरले आहे. माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी याठिकाणी बोलताना असे सांगितले की, 2/2 किंवा 3/3 वर्षापूर्वीचे प्रश्न उपस्थित केले जातात. खरे म्हणजे विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांना प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार आहे. माननीय सदस्य श्री. जाधव यांनी 2/3 वर्षापूर्वीचे प्रश्न उपस्थित केले असे सांगताना उदाहरण दिलेले नाही. त्यांचे वक्तव्य म्हणजे आमच्या अधिकारांवर गदा आणणारे आणि आमचा अवमान करणारे आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी 93 ची सूचना दिली होती ती भ्रष्टाचाराच्या संदर्भातील होती. एका शेतकऱ्याला लुबाडले गेले आहे आणि त्याबाबतीमधील प्रतिज्ञापत्र देखील त्यांच्याकडे उपलब्ध होते. ती सूचना दालनातच नाकारल्यामुळे साहजिकच त्यांचा संताप झाला आणि जे घडायला नको होते ते घडले. विरोधी पक्षनेता म्हणून या प्रकाराबाबत मी दिलगिरी व्यक्त करतो आणि हा विषय येथेच संपवावा अशी आपल्याला विनंती करतो.

------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: क्रीडा प्रशिक्षण केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ.

**मु.शी.**: क्रीडा प्रशिक्षण केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्यामानधनात वाढ करण्याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर, प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

प्रा. वसंत पुरके (शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे यांनी "क्रीडा प्रशिक्षण केंद्रावरील कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ SBT/ KGS/ MMP/ MMP/ 12:00

## निवेदनानंतर

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, राज्यातील 31 क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर क्रीडा मार्गदर्शक, लिपिक, शिपाई व चौकीदार यांची किती पदे भरण्यात आलेली आहेत ? क्रीडा प्रशिक्षकांना 1500 रुपये मानधन दिले जाते हा हास्यास्पद प्रकार आहे. यामध्ये वाढ न करण्याची कारणे कोणती ? खरोखरच क्रीडा क्षेत्राला पुढे न्यायचे असेल तर सध्या या कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करणे आवश्यक आहे ती वाढ शासन केव्हा करणार आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, क्रीडा प्रशिक्षक 29 जिल्हयात नेमले असून 50 ठिकाणी क्रीडा प्रशिक्षण केंद्रे सुरु आहेत. 89 क्रीडा प्रशिक्षक आहेत , 33 लिपिक आहेत आणि 64 शिपाई कार्यरत आहेत. नियम 93 अन्वये जी सूचना मांडलेली आहे त्याचा रोख मुख्यत: सध्या या कर्मचाऱ्यांना जे मानधन देण्यात येते त्यामध्ये वाढ करावी असा आहे. स्वत:च खात्याने या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव तयार केला असून त्यानुसार क्रीडा मार्गदर्शकाला 1500 रुपयांऐवजी 3000 रुपये, लिपिकाला 1200 रुपयांऐवजी 2000 रुपये देण्याचे प्रस्तावित केले आहे. स्वत: खात्यानेच सकारात्मक भूमिका घेऊन प्रस्ताव तयार केलेला आहे.

------

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: कोकण प्रदेशातील नद्यांमधील गाळ काढणे

**मु.शी.**: कोकण प्रदेशातील नद्यांमधील गाळ काढण्याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ. सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे,वि.प.स. यांनी "कोकण प्रदेशातील नद्यांमधील गाळ काढणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

----

....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>निवेदनानंतर</u>**

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, कोकणातील अनेक नद्यांमधील गाळ काढण्याचा विषय या सचनेद्वारे मी उपस्थित केला आहे. विशेषत: चिपळूण येथील वसिष्ठी नदीमधील गाळ काढणे आवश्यक आहे. ज्यावेळी वसिष्ठी नदीला पूर येतो त्यावेळी अर्धे चिपळूण पाण्याखाली असते. 10-12 फूट पाणी शहरामध्ये चढते. याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. याविषयावर चिपळूणमध्ये 1 मे रोजी जलआंदोलन झाले होते. त्यावेळी मी तेथे गेलो होतो. ज्या गांभीर्याने या विषयाकडे पाहिले पाहिजे तेवढे पाहिले जात नाही. गाळ काढला असे कागदोपत्री दाखविले आहे. परंतु जो गाळ काढला तो नदीच्या काठावर टाकला आणि पाऊस पडल्यानंतर पुन्हा नदीत गाळ गेला आहे. या वसिष्ठी नदीमधील गाळ काढण्यासाठी किती खर्च येणार आहे याचा विचार केला तर नदीच्या माध्यमातून करोडो रुपयांची रॉयल्टी शासनाकडे जमा होते.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 12:05

निवेदन क्रमांक-2..... श्री.संजय केळकर....

परंतु ती रॉयल्टीची रक्कम त्याठिकाणी वापरली तर हे काम होऊ शकते. गाळ काढण्याच्या कामाचे एस्टीमेट तयार केले आहे का? हे काम कोणत्या यंत्रणेकडून केले जाणार आहे? खाडीचा भाग आहे त्याठिकाणचा गाळ काढण्याचे काम मेरिटाईम बोर्डाकडून केले जाणार असून इतर ठिकाणचा गाळ काढण्याचे काम वेगळ्या यंत्रणेकडून केले जाणार आहे. परंतु या कामाचे एकत्रित एस्टीमेट तयार केले जाईल का? जे काम सुरु झाले होते ते बंद पडले आहे. हे गाळ काढण्याचे काम युध्द पातळीवर करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली जाणार आहे व हे काम केव्हा सुरु होईल?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, साधारणपणे खाडीच्या मुखाशी असलेल्या भागातील गाळ काढण्यासाठी विशिष्ट प्रकारची यंत्रसामुग्री आवश्यक असते. हे काम मेरिटाईम बोर्डाकडून केले जाते. त्या अलिकडच्या भागातील म्हणजे शहराला आणि गावाला लागून असलेल्या भागातील गाळ काढण्याचे काम जलसंपदा विभागकडून केले जाते. खाडीच्या मुखाशी असलेला गाळ काढला नाही आणि अलिकडच्या भागातील गाळ काढला तर खाडीच्या मुखाशी पुन्हा गाळ साठतो आणि अडचण निर्माण होते. म्हणून कोकण विकास पॅकेजमधून 10 कोटी रुपये या गाळ काढण्याच्या कामासाठी मेरिटाईम बोर्डाला दिले होते, त्यांनी तो निधी फिशरीज विभागाला दिला. उर्वरित भागातील गाळ काढण्याचे काम यांत्रिकी विभागाला दिलेले आहे. चिपळूण नगरपालिकेमध्ये सन 2006-07 मध्ये जवळजवळ 21930 घनमीटर गाळ काढला असून 2005-06 मध्ये 6169 घनमीटर गाळ काढला आहे. शासन त्यांना यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देते. शासनाला नगरपालिकेकडून एवढीच अपेक्षा असते की, ज्या नगरपालिकेच्या हद्दीतील नदी असेल तेथील गाळ काढण्यासाठी संबंधित नगरपालिकेने इंधनाचा खर्च द्यावा. शासनाला तीन पट खर्च करावा लागतो. जर इंधनाचा खर्च दिला तर शासनातर्फे गाळ काढण्यास तयार आहोत असे आम्ही वारंवार चिपळूण नगरपालिकेला कळविले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा माझ्या तालुक्यातील आणि चिपळूण शहरातील प्रश्न आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, कोकण विकास पॅकेज अंतर्गत 10 कोटी रुपये गाळ उपसण्यासाठी दिले. या नदीतील गाळ काढण्याचा आणि कोकण पॅकेजमधील निधीचा काहीही संबंध नाही. ही नदी चिपळूण शहरातून वाहणारी नदी आहे. त्यामुळे चिपळूण शहरात नदीचे पाणी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

घुसते. गेल्या वर्षी पाऊस पडण्यापूर्वी पाटबंधारे विभागामार्फत गाळ काढण्याचे काम सुरु केले. पाऊस सुरु झाल्याबरोबर हे काम थांबले. परंतु कायमस्वरुपी हे काम सुरु राहण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे? तेथील खाडीतून वाळू काढली जाते. या वाळूवर रॉयल्टी न घेता जो कोणी वाळू घेऊन जाईल त्यांच्याकडून इंधनाचा खर्च घेतला जाईल काय? रॉयल्टी न घेता वाळू काढून नेण्यासाठी परवानगी दिली जाईल काय?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, ही धोरणात्मक बाब आहे. एका नगरपालिकेसाठी किंवा एका नदीसाठी अशा प्रकारचा निर्णय घेणे संयुक्तिक होणार नाही. या संदर्भात कॅबिनेटसमोर जावे लागेल. 1/3 रक्कम शासन खर्च करण्यास तयार आहे. फक्त इंधनाचा खर्च नगरपालिकेने द्यावयाचा आहे. माझ्या अमरावती जिल्हयामध्ये ही प्रक्रिया राबविली आहे. आमदार निधीतून आमदार महोदयांनी पैसे दिले. नगरपालिकेकडून अद्याप 12 लाख रुपये येणे शिल्लक आहेत. त्यापैकी एक पैसाही दिलेला नाही. तरी देखील लोकांची अडचण होऊ नये म्हणून शासनाने काम केले आहे. सन्माननीय सदस्यांनी आमदार निधीतून पैसे द्यावेत व चिपळूण नगरपालिकेला सांगून इंधनाचा खर्च दिला तर यांत्रिकी विभाग हे काम करण्यास तयार आहे.

----------

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदन क्रमांक 3 संबंधी**

**सभापती** : नियम 93 अन्वये तिसरे निवेदन नगरविकास विभागाचे आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्री हे विधान सभेच्या सभागृहात आहेत. तत्संबंधातील पत्र त्यांनी मला दिलेले आहे. ते सभागृहात आल्यानंतर सदर निवेदन घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

....

**पृ.शी.**: शासनाने आदिवासी भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता तातडीने देणे

**मु.शी.**: शासनाने आदिवासी भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता तातडीने देणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते व प्रतापराव सोनवणे, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते व प्रतापराव सोनवणे यांनी "शासनाने आदिवासी भागात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता तातडीने देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...2

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी भागात जे शासकीय कर्मचारी काम करतात त्यांच्या प्रोत्साहन भत्त्याचा विषय आहे. मूळ वेतनाच्या व्याख्येमध्ये सध्या ऑागस्ट 2004 पासून 50 टक्के महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये समाविष्ट केलेला आहे. त्यामुळे तो आता महागाई भत्ता राहिलेला नसून मूळ वेतन झालेले आहे. त्याच्याच आधारे कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळत आहे. 6 ऑागस्ट 2002 च्या जी.आर.नुसार मूळ वेतनाच्या 15 टक्के प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. पण विशेष भत्ता समजून तो नाकारला जात आहे. हे काही बरोबर नाही. म्हणून प्रोत्साहन भत्त्याच्यासंदर्भात मूळ वेतन धरताना वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक 50 टक्के महागाई भत्ता त्यामध्ये समाविष्ट करण्याचा शासन पुनर्विचार करणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, दिनांक 1 मार्च 2004 च्या ज्ञापनाद्वारे केंद्र शासनाने, केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांचा 50 टक्के महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये विलिन केला. त्यावर अवलंबून आपण बाकी भत्ते केले. म्हणजे समजा त्याचा पगार पहिल्यांदा हजार रूपये होता, आणि महागाई भत्ता 1000 रूपये होता, तर तो 30 टक्केच रहायचा. त्यामध्ये त्यांनी 50 टक्के ॲड केला आहे. त्यामुळे 1000 रूपयाचे मूळ वेतन होते ते 1500 रूपयावर आले. त्यावर सगळे भत्ते त्यांनी कॅलक्युलेट केले. हा भत्ता आदिवासी क्षेत्रातील बिकट परिस्थिती असलेल्या परिसरामध्ये शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी व तेथे शासकीय कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन प्रोत्साहनपर सवलत आपण दिलेली आहे. त्यामुळे रेग्युलर भत्त्यांचा याच्याशी काहीही संबंध नाही. उद्या त्या कर्मचाऱ्याची नक्षलवादी भागातील किंवा अतिसंवेदनशील भागातून बदली झाली तर हा भत्ता त्याला मिळत नाही. त्यामुळे आपण असे ठरविले आहे की, ज्यावेळी तो त्या भागात काम करत असतो तो पर्यंत प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा. त्याप्रमाणे तो भत्ता आपण त्याला देतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सेवाखंडित सहायकांना शासकीय सेवेत सामावून घेणे

**मु.शी.**: सेवाखंडित सहायकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील यांनी "सेवाखंडित सहायकांना शासकीय सेवेत सामावून घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सेवाखंडित सहायकांना शासन किती कालावधीत सामावून घेणार आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सेवाखंडित हजेरी सहायक यांच्या संबंधातील हा प्रश्न आहे. सदर प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यासंबंधीची प्रक्रिया सुरू आहे. यासंबंधी विधि व न्याय विभागाचे मत घेतले आहे. वित्त विभागाने काही हरकती घेतल्या होत्या. त्याचे उत्तर देखील तयार केलेले आहे. लवकरात लवकर हे प्रपोजल कॅबिनेट समोर नेले जाईल.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पास झालेल्या विद्यार्थ्यांना नापास करण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतल्यामुळे विद्यार्थी-पालकांमध्ये निर्माण झालेला गोंधळ

**मु.शी.**: : पास झालेल्या विद्यार्थ्यांना नापास करण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतल्यामुळे विद्यार्थी-पालकांमध्ये निर्माण झालेला गोंधळ याबाबत श्री.कपिल पाटील, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.सुरेश शेट्टी (उच्च शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.कपिल पाटील, यांनी "पास झालेल्या विद्यार्थ्यांना नापास करण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतल्यामुळे विद्यार्थी-पालकांमध्ये निर्माण झालेला गोंधळ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाच्या लेखी निवेदनाने माझे समाधान झाले असल्यामुळे मी उप प्रश्न विचारू इच्छित नाही.

**सभापती** : ठीक आहे.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सीमा भागातील डी.एड.पदवीधारकांना नोकऱ्या न मिळणे

**मु.शी.**: सीमा भागातील डी.एड.पदवीधारकांना नोकऱ्या न मिळण्याबाबत ॲड.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, ॲड.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी "सीमा भागातील डी.एड.पदवीधारकांना नोकऱ्या न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, लेखी निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सीमा भागातील वादग्रस्त 865 गावातीलच रहिवासी असल्याबाबत वास्तव्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला सादर केला असल्याची खात्री करूनच हा लाभ देण्यात येणार आहे. यासंबंधी मंत्रिमहोदयांनी काही चौकशी केली आहे काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. 865 गावातील किती जणांना याचा लाभ होईल असे आपल्याला वाटते ? दुसरा प्रश्न असा आहे की, दोन आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. ते गुन्हे शासन पाठिमागे घेणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, 865 गावातील विद्यार्थ्यांना निवासी प्रमाणपत्र दिल्यानंतरच लाभ मिळतो. जेव्हा या विद्यार्थ्यांना लाभ देण्यास मान्यता दिली त्याच वेळेस कर्नाटकमध्ये जाऊन डी.एड.केले आहे त्याला महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली नव्हती. हा प्रश्न देखील सभागृहामध्ये आला होता. त्यांना देखील सामावून घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. या विद्यार्थ्यांना सामावून घेताना स्थानिक गुणवत्ताधारक विद्यार्थी आहेत त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून सीईटीची पद्धती सुरू केली आहे. या परीक्षेला सर्वांना बसता येईल.

दुसरा प्रश्न ज्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे, तो मागे घ्यावा असा आहे. ही बाब तपासून पाहिली जाईल.

यानंतर श्री.पी.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील अप्रशिक्षित शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी मिळणे

**मु.शी.**: राज्यातील अप्रशिक्षित शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी मिळणे याबाबत सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, यांनी "राज्यातील अप्रशिक्षित शिक्षकांना नियमित वेतनश्रेणी मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षण सेवक योजना शासनाच्या निर्णयानुसार आणि कोर्टाच्या आदेशानुसार राज्यात आलेली आहे. त्यानुसार तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला शिक्षण सेवक म्हणून ठेवता येणार नाही. तीन वर्षानंतर आम्ही तशी मागणी करु शकतो. म्हणजे तीन वर्षानंतर जर अनट्रेन शिक्षक असतील तर त्या पदाची वेतनश्रेणी मिळणे क्रमप्राप्त आहे. परंतु निवेदनात ज्या पध्दतीने उत्तर दिलेले आहे ते न टिकणारे असेच आहे. पण आम्हाला या छोट्या छोट्या गोष्टींसाठी शासन कोर्टात जायला लावणार काय ? जर कोर्टात गेले तर या शिक्षकांना न्याय मिळेल परंतु सगळ्याच बाबतीत आम्ही कोर्टात जाऊ इच्छित नाही. या निमित्ताने माझी अशी विनंती आहे की, नियमानुसार आम्ही मागणी करतो की, या शिक्षण सेवकांना तीन वर्षानंतर अनट्रेन शिक्षक असतील तर त्यांना अनट्रेन शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याच्या संदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : महोदय, यासंदर्भात आपण एक बैठक घेतली होती. ग्रॅज्युएट व अनट्रेन अथवा ट्रेन शिक्षक आहेत त्यात आदिवासी मुले टिकू शकत नाहीत म्हणून हा निर्णय आपण घेतलेला आहे. साधारणपणे या मुलांना आपण यासाठी 7 वर्षांचा अवधी दिलेला आहे. हा कालावधी संपेपर्यंत या मुलांनी प्रशिक्षित होणे आवश्यक आहे. अनट्रेन पेक्षा सन्माननीय सदस्यांनी त्यांचे मानधन वाढविण्याच्या संदर्भात जर प्रश्न विचारला असता अथवा त्यांची तशी मागणी असेल तर त्याचा जरुर विचार करता येऊ शकतो. आपण या मुलांना तीन वर्षाचा कालावधी दिलेलाच आहे, त्यानंतर त्यांना ऑलरेडी कायम करण्यात येते.

श्री. कपिल पाटील : महोदय, या प्रवर्गाचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी प्रामुख्याने आदिवासी भागातील आदिवासी अप्रशिक्षित शिक्षण सेवकांची पदे निर्माण केली आहेत. त्यात डी.एड. पूर्ण करेपर्यंत अप्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी आणि तीन वर्षे पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी देणार काय ?

प्रा. वसंत पुरके : सध्या तरी ही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 च्या सूचनांबाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : हे अधिवेशन सुरु झाल्यानंतर सभागृहात दिनांक 16 जुलै ते 18 जुलै या तीन दिवसांमध्ये नियम 93 च्या सूचना स्वीकारलेल्या आहेत, त्यांच्यापैकी एकाचेही उत्तर अद्याप आलेले नाही.

**सभापती** : मी स्वत: सर्व विभागांना कळविले आहे की, उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे उद्यापर्यंत या सर्व सूचनांवर निवेदन करायला पाहिजे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, दारव्हा आणि दिग्रसच्या संदर्भात कालच सभागृहात निवेदन व्हायला पाहिजे होते. तसेच आज क्र. 3 वर माझे निवेदन होते, ते आलेले नाही.

**सभापती** : आपले निवेदन उद्या सभागृहात करण्यात येणार आहे.

प्रा. वसंत पुरके : महोदय, माझी अशी विनंती आहे की, अधिवेशनात ज्या विषयांवर चर्चा होते तेच ते विषय पुन्हा पुन्हा निवेदनांच्या रुपाने चर्चेला येतात. म्हणून यासंबंधीची प्रिकॉशन घेतली तर रिपिटेशन होणार नाही.

**सभापती** : आपले म्हणणे योग्य आहे. काही वेळा असे होते की, एखाद्या विषयाच्या अनुषंगाने तारांकित प्रश्न सभागृहात येतात, त्यांची चर्चा होते पण त्याच्या अगोदर नियम 93 च्या सूचना स्वीकारलेल्या असतात, त्यांची निवेदने येत असतात. त्यादृष्टीने सुध्दा आम्ही तपासले की, यात डुप्लिकेशन होता कामा नये या अनुषंगाने आमचे प्रयत्न आहेत. नियम 93 नुसार निवेदन करावयास सांगितले असता सर्व मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, उद्या सभागृहाच्या कामकाजाचा शेवटचा दिवस आहे आणि जास्तीत जास्त निवेदने करावयाची असतील ती सर्व उद्यापर्यंत सभागृहात पोहचली पाहिजेत यादृष्टीने प्रयत्न करावेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(12.20 ते 1.00 मध्यंतर)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

पृ.शी : बीड जिल्हयात आढळून आलेल्या बोगस डॉक्टरांच्या विरुध्द कारवाई न करणे

मु.शी :बीड जिल्हयात आढळून आलेल्या 104 बोगस डॉक्टरांच्या विरुध्द कारवाई न करणे याबाबत श्रीमती उषा दराडे,सर्वश्री अरुण गुजराथी, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" बीड जिल्हयात माहे मे, 2008 अखेरपर्यंत 104 बोगस डॉक्टरांची नोंद करण्यात येते, अद्यापही बोगस डॉक्टरांच्या विरुध्द कोणतीच कारवाई करण्यात न येणे, आणखी बोगस डॉक्टर शोधण्यासाठी तालुकास्तरावर शोध पथक तयार करणे, या पथकात तालुका आरोग्य अधिकारी,नायब तहसीलदार, संबंधित पोलीस निरीक्षक, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांचा समावेश असणे, बोगस डॉक्टर सापडूनसुध्दा त्यांच्याविरुध्द कोणतीच कारवाई होत नसल्यामुळे तेथील नागरिकात पासरलेला तीव्र असंतोष या बोगस डॉक्टरांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याची तेथील नागरिकांची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना "

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( निवेदना नंतर )

श्रीमती उषा दराडे :सभापती महोदय, बीड जिल्हयामध्ये एकूण 104 बोगस डॉक्टर्स आढळून आले असतांना या लक्षवेधी सूचनेच्या निवदनामध्ये असे म्हटलेले आहे की," 28 बोगस डॉक्टर्स आढळून आलेले आहेत व त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली आहे." उर्वरित बोगस डॉक्टर्स केव्हा शोधून काढण्यात येणार आहे आणि त्यांच्या विरुध्द केव्हा कारवाई करण्यात येणार आहे ? त्याचबरोबर राज्याच्या इतर जिल्हयामध्ये बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यात येणार आहे काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, दिनांक 27.5.2008 रोजी जी बैठक बीड येथे घेण्यात आली होती त्या बैठकीमध्ये 28 बोगस डॉक्टर्स प्रॅक्टीस करीत असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि योग्य ती कारवाई केलेली आहे. 28 बोगस डॉक्टर्स सोडून 104 बोंगस डॉक्टरांना नोटीसेस देण्यात आलेल्या असून त्यांनी त्यांचे सर्टिफिकेट जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे असे त्यांना सांगण्यात आलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून हे सर्टिफिकेटस व्हेरिफाय केल्यानंतर जर ते बोगस असल्याचे आढळून आले तर त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या शोध पथकामार्फत राज्यातील इतर जिल्हयामधील बोगस डॉक्टराचा शोध घेण्यात येणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये या प्रश्नासंबंधी पुष्कळ चर्चा झालेली होती . प्रत्येक जिल्हयाच्या स्तरावर जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे डी.एच.ओ.च्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली आहे,गटविकास अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली देखील एक समिती गठीत करण्यात आली आहे इतकेच नव्हे तर महानगरपालिकेचे आयुक्त आणि नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली देखील समिती गठीत केलेली आहे संपूर्ण राज्यात प्रत्येक जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर तीन महिन्यानी , सहा महिन्यांनी शोध मोहीम राबविण्यात येऊन बोगस डॉक्टरांच्या विरुध्द कारवाई करण्यात येते. संपूर्ण राज्यातील किती डॉक्टरांच्या विरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे याची आकडेवारी माझ्याकडे असून सन्माननीय सदस्याना जर ती माहिती हवी असेल तर ती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

25-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) DD 3

VTG/ MMP/ 13=00

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, दर वर्षी प्रत्येक अधिवेशनामध्ये तारांकित प्रश्न,लक्षवेधी सूचना वा अन्य आयुधाच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला जातो .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोगस डॉक्टरांच्या विरुध्द कारवाई करण्याच्या बाबतीत कायद्याची काही अडचण आहे काय ? या बोगस डॉक्टरांना आपण प्रतिबंध का घालू शकत नाही. ? बोगस डॉक्टरांचा शोध घेण्याच्या संदर्भात पथक नेमण्यात आलेले आहे तसेच समित्या गठीत करण्यात आल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे परंतु या संदर्भातील कायद्यात काही त्रृटी असतील तर त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने वा प्रशासकीय सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

श्री.सुरेश् शेट्टी : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये बोगस डॉक्टरांच्या संदर्भात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात येते आणि दोन्ही सभागृहामध्ये त्यासबंधी चर्चा होत असते ही गोष्ट खरी आहे. या मुद्याच्या संदर्भात गेल्या तीन महिन्यापासून विभागामध्ये सुध्दा बरीच चर्चा झालेली आहे. बोगस डॉक्टर्स कसे असतात याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, होमियोपॅथी किंवा युनानीची पदवी घेतलेला डॉक्टर ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करतो त्याचबरोबर काही डॉक्टरांकडे कोणत्याही प्रकारची पदवी नसतांना ते होमियोपॅथी, युनानी किंवा ॲलोपॅथ्ीची प्रॅक्टीस करीत असतात व दवाखान्याच्या बोर्डावर ए टू झेड पर्यन्तची कोणती तरी पदवी लिहिलेली असते. त्याचबरोबर आणखी काही बोगस डॉक्टर्स कसे असतात याबाबतीत मी आपल्याला उदाहरण देतो.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

एखादी व्यक्ती श्री. सुरेश शेट्टीच्या नावाने विद्यापीठामध्ये अर्ज करते की, माझे प्रमाणपत्र हरविले असून मला नवीन प्रमाणपत्र देण्यात यावे. अशाप्रकारे नवीन प्रमाणपत्र घेऊन ती व्यक्ती दुसऱ्या गावामध्ये जाऊन प्रॅक्टिस करते. परंतु ज्यावेळी तपास केला जातो त्यावेळी ओरिजिनल सर्टिफिकेट असते परंतु व्यक्ती दुसरी असते. अशा वेगवेगळया प्रकारे बोगस डॉक्टर आपली प्रॅक्टिस करीत असतात. त्याकरिता आम्ही असा निर्णय घेत आहोत की, जे डॉक्टर्स प्रॅक्टिस करण्यासाठी आपला नवीन दवाखाना सुरु करतात त्यावेळी त्यांनी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये जाऊन त्याबाबत नोंद करण्याची आवश्यकता आहे. त्या डॉक्टर्सनी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये जावे आणि सांगावे की, मी आपल्या ज्युरिडिक्शनमध्ये प्रॅक्टिस करीत असून माझे प्रमाणपत्र आणि माझ्या दवाखान्याचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे. अशी व्यवस्था जर सर्व विभागामध्ये केली तर 90 टक्के बोगस डॉक्टर्सचे प्रकार थांबतील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, जे डॉक्टर्स दवाखाना उघडू इच्छितात त्यांनी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये जाऊन आपले प्रमाणपत्र दिले पाहिजे. I think is a humiliation त्यापेक्षा आपण असे करावे की, आपल्याकडे आयुर्वेदिक कौन्सिल आहे, होमियोपॅथिक कौन्सिल आहे, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल आहे, युनानी कौन्सिल आहे त्यांचे अधिकारी अशाप्रकारची नोंद करतात. आपण या कौन्सिलचा संपूर्ण आढावा घ्यावा. मध्यंतरी आयुर्वेदिक कौन्सिलसंबंधी प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी 1100 लोक बोगस मिळाले. तेव्हा अशाप्रकारे कौन्सिलचा आढावा घेऊन एक समिती नेमून ज्या कौन्सिलमध्ये सर्टिफिकेट रजिस्टर झाले आहे त्याची इलिजिबिलिटी आणि सादर केलेले डिग्री सर्टिफिकेट खरे आहे की नाही ? याचा तपास करुन दोषींवर आपण कारवाई करणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी याठिकाणी सूचना सांगितली होती. माननीय सदस्यांचा या विषयामध्ये जर जास्त इंटरेस्ट असेल तर त्यांच्याबरोबर बसून चर्चा करण्यास माझी तयारी आहे. मी आपणास सांगतो की, मेडिकल कौन्सिल किंवा आयुर्वेदिक कौन्सिलमध्ये सुध्दा अशाप्रकारची नोंद होते. माझ्या विधानसभा मतदारसंघामध्ये मी पदयात्रा करीत असतांना एका विभागात 8 बोगस डॉक्टर पाहिले. त्यावेळी त्याठिकाणी केलेल्या भाषणामध्ये मी ही दुकाने उद्या बंद केली नाहीत तर मी कारवाई करीन असे सांगितले. त्यापैकी 8 पैकी 7 दुकाने बंद करुन ते डॉक्टर निघून गेले. आणि 1 डॉक्टर आपले स्वत:चे सर्टिफिकेट घेऊन आला. तेव्हा अशाप्रकारे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी...

झोपडपट्टयांमध्ये हे बोगस डॉक्टर काम करतात. त्यांचे प्रमाण मुंबईमध्ये जास्त आहे. त्यांच्याकडे डिग्री नसल्यामुळे ती रजिस्टर करण्याचा प्रश्न नाही, ते कॉलेजमध्ये गेलेले नसतात. परंतु तरीदेखील ते त्याठिकाणी दवाखान्यात बसून प्रॅक्टिस करतात. माननीय सदस्य हयुमिलिएशन होणार असल्याचे सांगत आहेत. परंतु दवाखाना उघडण्यापूर्वी शॉप्स अँड एस्टॅब्लिशमेंट ॲक्टनुसार नोंदणी करावी लागते. त्याचप्रमाणे आपण आपल्या खोलीमध्ये पेईंग गेस्ट म्हणून एखाद्या व्यक्तिला ठेवतो त्यावेळी त्या पेईंग गेस्टचे नाव व पत्ता याची नोंद स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये जाऊन आपल्याला करावी लागते. तरीसुध्दा माननीय सदस्यांची इच्छा असेल तर याबाबत एकत्र बसून चर्चा करण्यात येईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, बोगस डॉक्टरचे समर्थन करणे किंवा बोगस डॉक्टर्सना पाठिंबा देण्याचा माझा हेतू नाही. सभागृहातील या विषयी असलेल्या भावनांशी मी सहमत आहे. हे डॉक्टर्स शहरामध्ये प्रॅक्टिस करीत नाहीत, ग्रामीण भागात प्रॅक्टिस करतात. ज्याठिकाणी हॉस्पिटल नाहीत, डॉक्टर जाऊ शकत नाहीत अशा ठिकाणी ते प्रॅक्टिस करतात. रात्री-अपरात्री विंचू दंश किंवा सर्प दंशामुळे आजार उदभवला किंवा एखाद्या गरोदर महिलेला त्रास झाला तर शहराच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी कोणतीही सुविधा नसते. अगदी इंटेरिअरमध्ये सोयी-सुविधा नसलेल्या ठिकाणी शासनाच्या नियमाविरुध्द हे डॉक्टर्स चोरी-छुपे हा व्यवसाय करीत असतात. त्यामुळे अशा डॉक्टर्सवर आपण बंदी आणीत आहात त्याला माझा विरोध नाही. अशाप्रकारे विंचू दंश किंवा सर्प दंश झाल्यानंतर अशा नागरिकांवर उपचार करण्यासाठी शासनाकडे कोणती उपाय योजना आहे हे मंत्री महोदयांनी सांगावे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:10

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, याठिकाणी आपण बोगस डॉक्टरांच्या बाबतीत चर्चा करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी येथे जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याबाबतीत उत्तर द्यावयाचे म्हटले तर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संपूर्ण पॉलिसी संबंधात चर्चा करावी लागेल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी बोगस डॉक्टरांच्या संबंधात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली असून, त्यामध्ये बीड जिल्हयाचा संदर्भ दिलेला आहे. तेथे किती बोगस डॉक्टर आहेत हे सन्माननीय सदस्यांना या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून दाखवयाचे आहे. परंतु मुंबई शहरामध्ये सुध्दा बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट आहे . . . .

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, जनावरांचा डॉक्टर होण्यासाठी चार वर्षाचा कालावधी लागतो. पण सहा महिन्यामध्ये आर.एम.पी.सर्टीफीकेट आणून लोकांच्या जीवनाशी खेळ खेळण्यात येतो. आज मुंबई शहरातील निरनिराळया झोपडपट्टयांमध्ये जे डॉक्टर क्वॉलिफाईड नाहीत, त्यांचा सुळसुळाट होत आहे आणि त्यांच्यावर शासनाचे नियंत्रण असले पाहिजे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे यासंबंधात कायदा करणार आहात काय ? जेणकरुन बोगस डॉक्टरांना पायबंद बसेल.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

-----

**उपसभापती** : यानंतर लक्षवेधी क्रमांक 3 चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, त्यापूर्वी लक्षवेधी सूचना क्र.2 चर्चेसाठी घ्यावयाची आहे.

**उपसभापती** : दुसऱ्या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत जे सन्माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत, ते सध्या विधानसभेमध्ये एका लक्षवेधी सूचनेच्या विषयावर उत्तर देत असल्याने ती नंतर चर्चेकरिता घेईल. आता तिसऱ्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल.

. . . .2 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मलकापूरहून कोल्हापूरकडे जाणाऱ्या एस.टी.बसला झालेला भीषण अपधात

**मु. शी.** : मलकापूरहून कोल्हापूरकडे जाणाऱ्या एस.टी.बसला झालेला भीषण अपघात यासंबंधी श्री अरुण गुजराथी, श्रीमती फौजिया खान,सर्वश्री जितेंद्र आव्हाड,हेमंत टकले, रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मलकापूर एस.टी. डेपोची मलकापूरहून कोल्हापूरकडे जाणाऱ्या एस.टी. बसची व टाटा सुमो यांची दिनांक 9 जून 2008 रोजी समोरासमोर धडक झाल्याने भीषण अपघात होऊन 16 ठार व 50 जखमी झाल्याची घटना घडणे, तसेच मृतांची संख्या वाढण्याची व्यक्त होत असलेली भीती, एस.टी. महामंडळातर्फे मृतांच्या नातेवाईकांना तातडीची मदत म्हणून 5 लाख रुपये परंतु जखमींना पाच हजार रुपये अशी अल्पशी मदत देणे, यामुळे जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व चिंता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.हसन मुश्रीफ (परिवहन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, मलकापूरहून कोल्हापूरकडे जाणाऱ्या एस.टी.बसची व टाटा सुमो यांची समोरासमोर घडक झाली आणि फार मोठा अपघात झाला. यामध्ये 16 जणांचा मृत्यू झाला. त्यातील 15 जण हे एस.टी.मधून प्रवास करीत होते. माझा असा प्रश्न आहे की, ज्या ठिकाणी हा अपघात झाला, तेथे अगोदर अपघात झालेला होता काय ? म्हणजे जर एकाच ठिकाणी वारंवार अपघात होत असतील तर सार्वजनिक बांधकाम विभाग आणि परिवहन विभाग एकत्रित बैठक घेऊन याबाबतीत विचार करणार आहेत काय ? तसेच एस.टी.मधून जे प्रवासी प्रवास करतात, त्यांचा एस.टी.महामंडळाने विमा उतरवून घ्यावा. यासाठी एका तिकिटामागे 5-10 पैसे सरचार्ज लागला तरी हरकत नाही. तेव्हा अशा प्रकारचा विमा उतरविण्याच्या बाबतीत शासन विचार करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, येथे जो अपघात झालेला आहे, त्याठिकाणी यापूर्वी अनेक लहान-मोठे अपघात झालेले आहेत. परंतु एवढा मोठा अपघात पहिल्यांदाच झालेला आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाबरोबर एकत्र बसून येथील वळण कसे काढून टाकता येईल यादृष्टीने आम्ही निश्चितपणे चर्चा करु. दुसरी गोष्ट म्हणजे दरवर्षी एस.टी.महामंडळ इन्शुरन्स फंड तयार करते. दरवर्षी 36 कोटी रुपये जमा होतात आणि अपघातामध्ये जे लोक जखमी होतात, त्यांना यामधून पैसे दिले जातात. परंतु सन्माननीय सदस्यांनी इन्शुरन्स कंपनीच्या बरोबर विमा योजना सुरु करावी अशी जी सूचना केली आहे, ती बाब तपासून पहाता येईल.

----

. . . .2 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पू. शी.** : अंधेरी, साकीनाका, मुंबई येथील मे. मिस्त्री प्रभुदास मानजी

इंजिनिअरिंग प्रा.लि. या कंपनीने जमीन विकण्याचा घेतलेला निर्णय

**मु. शी.** : अंधेरी, साकीनाका, मुंबई येथील मे. मिस्त्री प्रभुदास मानजी इंजिनिअरिंग प्रा.लि. या कंपनीने जमीन विकण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी श्री.किरण पावसकर, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" अंधेरी, साकीनाका, मुंबई येथील मे. मिस्त्री प्रभुदास मानजी इंजिनिअरिंग प्रा. लि. ही कंपनी दिनांक 7 एप्रिल 2007 रोजी पासून बंद केली असून आजतागायत तेथील 154 कामगारांना देय असलेली देणी देण्यात न येणे, या कंपनीच्या विरोधात औद्योगिक न्यायालयात सन 1999 पासून प्रलंबित असलेली प्रकरणे, असे असताना कामगार आयुक्त, मुंबई यांनी सदर कंपनी मालकाला आस्थापनेच्या जमिनीचा विकास करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शासनाकडे माहे सप्टेंबर, 2007 च्या सुमारास शिफारस करण्यात येणे, या शिफारशीनुसार सदर कंपनीला शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, कंपनीतील काही कामगारांची नुकसान भरपाई कायदेशीररित्या देणे अद्याप बाकी असणे, आधी कामगारांची देणी व नंतर विकास असे शासनाचे आदेश असूनही या कंपनी मालकांनी कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संगनमत करुन जमिनी विकण्याचा घेतलेला निर्णय, याबाबत शासनाने चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच कामगारांची रास्त देणी लवकरात लवकर देण्याची नितांत गरज, या प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

. . . .2 एफ-5



**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 एफ-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जी माहिती देण्यात आलेली आहे, ती संपूर्ण असत्य आहे. याचे कारण निवेदनामध्ये पहिल्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "व्यवस्थापनाने दिनांक 7-4-2007 रोजी हा उद्योग बंद केला." परंतु प्रत्यक्षात 1999 मध्ये हा

उद्योग बंद झालेला आहे. त्यानंतर 2001 मध्ये न्या.लाड यांच्याकडे जानेवारी ते ऑगस्ट पर्यंतचा पगार मिळावा यासाठी केस फाईल केली होती. याचा केस क्र.145/1999 आहे. परंतु सर्व कर्मचाऱ्यांनी पगार न घेता विकासकाला ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या बाबतीत आयुक्तांना अशी कोणती घाई झाली होती ?

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

दुसरा प्रश्न असा की, याच पध्दतीने या औद्योगिक नगरीमध्ये बहुतांश कंपन्या बंद झालेल्या आहेत. लाखो कामगार बेरोजगार झालेले आहेत. अशा पध्दतीने आयुक्त सर्वांना ना हरकत प्रमाणपत्र देणार असतील तर ते बरोबर नाही. पुष्कळ उद्योगधंद्यामध्ये मालकांना पैसे मिळाले परंतु कामगारांना काही मिळाले नाही. त्याचे हे एक जिवंत उदाहरण आहे. याबाबत शासन खुलासा करील काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मे. मिस्त्री मानजी इंजिनियरींग प्रा.लि. ही कंपनी 7.4.2007 ला बंद झाली. त्या ठिकाणी ज्या दोन युनियन्स आहेत त्यापैकी महाराष्ट्र जनरल कामगार महासंघ ही मान्यता प्राप्त युनियन आहे. या मान्यताप्राप्त युनियनने यूएलपी तक्रार क्रमांक 206/2005 औद्योगिक न्यायालयाकडे केली. औद्योगिक न्यायालयामध्ये या दोघात म्हणजे ही युनियन आणि व्यवस्थापनामध्ये समेट झाला. त्या समेटाच्या अनुषंगाने कामगारांना देय असलेली रक्कम ठरली. त्या अनुषंगाने कामगारांनी ती रक्कम घेतली. एकूण 16 कामगार रक्कम घ्यावयाचे शिल्लक आहेत. त्यांची रक्कम देण्याची तयारी व्यवस्थापनाने केलेली आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, शासनाच्या या आदेशाच्या अनुषंगाने कामगार आयुक्तांनी दिनांक 19.10.2007 रोजी सदर उद्योगास ना हरकत प्रमाणपत्र जारी केलेले आहे. माझ्याकडे प्रमाणपत्राची प्रत आहे. त्याच्यावर उपायुक्त श्री. वाय. डी. निकम यांची सही आहे. हे प्रमाणपत्र 12 जुलै, 2007 ला देण्यात आले आहे. अशा दोन वेगवेगळ्या तारखा देण्याची गरज का भासली ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, 19.10.2007 रोजी ना हरकत प्रमाणपत्र जारी केले आहे. कामगार खात्याने दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने शासनाने 26.9.2007 रोजी ना हरकत प्रमाणपत्र देण्याविषयी संमती दर्शविलेली आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, 1999 पासून ही कंपनी बंद झालेली आहे. या कंपनीच्या मालकांने आतापर्यंत कामगारांना पैसे देण्याच्या बाबतीत शासनाने दिलेला प्रत्येक आदेश डावललेला आहे. त्यांना भविष्यनिधी कायद्याच्या अंतर्गत तसेच इतर कायद्याच्या अंतर्गत शिक्षा झालेल्या आहेत. शासनाचा कोणताही निर्णय न मानण्यासाठी ते प्रसिध्द आहेत. ज्या कामगार

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

ॲड. अनिल परब ....

युनियनबरोबर त्यांनी करार केला त्या कायदेशीर मान्यता नसलेल्या युनियनला हाताशी धरुन करार केला. बऱ्याचशा कामगारांनी त्यांचा करार स्वीकारलेला नाही. भारतीय कामगार सेना मान्यताप्राप्त युनियन म्हणून काम करीत आहे. मान्यताप्राप्त युनियनला डावलून केवळ काही कामगारांना हाताशी धरुन, सरकारची परवानगी घेऊन कारखाना निकाली काढला जातो. मुंबईतील महत्वाच्या जागा विकल्या जात आहेत. अशा मालकांवर योग्य ती चौकशी करुन ताबडतोब कारवाई करणार काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, त्या आस्थापनेमध्ये एकूण 186 कामगार होते. त्यापैकी 170 कामगारांनी त्यांना देय असलेली रक्कम घेतलेली आहे. त्या ठिकाणी महाराष्ट्र जनरल कामगार महासंघ या मान्यताप्राप्त युनियनने औद्योगिक न्यायालयामध्ये केस दाखल केली होती. परंतु व्यवस्थापन आणि या कामगार संघटनेमध्ये समेट झाला त्यामुळे कोर्टातील केस काढण्यात आली. आता न्यायालयामध्ये अशा स्वरुपाची कोणतीही केस नाही. त्या ठिकाणी कामगारांचे देणे व्यवस्थापन देत असताना शासनाने किंवा कामगार आयुक्तांनी सहकार्य केले अशी बाब या ठिकाणी नमूद करण्यात आलेली नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय सभागृहाला चुकीची माहिती देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितले की, 1999 मध्ये कंपनी बंद झाली. शासनाचे असे म्हणणे आहे की, कंपनी 2007 मध्ये बंद झाली. शासनाचे असे म्हणणे आहे की, त्या ठिकाणी एकच मान्यताप्राप्त युनियन होती. भारतीय कामगार सेना ही मान्यताप्राप्त युनियन नव्हती काय ? ही कंपनी 1999 मध्ये बंद झाली. त्यानंतरचा पत्रव्यवहार आपल्यासमोर आहे. आपल्या खात्याशी देखील पत्रव्यवहार केलेला आहे. 15 फेब्रुवारी, 1999 ला भारतीय कामगार सेनेने औद्योगिक न्यायालयामध्ये एमआरटीयू आणि टीयूएलपी या कायद्याखाली कायदेशीर नोटीस पाठवली होती ती शासनाकडे आहे काय ? 25 फेब्रुवारी, 1999 ला न्यायाधीश आर.एम.मुळे यांनी डिसेंबर 1998 आणि जानेवारी 1999 मध्ये या कामगारांचे पगार न्यायालयात जमा करावेत असे सांगितले होते, हे खरे आहे काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

तिसरा प्रश्न असा आहे की, दिनांक 11 जानेवारी, 2001 रोजी माननीय न्यायाधीश लाड यांनी जानेवारी ते ऑगस्ट पर्यंतचा कामगारांचा पगार देण्यात यावा असा निर्णय दिला आहे. कोर्टाने असा निर्णय दिला असेल तर त्यांनी कोणत्या अधिकारामध्ये सन 2007 मध्ये कंपनी बंद केली ? त्यासाठी शासनाकडे काय पुरावा आहे ? उर्वरित 70-80 कामगारांचा पगार पूर्वीलक्षीप्रभावाने देण्यात येईल काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, कामगारांच्या या तंटयामध्ये 99 मध्ये ही कंपनी बंद झ ाली. त्या कंपनीचे उत्पादन बंद झाले. परंतु ती कंपनी बंद पडण्याची प्रक्रिया 2007 साली सुरु झ ाली. औद्योगिक न्यायालयामध्ये याबाबत केस दाखल झाल्यानंतर औद्योगिक न्यायालयाच्या बाहय ठिकाणी दोन्ही युनियन्स आणि मालक यांच्यामध्ये करार झाला. त्यानुसार 186 पैकी 170 कामगारांना त्यांची देणी दिल्यानंतर कामगारांचा वाद राहिला नसल्यामुळे कामगार न्यायालयाने कंपनी बंद करण्यास संमती दिली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, त्या कामगारांची देणी शिल्लक आहेत.

ॲड.अनिल परब : कंपनी बंद करीत असताना एमआरटीपी खाली मान्यता घ्यावी लागते, तशी मान्यता मिळालेली नाही.

श्री.गणेश नाईक : त्या कंपनीतील 16 कामगारांचे वेतन व्यवस्थापन देण्यास तयार आहे. युनियनने केलेल्या कराराच्या अनुषंगाने ठरलेले आहे. ते देणे देण्याच्या अनुषंगाने निदेश देण्यात आलेले आहेत आणि त्यांनी ते देण्याची तयारी दाखविली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मे.मेस्त्री मानजी सारख्या अनेक कंपन्या आहेत. त्या कंपन्यांचे कामगार रस्त्यावर आहेत. ही वस्तुस्थिती असताना शासनाकडून मालकाला मदत केली जाते. रियल इस्टेट सारखे कामगार आयुक्त काम करीत असतील तर त्यासाठी शासन कायदा तयार करणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : अशाप्रकारची बाब माझ्या निदर्शनास आणली तर त्या अधिका-यांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आमची कामगार सेना मान्यताप्राप्त संघटना आहे. या कामगार सेनेला विश्वासात घेऊन कामगारांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने शासन पाऊल उचलेल काय, इतर अनधिकृत कामगार संघटना असतील त्या बंद केल्या जातील काय आणि यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करतो असे मंत्रिमहोदय उत्तर देतील काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, 186 पैकी 170 कामगारांनी आपला हिशेब पूर्ण करुन घेतला आहे. राहिलेल्या 16 कामगारांची देय रक्कम व्यवस्थापन देण्यास तयार आहे. 16 कामगारांना देणी दिली नाही अशाप्रकारची तक्रार केली तर विभागाच्या अधिका-यांना पाठवून त्या अधिका-यांच्या समक्ष त्या कामगारांना देणी देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : राज्यातील विडी कामगारांपैकी काही कामगारांना ओळखपत्र व किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळणे

**मु. शी.** : राज्यातील विडी कामगारांपैकी काही कामगारांना ओळखपत्र व किमान वेतनापेक्षा कमी वेतन मिळणे यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सोलापूर, अहमदनगर, पुणे, नाशिक, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात विडी व्यवसाय चालत असून, पाच लाख विडी कामगारांमध्ये ९७ टक्के महिला कामगार असणे, देशात फक्त ४४ टक्के महिला कामगारांकडे ओळखपत्र असून, उरलेल्या महिला ठेकेदारी पध्दतीने विड्या वळण्याचे काम करीत असणे, किमान वेतन कायद्यानुसार महिलांना ७१ रुपये ४० पैसे वेतन मिळणे आवश्यक असताना केवळ ४० रुपये ते ५७ रुपये वेतन देण्यात येणे, तेंदूपत्ता आणि तंबाखू नेऊन घरातच विड्या वळल्या जाणे, घरखेप कामगारांना ठेकेदारांकडून ३५ ते ४० रुपये वेतन देण्यात येणे, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातही २८ रुपये मजुरी दिली जाणे, इतक्या अत्यल्प मजुरीत सदर कामगार अत्यंत हलाखीचे जीवन जगत असणे, या कामगारांमध्ये लहान मुलांचा मोठ्या प्रमाणात समावेश असणे, दिनांक १ जून, २००८ पासून धूम्रपानविरोधी कायद्याची कडक अंमलबाजावणी करण्याचे सरकारने जाहीर केल्याने व पर्यायी रोजगार उपलब्ध करुन न दिल्याने राज्यातील विडी कामगारांच्या रोजगाराचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, परिणामी विडी कामगारांच्या कुटुंबाची होणारी उपासमार, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन उपरोक्त विडी कामगारांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5...

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, विडी कामगारांसंबंधी अतिशय महत्वाची ही लक्षवेधी सूचना आहे. शासनाने लेखी उत्तरामध्ये "राज्यामध्ये 74,700 विडी कामगार आहेत" असे म्हटले आहे. परंतु केंद्र सरकारच्या कामगार राज्यमंत्र्यांनी राज्यसभेमध्ये महाराष्ट्र राज्यात 2 लाख 56 विडी कामगार असल्याची माहिती दिली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या उत्तरामध्ये तफावत आहे असे माझे मत आहे. राज्य सरकारच्या माहितीमध्ये मंत्रिमहोदयांना दुरुस्ती करावयाची आहे काय असा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, राज्यामध्ये 95 टक्के विडी कामगार महिला आहेत. राज्य सरकारने या विडी कामगारांसाठी अनेक चांगल्या योजना आखल्या आहेत. सोलापूर जिल्हयामध्ये विडी कामगारांसाठी 10 हजार घरे बांधण्यात आली, त्याबद्दल शासन अभिनंदनास पात्र आहे. नाशिकमध्ये सुध्दा अशी योजना राबविली जाणार आहे. एका बाजूला एका जिल्ह्यात विडी कामगारांसाठी 10 हजार घरे बांधली जात असताना संपूर्ण राज्यामध्ये केवळ 74 हजार विडी कामगार कसे असू शकतात ? यावरुन या उत्तरामध्ये विसंगती आहे असे माझे मत आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड....)

ही जी तफावत दिसते त्यामध्ये बाल मजूर नाहीत असा उल्लेख केलेला आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये या विडी व्यवसायामध्ये बाल मजूर देखील काम करतात हे मी पाहिलेले आहे. या बाल मजुरांची नोंद केलेली नाही. ती नोंद करणार काय ? केन्द्र शासनाच्या माहिती नुसार आपल्या राज्यामध्ये या विडी व्यवसायामध्ये 2.30 लाख महिला काम करतात. या व्यवसायामध्ये काम करणा-या कामगारांच्या आरोग्यावर परिणाम होत असतो. त्यांच्या शरीरामध्ये निकोटीन जाऊन, 40 वर्षानंतर त्यांच्या बोटांच्या हालचाली मंदावणे, कॅन्सर या सारखे दुर्धर आजार होतात. तसेच ज्या महिला गरोदर असतात त्यांच्या पॅसण्टामधून प्रसुतीच्या वेळी अनेक घातक द्रव्ये बाहेर जातात आणि त्याचा परिणाम बालकावर होतो असा अहवाल आहे. तेव्हा या व्यवसायामध्ये काम करणा-या महिलांना मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे वेतन आणि प्रसुती रजा देण्यात येईल काय ? तसेच त्यांच्या मुलाकरिता 6 महिने विशेष आहार देण्याची सोय करण्यात येईल काय ?

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र राज्यातील विडी कामगारांची संख्या चुकीची आहे अशा प्रकारची भूमिका मांडली. नोंदणी झालेल्या आस्थापनांमध्ये काम करणा-या कामगारांची संख्या 5674 इतकी असून त्यापैकी 2709 पुरुष आणि 2965 महिला आहेत. घरखेप काम करणा-यांची संख्या 69047 असून त्यामध्ये 65226 महिला आणि 3821 पुरुष आहेत. 74610 कामगारांना ओळखपत्रे दिलेली आहेत. केन्द्र सरकारच्या कामगार मंत्रालयाने कोणती माहिती दिलेली आहे ती मला माहीत नाही. परंतु ज्या एकूण आस्थापना महाराष्ट्रामध्ये आहेत त्यामधील कोकणामध्ये 7, पुण्यामध्ये 115, नाशिकमध्ये 109, औरंगाबादमध्ये 23 आणि नागपूरमध्ये 27, आस्थापना आहेत. या व्यतिरिक्त नॉन-रजिस्टर संस्था असतील तर त्याची मला माहिती नाही. परंतु स्वत: तेंदुपत्ता,तंबाखू,दोरा आणून विडया वळून त्या व्यापा-यांना विकण्याचा व्यवसाय करणारी काही कुटुंबे असून त्यांची नोंद शासनाकडे नाही. शासनाने दिलेली माहिती सत्य आहे.

श्री. किरण पावसकर : यंत्रमाग बंद पडल्यानंतर घरातील कर्ता पुरुष बेकार झाल्यामुळे ठेकेदाराकडून विड्या वळण्याचे काम घेतले जाते. या कामामध्ये महिला कामगार मोठ्या संख्येने असून त्यांना केवळ 28 रुपये वेतन दिले जाते. हे ठकेदार या विडी वळणा-या कामगारांची आर्थिक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री किरण पावसकर....)

पिळवणूक करीत असतात. तेव्हा सोलापूर, अहमदनगर, पुणे, नाशिक, गोंदिया, भंडारा या भागामध्ये विडी व्यवसायात काम करणा-या मजुरांना 28 रुपया ऐवजी 71 रुपये वेतन देण्यात येईल काय ?

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, विडी कामगाराने एक शेकडा विडी वळली तर त्यासंबंधी मजुरीचे दर ठरलेले आहेत. या विडी कामगारांना स्थानिक भत्ता देऊन त्या विडी कामगारांना 71 रुपये दर पडतो. मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्हयासाठी विडी कामगारांचे दर वेगळे आहेत. हे तीन जिल्हे वगळता उर्वरित जिल्हयात विडी कामगारांचे दर वेगळे आहेत. मुंबई शहरात महागाई जास्त असल्यामुळे 3 ते 4 रुपये दरामध्ये फरक आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विडी वळण्याच्या कामांवर बालमजुरांची संख्या मोठया प्रमाणात आहे अशा प्रकारचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी उपस्थित केला. आतापर्यंत कामगार खात्याने किती विडी उत्पादन कारखान्यांची तपासणी केली ? त्या तपासणीत किती बालमजूर आढळून आले ? ज्या विडी उत्पादन कारखान्यात बालमजूर आढळून आले असतील त्या कारखान्यांच्या मालकांवर कोणत्या प्रकारची ॲक्शन घेण्यात आली आहे ? कारखान्यांना बालमजूर ठेवण्याचे कायद्याने अधिकार आहेत काय ?

श्री. गणेश नाईक : विडी उत्पादन कारखान्याची तपासणी केली असता एकही बालकामगार आढळून आला नाही. बालकामगारांचे वयोमान खूपच कमी असते, त्यांना कोणत्याही कारखानदारांनी कामावर ठेऊ नये म्हणून जिल्हास्तरीय कमिटया निर्माण केल्या आहेत. बालकामगार हे विडी उत्पादन कारखान्यात काम करताना आढळून आले नाही, परंतु सोन्याचे अलंकार बनविण्याचे कारखाने आहेत त्या ठिकाणी मात्र बालकामगार आढळून आले आहेत.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:30

**पृ. शी.** : साडवली-देवरुख (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ) येथे डिझेलच्या टँकरमध्ये रॉकेलची भेसळ केल्याची बाब आढळून येणे

**मु. शी.** : . साडवली-देवरुख (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी ) येथे डिझेलच्या टँकरमध्ये रॉकेलची भेसळ केल्याची बाब आढळून येणे यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी,विनोद तावडे, जगदीश गुप्ता, संजय केळकर,सय्यद पाशा, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"साडवली-देवरुख (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) येथील अजय श्रीधर जाधव हे पाली-उरण येथून कृष्णा केमिकल कंपनीचा केमिकलचा टँकर भरुन माहे जुलै,2008 मध्ये वा त्या सुमारास घेऊन जाणे, याचवेळी पाली येथून कमी भाड्याने टँकर आल्यामुळे इतर टँकर चालकांनी पुरवठा अधिकारी यांना गुप्त माहिती देणे, नंतर पुरवठा अधिकाऱ्यांनी टँकरच्या डिझेल टाकीची तपासणी केल्यावर त्यांना डिझेलमध्ये रॉकेल भेसळ असल्याचे आढळून येणे, डिझेलचा नमुना प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, डिझेलमध्ये रॉकेल भेसळ करून माल वाहतूक करणाऱ्या टँकरचालकांना तातडीने अटक करुन कारवाई करण्याची होत असलेली मागणी, या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी टँकर चालकांत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सोडवली - देवरुख (ता.संगमेश्वर ) येथे रॉकेल मिश्रीत टॅकर्स पकडले, त्यातील नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे आणि या प्रकरणी वेळेत कारवाई करण्यात आली आहे. ट्रक चालकास अटक आणि त्या टॅकर्समधील नमुन्यांची तपासणी करणे अशा प्रकारची कारवाई करण्यात आली आहे. सदरहू टॅकर्समधील डिझेलमध्ये भेसळ आहे असे तपासणीअंती लक्षात आल्यानंतर त्यांचे विरुध्द कायद्यानुसार कलमे लावून कारवाई करावयास पाहिजे होती. तशा पध्दतीची कारवाई करण्यात आली आहे काय ? कारवाई करण्यात आली नसल्यास ती कधीपर्यंत करण्यात येणार आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, 26 तारखेस यासंदर्भात तक्रार करण्यात आली आहे. त्या तक्रारीची ताबडतोब नोंद घेण्यात आली आहे. या प्रकरणी संबंधित आरोपींना अटक करण्यात आली आहे. जीवनाश्यक कायदा 1955 मधील कलम 3 (7) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरहू आरोपींना 28.6.08 रोजी जामीन मिळालेला आहे. सदरहू टॅकर्समधील नमुने प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

श्री. भास्करराव जाधव : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना आणि त्यावरील निवेदन सर्वांनी बारकाईने वाचले तर एक गोष्ट लक्षात येईल की, यामध्ये दोन टॅकर्स आहेत. एका टँकरचा क्रमांक एमएच-06-9604 असा आहे आणि दुसरा टँकरचा क्रमांक एमएच-08-एच-1084 असा आहे. या ठिकाणी एक ट्रक केमिकलचा भरुन आला असे सांगितले गेले आहे. तो टॅकर पाली, देवरुखवरुन आला आहे तर दुसरा टँकर कोठून आला याची माहिती निवेदनात देण्यात आलेली नाही. मला एक गोष्ट कळली नाही की, पाली येथे कोणती केमिकल कंपनी आहे ? एक टँकर देवरुख येथून आला असे निवेदनात स्पष्ट म्हटले आहे. हा टँकर प्रत्यक्षात कुठे भरला होता ? सदर टॅकर उरणला भरला असेल तर पहिल्यांदा चिपळूण-खडपोली एम.आय.डी.सी. एरिया लागतो तेथे न जाता तो टॅकर देखरुख येथे का गेला ? देवरुखचा टॅकर पुन्हा चिपळूणमध्ये कसा आला ? या टँकरमध्ये कोणते केमिकल भरलेले होते ? श्री. अजय श्रीधर जाधव हा टॅकरचा चालक आहे की मालक आहे ? या टॅकरच्या मालकाचा खरोखरचा पत्ता शासनाने अवगत करुन घेतला आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या टॅकरच्या मालकाचे नाव श्री. अजय श्रीधर जाधव आहे. सदर टॅकरमधून केमिकल हे सुधागड-पाली, जिल्हा रायगड येथून आले आहे.

5...



श्री. सुनील तटकरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुधागड-पाली येथे रसायन तयार करण्याचा कारखाना आहे. त्या ठिकाणाहून सदर रसायन आलेले आहे. अन्य ठिकाणी जाण्याचा प्रश्न उदभवत नाही. सदर टॅकरमध्ये जे इंधन भरले होते, त्या इंधनमध्ये भेसळ करण्यात आली आहे अशा प्रकारची तक्रार करण्यात आली होती.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना पुढे सुरु....

श्री. सुनील तटकरे....

केमिकलच्या बाबतीत तक्रार केली नव्हती. दोन्ही बाबतीत योग्य तो तपास सुरु आहे. पालीमधून रसायन नेण्यात आले. जी तक्रार झाली ती सदर टँकरमध्ये असलेल्या इंधनाच्या बाबतीत झाली होती. रसायन आणणे आणि टँकरमधील इंधन यामध्ये पूर्णत: फरक आहे. रसायन वाहतूक करणारा टँकर आहे आणि त्याच्यामधील इंधनाच्या बाबतीतील तक्रार आहे त्यामुळे कुठून रसायन आणले त्यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये रसायन असे लिहिलेले नाही. रॉकेल मिश्रित डिझेल असे लिहिले आहे. माझा प्रश्न असा आहे की, डिझेलमध्ये सुध्दा रॉकेल मोठया प्रमाणावर मिसळले जात आहे. ज्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे त्याला पोलीस कस्टडी मागितली होती काय ? किती दिवस असा व्यवसाय चालला आहे आणि किती दिवस रॉकेल मिश्रित डिझेल वितरीत होत आहे ? या माणसाचा पत्ता काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, अजय श्रीधर जाधव साडवली-देवरुख, ता.संगमेशवर येथील आहेत. हेच त्या गाडीचे मालक आणि चालक आहेत. जीवनावश्यक वस्तू कायद्याअंतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे आणि न्यायालयाने त्यांना जामिनावर सोडलेले आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, अशा प्रकारे भेसळीचे काम करणारे मोठे रॅकेट काम करते आणि हायवे एरियामध्ये काम करीत आहे. याबाबतीत शासनाने भेसळ रोखण्यासाठी ठोस उपाययोजना केली आहे काय ? अलिकडच्या वर्षभरात अशा प्रकारे भेसळ करणाऱ्यांवर किती गुन्हे दाखल झाले आहेत ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रश्न भिन्न आहे.

------

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.** : मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातील नेमणुका.

**मु.शी.**: मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गातील नेमणुका यासंबंधी

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री रमेश शेंडगे, भास्कर जाधव, सतीश चव्हाण, विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील(सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" "मंत्रालयीन प्रशासकीय कार्यक्षमता टिकविण्यासाठी कक्ष अधिकारी पदाचा नवीन संवर्ग अस्तित्वात येणे, हे पद नियमाप्रमाणे लोकसेवा आयोगामार्फत व पदोन्नतीने भरण्याची तरतूद असूनही या पदावर नेमणूक करताना ते नियमाप्रमाणे भरण्यात न येणे, सदरची पदे पदोन्नतीने भरताना नियम डावलून भरणे, सरळ सेवा भरतीमध्ये मागास प्रवर्गांना आरक्षण असूनही पदोन्नतीत आरक्षण नसणे, पदोन्नतीने सदरची पदे भरताना या प्रवर्गावर अन्याय होणे, प्रतिवर्षी ज्येष्ठता सूच्या प्रसिध्द करण्याची नियमात तरतूद असूनही अनेक वर्षे ज्येष्ठता सुची प्रसिध्द न करणे, चुकीच्या अंतिम ज्येष्ठता यादीत अनेक अपात्र अधिकाऱ्यांचा समावेश असणे, सदर ज्येष्ठता सूचीमध्ये अनेक पात्र अधिकाऱ्यांची नावे नसणे, पात्र अधिकाऱ्यांऐवजी दुसऱ्या पदोन्नत अधिकाऱ्यांना नियुक्ती देणे, एकच पद अनेक अधिकाऱ्यांनी उपभोगणे, परिणामी शासनाचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे, सदर प्रकरणी प्रशासकीय स्तरावर सुरु असलेला मोठा आर्थिक घोटाळा, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....३



<u>**निवेदनानंतर**</u>

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, मंत्रालयातील कक्ष अधिकाऱ्यांच्या संदर्भातील हा विषय येथे उपस्थित केलेला आहे. विषय व्यापक स्वरुपाचा आहे. याविषयाबाबत चर्चा करीत असताना हाप्रश्न खरे तर येथे उपस्थित व्हायला नको होता. राज्यकर्ते आणि प्रशासक यांच्यामधील हे अंतर कमी करण्याच्या दृष्टीने आणि सगळया प्रशासनाचे काम सुरळित होण्यासाठी व महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेची कामे सुरळित पार पाडण्याच्या दृष्टीने प्रशासन एकसंघ असणे आवश्यक आहे. पदोन्नती असेल मग ती खुल्या गटातील असो, ओबीसी प्रवर्गातील असो सगळया वर्गाचा हा प्रश्न असल्यामुळे लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. न्यायप्रविष्ट बाब असल्यामुळे शासनाने त्यादृष्टीने उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. खरे पाहिले तर मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे हाप्रश्न येथे उपस्थित होणे सयुक्तिक नाही. या सर्व परिस्थितीला सामोरे जात असताना माझी शासनाला विनंती आहे की, याबाबतीत निर्णय घेण्यासाठी एक समिती असली पाहिजे. न्यायालयासमोर जे कागदपत्र जातील ते कोणाच्याही बाजूने अन्यायकारक होता कामा नये आणि कोणाचीही एक बाजू मांडली जाऊ नये.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2 श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील...

आणि शासनाचेही काम झाले पाहिजे. म्हणून जी कागदपत्रे सादर केली जातात त्याद्वारे विस्तृत व तपशीलवार माहिती देणे आवश्यक असल्यामुळे यासाठी शासनाने एक समिती नेमावी. त्या समितीच्या माध्यमातून न्यायालयापुढे खरी खोटी बाजू मांडली पाहिजे. शासनाने अशी समिती नेमली तर निश्चितपणे सर्वांना न्याय मिळू शकेल. शासन अशी समिती नेमणार आहे का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी या संदर्भात समिती नेमावी अशी विनंती केलेली आहे. या प्रश्नाबाबत अतिरिक्त मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) पातळीवरील अधिकारी न्यायालयापुढे ॲफिडेव्हीटच्या माध्यमातून शासनाची बाजू मांडत असतात. जर काही चुकीची माहिती दिली जात असेल तर निश्चितपणे त्याबाबत दक्षता घेण्याचे काम शासन स्तरावर करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आवश्यक असलेल्या पदांऐवजी 25 टक्के पदांचे मागणीपत्र शासनाने पाठविले होते, याबद्दल मॅटने ताशेरे ओढले आहेत हे खरे आहे का? सरळ सेवेने पदे भरताना 75 टक्के जागा कमी भरण्यात आल्या आहेत. सरळ सेवेमध्ये आणि पदोन्नतीमध्ये ओबीसी प्रवर्गाला आरक्षण नाही हे खरे आहे काय? पदोन्नतीने आवश्यकतेपेक्षा जास्त पदे भरली आहेत हेही खरे आहे काय?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मॅटने ताशेरे ओढलेले नाहीत. परंतु हे नक्की आहे की, 1990 साली मॅटने एक निर्णय दिला. 1990 पासून पदोन्नतीचा आधार देण्यात यावा असे सांगितले. अर्जदारांचे म्हणणे होते की, त्यांना 1986 पासून लाभ मिळावा. परंतु मॅटने 1986 ऐवजी 1990 पासून लाभ देण्याची सूचना केली. 1990चा बेस धरुन पदोन्नतीची ज्येष्ठता यादी तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ओबीसी प्रवर्गाला सर्व टप्प्यांवर पदोन्नती देण्याचा विषय पुढे आलेला नाही. ओबीसी प्रवर्गाला फक्त रिक्रूटमेंटमध्ये आरक्षण आहे. आज जे नियम अस्तित्वात आहेत, त्यानुसार व्हीजेएनटी, एससी, एसटी प्रवर्गासाठी सरळसेवा प्रवेश व पदोन्नतीबाबत जे नियम आहेत त्या नियमांचे तंतोतंत पालन झालेले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.............

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा विषय सभागृहासमोर चर्चेला आलेला आहे. शासनाच्या वतीने जे निवेदन करण्यात आले आहे ते सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. कक्ष अधिकारी संवर्गामध्ये 1986 पासून आजपर्यंत 2500 अधिकाऱ्यांनी पदाचा लाभ उपभोगला असून सेवाज्येष्ठता यादीमध्ये 600 अधिकारी असल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणाची शासन चौकशी करणार आहे का? जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करणार का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न आहे. शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी हे मान्य करतो की, या प्रश्नामध्ये दोन-तीन उणिवा राहिल्या आहेत. आज अपडेटेड ज्येष्ठता यादी 2001 पर्यंतची केलेली आहे. आजही पदोन्नती देत असताना अपडेटेड यादी चालू वर्षापर्यंतची असली पाहिजे ही नियमास अनुसरुन आवश्यक असलेली बाब आहे. ज्येष्ठता यादी तयार करीत असताना त्यामध्ये अनेक कक्षाचा संबंध येतो. आरक्षणे तपासावी लागतात. वेगवेगळया विभागातील सीआर पहावे लागतात. कक्ष अधिकारी हे केडर सहाय्यक व कक्ष अधिकारी यांचे केडर आहे.

(नंतर श्री.भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

त्यांना प्रमोशन देत असताना आरक्षण, सी.आर. यासंबंधातील सगळी माहिती घेऊन निर्णय घ्यायचा असतो. सन 2001 ची यादी सन 2008 पर्यंत करणे आवश्यक आहे. ते काम करण्यासंबंधी सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव किंवा अपर मुख्य सचिवांना मी निश्चितपणे सूचना देईन. ज्येष्ठता यादीचे काम येणाऱ्या तीन महिन्याच्या आतमध्ये करण्यामध्ये मी विभागाला सूचना देईन. ज्येष्ठता यादी न्यायालयामध्ये सादर करताना काही चुका झाल्या असतील असे काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. तांत्रिक चुका झाल्या असतील, कुणावर अन्याय झाला असेल असे सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले आहे. ती गोष्ट देखील गृहीत धरली जाईल. अशा तक्रारी शासनाकडे देखील आलेल्या आहेत. या सगळ्या तक्रारीला महत्त्व देऊन अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल. ही सर्व चौकशी एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल. ज्येष्ठता यादी संबंधातील ज्या काही तक्रारी असतील त्यासंबंधी पर्सनल हिअरिंग देऊन निश्चितपणे निकाल दिला जाईल. इतर संवर्गातसुद्धा अपडेटेशनचे काम लवकरच करण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचाराने काम करणारे आपले शासन आहे. अनुसूचित जाती, असुनूचित जमाती, ओबीसी यांना घटनेने आरक्षण दिलेले असताना देखील काही अधिकारी जे नियम ठरले आहेत, ते डावलून स्वत:च्या विश्वासातील जे कर्मचारी असतात, त्यांना पदोन्नती देतात. पदोन्नतीसंबंधी नियम ठरलेले आहेत. पण ते डावलून काम सुरू आहे. अशा अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ? 33 टक्के भरती एमपीएससीमार्फत झाली पाहिजे. त्याप्रमाणे 33 टक्के भरती झाली आहे काय ? नसल्यास, याला जे जबाबदार आहेत, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सनमाननीय सदस्यांचा पहिला प्रश्न असा आहे की, ज्यांनी चुका केल्या आहेत, त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ? आता आम्ही अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना चौकशी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे महिन्याभरात चौकशी आणि पर्सनल हिअरिंग देण्यात येणार आहे. पूर्वीच्या काळात जाणीवपूर्वक अन्याय केला असेल तर संबंधितांवर निश्चितपणाने कारवाई केली जाईल. 33 टक्क्याचा कोटा

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

मंत्रिमंडळाने ठरवलेला आहे. त्याप्रमाणे तंतोततपणे अंमलबजावणी करण्याचे काम करण्याचा प्रयत्न केला जाईल. 33.5 टक्के भरती थेट सेवेद्वारा तर 66.5 टक्के भरती पदोन्नतीने करण्यात येईल. अशा पद्धतीने काम करण्यासाठी शासन बांधील आहे.

प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, ज्या कर्मचारी, अधिकाऱ्याची नियुक्ती गुणवत्तेनुसार झाली आहे, अशा कर्मचाऱ्यांना किंवा अधिकाऱ्यांना खुल्या प्रवर्गामध्ये गणले जावे अशा प्रकारचे आदेश माननीय सर्वोच्च न्यायालयाचे, केंद्र शासनाचे असताना सुद्धा अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांना बिंदूनामावलीत धरण्यात आले आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा जनरलाईझ प्रश्न आहे. त्यामुळे यासंबंधीची माहिती आता देणे अवघड आहे. सन्माननीय सदस्यांकडे एखाद्या उमेदवाराला रिझर्व्ह कॅटेगरीत टाकले आहे अशी जर माहिती आपल्याकडे असेल तर ती द्यावी. कोणी जाणीवपूर्वक असे केले असेल तर यासंबंधी चौकशी करून आम्ही कारवाई करू.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रकार आहे. या सगळ्या प्रकरणांची चौकशी माजी निवृत्त न्यायाधिशामार्फत करण्यात येणार करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे.

यानंतर श्री.पी.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य जो प्रश्न विचारतात त्यावरुन त्यांचा शासनावर विश्वास नाही असे वाटते.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी माजी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याची जी मागणी केली त्याऐवजी आजी न्यायाधीशांचीच अशा समितीवर नेमणूक करावी, जेणेकरुन या लोकांना कोर्टातच न्याय मिळेल.

श्री. राजेश टोपे : या प्रकरणाचे गांभीर्य मी स्वत: समजावून घेतले असून त्यासाठी कालबध्द असा कार्यक्रम दिलेला आहे. एक महिन्यात सामान्य प्रशासन विभागाकडून यासंबंधीची चौकशी केली जाईल आणि या अपडेशनची यादी जाहीर केली जाईल.

**उपसभापती** : याप्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी या ठिकाणी निदेश देऊ इच्छितो की, लक्षवेधी सूचना क्र. 2 च्या संदर्भात माजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठित करावी आणि पुढील तीन महिन्यात या सर्व प्रकरणांची तपासणी करुन उचित निर्णय द्यावा.

----------

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेचे निवेदन आज क्र. 3 वर चर्चेला आले होते. परंतु त्यावेळी माननीय नगरविकास राज्यमंत्री खालच्या सभागृहात असल्याने ते निवेदन नंतर घेण्यात येईल, असे सांगितले होते. आता माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत.

**उपसभापती** : ठीक आहे, आता नियम 93 अन्वये क्र. 3 वर असलेले निवेदन चर्चेला घेण्यात येईल.

........2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत झालेली अनियमितता

**मु. शी.** : सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत झालेली अनियमितता याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत झालेली अनियमितता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेसंबंधीची ही सूचना असून शासनाने यासंबंधी क्र. सुजयो-102003/प्र.क्र.83/03/13, दिनांक 10 सप्टेबर, 2004 असे परिपत्रक देखील काढलेले आहे. त्यानुसार व्यवसाय अनुरुप टूल किटकरिता रु. 600/- पर्यंतची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. आपले शासन एवढे गतिमान आहे की, 14 मार्चपर्यंत यासंबंधी काहीच केले नाही परंतु 14 मार्च रोजी अल्प मुदतीच्या निविदा काढण्यात आल्या, ह्या निविदा 19 मार्च रोजी बोलाविल्या व 20 मार्चला उघडल्या. त्यात लेदर बॅग रु. 720, दुचाकी वाहन, इलेक्ट्रीशियन रु. 889, शिवणकाम रु. 1289 आणि ब्युटी पार्लर अशा विविध बाबी अंतर्भुत असलेले टुल किट घेण्यासंबंधीचे हे टेंडर होते. त्यात कमी दराचे टेंडर असताना अनिल हार्डवेअरला जास्त दराने हे टेंडर देण्यात आले. हार्डवेअरच्या दुकानात ब्युटी पार्लरचे सामान मिळते हे मी पहिल्यांदाच ऐकले, परंतु या शासनाने त्याचा शोध लावला. अशा प्रकारे 27 मार्चला हा सर्व माल पुरविला गेला, त्यानंतर 31 मार्च रोजी या मालाची देयके अदा करण्यात आली. निवेदनात सांगितले की, हा करारनामा अगोदर करण्यात आलेला आहे. परंतु माझ्याकडे या करारासंबंधीचे पत्रच आहे. हा करार 31 मार्च रोजी सर्व सामान पुरविल्यानंतरच झाल्याचे दिसून येते. याचा अर्थ माल अगोदर खरेदी केला आणि त्याची बिले 31 मार्च रोजी काढण्यात आली. तसेच 600 रुपयेपर्यंतची मर्यादा असताना जादा दराने ही खरेदी करण्याचा अधिकार नगरपालिकेला कोणी दिला होता ? तसेच 14 तारखेपासून संपूर्ण प्रक्रिया करुन 31 तारखेपर्यंत 6.99 लाख एवढ्या रकमेची देयके सुध्दा काढण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून जे टूल बॉक्स दिलेले आहेत ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहेत. इलेक्ट्रिशियनचे बिल 800 रुपये लावण्यात आले. वास्तविक त्यात साधा पेचकच आहे म्हणून हे किट अनेक लोकांनी नाकारले. वास्तविक ज्या किटची किंमत 350 च्या वर नाही त्याची किंमत 700 रुपये लावण्यात आली व 350 रुपये जादा देण्यात आले.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

यासंदर्भात वस्तुस्थिती अशी आहे की, माल घेतल्यानंतर करारपत्र तयार केले गेले एवढया गैर मार्गाने हा सर्व व्यवहार झालेला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी माननीय मंत्रीमहोदयांनी करावी अशी माझी विनंती आहे. सर्व वस्तू खरेदी झाल्यानंतर आम्हाला पैसे कमी पडतात ते वाढवून देण्यात यावेत म्हणून त्यांनी संचालकांना पत्र लिहिले आहे. त्यावेळेस संचालकांनी पत्र लिहिले की, "यासंदर्भातील अधिकार नगरपालिकेचा आहे. 600 रुपयांच्यावर खरेदी करण्यात येऊ नये यासंदर्भात शासनाचा जी.आर.आहे." असे असतांना संचालकांनी पत्र लिहिले आहे की, हा नगरपालिकेच्या अखत्यारीतील भाग असल्यामुळे नगरपालिकेने विचार करावा. या ठिकाणी जो व्यवहार झालेला आहे तो संशयास्पद आहे. टूल बॉक्ससुध्दा आम्ही सादर करण्यास तयार आहोत. या टूलबॉक्सची किंमत 200 ते 250 रुपयांच्यावर नाही असे असतांना या टूलबॉक्सची किंमत 700 ते 800 रुपये लावण्यात आलेली आहे. त्यामुळे यासंपूर्ण प्रकरणाची चौकशी माननीय मंत्रीमहोदय करणार आहेत काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, डेप्युटी डायरेक्टर म्युन्सिपल ॲडमिनिस्ट्रेशन यांच्या मार्फत या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे मुद्दे मांडलेले आहे त्यासंदर्भात चौकशी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल दोन महिन्यात मागविला जाईल व त्या अनुषंगाने पुढील कारवाई केली जाईल.

---------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सत्रसमाप्तीच्या संदर्भात वर्तमानपत्रात छापून आलेल्या वृत्ताबाबत.**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, दिनांक 24.7.2008 रोजी "लोकमत" या वर्तमानपत्रात अधिवेशन केव्हा संपणार या संदर्भात जी माहिती छापून आली होती त्याचा उल्लेख मी काल केला होता. त्या बातमीमध्ये संसदीय कामकाज मंत्री श्री. हर्षवर्धन देशमुख यांच्या नावाचा उल्लेख होता, व बातमीमध्ये अधिवेशन लवकर संपणार आहे असे जाहीर केले होते. या विषयाच्या संदर्भात संसदीय कामकाजमंत्र्यांनी सभागृहात खुलासा केला होता की, " मी अशा प्रकारे काही बोललोच नाही, या विषयाच्या संदर्भात माझी कोणाशी चर्चा देखील झाली नाही, माझा याच्याशी संबंध नाही, असे मी सांगितलेच नाही". एखादी घटना घडल्यानंतर कोण दोषी आहे हे समजते. सभापती महोदय, पत्रकाराने चुकीची माहिती छापली असेल तर त्याच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे असा मी काल मुद्दा मांडला होता. हा जो प्रकार घडलेला आहे तो गंभीर आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सुध्दा अशा प्रकारे वर्तमानपत्रात छापून आलेली माहिती गंभीर आहे असा मुद्दा मांडला होता. सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी या सभागृहात जे सांगितले तेच कालच्या बैठकीत घडलेले आहे. लोकमत मध्ये जी बातमी छापून आली होती तेच कामकाज सल्लागार समितीमध्ये घडलेले आहे. खरे म्हणजे संसदीय कामकाज मंत्र्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. या सदनाची दिशाभूल सन्माननीय संसदीय मंत्रीमहोदयाकडून होत असेल तर ते योग्य नाही. ंया ठिकाणी संसदीय कामकाज मंत्र्यांनी जे कथन केले ते चुकीचे असून गंभीर आहे. संसदीय कामकाज मंत्र्यांकडून सदनाची दिशाभूल करण्यात आलेली आहे. या सदनाच्या कोणत्या आमदारांची, दुष्काळ पडल्यामुळे अधिवेशन चालविण्याची मानसिकता नाही त्यांची नावे आम्हाला मिळाली तर चांगले होईल. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या सदनाची दिखाभूल केलेली आहे. सदनाच्या पावित्र्याचा भंग निदान संसदीय कामकाज मंत्र्यांकडून होऊ नये अशी आमची अपेक्षा आहे. असे प्रकार भविष्यात होऊ नयेत यासाठीच मी औचित्याचा मुद्याच्या माध्यमातून विचार व्यक्त केलेले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : काल या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी लोकमतमध्ये अधिवेशनाच्या संदर्भात जी माहिती छापून आली होती त्यासंदर्भात उल्लेख केला होता. या विषयाच्या संदर्भात संसदीय कामकाज मंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, मी असे

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

काही बोललोच नाही. परंतु संसदीय कामकाजमंत्री जे बोलले नाही तेच वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. संसदीय कामकाज मंत्र्यांनी या सभागृहात जे सांगितले तेच कालच्या संसदीय कामकाज बैठकीमध्ये सांगितले. अधिवेशन गुंडाळण्याच्या संदर्भात आमदारांचीच मागणी आहे, आमदार अधिवेशन गुंडाळण्याच्या मन:स्थितीत आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

त्यांना मतदारसंघात जावयाचे आहे या संदर्भात वर्तमानपत्रात जे छापून आलेले होते त्याच शब्दात कालच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये त्यांनी सागितले होते. त्यावेळी आम्ही त्यांना असे विचारले होते की, अधिवेशन गुंडाळण्यात यावे अशी मागणी या सभागृहातील कोणत्या सन्माननीय सदस्यांनी केली होती. सन्माननीय सदस्यांना ताबडतोब मतदारसंघात जावयाचे आहे किंवा दुष्काळाच्या संदर्भातील कामे करावयाची आहेत म्हणून त्यांना मतदारसघात जावयाचे आहे. पालक मंत्र्यांना दुष्काळासंबंधी बैठका घेण्यास वेळ पाहिजे म्हणून हे अधिवेशन गुंडाळण्यात यावे असे कोणीही सांगितलेले नाही. हे अधिवेशन उद्या संपणार आहे.माझी आपल्याला अशी विनंती आहे की, या विषयावर बोलण्यासाठी आपण मला दोन मिनिटे द्यावीत. माझ्याकडे लोकमत या वर्तमानपत्राचा अंक आहे. या वर्तमानपत्रात अशी बातमी आलेली आहे की , " अर्थसंकल्पातील तरतूदीमध्ये दहा टक्के कपात करण्यात येणार आहे." तेव्हा ही कपात करीत असतांना दुष्काळ निवारणासंबंधीचा आराखडा शासानाने तयार केला आहे काय , ही कपात कोणत्या कोणत्या खात्यातून करणार आहात , पाटबंधारे खात्यातून ही कपात करणार आहे की, बी. ॲन्ड सी. खात्यातून करणार आहे की सर्व खात्यातून करणार आहे?शासनाने अर्थसंकल्पामध्ये . पाटबंधारे खात्याला 5 हजार कोटी रुपये दिलेले आहेत त्यातून दहा टक्के कपात करणार आहे काय, बांधकाम खात्याला अर्थसंकत्पात जे पैसे दिलेले आहेत त्यातून कपात करणार आहे काय,? शिक्षण खात्यामध्ये पगारासाठी मोठया प्रमाणावर खर्च केला जातो तेव्हा या मध्ये कपात कशी करण्यात येणार आहे ? त्याचबरोबर दुष्काळाच्या संदर्भात शासनाने कोणता आराखडा तयार केलेला आहे ? दुष्काळ निवारणासाठी जो खर्च येणार आहे त्यासाठी कॉन्टीजन्सी फंडातून निधी देण्यात येणार आहे काय आणि तो निधी किती आहे ? सभापती महोदय, या सर्व मुद्यांच्या बाबतीतील उद्या अधिवेशन संपण्याच्या आत खुलासा करण्यात आला पाहिजे.. कारण डिसेंबर महिन्यापर्यंत अधिवेशन होणार नाही. डिसेंबर महिन्यात एक आठवडा अधिक अधिवेशन घेण्याचे जरी सरकारने कमिटमेन्ट केलेली असली तरी सुध्दा डिसेंबर महिन्यात इतर राज्यामध्ये निवडणुका होणार आहेत त्या निवडणुका डोळयासमोर ठेवून पुन्हा अधिवेशन गुंडाळण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे दुष्काळाच्या या मुद्यासबंधीची चर्चा होणार नाही. तेव्हा सरकारने दुष्काळाला तोंड देण्यासाठी काय तयारी केली आहे, सरकारकडे किती पैसे उपलब्ध आहेत.,पिण्याच्या

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ....

पाण्यासाठी किती टॅन्कर्स लावणार आहात, जनावरांसाठी किती छावण्या उभ्या करण्यात येणार आहेत,शेतमजुरासाठी किती कामे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत यासंबंधीचा आराखडा कशा पध्दतीने सरकारने तयार केला आहे आणि त्यासाठी लागणारा पैसा कोठून उपलब्ध करण्यात येणार आहे याची माहिती अधिवेशन संपण्याच्या आत माननीय मुख्यमंत्र्यांनी वा माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला देणे गरजेचे आहे तेव्हा त्यांनी ही माहिती सभागृहाला द्यावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. त्या संदर्भात आपण शासनाला आदेश द्यावेत. उद्या हे अधिवेशन संपणार आहे. हे अधिवेशन एक आठवाडा अगोदरच संपविण्याचे काहीही कारण नव्हते.परंतु सरकारचे नेहमीच असे ठरलेले असते की, विनियोजन विधेयक पास झाले की सरकार अधिवेशनातून पळ काढते. दुष्काळी परिस्थिती असतांना व या ठिकाणी त्यासंदर्भातील चर्चा न करता सन्माननीय सदस्यांना त्यांच्या मतदारासंघात पाठविल्यानंतर तेथील लोक सन्माननीय सदस्यांना विचारतील, सरकार मात्र याच ठिकाणी राहील. माझी अशी आग्रहाची विनंती आहे की, या सर्व मुद्याचा खुलासा उद्या अधिवेशन संपण्याच्या आत सरकारने करावा. दुष्काळासाठी सरकारने काय प्लॅन तयार केला आहे,किती पैसे दुष्काळासाठी खर्च करण्याची सरकारची तयारी आहे, त्यासाठी लागणारा पैसा कोठून आणण्यात येणार आहे, त्यासाठी बजेटमध्ये कपात करण्यात येणार आहे काय,? या सर्व मुद्याचे खुलासे उद्या अधिवेशन संपण्याच्या आत सरकारने करावेत असे निदेश सभापती महोदय, आपण त्यांना द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.आताच आपण एक निदेश दिलेला आहे पुन्हा एक निदेश जनतेसाठी द्यावा अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

प्रा..वसंत पुरके : सभापती महोदय, एखाद्या वर्तमानपत्रात कपात करण्याची बातमी आली असेल... (अडथळा )

श्री.पांडुरंग फुंडकर : पेपरमध्ये ही बातमी आली आहे.

प्रा..वसंत पुरके : एका वर्तमानपत्रात जर बातमी आली असेल तर ती ग्राहय धरण्या पेक्षा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगतो की, त्यांनी दुष्काळासबंधीची चर्चा घ्यावी व त्यातून या मुद्यांची माहिती मिळवावी.

श्री.दिवाकर रावते :वर्तमानपत्रातील बातमी चुकीची आहे काय ?

3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : वर्तमानपत्रामध्ये जी बातमी छापून आली होती त्याबाबतीत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी सागितलेले आहे . ती वस्तुस्थिती आहे किंवा नाही हा नंतरचा भाग आहे. दुष्काळी परिस्थितीशी सामना करण्यासाठी हे अधिवेशन शासनाकडून लवकर आटोपते घेण्यात येत आहे तेव्हा या दुष्काळाशी सामना करण्यासाठी शासनाने नेमकी कोणती योजना आखलेली आहे हे सदस्यांना समजावून घ्यावयाचे आहे .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ...

या संदर्भात मी दोन तासाच्या आत माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर बोलतो आणि आपण केलेल्या अपेक्षेप्रमाणे त्यांना या संदर्भात उद्या निवेदन करण्याबाबत विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण दिलेल्या निर्देशाच्या बाबतीत काय कारवाई झाली?

**उपसभापती** : मी त्यांच्याबरोबर बोलतो आणि आपणास पाहिजे असलेली माहिती देण्यास सांगतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या जीवाला असलेल्या धोक्यासंबंधी या सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. त्या संदर्भात शासनाकडून निवेदन होणार आहे की नाही?

**उपसभापती** : आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन करण्यात येईल असे शासनातर्फे सांगण्यात आले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ.शी.**: दिनांक 26 मे 2008 चा शासन निर्णय रद्द केल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान

**मु.शी.**: दिनांक 26 मे 2008 चा शासन निर्णय रद्द केल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सध्याच्या स्पर्धात्मक युगात तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. राज्यात + 2 स्तरावर व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविणाऱ्या अनेक संस्था आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व्यवसायाचे शिक्षण देऊन रोजगार व स्वयं रोजगारासाठी सक्षम बनविणे हा त्या पाठिमागचा प्रमुख उद्देश आहे.

दिवसें दिवस या व्यवसाय अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्यांची वाढती संख्या विचारात घेऊन प्रवेश क्षमतेमध्ये उच्च व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणे अशक्यप्राय होत आहे. याची दखल घेऊन शासनाने 26 मे 2008 च्या शासन निर्णयानुसार सध्याची प्रवेश क्षमता 25 ऐवजी 50 करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तो सर्व संस्थांना मिळाला आहे. त्या सर्व संस्थांनी + 2 स्तरावर शिक्षण देणाऱ्या सर्व संस्थांनी 50 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. दरम्यान 1 महिन्यानंतर प्रथम हा आदेश स्थगित करण्यात आला व नंतर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर शासनाने दुसरा जी.आर. काढला आणि सर्व संस्थांना दिलेली 50 विद्यार्थ्यांची प्रवेश मर्यादा रद्द केली आणि पूर्वीप्रमाणे 25 विद्यार्थ्यांचे प्रवेश ग्राहय धरले जातील असे जाहीर केले. त्यामुळे राज्यातील प्रत्येक विद्यालयातील 25 विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यांना आता कोणत्याही क्षेत्रामध्ये प्रवेश मिळणार नाही. सर्वच ठिकाणी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासन निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असेल त्यांचे प्रवेश नियमित करावेत आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: डी.एम.एल.टी. व तत्सम पदविकाधारकांना त्यांच्या व्यवसायामध्ये येत असलेल्या अडचणी

**मु.शी.**: डी.एम.एल.टी. व तत्सम पदविकाधारकांना त्यांच्या व्यवसायामध्ये येत असलेल्या अडचणी याबाबत श्री. प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. प्रतापराव सोनवणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"डी.एम.एल.टी. व तत्सम पदविकाधारकांनी त्यांना व्यवसायात येत असलेल्या अडचणींबाबत, तसेच त्यांच्या व्यवसायात त्यांना स्थैर्य प्राप्त होऊन, या क्षेत्रातील सेवा अधिक चांगल्या रितीने देता यावी या हेतूने शासनाकडे वेळोवेळी भूमिका मांडलेली आहे व शासनाकडून आवश्यक ते सहकार्य मिळावे यासाठी बऱ्याच कालावधीपासून शासनाची व्दारे ठोठावली आहेत. या विषयाच्या संदर्भात नागपूर येथील 2007 च्या हिवाळी अधिवेशनामध्ये दि. 23.11.2007 रोजी विधानसभेत लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली. त्या चर्चेत मंत्रिमहोदयांनी महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्ट 1961 मधील सेक्शन 2/2 च्या परंतुकामध्ये दुरुस्ती करुन या व्यावसायिकांना समाविष्ट करुन घेण्यात येईल. तसेच हा बदल करुन माननीय मुंबई हायकोर्टामध्ये ॲफिडेव्हिट दाखल करण्यात येईल. तसेच, या केससाठी असिस्टंट ॲडव्होकेट जनरल यांची नियुक्ती करण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे.

सभापती महोदय, मला खेदाने व क्लेषपूर्वक सांगावे लागते की, शासनाने आजतागायत या आश्वासनाची पूर्ती केली नाही. डी.एम.एल.टी. व तत्सम पदविकाधारकांनी असोसिएशनच्या माध्यमातून भरपूर पाठपुरावा करुनही शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या सर्व प्रवर्गामध्ये तीव्र असंतोष पसरलेला असून नैराश्य निर्माण झाले आहे. शासनाविरुध्द तीव्र आंदोलन करण्याची त्यांची मानसिकता तयार झाली आहे. शासनाने या विषयात गांभीर्याने लक्ष घालावे व दिलेल्या आश्वासनांची पूर्ती त्वरीत करावी व संबंधितांना न्याय ध्यावा अशी आग्रही मागणी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:10

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयामध्ये राबविण्यात येणारी पाळणाघराची योजना

**मु. शी.** : ठाणे जिल्हयामध्ये राबविण्यात येणारी पाळणाघराची योजना याबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, केंद्र शासनाच्या आदिवासी मंत्रालयातर्फे आदिवासी जिल्हयातून पाळणा घराची योजना राबविली जाते. आदिवासी दुर्गम भागातील हजारो मुले कुपोषणाने ग्रस्त होऊन मृत्यू पावतात. यासाठी 1992 सालापासून ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड भागातून पाळणाघराची योजना राबविली जाते. या तीन तालुक्यात मिळून 55 पाळणाघराची योजना सुरु आहे. एप्रिल, मे महिना सोडून 10 महिने ही योजना चालू असते. यासाठी केंद्र सरकार 25 हजार रुपये अनुदानही देते व ही ठेकेदारी खाजगी संस्थेकडे आहे. 1992 पासून कोट्यावधी रुपयांचा निधी केंद्र शासनाचा खर्च होऊनही ही पाळणाघरे केवळ कागदावरच चालविली जातात. नुकताच आदिवासी विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे यांचा पाहणी अहवाल आला आहे. ही पाळणाघरे केवळ कागदावरच असून त्यापैकी अनेक पाळणाघरे अस्तित्वातच नाही. ती हाताच्या बोटावर मोजण्यासारखी आहेत. त्यांची स्थिती दयनीय आहे. या कुपोषित बालकांच्या वाटयाला आलेल्या सुविधा बाहेरच्या बाहेर लाटणाऱ्या या खाजगी संस्थांवर आपण कोणती कारवाई करुन त्यांना शिक्षा करणार हा प्रश्न असून 1992 सालापासून प्राप्त झालेल्या पैशाचा विनियोग कोणासाठी झाला ? यावर शासनाची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे."

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या आदिवासी मंत्रालयातर्फे आदिवासी बालकांच्या संगोपना-साठी पाळणाघराची योजना राबविली जाते. यासाठी केंद्र शासनातर्फे फंड देखील दिला जातो. 1992 सालापासून ही योजना सुरु आहे. ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड या तीन तालुक्यामध्ये 1992 पासून ही योजना राबविली जात आहे. या तीन तालुक्यांमध्ये 55 पाळणाघरे ...

. . . . 2आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

सुरु करण्याचे ठरले होते. तसेच ही पाळणा घरे एप्रिल व मे हे दोन महिने सोडून उरलेले 10 महिने चालविण्यात यावीत असे ठरले होते. केंद्र शासन प्रत्येक पाळणा घरासाठी 25 हजार रुपयांचे अनुदान देते आणि ती खाजगी संस्थांमार्फत, एन.जी.ओ.तर्फे चालविली जातात. आदिवासी विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे याबाबतचा पाहणी अहवाल लेखी स्वरुपात प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये असे आढळून आलेले आहे की, केंद्र शासनाने 1992 पासून या योजनेवर कोट्यावधी रुपये खर्च केलेले आहेत. पण जव्हार, मोखाडा, विक्रमगड येथे पाळणाघरे अस्तित्वातच नाहीत. तसेच अनेक ठिकाणी अंगणवाडीमध्ये पाळणाघरे आहेत. अशा प्रकारे 1992 पासून पाळणाघर योजनेच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांची लूट होत आहे. मला या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आदिवासी मुलांच्या पाळणाघरामध्ये ठेकेदारांचेच संगोपन होत आहे. माझी यानिमित्ताने अशी सूचना आहे की, 1992 पासून केंद्र शासनामार्फत किती निधी प्राप्त झ ााला आहे ? तसेच आदिवासी विकास विभागातर्फे या निधीचा कशा प्रकारे विनियोग करण्यात आला आहे ? याची सदनाला ताबडतोब माहिती देण्यात यावी. धन्यवाद.

----

. . . .2 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**पृ. शी.** : मागासवर्गीयांसाठी असलेली टक्केवारीची सवलत

भटक्या विमुक्त समाजातील उमेदवारांना देणे

**मु. शी.** : मागासवर्गीयांसाठी असलेली टक्केवारी सवलत भटक्या विमुक्त समाजातील उमेदवारांना देणे याबाबत श्री.प्रकाश शेंडगे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाव्दारे भटक्या विमुक्त समाजातील घटकांना मागासवर्गीयांचा दर्जा दिलेला असून सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी आरक्षण तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव, वय इत्यादीमध्ये सवलत दिलेली आहे, हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय घाब्यावर बसवून मुंबई महानगरपालिकेच्या लिपिक पदासाठी एप्रिल 2008 रोजी दिलेल्या जाहिरातीनुसार झालेल्या नोकर भरतीत भटक्या विमुक्तांना मागासवर्गीयांसाठी असणारी मार्कांची सवलत काढून घेतल्याने या भरतीमध्ये खुल्या वर्गासाठी असलेल्या 65% हे किमान पाहिजे अशी जाहिरात दिली. परंतु मागासवर्गीयांना या गुणांच्या टक्केवारीची सवलत असतानाही हे या जाहिरातीत नमूद केले नाही. त्यामुळे मागासवर्गीय भटक्या विमुक्तांच्या न्याय्य हक्कावर गदा आणण्याचे काम मुंबई महानगरपालिकेने केले आहे, तरी मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या मार्फत निदर्शनास आणून देतो की, मागासवर्गीयांसाठी असलेली टक्केवारी ही भटक्या विमुक्तांच्या उमेदवारांना देण्यात यावी, यासाठी राज्य शासनाने संबंधितांना निर्देश द्यावेत, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

"महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाव्दारे भटक्या विमुक्त समाजातील घटकांना मागासवर्गीयांचा दर्जा दिलेला असून सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी आरक्षण तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव, वय इत्यादीमध्ये सवलत दिलेली आहे. हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय धाब्यावर बसवून मुंबई महानगरपालिकेने नुकत्याच झालेल्या

. . . .2 आर-4



श्री.प्रकाश शेंडगे . . . .

लिपिक पदाच्या भरतीसाठी त्यांनी दिलेल्या जाहिरातीमध्ये मार्कांची जी सवलत दिलेली आहे, ती काढून घेऊन, खुल्या वर्गासाठी जी मार्कांची अट आहे, त्याच अटीमध्ये भटक्या विमुक्तांमध्ये असलेल्या क आणि ड संवर्गांना ओपन कॅटॅगरीमध्ये जी मार्कांची कंडीशन आहे, त्या मार्कामध्ये असलेल्या लोकांना त्यांनी घेण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारे महानगरपालिकेने जी भरती केलेली आहे, त्यामुळे भटक्या विमुक्तांच्या न्याय हक्कावर गदा आणलेली आहे.त्यांचा हक्क काढून घेतलेला आहे. माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे. मागासवर्गीयांसाठी जी 45 टक्क्याची सवलत आहे, ती ओपन कॅटॅगरीसाठी 65 टक्के आहे. त्यांनी भटक्या विमुक्त समाजातील क आणि ड साठी 65 टक्क्याची अट नमूद केलेली आहे. ही जी लिपिक पदासाठी भरती झालेली आहे, ती बेकायदेशीर ठरवून पुन्हा नव्याने भटक्या विमुक्त प्रवर्गातील क आणि ड साठी नवीन 45 टक्के मार्कांची कंडीशन लावून ही भरती करावी आणि या समाजाला न्याय द्यावा अशा प्रकारची मागणी मी आपल्यामार्फत करीत आहे.

----

. . . .2 आर-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : नवी मुंबई वाशी सेक्टर-1 येथील पोलीस कर्मचाऱ्यांना सिडकोने दिलेल्या घराची अत्यंत वाईट अवस्था असताना

देखील सिडको घेत असलेले घराचे भाडे व सर्व्हीस चार्ज

**मु. शी.** : नवी मुंबई वाशी सेक्टर-1 येथील पोलीस कर्मचाऱ्यांना सिडकोने दिलेल्या घराची अत्यंत वाईट अवस्था असताना देखील सिडको घेत असलेले घराचे भाडे व सर्व्हीस चार्ज याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"नवी मुंबई वाशी सेक्टर 1 येथे गेली 35 वर्षे रहाणारे पोलीस कर्मचारी सिडकोने दिलेल्या घरात रहातात. हया घरांची परिस्थिती अत्यंत वाईट अवस्थेत असून घरांचे पत्र तुटले आहेत, खिडक्या, दरवाजे तुटलेले आहेत, गेली 35 वर्षे सिडको भाडे घेते. त्याचप्रमाणे सर्व्हीस चार्ज सुध्दा घेण्यात येत आहे. 7 ते 8 कर्मचाऱ्यांची घरे सिडकोशी संबंधित आहेत. बाकीची पी.डब्ल्यु.डी.शी संबंधित आहेत. सिडको हया सात घराचे भाडे व सर्व्हीस चार्ज घेते. पण गेली 35 वर्षे कुठल्याही सुखसुविधा दिलेल्या नाहीत. तिथे गवत वाढलेले आहे. साप, घुशींचे, उंदरांचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. हे पोलीस कर्मचारी राज्याची सेवा करीत आहेत. पण आज अशा घाणेरडया अवस्थेत रहात आहेत. सिडकोने हया घराच्या बाजुला असलेल्या खोल्या विकल्या. पण हे कर्मचारी 35 वर्षानंतर कुठे जातील. त्या कर्मचाऱ्यांचे म्हणणे असे आहे की, सिडकोच्या हया 7 ते 8 खोल्या आहेत, त्या सिडकोने ज्या भावामध्ये विकल्या आहेत, त्या भावामध्ये सिडकोने त्यांना द्याव्यात याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई. "

सभापती महोदय, नवी मुंबई सेक्टर-1 येथे पोलीस कर्मचाऱ्यांची घरे आहेत. घरे म्हणण्यापेक्षा एका छोट्या 10X10 च्या खोलीमध्ये हे कर्मचारी गेल्या 30 ते 35 वर्षे रहात आहेत. आपण आज त्या खोल्यांची अवस्था पाहिली तर दरवाजे तुटलेले आहेत, पत्रे तुटलेले आहेत आणि

. . . .2 आर-6



श्रीमती मंदा म्हात्रे . . . . .

गेली 35 वर्षे सिडको या सात ते आठ खोल्यांमध्ये रहात असलेल्या कर्मचाऱ्यांकडून भाडे घेत आहे, सर्व्हीस चार्ज घेत आहे आणि कोणतीही सुविधा या खोल्यामध्ये रहात असलेल्या कर्मचाऱ्यांना मिळत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नाही. त्यांच्या अजुबाजूच्या ज्या बैट्या खोल्या आहेत, त्या सिडकोने इतरांना विकलेल्या आहेत. आज पोलीस कर्मचारी राज्याची सेवा करीत असताना ते ज्या परिस्थितीमध्ये, ज्या अवस्थेमध्ये तेथे रहात आहेत ती वाईट आहे. तेथे घुशींचे, उंदरांचे,सापाचे तसेच घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करते की, 7 ते 8 पोलीस कर्मचारी अशा अवस्थेमध्ये रहात असताना, दुसरीकडे सिडको इतर ठिकाणी घरे विकत आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

त्या ठिकाणी बाजूच्या खोल्या ज्या भावाने विकल्या गेल्या त्या भावात उपलब्ध करुन दिल्या तर ते कर्मचारी या खोल्या घेण्यास तयार आहेत. आपल्या माध्यमातून संबंधित माननीय मंत्रिमहोदयांना आदेश देण्यात यावेत अशी विनंती करते.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दादर स्टेशन ते शिवाजी पार्क-चैत्यभूमी पर्यंत तसेच दादर स्टेशन ते सिध्दिविनायक मंदिर पर्यंत स्काय वॉक बांधण्याची होत असलेली मागणी

**मु. शी.** : दादर स्टेशन ते शिवाजी पार्क-चैत्यभूमी पर्यंत तसेच दादर स्टेशन ते सिध्दिविनायक मंदिर पर्यंत स्काय वॉक बांधण्याची होत असलेली मागणी याबाबत श्री. कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" एमएमआरडीएमार्फत मुंबईत ठिकठिकाणी स्काय वॉक बांधण्याची योजना प्रस्तावित आहे. ती स्वागतार्ह आहे. अशा प्रकारचा स्काय वॉक दादर येथे बांधावा अशी जनतेची मागणी आहे. दादर स्टेशनवरुन सिध्दिविनायक पर्यंत आणि चैत्यभूमीपर्यंत स्काय वॉक बांधावा अशी मागणी मी शासनाकडे करीत आहे. दादर हे मुंबईचे हृदय आहे. गजबज व गर्दी असलेले ठिकाण आहे. मुंबईचे ते मुख्य सांस्कृतिक केंद्र आहे. सर्वात मोठी दोन श्रध्दास्थाने येथेच आहेत. पण स्टेशनच्या बाहेर पडल्यानंतर चालणे कठीण असते. तेव्हा चैत्यभूमी आणि सिध्दिविनायककडे जाण्यासाठी स्काय वॉक ही तातडीची गरज आहे. दादर स्टेशन बाहेरील फेरीवाल्यांना त्या स्काय वॉकवर बॉक्स शॉपिंग प्लाझाची व्यवस्था करुन त्यांचे पुनर्वसन करता येईल. माझी आपणामार्फत शासनाला विनंती आहे की, फेरीवाल्यांच्या शॉपिंग प्लाझासह हा स्कायवॉक लवकर बांधावा. फेरीवाले भाडे द्यायला तयार होतील. त्यातून मेंटेनन्सचा खर्च निघेल. काही हितसंबंधित मंडिळींचा या स्काय वॉकला विरोध आहे. परंतु दादरकर रहिवाशी तसेच आम मुंबईकर यांना स्काय वॉक हवा आहे. तशाच पध्दतीने घाटकोपर रेल्वे स्थानकाबाहेरही अशाच तऱ्हेने स्काय वॉक बांधण्यात यावा व हे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....
दोन्ही स्काय वॉक बांधण्याची कार्यवाही तातडीने करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

सभापती महोदय, दादर स्टेशन ते शिवाजी पार्क-चैत्यभूमी तसेच दादर स्टेशन ते सिध्दिविनायक मंदिर पर्यंत जाण्यासाठी स्काय वॉक बांधावा अशी दादरकरांची मागणी आहे. त्या ठिकाणी प्रमुख बाजारपेठ आहे तसेच हा भाग नेहमी गजबजलेला असतो. त्या ठिकाणी नेहमी गर्दी असते. त्या ठिकाणी चालणे कठीण असते. माझी सभागृहामार्फत अशी मागणी आहे की, तेथील फेरीवाल्यांचे पुनर्वसन शॉपिंग प्लाझासह करावे आणि दादर स्टेशन ते शिवाजी पार्क-चैत्यमूमी तसेच दादर स्टेशन ते सिध्दिविनायक मंदिर असा स्काय वॉक बांधण्याची कार्यवाही करावी. काही लोकांनी विरोध केला असला तरी लोकांची ती गरज आहे. दादरकरांची मागणी लक्षात घेऊन एमएमआरडीएमार्फत त्या ठिकाणी स्काय वॉक बांधावा अशी मी शासनाला विनंती करतो.

**उपसभापती** : श्री. मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना त्या ठिकाणी सगळ्या फेरीवाल्यांसाठी एक मंडई बांधली होती. परंतु त्या ठिकाणी कोणीही गेले नाहीत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, फेरीवाले त्या ठिकाणी गेले नाहीत हे आपले म्हणणे अतिशय बरोबर आहे. कारण ज्या ठिकाणी गर्दी असते त्याच ठिकाणी फेरीवाले असतात. आपली सूचना बरोबर आहे. स्काय वॉकवर फेरीवाल्यांचे पुनर्वसन करावे. शॉपिंग प्लाझासह फेरीवाल्यांचे पुनर्वसन करावे अशी माझी सूचना आहे.

---

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : केवनी-दिवा (ता.भिवंडी) गावातील मागासवर्गीय अल्पवयीन मुलीवर गावगुंडांकडून करण्यात आलेले पाशवी अत्याचार

**मु. शी.** : केवनी-दिवा (ता.भिवंडी) गावातील मागासवर्गीय अल्पवयीन मुलीवर गावगंडांकडून करण्यात आलेले पाशवी अत्याचार याबाबत श्री. राम पंडागळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. राम पंडागळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राम पंडागळे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" भिवंडी तालुक्यातील (जि. ठाणे) केवनी-दिवा गावातील एका मागासवर्गीय अल्पवयीन मुलीला दि. 24.7.2008 रोजी तिच्या आई-वडिलांसमोर त्या गावातील गावगुंडांनी उचलून नेऊन तिच्यावर पाशवी अत्याचार करणे, याबाबत अत्याचारित मुलीने संबंधित पोलीस ठाण्यात जाऊन गुन्हा नोंदविला असता पोलिसांनी अत्याचाराचा व ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल न करणे, तसेच संबंधित गावगुंडांना अटक न करणे, याबाबत तक्रार केल्यास घराच्या सगळ्यांना मारुन टाकण्यात येईल अशी दिलेली धमकी, अत्याचारग्रस्त मुलीने विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा केलेला प्रयत्न, त्यामुळे तेथील मागासवर्गीय समाजात पसरलेला तीव्र असंतोष, संबंधित गावगुंडांना अटक करण्याची तेथील जनतेची होत असलेली माणगी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, विशेष उल्लेखाचे गांभीर्य आळखून आपण मला जी संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. आज सकाळी आल्याबरोबर मी माननीय सभापती महोदयांकडे हा विशेष उल्लेख दिलाहोता. भिवंडीमध्ये केवनी-दिवा गावामध्ये काल संध्याकाळी एका अल्पवयीन मुलीवर तिचे आई-वडील घरामध्ये असताना त्या गावातील गावगुंडांनी आई-वडिलांसमोर त्या अल्पवयीन

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राम पंडागळे .....

मुलीला घरातून ओढून नेले. तिला एका कारखान्यामध्ये नेले आणि तिचा विनयभंग केला. ही तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केल्यावर फक्त अपहरणाचा गुन्हा दाखल केला. त्यांच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता. पण ते केले नाही. हा गंभीर गुन्हा घडलेला आहे. तेथील गावगुंडांनी त्या मुलीला गावामध्ये तिच्या आई-वडिलांसमोर फरफटत ओढून नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. त्यांना पोलिसांनी अटक केलेली नाही. उलट आजही ते गुन्हेगार गावामध्ये फिरत आहेत. पोलीस आमचे काय वाकडे करणार आहेत अशी धमकी ते तिच्या आई-वडिलांना देत आहेत. पोलीस अधिकारी कोणत्याही प्रकारची ॲक्शन घेत नाहीत. त्यांच्या पाठीमागे कोण राजकीय हस्तक आहेत याची चौकशी सरकारने आणि अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. असे गुन्हे दलित महिलांच्या बाबतीत, अल्पवयीन मुलींच्या बाबतीत वारंवार घडत आहेत. हे सरकार संवेदनाहीन झालेले आहे काय, अशी भावना दलित समाजामध्ये पसरलेली आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, हे जे गुन्हेगार उजळमाथ्याने फिरत आहेत त्यांना ताबडतोब अटक करुन त्यांच्यावर ॲट्रॉसिटीसारखा गंभीर गुन्हा नोंदवला पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ती घटना फार गंभीर आहे. ही काल घडलेली घटना आहे. घरातून त्या मुलीला खेचून न्यावयाचे, कारखान्यामध्ये न्यावयाचे एवढे झाल्यानंतर सुध्दा पोलीस लक्ष देत नाहीत. सभापती महोदय, याबाबत आपण निदेश द्यावेत की, या प्रकरणाची चौकशी करुन शासनाने उद्यापर्यंत याबाबत निवेदन केले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी उपस्थित केलेल्या विषयासंबंधी शासनाने तातडीने कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा तपशील उद्या अधिवेशन संपण्यापूर्वी सभागृहाला अवगत करावा.

प्रा.वसंत पुरके : होय.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: दादर-विरार या लोकल गाडीतील महिलांच्या डब्यामध्ये अज्ञात व्यक्तिंनी केलेले हिडीस कृत्य.

**मु.शी.**: दादर-विरार या लोकल गाडीतील महिलांच्या डब्यामध्ये अज्ञात व्यक्तिंनी केलेल्या हिडीस कृत्याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, महिलांमध्ये खास करुन रेल्वे लोकलमधून प्रवास करताना त्यांच्या सुरक्षेसंबंधी अनेकवेळा मी या सदनाचे लक्ष वेधले आहे. काल रात्री 9.27 च्या दादर-विरार या लोकलमधील महिलांच्या डब्यामध्ये ज्यावेळी स्त्रिया चढल्या त्यावेळी त्यांना भयंकर धक्का बसला. त्याठिकाणी त्यांना जे आढळून आले त्याबाबत शब्दश: सांगण्यास मला संकोच वाटतो. पण नाईलाजास्तव उल्लेख करणे आवश्यक आहे. त्या डब्यांमध्ये लघवी भरुन ठेवलेले कंडोम्स ठिकठिकाणी अडकवून ठेवलेले होते. त्या महिलांनी बोरीवली पोलीस स्टेशनमध्ये याबाबत तक्रार केल्यावर साफसफाई करण्यात आली. परंतु आज महिला प्रवास करीत आहेत, याचा अर्थ दादरला ट्रेन येत असताना मध्येच कोणी तरी हे कृत्य करुन ठेवले होते. इतका विकृत प्रकार भर वस्तीमध्ये होत असेल तर आज रात्री, उद्या रात्री महिलांच्या डब्यामधून महिला प्रवास करतील त्यावेळी त्यांना कशाप्रकारे धसका बसलेला असेल हे सांगता येत नाही. अजूनही कोणाला अटक केलेली नाही. ट्रेनच्या टपावरुन प्रवास करणा-या काही प्रवाशांना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमधील लोकांना पकडलेले नाही. उद्या हे अधिवेशन संपणार आहे. महिलांच्या डब्यातील स्वच्छेतेची दुर्दशा आहे, स्वच्छतागृहांचे प्रश्न आहेत. मध्यंतरी "महाराष्ट्र टाईम्समधून" महिलांच्या स्वच्छतागृहांची लेखमाला प्रसिध्द झाली होती. त्या स्थितीत 49.............

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.नीलम गो-हे....

महिलांना दादर ते बोरीवली प्रवास करावा लागला होता. महिलांच्या डब्यामध्ये अशी विकृती हैदोस घालत असेल तर शासन या महिलांना कशाप्रकारे संरक्षण देणार आहे. महिलांच्या डब्यामध्ये सशस्त्र पोलिसांची व्यवस्था ताबडतोब झाली पाहिजे तसे निर्देश शासनाला आपण द्यावेत आणि या प्रकरणातील आरोपी पकडून त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे अशी मी मागणी करते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी आता सभागृहामध्ये मांडलेल्या विषयाच्या संदर्भात शासनाने उचित कार्यवाही करावी.

डॉ.विजयकुमार गावित : होय.

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: यंदाच्या अकरावी प्रवेशाच्या वेळी शासनाने पर्सेंटाईल पध्दत सुरु करण्याबाबत घेतलेलेला निर्णय, गतवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षीही क्रमिक पुस्तकांमध्ये आढळून आलेल्या चुका व लैंगिक शिक्षणाबाबत शासनाने स्पष्ट भूमिका न घेतल्याने निर्माण झालेली संभ्रमावस्था

**मु.शी.**: यंदाच्या अकरावी प्रवेशाच्या वेळी शासनाने पर्सेंटाईल पध्दत सुरु करण्याबाबत घेतलेलेला निर्णय, गतीवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षीही क्रमिक पुस्तकांमध्ये आढळून आलेल्या चुका, लैंगिक शिक्षणाबाबत शासनाने स्पष्ट भूमिका न घेतल्याने निर्माण झालेल्या संभ्रमावस्थेसंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, अनिल परब, संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, भगवान साळुंखे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात शालेय शिक्षण क्षेत्रात दरवर्षी वाढत जाणारा प्रचंड गोंधळ, गुणवत्ता विकास चाचण्यांमुळे जिल्हापरिषदा, नगरपालिका व महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांवर येणारा मानसिक तणाव, अकरावी प्रवेशाच्यावेळी अंमलात आणलेल्या ७०:३० व पर्सेंटाईल गुणसुत्रामुळे विद्यार्थी व पालक वर्गात निर्माण झालेले गोंधळाचे वातावरण, निर्माण झालेला प्रचंड असंतोष, त्यामुळे मा.न्यायालयाला करावा लागलेला हस्तक्षेप, क्रमिक पुस्तकात गतवर्षी झालेल्या चुकांबाबत अद्यापपावेतो जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्याची प्रक्रिया प्रलंबित असतानाच यावर्षी देखिल त्याच प्रकाराची पुनरावृत्ती होणे, त्यास जबाबदार असणाऱ्या पाठ्यपुस्तक मंडळातील

५...

NTK/

श्री.विनोद तावडे....

जबाबदार व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यात अक्षम्य विलंब होणे, पाठ्यपुस्तक मंडळाप्रमाणेच माध्यमिक शिक्षण मंडळातही झालेल्या अनेक प्रकारच्या अनियमिततेची व चुकांची जबाबदारी निश्चित करुन करावयाची कारवाई प्रलंबित असणे, शासनाने विधानपरिषदेत लैंगिक शिक्षणाची घोषणा करणे व ते अंमलात आणण्याचा निर्धार व्यक्त करणे तथापि, त्यास किशोरवयीन आरोग्य शिक्षण वा तत्सम नाव देण्याऐवजी लैंगिक शिक्षण म्हणून संबोधल्यामुळे त्यास होणारा विरोध, शासनाने या संदर्भातील आपली भूमिका स्पष्टपणे न मांडल्यामुळे अद्यापही त्याबाबतीत असलेली संभ्रमावस्था, शालेय शिक्षण क्षेत्रातील अशा सर्व प्रकारामुळे शिक्षण क्षेत्राची झालेली वाताहात व याप्रकरणी शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.जगदीश गुप्ता )**

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 14:25

(श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये प्रत्येक वर्षाच्या मे, जून आणि जुलै महिन्यामध्ये शिक्षणाचा जो बोजवारा उडालेला आपल्याला दिसतो त्याला एकमेव असे कोणी जबाबदार असतील तर ते या राज्याचे शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके हे आहेत असे माझे ठाम मत झालेले आहे. शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके हे संत साहित्याचे गाढे अभ्यासक आहेत. हा अभ्यास करता करता ते अध्यात्माच्या इतक्या उंचीला जाऊन पोहोचलेले आहेत की, शिक्षण दिले काय किंवा नाही दिले काय, एकूण एकच असे त्यांना वाटायला लागलेले आहे. संत साहित्यामध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन केल्यानंतर ते या अवस्थेला पोहोचलेले असल्यामुळे मुलांना शिक्षण मिळाले किंवा नाही मिळाले तरी ते समाधानी आहेत असे वाटत असले तरी या शिक्षणाच्या बाबतीत विरोधी पक्षातील आणि सत्ताधारी पक्षातील लोक चिंतेत आहेत. सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांची या सदनातील उत्तरे आणि भाषणे ऐकल्यानंतर मला प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी प्राध्यापकाची केलेली व्याख्या आठवते. ते असे म्हणतात की, टोला पडल्यावर जो वर्गात येतो आणि टोला पडल्यावर जो वर्गाच्या बाहेर जातो आणि दोन टोल्यांमध्ये जो टोलवाटोलवी करतो तो प्राध्यापक. माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांची सदनातील उत्तरे आणि भाषणे ही अशीच आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यांनी कोणत्याही प्रश्नाला समाधानकारक उत्तर दिल्याचे मी अद्याप पाहिलेले नाही.

सभापती महोदय, राज्यात सर्व शिक्षा अभियान लागू झाले. राज्य सरकार पैसे देत नाही म्हणून या अभियानाद्वारे केन्द्राने मदतीचा हात पुढे केला. परंतु त्याचाही फायदा राज्याला घेता आला नाही. केन्द्राने दिलेल्या निधीला मॅचिंग ग्रॅण्ट देण्याची क्षमता या सरकारमध्ये नाही एवढे आपण कपाळकरंटे आहोत. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ म्हणतात की, अर्थमंत्री श्री. जयंत पाटील हे आमचे ऐकत नाहीत. मग शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांची काय अवस्था होत असेल याची आम्हाला कल्पना करवत नाही. शिक्षण आणि समाजकल्याणाचा जो धो धो निधी अन्यत्र जातो तो शालेय शिक्षण मंत्री अडवू शकत नाहीत. परफॉर्मन्स रिव्ह्यूमध्ये असे म्हटलेले आहे की, "During 2001-2005, only Rs 911.37 crore were available with Maharashtra Prathamik shikshan Parishad against the approved outlay of

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे....)

Rs 2,155.87 crore; short release by Government of India and State Government was Rs 909 crore and Rs 335.50 crore respectively. Utilisation of available funds was poor during 2001-02 (nil) and 2002-03 (54 percent).

As of March 2005, 370 out of 72,033 habitation and did not have schooling facility. As of November 2005, 1.06 lakh children continued to remain 'out of school', out of 15.79 lakh identified in March 2002.

Despite availability of funds, only 37 percent of civil works (construction of class rooms, toilets and provision of drinking water facilities) taken up could be completed as of March 2005, mainly due to land problem.

Though the teacher to pupil ratio in the State as a whole was adequate, this ration in single teacher schools was low. Out of 76,407 primary and upper primary schools, 6,480 were single teacher schools."

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

कशासाठी माघार घेतली ? निर्णय घ्या पण विचारपूर्वक घ्या. घिसाडघाईने घेतलेले निर्णय पुढे नेण्याची सरकारमध्ये हिंमत नसते. पहिल्या दिवशी प्रतिज्ञापत्र केले, मागे घेतले. मुले किती दिवस ताटकळत होती ? 10 वी च्या मुलांची मानसिकता आपण जाणत असालच. खरोखरच त्यांची मानसिकता काय असते याचा कधी विचार केला आहे काय ? अचानक कोणी तरी भेटतो काही तरी सांगितले जाते. सचिव काही सांगतात आणि त्यामुळे सगळे प्राचार्य हवालदिल झालेले होते. आता पर्सेंटाईलचा निर्णय रिझल्टच्या आदल्या दिवशी घेतला. कोर्टात बाजू मांडताना ज्योती पवारांच्या तोंडाला फेस आला. किती वेळा प्रतिज्ञापत्र बदलले.सरकारची बाजू ज्या मांडतात त्याच कन्व्हीन्स नाहीत.सरकारचे अधिकृत वक्तव्य वकीलबाईंनी काय केले तर आम्ही एस.एस.सी.मधील मुलांना फायदा देण्यासाठी हे आणले.असे वक्तव्य केल्यावर न्याय देणारी न्याय संस्था तरी पर्सेंटाईलचे सूत्र मान्य करील काय ? जर अभ्यासपूर्ण निर्णय झाला असता व अभ्यासपूर्ण बाजू मांडली असती तर चित्र वेगळे दिसले असते. 1980 पासून 1993 पर्यंत सीबीएसई आणि आयसीएसई मधील मुलांचे मार्क आणि आमचे मार्क विचार केला तर मला जर 82 टक्के असतील तर सीबीएसई आणि आयसीएसई मधील विद्यार्थ्यालाही 82 टक्के असतील त्याचे 87 टक्के धरले जायचे आणि त्याला प्रवेश दिला जायचा. कारण त्यात्यावेळी त्यांच्या स्टँडर्डच्या विषयात पुण्यात आणि मुंबईत हे नियम होते. सीबीएसई आणि आयसीएसई मधील मुलांना 5 टक्के आणि 3 टक्के जास्त मार्क मिळत होते. 1993 नंतर हे बंद झाले. का बंद झाले आणि आताचे पर्सेंटाईल का योग्य का आहे याचे कारण आपला एस.एस.सी.चा विद्यार्थी 3 भाषांची परीक्षा देतो. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाचा विद्यार्थी दोन भाषांची परीक्षा देतो. भाषांमध्ये स्कोअरींग नसते. आपण घाईगर्दीने काढलेला मार्ग योग्य होता काय असे ज्योती पवारांना कोर्टाने विचारल्यावर 10/10 मुलेच का? त्या म्हणाल्या थांबा. विचारुन येते! बाकीचे सगळे मागे बसले आहेत. फर्स्ट स्लीप, सेकंड स्लीप आणि थर्ड स्लीपसारखे. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? रोज कोर्टामध्ये शिक्षण खात्याची चि-थू होत आहे. जर हा निर्णय आपण सीबीएसई आणि आयसीएसई परीक्षा सुरु होण्यापूर्वी घेतला असता तर वेगळी गोष्ट होती. खरे तर एनसीआरटीकडे गेले पाहिजे. 600 मार्क सीबीएसई आणि आयसीएसई तर 700 मार्क एसएससी बोर्ड. 11वीला सगळे आमच्या बोर्डाकडे येणार. आमच्या बोर्डाकडे यायचे असेल तर 9 वी पर्यत काहीही मार्क्स द्या पण 10 वीला त्यांना मार्क देण्याची पध्दत जशी एसएससी ...

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

बोर्डाला असते तशी म्हणजे एए.एस.सी.बोर्डाला 3 भाषा विषय असतील तर त्यांना 3 भाषा विषय करा, असे प्रपोजल एनसीईआरटीकडे आपल्याला पुटअप करावे लागेल. ते आताच ऑगस्टमध्ये केले तर डिसेंबरमध्ये निर्णय होईल. नाहीतर खात्याला जानेवारी-फेब्रुवारीमध्ये जाग येईल आणि मग एनसीआरटीकडे गेले तर करणार नाहीत. जर एनसीईआरटी सगळया प्रकारच्या बोर्डाचे को-ऑर्डीनेशनचे काम करते तर आपल्याला आताच म्हटले पाहिजे की, आज गरज अशा पध्दतीची आहे त्याचा विचार करायला पाहिजे. अशाच प्रकारचा एनसीईआरटीचा फटका आपल्याला 140 मार्क तोंडी दिले आहेत त्याबाबतीत बसणार आहे. काही शिक्षक अतिशय व्हॅलीजवर चालतात ते म्हणतात आम्ही नियमाने जेवढे मार्क आहेत तेवढेच देऊ. काही शाळांमधील मॅनेजमेंट शिक्षकांना बोलावून सांगते पूर्णच्या पूर्ण म्हणजे 15 मार्क द्यायचे त्याच्याखाली द्यायचे नाहीत. विद्यादानामध्ये यामुळे प्रचंड घोळ होत आहे. परंतु आपले लॉजिक आहे की मुले पास झाली पाहिजेत. मुले आत्महत्या करतात. आता मुले आत्महत्या करतात पण पास होऊन सुध्दा ॲडमिशन मिळत नाही म्हणून करतात. एवढाच फरक झालेला आहे. आत्महत्येचे आणि नैराश्येचे कारण बदलले आहे. त्यामुळे आपण जे मार्क वाढवत आहोत त्यातून आपण विद्यार्थी घडवत आहोत की परीक्षार्थी घडवत आहोत ?

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:40

श्री.विनोद तावडे..........

त्यामुळे ही ॲडव्हॉक निर्णयाची पध्दत बदलली पाहिजे. मंत्रीमहोदयांनी 12 महिने शिक्षणमंत्री म्हणून काम करावे. शेवटच्या महिन्यात धावपळ केली जाते आणि बाकीचे महिने डी.एड, बी.एड कॉलेजांची यादी मंजूर करण्यात वेळ जातो. मंत्रालयातील शिक्षण सचिवांचे दालन म्हणजे वेटिंग हॉल आहे का? अगोदर जे कोण शिक्षण सचिव होते ते बदलून गेले. नंतर श्री.आनंद कुलकर्णी आले, ते बराच काळ रजेवर होते, नंतर त्यांची बदली झाली. श्रीमती शर्वरी गोखले यांची शिक्षण सचिव म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्याकडे पर्यावरण विभागाचा सुध्दा पदभार होता. त्यांचीही बदली झाली. आता श्री.संजयकुमार हे शिक्षण सचिवपदी विराजमान झाले आहेत. परंतु ते देखील चांगली पोस्टिंग मिळण्याची वाट पहात आहेत की काय अशी शंका येते. सन्माननीय मंत्री प्रा.पुरके यांच्या काळातील आमचा हा विदारक अनुभव आहे. पाठ्यपुस्तकांमध्ये चुका झ ााल्याबाबतची चर्चा सभागृहात झाली. त्या चुका आम्ही निदर्शनास आणून दिल्या. वास्तविक या चुका दाखवून देण्याचे काम आमचे नाही. शिक्षण तज्ज्ञांचे ते काम होते हे आम्हाला मान्य आहे. परंतु त्या चुका दुरुस्त झाल्या पाहिजेत. शासनाने लाखो पाठ्यपुस्तके रद्दीत टाकली. ती पुस्तके बदलली पाहिजेत यासंबंधीचे पत्र माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा श्रीमती सरदेशपांडे यांनी 23 ऑक्टोबर, 2007 ला शिक्षण विभागाला पाठविले. शासनाने त्या पत्राचे उत्तर 23 एप्रिल, 2008 रोजी पाठविले. मी ज्यावेळी श्रीमती सरदेशपांडे यांच्याकडे प्रत्यक्ष जाऊन चौकशी केली तेव्हा त्यांनी सांगितले की, काहीही करुन हा निर्णय करुन घ्या. पाठ्यपुस्तके बदलाचे परिपत्रक शासनाने 23 एप्रिल, 2008 ला शाळांमध्ये पाठविले, पुस्तक भांडारांना पाठविले. 18 मे, 2008 पर्यंत हे परिपत्रक नेटवर मला वाचायला मिळाले नव्हते. त्यामुळे शासनाने हे परिपत्रक काढले आहे याची आजही अनेकांना माहिती नाही.

आता दहावीच्या पुस्तकांचे काय झाले? सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, नववीच्या परीक्षा झाल्याबरोबरच मुले दहावीचा अभ्यास सुरु करतात. दहावीची पुस्तके विकत घेतात. लातूर पॅटर्न, अमुक पॅटर्न, तमुक पॅटर्ननुसार विषय शिकविला जातो. विद्यार्थ्यांना जुन्या पुस्तकातील विषय शिकवायला सुरुवात झाली. जून, 2008 मध्ये शाळा सुरु झाल्यानंतर कळले की, यावर्षी हे पुस्तक लागू नाही. आता नवीन पुस्तक आले आहे. मग मी श्रीमती सरदेशपांडे यांच्याकडे विचारणा केली. पुस्तक बदलण्याची एवढी घाई का आहे? त्या म्हणाल्या, आम्ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:40

श्री.विनोद तावडे..........

ऑक्टोबर, 2007 मध्येच शासनाला कळविले होते. शासनाचा निर्णय आम्ही बदलू शकत नाही. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, परीक्षांबाबतचे निर्णय, पुस्तक बदलाचे निर्णय हे पुढील शैक्षणिक वर्षातील पहिली सेमिस्टर परीक्षा होण्यापूर्वी केले पाहिजेत. त्यानंतर कोणतेही बदल स्वीकारु नयेत. कारण शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी पुस्तके छापली जातात, त्याच्या प्रती विकल्या जातात, पुस्तक भांडारांकडे प्रती पाठविल्या जातात. शासनाने गणित विषयाबाबत नवीन निर्णय घेतला. 15 ते 20 टक्के मुले दहावीनंतर गणित विषय घेऊन पुढील शिक्षण घेतात. म्हणून शासनाने लोअर गणित सुरु केले. मला हा निर्णय व्यक्तिश: योग्य वाटतो. परंतु असे लोअर गणित येणार आहे यासंदर्भात कधी बैठक झाली का? शाळा सुरु झाल्यानंतर बैठक घेण्यात आली. मंत्रीमहोदय, आज तरी हे गणिताचे पुस्तक बाजारात उपलब्ध नाही. दहावीला कोणती मुले लोअर गणित घेणार? कोणती मुले हायर गणित घेणार? पालक म्हणतात की, पुस्तक पाहिल्याशिवाय आम्ही ठरवू शकत नाही. पहिल्या चाचणी परीक्षेची वेळ आली आहे. लोअर गणित अनेक शाळांमध्ये शिकवलेच गेले नाही. कारण काय? सन्माननीय मंत्री श्री.वसंत पुरके कधी प्रसन्न होतील, मग पुस्तक पाठवतील, मग पालक ते पुस्तक पाहून निर्णय घेतील, मग आमच्या मुलांना चांगले गुण मिळतील. महात्मा, संत माननीय मंत्री श्री.पुरके साहेबांना कधी दुष्टान्त होईल? गणिताचे पुस्तक कधी आमच्या हातात येईल? हजारो वारकऱ्यांची मुले याची वाट पहात आहेत. अन्यथा ते ऑक्टोबर आणि मार्चची वारी करीत बसतील. याला सन्माननीय मंत्रीमहोदय दोषी असणार आहेत.

(नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

ही वारी पंढरपूरची नसेल. ती मार्च-ऑक्टोबर परीक्षा नापास होणाऱ्या मुलांची असेल. यावर्षी नापास होणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढले तर त्यास पुरके साहेब आपण जबाबदार असाल. अजूनही पुस्तक बाजारात आलेले नाही. अजून तुकड्या निर्माण करण्यात आलेल्या नाहीत. गणिताचे पुस्तक पाहिल्याशिवाय कोणत्या गणिताचा विषय घ्यायचा हे आम्ही ठरविणार नाही, असे पालक सांगत आहेत. मग आपण या जूनमध्ये याची घाई का केली ? आपण जे चांगले असेल त्यासाठी जरूर चांगले निर्णय घ्यावेत. पण चांगले निर्णय घेताना आपण शिक्षकांना विचारात घ्यावे. शिक्षण तज्ज्ञांना विचारात घ्यावे. आपल्या सदनातील शिक्षक आमदार असतील त्यांना घ्या. त्यांच्याशी चर्चा करून चांगला निर्णय घ्या. पाठ्यपुस्तक मंडळाची पुस्तके चुकांसहित देण्याचे आपण का ठरविले आहे ? माध्यमिक शिक्षण मंडळाने, पाठ्यपुस्तक मंडळाला सांगितले की, या चुका आहेत ती पुस्तक विद्यार्थ्यांना देऊ नका. श्री.पवार साहेब म्हणाले की, आपण चुकीचे दिले. आमची 17 लाख पुस्तक जास्त आहेत. एवढी पुस्तके आपण का छापली ? म्हणून सरदेशपांडेबाई आपला चेंडू त्यांच्यावर टाकत असतील, पवार साहेब म्हणतात की, आपण दिले ते आम्ही छापले असे म्हणून तो चेंडू परतवून टाकत आहे. अशा प्रकारे पाठ्यपुस्तक मंडळ आणि माध्यमिक मंडळामध्ये भांडण सुरू आहे. यासाठी निर्णय घेण्यासाठी गव्हर्निंग कौन्सिल असते. त्याचे चेअरमन माननीय संत महात्म्य श्री.पुरके साहेब आहेत. त्यांनी निर्णय काय दिला ? पाठ्यपुस्तक मंडळाचे आर्थिक नुकसान नको. माध्यमिक शिक्षण मंडळावर आर्थिक बोजा नको. दोघांचेही आर्थिक नुकसान नको म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करू या असा निर्णय घेतला. शैक्षणिक नुकसान म्हणजे काय ? बाजारात पुस्तक विक्रीसाठी जाऊ दे, पण ते विक्रीसाठी त्या पुस्तकासोबत दुरूस्तीची पुरवणी जोडू या, असा निर्णय घेतला. ज्यावेळी वर्गात मुलगा अभ्यास करण्यासाठी बसेल त्यावेळी तो वाचता वाचता पुरवणी बघेल. का ? तर चुकांची दुरूस्ती कोणती आहे हे तो बघेल. अनेक दुकांनामध्ये दुरूस्तीची पुरवणी आली नव्हती. पुस्तकाच्या पावतीवर दुकानदारांनी शिक्का मारून दिला आता पुस्तक घेऊन जा आणि नंतर मोफत पुरवणी घेऊ जा. असा पुरके साहेब आपण तरी अभ्यास केला होता काय ? मला यासंबंधी खरच उत्सुकता आहे. कोर्टामध्ये असा प्रयोग करीत असतील ?

श्री.विनोद तावडे...

आपण सुद्धा येथे असे करतो. पण दहावीतील मुलगा पुस्तक हातामध्ये घेतल्यानंतर तो लगेच वाचायला सुरूवात करतो. लोअर मॅथ्स्‌मुळे मुलांचे दिवस बुडाले आहेत. विधानसभेत माननीय श्री.पुरके साहेबांनी शैक्षणिक दिवस किती असले पाहिजेत हे सांगितले आहे. ते म्हणाले की 235 दिवस असले पाहिजेत. जपान देशामध्ये 250 शैक्षणिक दिवस आहेत. आपले शैक्षणिक दिवस कसे वाया जातात यासंबंधी श्री.पुरके साहेब आपण तडफेने बोलला आहात. श्रावणी सोमवार असेल तर सुट्टी, शनिवार असेल तर अर्धा दिवस. आपले खासदार, आमदार डमरू वाजवत जातात, त्या दिवशी शाळा बंद होते असे बोलला आहात. (अडथळा) आपले जे भाषण आहे, त्यातील ओळी मी आता सभागृहाला काळजीपूर्वक वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले आहे की, श्रावणी सोमवारी सकाळ पासून उपवास सुरू होतो. त्यामुळे चार दिवस गेले. शनिवारी सकाळी शाळा उशिरा सुरू होते. एकाच वेळी डमरू वाजवत, डफली वाजवत माननीय खासदार आणि आमदारांनी भेट दिली मग तो संपूर्ण दिवस वाया जातो. अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या वाटेला कमी शैक्षणिक दिवस येतात. हे आपले भाषण आहे. जे भाषण रेकॉर्डवर आले आहे, ते मी येथे वाचून दाखविले आहे. इंजिनिअर असल्यामुळे मी स्पेसिफिक सांगितले आहे. जनरल बोललेलो नाही. माननीय श्री.पुरके साहेब शैक्षणिक दिवसासाठी एवढे आग्रही असल्यामुळे मला भरून आले. मी म्हटले की हा पहिला मंत्री भेटला की ज्याला शैक्षणिक दिवसाच्या नुकसानीचे प्रचंड वाईट वाटते. निम्न गणितामुळे तीन महिन्याचे नुकसान विद्यार्थ्यांचे झाले आहे. म्हणून मी म्हणतो संत श्री पुरके महाराज की जय.

यानंतर श्री.पी.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

ते ज्या पध्दतीने विषयाला सोडून संतांची वचने सांगतात.......(अडथळा).........त्यामुळे आता पुस्तक बदलले,.....दहावीला हे पुस्तक बदलले त्यात शेतकऱ्याचे दु:ख, गरिबी, उपासमार याचे चित्र उभे केले. स्वाभाविक यामागे असा हेतू असेल की, आपल्यासारख्यांच्या काळात शेतकऱ्यांचा वाईट काळ कसा असतो हे विद्यार्थ्यांना कळले पाहिजे. पण काही विद्यार्थी म्हणतील की असे असेल तर आपला देश कृषिप्रधान असला तरी शेतकरी कशाला व्हावयाचे. अशा प्रकारे त्या पुस्तकात दिलेले आहे. निदान त्या पाठाच्या शेवटी पॉझिटिव्हली शेवट करणे आवश्यक होते म्हणजे त्या विद्यार्थ्याला वाटेल की, शेतकरी झाले पाहिजे. तसेच निसर्गाचा अभ्यास केला पाहिजे आणि त्यातून खूप शिकायला मिळते म्हणून "शाळा" नावाचा एक धडा आहे, त्यात तसे न केल्यामुळे शिक्षक मारतील या पध्दतीने मुलांनी शाळा बुडविली. त्यामुळे मुले जंगलात गेली, त्या जंगलात निसर्गाकडून त्यांना जे ज्ञान मिळाले ते शाळेत कधीच मिळाले नसते. मी प्रत्येक पुस्तक वाचले नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांनी दोन दोन वेळा पुस्तक वाचून ह्या चुका पाहिल्या आहेत. एरवी ॲकेडमिकवर आमदारांनी बोलावे असे अपेक्षित नसते पण मंत्री महोदयांनी ती पुस्तके वाचली. मग आपल्या "शाळा" या पुस्तकाचा अभ्यास न केल्यामुळे शिक्षक मारतील. म्हणजेच शाळेत शिक्षण मिळत नसून जंगलात मिळते असे त्या मुलांना वाटते. तसेच शाळेत शिक्षण मिळत नाही हे मंत्री महोदयांनी मान्य केले, त्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. आणखी एक आठवडा अधिवेशन चालले असते तर एक ठराव पास करुन त्यांचे अभिनंदन केले असते, आणि इतका बिनधास्त मंत्री मिळणार नाही असे सांगितले असते. त्यानंतर विज्ञानाचे पुस्तक 30 पाठांचे आहे, सर्व शिक्षक आमदार सांगत होते की, एवढ्या पाठांची गरज नाही, ते यात देऊ नका. मराठी विषयाच्या पुस्तकात माननीय शिक्षण मंत्र्यांनी कदाचित ते नक्कीच वाचले असेल. त्यात शिवरायाशी संवाद साधला आहे पण त्याच पुस्तकाची इंग्लिशमध्ये जी प्रस्तावना दिलेली आहे त्यात असे म्हटले आहे की, "तुकोबारायांनी बुवाबाजीच्या विरोधात सदर आवाज उठविला आहे" व्वा, वाह.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

त्यांच्या गाथेतील अर्थ माननीय शिक्षणमंत्र्यांना कळला असेल परंतु हा अर्थ मला कळला नाही. मी आपला वारकरी आहे. ईश्वराशी संबंध बुवाबाजीच्या विरोधात कसा काय आहे? माननीय उल्हास पवार, माननीय गावित साहेब शिक्षण मंत्री असते तर आम्ही समजू शकलो असतो. परंतु माननीय शिक्षणमंत्री महोदयांनी सर्व साहित्याचा अभ्यास केलेला असतांना, पुस्तके दोनदा-दोनदा वाचलेली असतांना हे कसे काय घडलेले आहे ? ऐनवेळी जी पुस्तके आलेली आहेत त्यासंदर्भात 7 ते 9 जुलै, 2008 या काळात ऑनलाईन प्रशिक्षण यशवंतराव चव्हाण विद्यापीठात दिले गेले. यासंदर्भात महाराष्ट्रात 32 ठिकाणी ऑनलाईन प्रशिक्षण केंद्र सुरु केले. ऑनलाईन प्रशिक्षणामध्ये काही शिक्षकांनी प्रश्न विचारले त्यावेळेस त्यांना हे ऑऊट ऑफ कॉन्टयाक्ट आहे, हा प्रश्न विचारण्याची गरज नाही, बाकीचे बघा असे त्यांना उत्तर देण्यात आले. मला माझ्या शाळेतील घटना आठवते. त्यावेळेस मी तिसरी किंवा चौथीमध्ये होतो. आमच्या बाईंनी सांगितले की, पृथ्वीपासून चंद्राचे अंतर हे इतके गुणिले इतके प्रकाश वर्ष आहे. ही सर्व माहिती मुलांनी लिहून घेतली. मी सुध्दा लिहून घेतली. आमचे आता जसे डोकं चालतं ते त्यावेळी अजून जास्त चालायचे. मी हात वर करुन म्हणालो, "बाई, पृथ्वी आणि चंद्राचे अंतर तुम्ही मोजले कसे?" बाई म्हणाल्या, "हा प्रश्न परीक्षेत येणार नाही, खाली बस." हाच प्रकार ऑनलाईन प्रशिक्षणामध्ये सुध्दा झालेला आहे. जे प्रश्न शिक्षकांनी ऑनलाईन प्रशिक्षणात विचारले त्यांना उत्तरे देण्यात आली नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अज्ञापत्रात फारशी भोषेतील 1676 असे जे लिहिले आहे त्यासंदर्भात विचारणा केली असता त्यासंदर्भात ऑनलाईन प्रशिक्षणात एकालाही उत्तर देता आले नाही. शिक्षण देण्याचा आपला जो प्रयत्न आहे तो विफल होतो. एनडीटीव्हीच्या मुलाखतील आपले शिक्षण राज्य मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी तर मान्य केले आहे की, "शासन शिक्षणावर हजारो कोटी खर्च करते परंतु आम्हाला शिक्षण द्यायला जमले नाही." सभापती महोदय, शिक्षण आणि पशुसंवर्धन खाते एकत्र केल्यावर अजून काय होणार ? यामध्ये मंत्रीमहोदयांचा काय दोष आहे?

सभापती महोदय, लैंगिक शिक्षणाचा विषयाच्या संदर्भात माननीय शिक्षण मंत्री श्री. पुरके यांनी राणा भीमदेव थाटात सांगितले की, "काय वाट्टेल ते होऊ दे, मी लैंगिक शिक्षण लागू करणार म्हणजे करणार, काय बोंबलायचे ते बोंबला." जाऊ द्या बोली भाषा असते. मागच्या वेळी यासभागृहात मी आणि डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले होते की, इलेक्ट्रॉनिक्स मिडीया प्रत्येक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

घरा-घरात गेल्यामुळे सर्व लहान मुलांना बघावयास मिळते त्यामुळे अशा प्रकारच्या शिक्षणाची गरज असू शकते ? विधानसभेत सीबीएसई आणि आयसीएसईचा सिलॅबस चुकीचा आहे यासंदर्भात चर्चा झाली होती. "लैंगिक शिक्षण" या शब्दाच्या ऐवजी " किशोरवयीन आरोग्य शिक्षण" असे नाव द्या असे मी सूचवले होते. ॲडलेसन्स-एज हेल्थ एज्यूकेशन हा शब्द आल्याबरोबर हे वेगळयाच प्रकारचे शिक्षण आहे असे वाटते. आपण मान्य करा किंवा करु नका, परंतु आज या प्रकारच्या शिक्षणाची गरज आहे. त्यामुळे यासाठी या सभागृहातील डॉ. आमदार असतील, एनजीओ, या विषयात काम करणारे काही शिक्षक आहेत, संघटना आहेत त्यांच्या बरोबर एकदा बैठक तरी बोलवा.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

त्याचबरोबर या विषयाच्या संदर्भात काम करणारे काही एन.जी.ओ. आहेत त्यांच्याबरोबर बैठक बोलावून या विषयाचे सिलॅबस कसे असावे याची चर्चा केली पाहिजे. यासाठी सिलॅबस म्हणजे 100 मार्कांच्या पेपरची काही गरज नाही या विषयाचा दर महिन्यातून एकदा पिरियड घेतला तरी चालू शकेल सी.बी.एस.ई.चा जो सिलॅबस आहे तो चुकीचा आहे. किशोरवयीन आरोग्य शिक्षण केवळ एडस थांबविण्यासाठीच नाही. त्याचा भाग फक्त पाच टक्केच आहे मात्र या विद्यार्थ्याचा चांगला विकास व्हावा, वाईट गोष्टीपासून त्याने दूर रहावे, समज गैरसमजापासून दूर रहावे आणि स्वत:चा सकारात्मक विकास करावा यासाठी किशोरवयीन आरोग्य शिक्षणाची आवश्यकता आहे .या विषयावर जेव्हा आपण चर्चा करु त्यावेळी मी सविस्तर बोलेन. किशोरवयीन आरोग्य शिक्षणाचा विषय जर सुरु करण्यात आला तर त्यासाठी कोणाची आडकाठी राहील असे मला वाटत नाही. परंतु हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी संबंधितांना विश्वासात घेण्यात आले पाहिजे परंतु तसे न करता मी काही तरी नवीन विषय सुरु करणार आहे असे माननीय मंत्रीमहोदयांना का वाटत आहे ? हा विषय आणण्यामध्ये ते तरबेज आहे किंवा नाही या सबंधीची चर्चा शिक्षण मंत्र्यांनी कशाला करावयाची. शिक्षण मंत्र्यांनी याबाबतीत ते वाक्य उच्चारले होते म्हणून मी उल्लेख केला आहे.. काहीही झाले तरी हा अभ्यासक्रम मी सुरु करीनच असे म्हणण्या ऐवजी विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा अभ्यासक्रम सुरु करावा लागणार आहे व त्यामध्ये जो काही बदल सुचविण्यात येईल तो बदल करुन तुम्ही - आम्ही मिळून हा अभ्यासक्रम सुरु करु या असे माननीय शिक्षण मंत्र्यांनी म्हणावयास पाहिजे.

**श्री. जगदीश गुप्ता (तालिका सभापती)** : माननीय शिक्षण मंत्र्यांना आपण शिकवत आहात काय

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यांना शिकविण्याची माझी हिंमत नाही. या चर्चेच्या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, शिक्षण खात्यामध्ये माननीय शिक्षण मंत्र्यांनी वचक निर्माण करावयास पाहिजे आणि तो निर्माण करीत असतांना यवतमाळ जिल्हयातील राळेगाव मधील इंदिरा गांधी नावाच्या कॉलेजमध्ये आम्ही अमुक देतो,तमुक देतो असे सांगून फी वाढविण्यात येईल असे सांगण्याचा प्रसंग टाळण्यात आला पाहिजे. कॉलेजमधील फी वाढविण्यात आल्यानंतर विद्यार्थी आदोलन करतात त्यानंतर ही फी वाढ मागे घेण्यात येते . तेव्हा असे प्रकार जर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

टाळण्यात आले तर आपल्यामध्ये नैतिक ताकद येईल. या राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दिवस किती असतात हे शिक्षण संचालकांनाही माहिती नव्हते असे आपणच सांगितले आहे. तुमच्या ऐवजी दुसरा कोणता शिक्षण मंत्री असता तर त्यांनी शिक्षण संचालकाला घरी बसवले असते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक दिवस किती आहेत हे शिक्षण संचालकान्ना माहीत नाही असे सभागृहात सांगणे ही बाब भूषणावह नाही. शिक्षण संचालकाना त्याची माहिती असणे आवश्यक आहे. केवळ अनुदान वाटण्याकरिता ते बसलेले आहेत काय ? शैक्षणिक कामाची जबाबदारी त्यांच्यावर नाही काय ? शिक्षण विभागावर मंत्र्यांचा वचक असला पाहिजे. बांदा एज्युकेशन सोसायटीचे एक प्रकारण मी आपल्याकडे पाच वेळा घेऊन आलो होतो आणि आपणही त्याबाबतीत योग्य भूमिका घेऊन निर्णय दिला होता. प्रशासक नेमण्यासंबंधी आपण दिलेल्या आदेशाचे पालनच श्री.गडकरी नावाच्या शिक्षणाधिका-याने केले नाही म्हणून त्याचे निलंबन करण्यात यावे असे आपण सागितले होते परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. आपण जे काही आदेश देता तो आदेश कोणताही राजकीय पुढारी येऊन थांबवतात. माननीय शिक्षण मंत्र्यानी दिलेल्या आदेशाची मात्र अंमलबजावणी होत नाही..

एक सन्माननीय सदस्य(बसून) : त्यांचे नाव काय होते ?

श्री.विनोद तावडे : सिंधुदूर्ग जिल्हयातील गडकरी नावाचा हा शिक्षणाधिकारी असून बांदा एज्युकेशन सोसायटी नावाचे ते कॉलेज होते..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. पुरके साहेब आपली प्रशासनावर पकड निर्माण झाली पाहिजे व त्याची आज गरज आहे. मंत्री महोदय, आपला आवाज ठायी ठायी गेला पाहिजे. माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील हे असे तसे पैसे देत नाहीत. तुमच्या शिक्षणाचे पैसे जर त्यांनी ओरबाडण्याचा प्रयत्न केला तर त्यावर तुमचा वचक असला पाहिजे. आपल्या विभागामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. मुंबईच्या एस.एस.सी. बोर्डाचे अध्यक्ष, राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव हे एकेक अधिकारी दोन-दोन पदे संभाळतात. तेव्हा आपण ही पदे कां भरीत नाही? आपणास माणसे कां मिळत नाहीत? आपणास माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील पैसे देत नाहीत काय? माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. हंडोरे साहेब सुध्दा मान डोलवीत आहेत. त्यांच्या खात्याला सुध्दा कधी-कधी फटका बसतो. ज्यावेळी एखाद्या खात्याचा मंत्री कमकुवत असतो त्यावेळी त्या खात्यावर अन्याय होत असतो, तो आपणावर होत नाही. माननीय प्रा. पुरके साहेब हा आपल्यावर अन्याय नसून आपल्या खात्यावर होतो. मंत्रिमहोदय, आपण संत वाङमयाचे अभ्यासक आहात. "मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास,

कठीण वज्रास भेदू ऐसे,

भले तरी देऊ कासेची लंगोटी,

नाठाळांच्या पाठी देऊ काठी"

हे जर आपल्या कारभारामध्ये आणले तर शिक्षण खाते सुधारेल. आपली मुले हायफाय, नॉन स्टॉप इंग्रजी फाडफाड बोलायला लागले याचा अर्थ शिक्षण खाते सुधारले असे मी मानीत नाही. असे आपल्या विधानसभेतील वक्तव्यावरुन मला वाटले. ज्यावेळी एस.एस.सी. उत्तीर्ण झालेला कोणताही विद्यार्थी टेंशन न घेता उत्तीर्ण झालो असे म्हणेल आणि त्यावेळी त्या विद्यार्थ्याचे पालक आपल्या मुलाचे नाव कोणत्याही कॉलेजच्या यादीमध्ये लागले किंवा लागले नाहीतरी  निर्धास्त रहातील तो दिवस या देशातील व राज्यातील शैक्षणिक सुदिन राहील. आणि तसे जमत नसेलतर आपण अध्यात्मामध्ये म्हटले आहे तेवढेच म्हणेन. एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

---

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सुदैवाची गोष्ट अशी आहे की, गेल्या सहा महिन्यामध्ये शिक्षणावर दुसऱ्यांदा प्रस्ताव येत आहे. गेल्या वेळी माननीय मंत्रिमहोदय, प्रा. पुरके साहेबांनी केलेले प्रदीर्घ भाषण परवा लैंगिक शिक्षणाच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित झाला त्यावेळी वाचण्याचा योग आला. माननीय मंत्रिमहोदय प्रा. पुरके साहेबांनी जी वचने आपल्या प्रवचनामध्ये दिली होती ती किती पूर्ण केली हे मी पाहिले. त्यावेळी दुर्दैवाने असे वाटले की, त्यातील एकही वचन पूर्णत्वाला गेले नव्हते. माननीय प्रा. पुरके साहेबांनी अनेक योजना जाहीर केल्या. प्रस्तावात युनिट टेस्टपासून पर्सेंटाईल पर्यंत उल्लेख केला आहे. त्यामध्ये 70:30 प्रमाण आले. त्यामध्ये कोटा सिस्टीम आली. त्यामध्ये लैंगिक शिक्षण आले. अशा सर्व योजना माननीय प्रा. पुरके साहेबांनी मोठ्या धिरोदात्तपणे मांडल्या परंतु ज्यावेळी विरोध झाला त्यावेळी ते बॅकफूटवर गेले. ते बोल्ड होता होता वाचले. नाही तर त्यांची विकेट गेली असती. असे निर्णय बदलण्याची प्रक्रिया माननीय प्रा. पुरके साहेबांच्या नशिबी का यावी ? त्यांनी युनिट टेस्टचा प्रश्न मांडला त्यावेळी आम्ही त्यांना जाऊन भेटलो होतो. एका वर्षात 18-19 युनिट टेस्ट हे अनाकलनीय होते. विद्यार्थ्यांनी शिकावे की फक्त परीक्षा द्याव्यात ? त्यानंतर मार्कांची पध्दत और होती. गेल्या वर्षाचे गुण, या वर्षाचे गुण हे सर्व पालकांना संभ्रमात टाकणारे काम होते. आजही तीच प्रक्रिया चालू आहे. ज्यांचा पाल्य पहिलीतून दुसरीत जाणार असेल किंवा नववी पास होऊन दहावीत जाणार असेल किंवा दहावी पास होऊन अकरावीत जाणार असेल ते सर्व पालक संभ्रमावस्थेत आहेत. त्या पालकांची अवस्था काय असेल हे सांगणे शक्य नाही. राज्य शासनाने काही योजना घेतल्या. त्यामध्ये महात्मा फुलें शिक्षण हमी योजना, वस्तीशाळा योजना, उपचारात्मक अभ्यास वर्ग, अनिवासी वस्तीशाळा, निवासी वस्तीशाळा, हंगामी स्थलांतरित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे अशा अनेक योजना घेतल्या. योजनांचा सुकाळ आहे पण पैशाचा दुष्काळ आहे. सन 2007-08 मध्ये जवळजवळ 358 लाख रुपयांची योजना होती. परंतु आपल्याला फक्त 161 लाख रुपये मिळाले. आपण सांगितले की, मी सहा वर्षामध्ये शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या कमी केली. या वर्षी फक्त 96821 शाळाबाह्य मुले आहेत. शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या 15 लाख 78 हजार होती. ते विद्यार्थी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. दीपक सावंत .....

शाळेत जात नव्हते. सहा वर्षामध्ये कोणती जादू झाली की ती संख्या 96821 वर आली ? आपण शाळाबाह्य मुले मोजली नाहीत काय ? हा आकडा आपोआप कमी झाला काय ? माननीय शिक्षण मंत्र्यांना विचारु इच्छितो की, 96821 ही संख्या बरोबर आहे काय ? राज्यामध्ये 1 लाख 70 हजार मुलांपर्यंत योजना पोहचू शकली नाही. आपण 1 लाख 70 हजार मुलांसाठी योजना राबवली परंतु आपले खाते फक्त 66522 विद्यार्थ्यांपर्यत पोहोचले. शिक्षकांचे प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील मांडतील. मी जाता जाता एवढेच सांगू इच्छितो की, 2005 पासून हा प्रश्न सर्वशिक्षा अभियानामध्ये अजूनही शिल्लक आहे. हा सर्वशिक्षा अभियानाचा भाग आहे. यामध्ये मुंबई आणि मुंबई उपनगर सुध्दा येते. या सर्वशिक्षा अभियानामध्ये फक्त 41 ते 44 टक्के रक्कम खर्च झालेली आहे. बाकीचे पैसे का खर्च झालेले नाहीत ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

या राज्यामध्ये 6 टक्के शाळा एकशिक्षकी शाळा आहेत. आजही 500 हून अधिक शाळा एकशिक्षकी आहेत. त्यात दुर्दैवाने आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयाचा पहिला क्रमांक लागतो. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकूण 1701 शाळा आहेत. त्यापैकी 246 शाळा एकशिक्षकी आहेत. राज्याच्या अर्थसंकल्पाची स्थिती विचित्र आहे. संपूर्ण राज्यासाठी 100 रुपये खर्च केले जात असतील तर शिक्षणावर 2.50 पैसे ते 3 रुपये खर्च होतात. यामध्ये सर्वसाधारण शिक्षण, तंत्रशिक्षणाचा समावेश आहे. माझ्या मते एकूण खर्चाच्या 50 टक्के शिक्षणावर खर्च होणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणावर तर काहीच खर्च होत नाही. सन 2010 पर्यंत सर्व शाळांमध्ये सर्वशिक्षा अभियान योजना पोहोचावी असा शासनाचा मानस होता. यासाठी सन 2003 मध्ये सर्व मुले शाळेमध्ये जाणे आवश्यक होती. परंतु ते शक्य झालेले नाही. सर्वशिक्षा अभियान अंतर्गत केंद्र सरकारकडून राज्याला 447 कोटी रुपयांचा निधी मिळणार होता, तसेच राज्य सरकारने तेवढीच रक्कम टाकणे आवश्यक होते. त्यासाठी सरकारने 271 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केले होते, प्रत्यक्षात केवळ 171 कोटी रुपयांची मॅचिंग ग्रॅन्ट दिली आहे. म्हणजे केवळ 16 टक्के रक्कम यासाठी देण्यात आली आहे. हा सर्व प्रकार होत असताना या राज्यातील अपंग विद्यार्थ्यांची परिस्थिती तर फारच भयानक आहे. ग्रामीण, दुर्गम भागामध्ये विद्यार्थ्यांच्या अपंगत्वावर मात करण्यासाठी शिक्षकांची कमतरता आहे. राज्यामध्ये 3.98 लाख विद्यार्थी अपंग आहेत. यामधील विविध आकडेवारी थक्क करणारी आहे. अस्थि व्यंग असलेले विद्यार्थी 77,280 आहेत, दृष्टी दोष असलेले 1.26 लाख, कर्णबधिर 63 हजार, भिन्नमति 57,572, अध्ययन 41 हजार, वाचा दोष असलेले 39 हजार, स्वमग्न 4900, बहुविकलांग असलेले 9449, पक्षघाताने आजारी असलेले 2700 विद्यार्थी आहेत असा सर्वशिक्षा अभियान अंतर्गत अहवाल प्राप्त झाला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सीबीएसई आणि आयसीएसई, पर्सेंटाईल सिस्टिमबाबतची माहिती सांगितली आहे. या मंडळांचे आणि आय.बी.चे विद्यार्थी ज्या शाळांमध्ये शिकतात त्या शाळांमध्ये वंदे मातरम् आणि जन गण मन ही राष्ट्रगीते म्हटली जात नाहीत. यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत...

माननीय शिक्षणमंत्री श्री.वसंत पुरके यांच्या सहीचे मला पत्र आलेले आहे. त्यात ते असे म्हणतात की, "या सर्व शाळांमध्ये या वर्षापासून 26 जानेवारी आणि 15 ऑगस्ट या दोन दिवशी झेंडावंदन व राष्ट्रगीतही होईल." या पत्रातील संदिग्धता पुढे आहे. "राज्यातील आयसीएसई, आयसीएसई आणि आयबी, आयजीसीएसई अभ्यासक्रमाच्या शाळांना संबंधित मंडळ आणि परिषद मंडळांचे संलग्नीकरण प्राप्त करण्यापूर्वी राज्य शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते. या सर्व शाळांमध्ये 26 जानेवारी - प्रजासत्ताक दिन व 15 ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन या दोन दिवशी राष्ट्रीय सण साजरे केले जातील. या अटींवर हे ना हरकत प्रमाणपत्र राहील अशी शासनातर्फे सर्व संबंधित परिषदा व मंडळांना कळविण्यात आलेले आहे."

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:20

(डॉ. दीपक सावंत....

या पत्रातून सीबीएसई आणि आयसीएसई शाळांना हा नियम लागू नाही तर यानंतरच्या ज्या शाळांना ना हरकत प्रमाणपत्र देणार आहात त्यांच्यासाठी हा नियम लागू आहे असा अर्थ या पत्राने ध्वनित होतो. या पत्रामध्ये शब्दच्छळ केलेला आहे. तेव्हा यापूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या शाळांना हा नियम लागू होणार आहे की नाही, त्यांना वंदे मातरम् आणि जनगणमन म्हणण्यास सक्तीचे करणार आहात की नाही ? या शाळांमध्ये वंदे मातरम् आणि जनगणमन म्हटले जाणार नसेल तर त्या शाळा महाराष्ट्रामध्ये चालविण्याचा त्यांना काय अधिकार आहे ?

सभापती महोदय, पर्सेण्टाईल सिस्टिम ऑफ मार्क्स हा विषय मी आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आम्ही दोघांनी या सदनामध्ये मांडला होता. या ठिकाणी जो ज्योती पवार यांचा उल्लेख करण्यात आला तो बरोबर आहे. कोर्टामध्ये ज्या पध्दतीने ॲफिडेव्हिट करायला पाहिजे होते त्या पध्दतीने ते केले गेले नाही. हे पर्सेण्टाईल सिस्टिम 10 विद्यार्थ्यांचीच का, ती 1000 विद्यार्थ्यांची का नाही असा प्रश्न कोर्टाने विचारलेला आहे. पर्सेण्टाईल सिस्टिम म्हणजे अमेरिकन सिस्टिम ऑफ कॅल्क्युलेटिंग मार्क्स होय. या मधील मूळसूत्र हे व्यवस्थितपणे कोर्टाला सांगितले असते तर आपल्याला कोर्टापुढे मान खाली घालावी लागली नसती. या प्रकरणी कोर्टाने अजून निर्णय दिलेला नाही. तेव्हा आपण या बाबतीत काय करणार आहात ? हजारो पालक आपल्यावर चालून येतील. जशी पाण्यासाठी युध्दे होतील तशी ती शिक्षणासाठी देखील होतील. आज पालकांची मानसिकता काय आहे? आज विद्यार्थ्याला ॲडमिशन मिळालेले असले तरी या पर्सेण्टाईल सिसिटममुळे ते रद्द होईल की काय अशी भीती त्यांच्या मनामध्ये आहे.

सभापती महोदय, 70:30 प्रमाणे ॲडमिशन देण्याचा जी.आर. 4 वर्षापूर्वी निघाला असताना त्याची अंमलबजावणी त्याच वर्षापासून का केली नाही ? तो जी.आर. अजून कोणालाच समजलेला नाही. त्या जी.आर.मध्ये नेमके काय म्हटलेले आहे हे कोणालाच कळलेले नाही. त्या जी.आर.मध्ये नेमके काय म्हटलेले आहे हे माननीय शिक्षण उपसंचालक महोदया देखील मला सांगू शकल्या नाहीत. तेव्हा त्या जी.आर.मध्ये काय म्हटलेले आहे हे माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला सांगितले तर फार बरे होईल.

..2..

(डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, काही कॉलेजमध्ये ऑन लाईन ॲडमिशन पध्दत सुरु केली. संगणक तज्ज्ञ श्री. जितेंद्र शहा यांच्या माध्यमातून स्क्रॅच आणि झिप कार्ड काढले. झीप कार्डची किंमत 300 रुपये आहे. कॉलेजच्या प्रॉस्पेक्टस्ची किंमत जास्तीत जास्त 100 ते 150 रुपये असते. म्हणजे ऑन लाईन ॲडमिशन फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्याला 300 अधिक 100 रु. म्हणजे एकूण 400 रुपये खर्च आला. दुसरे असे की, कॉलेजमध्ये ॲडमिशन घेणारी सर्वच मुले ही मोठ्या इमारतीमध्ये राहाणारी नसतात. झोपडपट्टीमध्ये राहाणारे विद्यार्थी देखील आहेत. झोपडपट्टीमध्ये इंटरनेट नाही. मग अशा विद्यार्थ्यांना सायबर कॅफेमध्ये जाऊन तासाला 50 रुपये देऊन हे ॲडमिशन फॉर्म भरावे लागले. अनेक जणांनी एकाच वेळी ही संकेतस्थळे उघडल्यामुळे ते जॅम झालेले होते. या संकेत स्थळांच्या साईटस् ओपन होण्यासाठी लोक रात्री 3-3 वाजेपर्यनत प्रयत्न करीत होते. एखादी व्यवस्था ही लोकांच्या फायद्यासाठी करीत असताना तिचे नीट व्यवस्थापन केले नाही तर त्या व्यवस्थेचा लोकांना फायदा होण्याऐवजी त्रासच अधिक होतो. ऑन लाईन ही चांगली सिस्टीम आहे परंतु तिचे ॲप्लिकेशन नीट होऊ शकले नाही हे मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते. इंटरनेट वरुन जेव्हा ॲडमिशन फॉर्म भरला जातो त्यावेळी त्याची रिसिप्ट वगैरे काहीच मिळत नाही. त्यामुळे एखाद्या कमी मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्याला मेरिट डावलून ॲडमिशन दिले असेल तर ते समजू शकणार नाही. कॉलेजमध्ये प्रत्यक्ष फॉर्म दिला तर त्याची रिसिप्ट तरी मिळते. तेव्हा या शिक्षण क्षेत्रामध्ये ज्या ज्या गोष्टी केलेल्या आहेत त्या अत्यंत धिसाडघाईने केलेल्या असल्यामुळे त्यांचा उलटा परिणाम होताना दिसतोय. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, कोणताही निर्णय घेताना जे ॲप्लिकेशन ऑफ माईण्ड लागते, आजूबाजूला जी थिंक टॅंक असावी लागते ती थिंक टॅंक डिफेक्टिव्ह आहे असे मी जबाबदारीने येथे सांगतो.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, इयत्ता 12 वी च्या विद्यार्थ्यांना इंटरनल परीक्षेच्या अनुषंगाने 20 गुण देऊन टाकले आहेत. एस.एस.सी.ची परीक्षा झाली इंटरनल ॲसेसमेंटचे गुण दिले, त्यामुळे विद्यार्थ्यांचे गुण एकदम वाढले. 10 वी मधील विद्यार्थ्यांना भाषा विषयात तोंडी परीक्षेचे गुण दिले. विज्ञान विषयात प्रॅक्टीकलचे गुण दिले. गणित आणि समाजशास्त्र विषयात अंतर्गत गूण, अशी ब्रम्हास्त्र शिक्षण मंडळाने शिक्षकांच्या हातात दिली. त्यामुळे 78 टक्के विद्यार्थ्यांना जास्त गूण मिळाले ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी इयत्ता 10 वी च्या पुस्तकाबाबतचा उल्लेख केला गेला. इयत्ता 10 वी चा वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके मिळावयास पाहिजे होती. 10 वी ची पुस्तके बाजारात आली किंवा नाहीत या गोष्टीची कल्पना शिक्षकांना नाही. अशा प्रकारच्या चूका शिक्षण विभागाकडून झाल्या आहेत. आज विद्यार्थ्यांची अशी परिस्थिती आहे की, इयत्ता 10 वी आणि इयत्ता 12 वी उत्त्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळालेले नाहीत. माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, 26 हजार जागा शिल्लक आहेत. 26 हजार जागा कोठे शिल्लक आहेत ? आजच्या इंग्रजी वृत्तातील बातमी वाचली तर बोटावर मोजण्या इतक्या जागा शिल्लक आहेत. मी या सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आज इयत्ता 12 वी परीक्षेत 80 ते 85 गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळालेले नाहीत. रुईया महाविद्यालयात सायन्सच्या फक्त 4 जागा शिल्लक आहेत. कटऑफ यादी 92 टक्के गुण एवढी आहे. आर्टची कटऑफ यादी 72 एवढया गुणांची असून त्या ठिकाणी 16 जागा शिल्लक आहेत. एस.आय.ई.एस.मध्ये सायन्सच्या फक्त 9 जागा शिल्लक आहेत. कटऑफ यादी 92 टक्के गुण एवढी आहे. ऑर्टस्‌मध्ये 15 जागा शिल्लक आहेत. कटऑफ यादी 78 टक्के गुण एवढी आहे. कॉमर्समध्ये 38 जागा शिल्लक आहेत आणि कटऑफ यादी 84 टक्के गुण एवढी आहे. मिठीबाई कॉलेजला सायन्समध्ये 42 जागा शिल्लक आहेत, कटऑफ यादी 90 टक्के गुण एवढी आहे. कॉमर्सला 77 जागा शिल्लक आहेत, कटऑफ यादी 87 टक्के गुण एवढी आहे. आर्टस्‌मध्ये 37 जागा शिल्लक आहेत. कटऑफ यादी 60 टक्के गुण एवढी आहे. गेल्या वर्षी अधिवेशनात ज्या विद्यार्थ्यांना 65 ते 70 टक्के गुण होते त्यांना प्रवेश मिळावा म्हणून आपण भांडत होतो. परंतु या वर्षी ज्या विद्यार्थ्यांना 80 टक्क्यांच्यावर गुण आहेत, त्या विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयांमध्ये

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

प्रवेश मिळालेले नाहीत ही दुर्देवाची गोष्ट आहे. या गोष्टीवर उपाय म्हणजे माननीय शिक्षणमंत्र्यांनी जो निर्णय घेतला आहे तो पुन्हा तपासून घ्यावयास पाहिजे. जर पर्सेंटाईल सिस्टीम ऑफ मॉर्क्स् फेल ठरली तर आपण काय करणार आहात ? या सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश पुन्हा करणार काय ? 70:30 चा तुमचा निर्णय फेल ठरलेला आहे, त्याप्रमाणे पर्सेटाईल सिस्टीम ऑफ मॉर्क्स् फेल ठरली. ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळालेला नाही त्यांना कोणत्या बेसिसवर आपण प्रवेश देणार आहात. पूर्वी सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई या संस्थेतील विद्यार्थ्यांना 5 टक्के गुण वाढवून देण्यात येत असून त्याचप्रमाणे आज पर्सेटाईल सिस्टीम सुरु करण्याचा प्रयत्न केला. आज सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई. आणि आय.बी.चे विद्यार्थी 20 ते 25 हजार एवढे आहेत. सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई शाळांची मस्ती मिटवावयाची असेल तर त्यांना स्वतःची महाविद्यालये सुरु करा असे सांगावे लागेल. या संस्था लाखो रुपयांचे डोनेशन्स घेतात. त्यांच्या संस्थांना इयत्ता 11 वी आणि इयत्ता 12 वी चे वर्ग सुरु करण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी. या वर्षी हा प्रश्न सुटणे कठीण आहे, परंतु पुढील वर्षी तरी हा प्रश्न शासनाने सोडविला पाहिजे. सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई आणि आय.बी. या संस्थांनी इयत्ता 11 वी व 12 वी वर्ग सुरु करण्यास काय हरकत आहे ? 12 वी उत्तीर्ण झाल्यानंतर सर्व विद्यार्थी एकत्रच येतात. 12 वी नंतर अर्धे विद्यार्थी वैद्यकीय क्षेत्राकडे निघून जातात. काही सायन्सचे विद्यार्थी इंजिनिअरीं क्षेत्राकडे निघून जातात. त्यानंतर जे विद्यार्थी राहतात ते कॉमर्स आणि आर्टस्कडे येतात. त्या संस्थांना इयत्ता 11 वी 12 वी चे वर्ग सुरु करण्यासंदर्भात शासनाने सूचना द्याव्यात अशी माझी विनंती आहे. या वर्षी खरोखरच विद्यार्थ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर काही जागा सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवा. एस.एस.सी.बोर्डातून उत्तीर्ण झालेले एकूण विद्यार्थी, सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई या संस्थांमधून उत्तीर्ण झालेले एकूण विद्यार्थी यांचे गुणोत्तर काढा. त्याची टक्केवारी ठरवून द्या. प्रत्येक महाविद्यालयाने सी.बी.एस.ई.च्या 5 टक्के, आय.सी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांसाठी 2 टक्के जागा आरक्षित ठेवा आणि उर्वरित जागा एस.एस.सी.बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी आरक्षित ठेवाव्यात अशा प्रकारे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे गुणोत्तर काढून प्रवेश देण्यात यावा असे माझे सजेशन आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, नाही तर मुंबई,ठाणे आणि मेट्रोपॉलिटन शहरे म्हणजे नाशिक, नागपूरसारख्या ठिकाणी मोठा गोंधळ होण्याची शक्यता आहे एवढेच नाही तर पालकांच्या माऱ्यामाऱ्या होतील. पालक प्राचार्यांना जिवंत सोडणार नाहीत. मंत्रीमहोदय यवतमाळला निघून जातील त्यावेळी प्राचार्य काय करणार ? सभापती महोदय, याविषयाच्या बाबतीत शासनाने जे जे जीआर काढले असतील ते ते जीआर त्या त्या वेळी शिक्षण संस्थांना पोहोचले पाहिजेत. मी दुर्देवाने सांगू इच्छितो की, शिक्षण उपसंचालक कधीच भेटत नाहीत. आमदारांना सुध्दा भेटत नाहीत. फोन केला तर बंद नसतो पण फक्त बेल वाजते. या कार्यालयामध्ये एक कक्ष उघडावा आणि त्याठिकाणी पीआरओची नेमणूक करावी. म्हणजे लोकांना खरी माहिती तरी मिळेल. हे सर्व आजच्या कोर्टाच्या निर्णयावर अवलंबून आहे. कोर्ट काय सांगेल त्यावर अवलंबून आहे. वर्तमान सीबीएसई आणि आयबीएसई मुलांचा कोटा कोणासाठी आहे हे कळत नाही. यातून प्रवेश घेणारी मुले कोणाची आहेत हे पाहिले तर ती मुले प्रशासनातील अधिकाऱ्यांची आहेत. प्रशासनातील अधिकाऱ्यांसाठी पर्सेंटाईल सिस्टीमला विरोध आहे. सर्वसामान्य लोकांच्या मुलांना प्रवेश कसा मिळेल हे पाहण्याची गरज आहे. यासंदर्भात कोर्टात जे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे ते भोंगळ स्वरुपाचे आहे. यासाठी जे अधिकारी जबाबदार असतील त्यांना शासन झाले पाहिजे.

सभापती महोदय,मी शेवटचा मुद्दा हा लैंगिक शिक्षणाचा मांडणार आहे. यासंदर्भात माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी अतिशय चांगले भाष्य केले आहे. मुळात लैंगिक शिक्षण हा शब्दच चुकीचा आहे. इंग्रजी शब्द Sex Education हा शब्द सुध्दा बरोबर नाही. त्याऐवजी किशोरवयीन आरोग्य शिक्षण असा शब्द आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट नाही. महिला शिक्षक अशा प्रकारचे शिक्षण विद्यार्थ्यांना शिकविताना त्यांची पोझीशन अवघड होईल. ज्यावेळी एखादी आई आपल्या मुलाला किंवा मुलीला अशा बाबतीत काही सांगते तेव्हा तिची पोझीशन सुध्दा अवघड होते. तेव्हा ती मैत्रिणींमार्फत अशा प्रकारचे उपदेश मुलीला करीत असते. एखादी शिक्षिका 25 मुले आणि 25 मुली असलेल्या वर्गामध्ये अशा प्रकारचे शिक्षण कसे शिकविणार याचा विचार केला पाहिजे. यासाठी अभ्यासक्रम ठरवून दिला पाहिजे. लैंगिक शिक्षण हे शिकविण्यासाठी ठेवण्यापेक्षा अवांतर वाचनासाठी ठेवले तर अतिशय उत्तम होईल. लैंगिक शिक्षण हा विषय अवांतर वाचनासाठी ठेवा म्हणजे मुले वाचतील पण परीक्षा देणार नाहीत.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा पर्यावरण या विषयाबाबतचा आहे. पर्यावरण विषयाला असलेल्या गुणांमुळे अनेक विद्यार्थी नापास झाले आहेत. कारण पर्यावरण विषयाचे मार्क कसे कॅलक्युलेट करावेत हे कुठेच सांगितलेले नाही. यासाठी तोंडी परीक्षेला 40 टक्के आणि लेखी परीक्षेला 60 टक्के गुण आहेत. अे,बी,सी आणि डी असे ग्रेडेशन केलेले आहेत. बी ग्रेड मिळालेला विद्यार्थी नापास होणार आहे. म्हणजे अभ्यासक्रमात 80 टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्याला सुध्दा प्रवेश मिळू शकणार नाही. पर्यावरण विषयाबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे आणि त्यासाठी शासन काय करणार आहेत हे स्पष्ट झाले पाहिजे. शिक्षणमंत्र्यांचे पेपरवर्क चांगले असेल, त्यांची मानसिकता चांगली असेल पण निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये ते संपूर्णपणे अपयशी ठरले आहेत. म्हणून त्यांनी पुन्हा एकदा या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करावा आणि पुन्हा एकदा सदनासमोर वेगळे प्रारुप घेऊन यावे अशी मी आपल्यामार्फत शिक्षणमंत्र्यांना विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय शालेय शिक्षणमंत्र्यांनी जो नवीन प्रयोग आरंभिला आहे तो करीत असताना काही उणिवा, काही त्रुटी लक्षात येत आहेत....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसीजरच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. सभागृहात नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोदजी तावडे यांनी प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात केली. त्यानंतर खऱ्याअर्थाने सत्ताधारी पक्षाच्या बाजूने बोलणारे कोणी सन्माननीय सदस्य नसतील तर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना बोलण्याची संधी दिली जाणे आवश्यक होते. त्याऐवजी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपले विचार मांडले. असे असताना आता पुन्हा विरोधी पक्षाकडील सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांना संधी देण्यात आली आहे?

**तालिका सभापती** (श्री.जगदीश गुप्ता) : पध्दत अशी आहे की, उजवी बाजू आणि नंतर डावी बाजू याप्रमाणे नावे पुकारली जातात. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे डाव्या बाजूस बसलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, शिक्षणाचा संपूर्ण प्रपंच ज्या लाभार्थ्यांसाठी आहे, त्या विद्यार्थ्याचे वय, त्याची क्षमता आणि त्याच्यावर आपण टाकलेला बोजा याचे गणित, याचे ताळतंत्र पाळले गेले आहे का? हे बघितल्यानंतरच गोंधळाला सुरुवात झाली. पूर्वी सहा विषय होते. आता सहाऐवजी बारा विषय झाले. बारा विषयांमध्ये आणखी काही विषयांची भर पडत आहे. त्या विद्यार्थ्यांला हे पेलते का? त्याला हे झेपेल का? आवश्यकता हा वेगळा विषय आहे. कोणत्या टप्प्यावर कोणता विषय सुरु केला पाहिजे याचे भान न ठेवता शैक्षणिक तत्वज्ञानाच्या विरोधात जाऊन महाराष्ट्र शासन निर्णय घेत आहे. शासनाने पहिलीपासून इंग्रजी विषय सुरु केला. मुळात विद्यार्थ्याला मातृभाषा येते का? मातृभाषा शिकण्याच्या टप्प्यावर त्या विद्यार्थ्याला आपण दुसरी भाषा शिकवितो. राष्ट्रभाषा मात्र पाचवीपासून शिकवितो. म्हणजे परकीय भाषा पहिलीपासून आणि राष्ट्रभाषा पाचवीपासून शिकवितो. हा गोंधळ आपण लक्षात घेतो का? एका बाजूने हे घडत आहे. त्याचबरोबर ज्या मराठीसारख्या विषयामध्ये सुध्दा त्या विद्यार्थ्याची गुणवत्ता टिकवितो का? ती टिकविण्यासाठी अभ्यासक्रम बांधणीमध्ये म्हणजे सिलॅबस फ्रेमिंग करीत असताना शिक्षकाचा सहभाग किती घेतो? नाममात्र सहभाग घेतला जातो याकडे लक्ष दिले जात नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे...........

शिकविणा-या शिक्षकाचा अभ्यासक्रम निर्माण करण्यामध्ये नाममात्र संबंध येतो. त्या शिक्षकाचा त्यात सहभाग घेतला जात नाही. समाजात अशा विषयाचे भरपूर तज्ज्ञ असतात, जो शिक्षक प्रत्यक्ष त्या क्षेत्रामध्ये काम करतो, जो फिल्ड वर्कर आहे, त्याचा मात्र अभ्यासक्रमाच्या बांधणीमध्ये सहभाग नाममात्र आहे.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

शिक्षक हा शैक्षणिक क्षेत्रात काम करीत असतो. पण अभ्यासक्रमाच्या बांधणीमध्ये त्याचा सहभाग मात्र नाममात्र आहे. अलीकडच्या काळामध्ये तर तो नामशेष होत चालला आहे. अभ्यासक्रम व विद्यार्थी आणि विद्यार्थ्याला अभ्यास देणारा शिक्षक यांच्यामध्ये कम्युनिकेशन गॅप प्रचंड वाढत आहे. त्याचा परिणाम विद्यर्थ्यांच्या गुणवत्तेवर अतिशय मोठ्या प्रमाणावर होत आहे.

सभापती महोदय, आम्ही मूल्यमापनाच्या पद्धतीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर फरक करीत आहोत. आता आम्ही क्रमदेय पद्धतीकडे निघालो आहोत. सीईटीमध्ये मात्र आपण गुणदान पद्धतीला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण होत आहे. दहावी पर्यंत विद्यार्थी क्रमदेय पद्धतीला सामोरे जात आहे. स्पर्धात्मक जगामध्ये उभे राहण्यासाठी गुणदान पद्धतीला सामोर जावे लागत आहे. म्हणजे विद्यार्थ्याला नेमक्या कोणत्या दिशेने जायचे आहे यासंबंधी गोधळ निर्माण करून टाकला आहे. यामध्ये देखील क्लिअर असे लॉजीक राहिलेले नाही.

आपण मूल्यमापन पद्धतीत वर्तन परिवतर्नाधिष्ठीत संकल्पना आणली. याचा प्रारंभ 1995 मध्ये झाला. ही कल्पना चांगली आहे. ती राबविली पाहिजे. व्यवहारात आणली पाहिजे. मी येथे उदाहरण देऊ इच्छितो. आई या विषयावर पांडित्यपूर्ण भाषण देणारा विद्वान स्वत:च्या आईला वृद्धाश्रमात ठेवत असेल तर ते वर्तन परिवर्तन नव्हे. जे मी आत्मसात करीत आहे, ते आचरणात आणत आहे, त्याला वर्तन परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापन म्हणतात. ही संकल्पना आम्ही मान्य केली. प्रत्यक्षात मात्र पुन्हा पांडित्यपूर्णतेला महत्त्व देत आहोत. प्रचलित मूल्यमापन पद्धतीमध्ये मात्र दिवसेंदिवस फरक पडत आहे. पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी अवस्था झाली आहे. पुन्हा आपण बौद्धिक मूल्यमापनाकडे जात आहोत. वर्तन परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापनाकडे दुर्लक्ष करीत आहोत. आपल्याला जर आदर्श नागरिक घडवायचे असतील तर वर्तन परिवर्तनाधिष्ठीत ही संकल्पना ही रूढ करावी लागेल.शैक्षणिक प्रशासनाच्या माध्यमातून, धोरणातून त्याचा नाममात्र उल्लेख झालेला आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी जे नियोजन असणे आवश्यक आहे, अंमलबजावणीचा आग्रह असला पाहिजे ते अभावाने पहायला मिळत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे...

सभापती महोदय, 26 एप्रिल 2007 रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी गुणवत्ता विकास कार्यक्रम राबवायला सुरूवात केली. सुरूवातीला सांगितले की, हा कार्यक्रम प्राथमिक टप्प्यावर आहे. पण हा कार्यक्रम आता माध्यमिक शाळेमध्ये आणायला देखील सुरूवात केली आहे. हा गुणवत्ता कार्यक्रम सदोष आहे. आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ? विद्यार्थ्याने काही ग्रहण केले असेल तर त्याचे आम्ही मूल्यमापन करू शकतो. विद्यार्थ्याला सर्व देण्यासाठी आम्हाला अवधी किती लागतो. 6 विषय आहेत ते आता 12 होत आहेत. पूर्वी दोन घटक चाचण्या होत्या. त्या चार झाल्या आहेत. त्यावर आपण गुणवत्ता विकास कार्यक्रम ठेवला आहे. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देता येईल एवढी संख्या नाही. एका वर्गात 60-60-, 90-90 विद्यार्थी आहेत. काही ठिकाणी विद्यार्थी संख्या 100 झाली आहे. कित्येक शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे त्यांची नावे देखील लक्षात राहू शकत नाही, अशी दुरावस्था आहे. तासिकांची मिनिटे 45 वरून 40, 40 वरून 35 आणि 35 वरून 30 वर आली आहे. 30 मिनिटांच्या तासिकेमध्ये शिक्षकाने विद्यार्थ्यांना अध्ययन द्यायचे किती ? 30 मिनिटामध्ये शिक्षक फक्त अध्यापनाचे कार्य उरकू शकतो.

नवीन एक कल्पना आम्ही पुढे आणली ती म्हणजे What is teaching? Teaching is nothing but to assist the children to learn. विद्यार्थ्याला शिकायला मदत करणे ही कल्पना आम्ही पुढे आणली. शिकणे ही सलग प्रकिया असते. शिक्षणाच्या प्रकियेला मदत करणारा शिक्षक असतो अशी कल्पना आहे.

यानंतर श्री.पी.खर्चे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ......

अभ्यासक्रमाची बांधणी मात्र पुन्हा ब्रिटीशांच्या पध्दतीने, मेकॉलेच्या पध्दतीनेच सुरु आहे. ही आमची शिक्षण पध्दती असेल, अध्यापन पध्दती असेल आणि टाचण त्या पध्दतीने करावे असा आग्रह धरला तर माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, आमची आणि विद्यार्थ्यांची एकदा गाठ घालून द्यावी. कारण आमचा शिक्षक आज प्रशिक्षणातच घायल आहे आणि त्यामुळे आमची आणि विद्यार्थ्यांची गाठ पडत नाही. शिक्षकांचे आम्ही प्रशिक्षण करीत आहोत पण प्रशासन अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण कधी करणार आहात हे सुध्दा विचारात घेण्यासारखे आहे. कारण हा प्रशासनाचा अधिकारी एकदा एमपीएससी परीक्षा पास होऊन त्या पदावर बसला की त्याचे नॉलेज मात्र रिफ्रेश होत नाही आणि खाली मात्र आमचे मूल्यमापन करुन त्यातून आऊटपूट काढावयाचे हे अधिकाऱ्यांच्याही लक्षात येत नाही म्हणून हा अधिकारी ज्यावेळी शाळेत येतो, मुळात तो शाळेत तपासणीसाठी वर्षातून किती वेळा येतो हा विषय सुध्दा महत्वाचा आहे. कारण वाढलेली शाळांची संख्या पाहिली तर सन 1972 च्या स्टाफिंग पॅटर्ननुसार महाराष्ट्रातील शिक्षणाधिकारी आणि उप शिक्षणाधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत परंतु त्यानंतरच्या 36 वर्षांच्या काळात शाळांची संख्या विचारात घेऊन दुप्पट व तिप्पट ही पदे भरणे आवश्यक असताना ती पदे मात्र त्या प्रमाणात भरली गेली नाहीत. मी हे जबाबदारीने सांगू इच्छितो की, आमची प्रशासनातील अधिकारी मंडळी राज्यातील सर्व शाळांची वर्षातून एकदा भेट घेऊन नीट तपासणी करु शकत नाही, एवढी शाळांची संख्या वाढलेली आहे. तसेच शाळेत अधिकारी केवळ यायचे म्हणून येतो कुठल्या तरी अपेक्षेने जातो, आणि असे प्रकार होत असतात. चांगल्या प्रकारची वार्षिक तपासणी मात्र होत नाही. अशा प्रकारे शिक्षणाच्या क्षेत्रात सर्व पातळयांवर, सर्व टप्प्यांवर जो गोंधळ आहे तो पहिल्यांदा दूर होणे आवश्यक आहे.

महोदय, दुसरी बाब म्हणजे शाळांना मिळणाऱ्या वेतनेत्तर अनुदानाबाबतची आहे. या शाळांना वेतनेत्तर अनुदान मिळत नाही आणि ज्या जुन्या शाळा आहेत त्यातील शिक्षकांना वेतनेत्तर अनुदान मिळते तर काहींना मिळत नाही म्हणून संस्थाचालक आणि मुख्याध्यापक शिक्षकांना सांगतात की, आपण आपल्या खिशातून खडू-फळा, शैक्षणिक साहित्य विकत आणावे. तसेच विना अनुदानित शाळांच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर साधनांचाच अभाव आहे, अशा प्रकारे शाळांमध्ये शैक्षणिक साहित्याच्या बाबतीतही सगळा लखलखाट आहे, तरीही अध्यापनाचे काम चालू आहे.

.......2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ......

मला सभागृहात बोलताना मनस्वी दु:ख होत आहे की, राज्यात 6 हजार शाळा कायम विना अनुदानित स्वरुपाच्या आहेत. तेथे काम करणाऱ्या एम.ए./बी.एड. शिक्षकांच्या बाबतीत कागदावर तर सगळे व्यवस्थित आहे परंतु त्यांना प्रत्यक्षात पाच पैसे सुध्दा पगार मिळत नाही. एका बाजूने शेतात काम करणारा मजूर 50 रुपये घेतल्याशिवाय कामावर जात नाही परंतु आमचा एम.ए./बी.एड. झालेला शिक्षक मात्र विनावेतन त्या शाळांवर राबतो, त्याचा आक्रोश ऐकण्यासाठी कोणीच पुढे येत नाही अथवा त्याची जबाबदारी कोणीच घ्यायला तयार नाही. संस्थाचालक म्हणतात आम्ही शाळा काढली तर चूक केली काय ? आणि शासन म्हणते संस्थाचालकांनी 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर अनुदान नको म्हणून लिहून दिलेले आहे, अशा प्रकारे जबाबदारी नाकारली जाते. समाजाला असे वाटते की, हा शिक्षक इतर शिक्षकांप्रमाणे 15 हजार रुपये पगार घेतो परंतु कायम विना अनुदानित शाळांमध्ये काम करणारा शिक्षक मात्र उपासमारी सहन करुन अध्यापनाचे काम करतो, ही या शाळांमधील शिक्षकांची शोकांतिका आहे. याबद्दल माननीय मंत्री महोदयांनी कृपया गैरसमज करुन घेऊ नये, परंतु मला सांगावयाचे आहे की, हे सर्व करताना आपला हेतू शुध्द असेल, भूमिकाही चांगली असेल पण त्याची अंमलबजावणी करीत असताना खाली काय घडत आहे त्याचाही फीड-बॅक घेतला गेला पाहिजे. त्या निमित्ताने काय काय होते हे बघितले पाहिजे, दुर्देवाने ते पाहिले जात नाही. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, आपल्याला गणपती करावयाचा असेल तर निदान मारुति तरी व्हावा, परंतु गणपतीही दिसत नाही, मारुतिही नाही आणखी काही तरी विचित्र होत आहे, ते किती विचित्र होत आहे हे पाहण्याची गरज आहे. या निमित्ताने मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण गुणवत्तेचा ध्यास धरीत आहोत, आज आमच्यासमोर मुलगा दहावी, बारावी होतो, ग्रॅज्युएट सुध्दा होतो आणि त्याची गुणवत्ता तपासली तर असे लक्षात येईल की, आपण मूल्यमापन करण्याच्या पध्दतीमध्ये जे नवीन लॅक्युनाज निर्माण केले आहेत .....

यानंतर श्री. जुन्नरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ....

त्याचा परिणाम असा झाला आहे की, सध्या जे काही पदवीधारक आहेत ते चार वाक्य सुध्दा चांगले बोलू शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. कोणताही संस्कार न घेता हा प्रॉडक्ट निसटला कसा, बाहेर गेला कसा, बाहेर जाण्याची कारणे कोणती आहेत यासंदर्भात आपल्याकडे काऊंटर चेक करण्याची कोणतीही व्यवस्था नाही. शिक्षणाच्या संदर्भात अशीच दुरावस्था ठेवली तर शिक्षणाचा प्रसार वाढेल परंतु क्वालिटीचे शिक्षण मिळणार नाही. क्वालिटेटीव्हचा -हास वाचवायचा असेल तर मी तुम्हाला एकाच वाक्यात सांगतो की, "संरक्षणानंतर महत्वाचे खाते हे शिक्षण खाते आहे". यासंदर्भातील जबाबदारी राज्यसरकार नाकारु शकणार नाही, राज्यसरकारला ही जबाबदारी नाकारता येणार नाही. मी अत्यंत जबाबदारीने दुसरे विधान करतो की, Each and every citizen of India pays 35 % of their income to the Government from direct or Indirect taxes. कारण सरकारने आम्हाला कल्याणकारी राज्याचे अभिवचन दिले आहे. त्यामुळे कल्याणकारी राज्यात तुमच्या मुलांना मोफत शिक्षण देऊ, आरोग्य देऊ अशा प्रकारचे अभिवचन देण्यात आलेले आहे परंतु दुर्दैवाने महाराष्ट्र सरकार या अभिवचनापासून फारकत घेत आहे, शिक्षणाची जबाबदारी नाकारीत आहे, कायम विनाअनुदनाच्या शाळा वारेमाप देत आहे, अनुदानित शाळांना अडचणीत आणत आहे, त्याचा परिणाम शिक्षणाची गुणवत्ता ढासळण्यात होत आहे, काम करणा-या शिक्षक वर्गाची प्रचंड शोषण, प्रचंड अडवणूक होत आहे. हे सर्व रोखण्यासाठी तुम्हाला-आम्हाला युध्द पातळीवर विचार करण्याची आवश्यकता आहे. आपण आमच्याकडे विरोधकाच्या भूमिकेतून बघून नका, आपण यासंदर्भात विचार करु या. चांगला विचार देण्यासाठी आम्ही आपल्याला पूर्ण सहकार्य देण्यास कटिबद्ध आहोत. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात शिक्षणाच्या प्रश्नावर विस्तृत चर्चा झाली होती व या वेळेला पुन्हा एकदा शिक्षणावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी प्रवेशाच्या प्रश्नासंदर्भात हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणलेला आहे. गेल्या दोन तीन वर्षापासून सातत्याने शिक्षणावर या सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर चर्चा होते आहे. असे असतांनाही कोणतीही सुधारणा शिक्षण खाते करण्यास तयार नाही. माझा माननीय शिक्षणमंत्र्यांवर कोणताही वैयक्तिक राग नाही, मी त्यांच्यावर कोणताही हेत्वारोप करु इच्छित नाही. परंतु माझे एवढेच सांगणे आहे की, जमत नसेल तर सोडून द्या पण कृपा करुन शिक्षणाचा खेळखंडोबा यापुढे आणखीन तरी करु नका.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ..

सभापती महोदय,माननीय मंत्री महोदयांचा प्रत्येक नवीन प्रयोग शिक्षणामध्ये नवीन सुधारणा करण्या ऐवजी, एस.एस.सी. बोर्डाचा दर्जा वाढण्याऐवजी, शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याची जी जबाबदारी शासनावर आहे तिची अंमलबजावणी करण्याऐवजी शिक्षक नावाचा कोणी तरी प्राणी असून त्याला मी धडा शिकवणार आहे अशा प्रकारची एकमेव भूमिका त्यांनी घेतलेली असल्यामुळे बाकीच्या सगळया मुद्यांकडे,शिक्षणाच्या व्यापक प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळ नाही. या राज्यातील जे शिक्षण बिघडलेले आहे ते केवळ शिक्षकांमुळे बिघडलेले आहे असे त्यांनी गृहित धरलेले आहे त्यामुळे त्यांना सरळ करण्यासाठी घटक चाचण्यांच्या किंवा आचारसंहितेच्या संदर्भातील त्यांचा कार्यक्रम आहे.शिक्षण मंत्र्यांची भूमिका शुध्द आणि चांगली आहे परंतु त्यांचे प्रयोग चुकलेले आहेत. त्यांच्या हेतूबद्दलचा आणि शुध्दतेबद्दलचा प्रश्न नाही. शिक्षण खाते नेमके कोणासाठी आहे ? शिक्षकांसाठी वा शिक्षण मंत्र्यांसाठी हे शिक्षण खाते नाही तर या राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी हे शिक्षण खाते आहे. विना अनुदानाचा, शिक्षण सेवकांचा वा वस्ती शाळांचा मुद्दा असो या मुद्याच्या बाबतीत शिक्षण मंत्र्यांची जबाबदारी कमी आहे कारण या सर्व कामासाठी त्यांना कमी बजेट मिळते. या कमी बजेटमध्ये हा संपूर्ण कारभार त्यांना करावयाचा असतो. त्याबद्दल शिक्षण मंत्र्यांना मी दोष देणार नाही. शिक्षणासाठी सहा टक्के तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन आघाडी सरकार सत्तेवर येण्यापूर्वी जनतेला दिले होते. परंतु सध्या अर्थसंकल्पामध्ये शिक्षणासाठी फक्त 2.38 टक्के तरतूद करण्यात आली आहे. 2005 साली ही तरतूद पाच टक्के करण्यात आली होती. अशा प्रकारे कमी तरतूद करण्यात येत असल्यामुळे ही घसरगुंडी रोखण्याचे सामर्थ्य शिक्षण मंत्र्यांमध्ये नाही. अर्थात त्याबद्दल मी त्यांना दोष देत नाही. कारण राज्य सरकारची ही सामूहिक जबाबदारी आहे.जे खाते आपल्याला देण्यात आलेले आहे ते नीट चालविण्याचे काम जरी त्यांनी केले असते तरी आज जे काही गोंधळ निर्माण झालेले आहेत ते निर्माण झाले नसते असे मला सांगावयाचे आहे.

. सभापती महोदय, प्रवेशाच्या गोंधळाच्या निमित्ताने गेल्या वर्षी मी आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले होते. पर्सेंटाईलच्या संदर्भातील मागणी आम्ही त्यावेळी केली होती परंतु दरवेळी या प्रश्नांना बगल दिली जाते किंवा त्याकडे लक्ष दिले जात नाही .शिक्षण मंत्र्यांचे उत्तराचे भाषण काय होणार आहे हे मला माहीत आहे. मागच्या चर्चेच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ..

वेळी दिलेले उत्तराचे भाषण त्यांनी काढून पहावे. त्याचबरोबर विधानसभेमध्ये दिलेल्या उत्तराचे भाषण काढून पहावे. ही दोन्ही भाषणे त्यांनी पाहिली तर त्यांना असे आढळून येईल की, या भाषणांमधून त्यांनी अनेक संताचे, अंभंगाचे दाखले दिलेले आहेत. हे दाखले सोडले तर बाकीच्या मुद्यांचे उत्तर कोठे दिलेले आहे ? आम्ही सभागृहामध्ये कीर्तन ऐकावयास येत नाही. मुद्यांची चर्चा करण्यासाठी आणि त्यांची उत्तरे ऐकण्यासाठी आम्ही सभागृहात येत असतो.आम्हाला जर संताचे दाखले ऐकावयाचे असतील तर त्यासाठी पंढरपुरात आणि देवळात जागा आहे.त्यामुळे आम्ही संध्याकाळी तेथे जाऊ ....

श्री.उल्हास पवार : नाचू कीर्तनाचे रंगी ज्ञानदीप लावू जगी.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्यांनी जे सागितलेले आहे ते बरोबर आहे परंतु त्यांनी हा दिवा घरात लावावा. संतानी जे काही सांगितलेले आहे ते करावयाचे आहे परंतु मंत्रीमहोदय सर्व प्रश्न व्यक्तिगत घेत आहेत.. गेल्या वेळी त्यांनी या सभागृहात केलेले भाषण किंवा खालच्या सभागृहात केलेले भाषण जर पाहिले तर हे मुद्दे मंत्र्यांनी व्यक्तिगत घेतल्याचे या भाषणातून दिसून येईल. प्रत्येक वेळे ते गोंधळ निर्माण करतात त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना, राज्य शासनाला मध्यस्थी करण्यासाठी धावपळ करावी लागते. ॲम्ब्युलन्स पाठवावयाची आणि त्यांना वाचवावयाचे असे प्रकार सुरु आहेत. शिक्षण मंत्र्यांनी या विद्यार्थ्यावर 14 घटक चाचण्या लादल्या आहेत . त्या संबंधी पालकांचा क्षोभ निर्माण झाला होता. त्यांनी तक्रार केली आणि सांगितले की या घटक चाचण्या शिक्षकांना नकोत. मुलांनी शिकावयाचे की परीक्षा द्यावयाच्या असा मुद्दा त्यातून निर्माण झाला होता. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या संदर्भात गेल्या वर्षी चर्चा झाली होती त्याची शिक्षा शिक्षण सचिवांना मिळाली होती. कॅबिनेटच्या बैठकीलासुध्दा जाण्यास शिक्षण मंत्र्यांना वेळ मिळत नाही. चहापानाच्या वेळी जेव्हा आम्ही शिक्षणासंबंधीचा प्रश्न उपस्थित करतो त्यावेळी शिक्षण मंत्री उपस्थित नसतात. जे मुद्दे उपस्थित केले जातात त्यासबंधीचे काम कोणी करावयाचे ? हे काम करण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे त्यांनीच हे काम करावयास पाहिजे विद्यार्थ्यांचा प्रवेश सुरु झाल्यानंतर पर्सेंटाईलच्या आदेशावर सही घेण्यासाठी शिक्षण मंत्री आले . प्रवेशाच्या प्रश्नाच्या बाबतीत सुध्दा ते नंतर आले होते. त्याबाबतीत त्यांच्याकडून असे उत्तर देण्यात आले होते की यवतमाळ जिल्हयातील बाजार समितीच्या निवडणुकीत गुंतल्यामुळे मला येथे येण्यास वेळ मिळाला नाही.

नंतर श्री.सरफरे

नंतर श्री.सरफरे

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, या राज्याच्या माननीय शिक्षण मंत्र्यांना यवतमाळच्या बाजार समितीची निवडणूक महत्वाची वाटत असेल तर त्यांनी तेच काम करावे त्याला आमची तक्रार नाही. परंतु या खात्यामधून मोकळे व्हावे व हे खाते दुसऱ्याच्या हातामध्ये द्यावे, ते हे खाते नीट संभाळतील. त्यासाठी काही वेगळे करण्याची आवश्यकता नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मला एकच सांगावयाचे आहे की, माननीय सदस्यांना वाटेल ते बोलावयाचे असेल तर त्याला माझी तयारी आहे. एखाद्या वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आल्यानंतर ती खरी मानून जर ते बोलत असतील तर तो त्यांचा भ्रमनिरास आहे. मी केव्हा केव्हा मंत्रालयात होतो. मी माझी डायरी मेंटेन केलेली आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी सरळ बोलावे. त्यांना उत्तर देण्याची माझी 100 टक्के तयारी आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय बाजार समितीच्या बैठकीबाबत खुलासा करतील असे मला वाटले होते. परंतु त्यांनी दूरदर्शनच्या चॅनेलवर केलेले विधान आहे व ते वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. मी माझ्या पदरचे सांगत नाही. सभापती महोदय, यवतमाळच्या बाजार समितीची निवडणूक महत्वाची आहे असे आपण म्हणालात. "रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग" असे संतांनी सांगितले आहे. आज विद्यार्थ्यांच्या पालकांवर आपण युध्दाचा प्रसंग आणून ठेवला आहे. अशावेळी माननीय शिक्षण मंत्री गायब झाले म्हणून हा प्रश्न उपस्थित केला. ज्यांची जबाबदारी आहे, त्यांनी ती पार पाडावयाची नाही. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, पर्सेंटाईलचा निर्णय घेण्यास आपण उशीर कां लावला? गेल्या वर्षी मी आणि माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी तामिळनाडूमध्ये सी.ई.टी. चा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सी.ई.टी. मध्ये ग्रामीण भागातील एस.एस.सी.चा विद्यार्थी मागे पडतो आणि त्यावेळी हा निर्णय ताबडतोबीने लागू करावा. Equilisation of Mars गुणांचे समानीकरण झाले पाहिजे असे सांगितले होते. तिनही बोर्डामध्ये गुण देण्याची पध्दत वेगळी आहे, त्यामध्ये बदल घडविला पाहिजे. मागील अधिवेशनामध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी हाच मुद्दा मी उपस्थित केला होता. तिनही बोर्डाच्या अभ्यासक्रमांचा आराखडा एकच आहे. एन.सी.ई.आर.टी. ने तो निश्चित केला आहे. अध्यापन पध्दतीमध्ये थोडासा बदल करुन परीक्षा पध्दत व मूल्यमापन पध्दतीमध्ये फार मोठे अंतर आहे. याचा फायदा सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई., आय.जी., आय.बी. च्या विद्यार्थ्यांना मिळतो. त्या तुलनेत आपली परीक्षेची पध्दत वेगळी आहे. यापूर्वी मराठीच्या विषयावर बोलत असतांना सांगितले होते की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. कपिल पाटील...

मराठीच्या परीक्षेमध्ये विद्यार्थी टिकला तरी त्याला मार्क कमी मिळतात. परंतु आय.सी.एस.ई. च्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या उत्तर पत्रिकेतील व्याकरण बरोबर आहे की नाही हे बघितले जात नाही, त्यांनी उत्तर बरोबर लिहिले आहे की नाही हे बघितले जाते. परंतु आपल्याकडे बाबा आदमच्या काळापासून चालत आलेली सरळ पध्दत आहे. छोटया छोटया चुका सुध्दा बघितल्या जातात. आपल्याकडे पेपर तपासतांना ऱ्हस्व, दीर्घ, वेलांटी इत्यादी बघत असतांना त्या विद्यार्थ्यांची कत्तल होते. परीक्षेचा पेपर कडक तपासल्याशिवाय त्याला पास करणार नाही.. मराठीची प्रश्न पत्रिका सोडवितांना व्याकरण पाहिले पाहिजे. परंतु विज्ञान आणि गणिताची प्रश्नपत्रिका सोडवितांना व्याकरणाच्या चुका पाहू नये. मराठीच्या पुस्तकामध्ये प्रमाण भाषा कोणती हा मुद्दा आहे. त्या संदर्भात वेगळया पध्दतीचे वाक्प्रचार, वेगळया पध्दतीचे उद्‌गार किंवा कार्यपध्दती आपण वापरतो. उदा. विदर्भ आणि मराठवाडयामधील मुले "बोलून राहिलो, येऊन राहिलो" असे म्हणत असतील तर त्यांचे मराठीतील मार्क आपण कमी करणार काय? या मुंबई शहरामध्ये वेगवेगळया विभागातून विद्यार्थी येत असतात.त्यांच्या बोलण्यामध्ये, भाषेमध्ये आणि विचारांमध्ये अंतर पडणार म्हणून त्याप्रमाणे आपण निकष लावणे तथाकथित आहे. तेसुध्दा आपण बदलत नाही. म्हणून मी मराठी राजभाषेच्या चर्चेच्यावेळी बोलतांना म्हणालो होतो की, याची सुरुवात खालून केली पाहिजे जोपर्यंत यामध्ये बदल होत नाही तोपर्यंत त्याची मुलांना शिक्षा होत असते. आणि म्हणून कोणताही बदल न करता फक्त दाखले देत रहावयाचे. सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, आय.सी.एस.ई., सी.बी.एस.ई. किंवा आय.जी., आय.बी. च्या परीक्षेमध्ये 20 ते 25 ठराविक वर्गाची मुले असतात. बाकी सर्व समुदाय एस.एस.सी. बोर्डाचा असतो. त्यामुळे एस.एस.सी. बोर्डाचा दर्जा, माध्यमिक परीक्षा मंडळ, अभ्यास मंडळ आणि आपली मुले यांचा दर्जा कसा वाढेल आणि ते स्पर्धेत कसे टिकतील याबाबत चर्चा व प्रयोग घडविणे आवश्यक आहे ते आपण घडवीत नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

मी किरकोळ चुकांकडे लक्ष वेधून त्यांना अपराधी मानत नाही. गेल्या वर्षी पुस्तकामध्ये 350 चुका होत्या. या वर्षी नाहीत. ज्या 350 चुका श्री. दादा गोरे यांनी दाखवल्या ते पुस्तक मी घरी घेऊन गेलो आणि वाचले. त्यामध्ये फक्त 7 चुका होत्या आणि त्याही किरकोळ चुका आहेत. त्यांनी बाकीच्या ज्या तथाकथित चुका दाखवल्या त्या चुकीच्या आहेत. आमचे चुकले म्हणून दुसऱ्याच्या चुका काढल्या एवढेच त्यामध्ये आहे. त्यांनी धोपटले म्हणून यांना धोपटा असे मी काही करणार नाही. नवीन पुस्तक खूप चांगले आहे याबद्दल वाद नाही. भूगोलाच्या पुस्तकामध्ये ज्या चुका आहेत त्या तांत्रिक चुका आहेत. तो भाग वेगळा आहे. मी भाषेच्या पुस्तकाबाबत बोलत आहे. आज किंवा उद्या परसेंटाईल बाबत कोर्टाचा निर्णय अपेक्षित आहे. आपली जी बेअब्रू झालेली आहे त्याबद्दल सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी जबाबदार असतील परंतु आपल्या वकिलाला आपला निर्णय काय आहे आणि कशासाठी आहे हे सांगणे आणि ते कोर्टापुढे मांडणे ही जबाबदारी सरकारची आहे. ही शिक्षण मंत्र्यांची जबाबदारी आहे. ते जबाबदार ठरतात. हे मांडले गेले नाही आणि त्यामुळे कोर्ट दरवेळी नवीन नवीन प्रश्न काढतात. पुन्हा वकील सरकारकडे येतो. पुन्हा कोर्टात नव्याने बाजू मांडतो. कोर्टाने काल असे सूचित केले आहे की, विद्यार्थी बदलता येतील. तसे जर घडले तर खरोखर या ठिकाणी युध्दाचा प्रसंग येईल. प्रवेशाचा प्रश्न प्रत्येक पालकाच्या दृष्टीने अतिशय काळजीचा आणि संवेदनेचा प्रश्न असतो. आपल्या मुलाच्या उद्याच्या भविष्याचा प्रश्न असतो. पालक अतिशय हवालदिल झालेले आहेत. कोर्टाचा प्रत्येक निर्णय बरोबर असतोच असे मानण्याचे कारण नाही. पण आपण बाजू मांडण्यामध्ये जर चूक करीत असू आणि उद्या जर कोर्टाचा उलट निर्णय आला तर ती शिक्षा मुलांना भोगावी लागेल आणि त्या गोष्टीला आपण जबाबदार असणार आहात. म्हणून सुप्रीम कोर्टात जाण्याची तयारी सुध्दा नीट करुन ठेवावी. त्याची अभ्यासपूर्ण तयारी आताच करावी. नाही तर पुन्हा नव्याने सुरुवात कराल आणि पुन्हा मार खाल. तामिळनाडूने तसे केले पण तामिळनाडू जिंकले आणि आपण मात्र आपल्या कोर्टामध्ये रोज हरत आहोत. रोज प्रश्न निर्माण करीत आहोत. कारण आपण आपली तयारी केलेली नाही. आपण तयारी काय केलेली आहे याबाबत या निमित्ताने आपण सांगावे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. कपिल पाटील ....

सभापती महोदय, अभ्यासक्रमाच्या संदर्भामध्ये आणि परीक्षा पध्दतीच्या संदर्भामध्ये बोर्डाने तीन वेळा ज्या पध्दती अवलंबिलेल्या आहेत त्यामध्ये प्रोजेक्ट पध्दती असतील, प्रयोगशीलतेच्या पध्दती असतील, गुणदानाच्या पध्दती असतील, या सर्व बाबतीत तातडीने अभ्यास करण्यासाठी आपण एक स्वतंत्र कमिटी नेमावी आणि तीन चार महिन्यांमध्ये याबद्दलचा निर्णय घ्यावा. आपल्याला एस.एस.सी.च्या एकूण पध्दतीमध्ये काय बदल करता येतील आणि स्पर्धेच्या तुलनेत आपल्याला कसे पुढे जाता येईल याचा निर्णय आपण घेतला पाहिजे. एनसीईआरटीचा आराखडा गृहीत धरुन सुध्दा आपल्याला हे करणे शक्य आहे परंतु त्यासंबंधीची उच्चाधिकार समिती किंवा एक वेगळा आयोग नेमण्याची आवश्यकता आहे. तो नेमावा अशी मागणी मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, शाळाबाह्य कामाच्या संदर्भामध्ये सातत्याने या सभागृहामध्ये चर्चा होते. शिक्षकांवर शिक्षणबाह्य आणि शाळाबाह्य कामे लादली जातात. माननीय शिक्षण मंत्री असे म्हणतात की, शिक्षकांवर जनगणना आणि निवडणुका सोडून इतर कामे लादली जात नाहीत. पण आता निवडणुकीच्या वेगळ्या परमनंट कामासाठी शिक्षक लावण्यात आले आहेत. त्यामुळे शाळा ओस पडलेल्या आहेत. शाळेत शिक्षक नाहीत. मला एके दिवशी ठाणे जिल्ह्यातून फोन आला की, उद्या सणाचा दिवस आहे आणि आम्हा शिक्षकांना निर्मल ग्राम योजनेच्या अंतर्गत बाहेर किती लोक बसतात जे मोजण्यासाठी पाठवलेले आहे. सध्याकाळी हा फोन आल्यानंतर मी जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन विचारले की, असे घडले आहे काय ? उद्या सणाचा दिवस आहे. पहाटे 5.00 वाजता, 6.00 वाजता शिक्षकांनी जाऊन शिवारात उभे राहावयाचे आणि किती माणसे बाहेर बसली आहेत ती मोजावयाची. लोक त्या टमरेलातील पाणीही फेकतील आणि दगडही फेकतील. हे काम शिक्षकांनी सणाच्या दिवशी करावयाचे काय आणि हे शिक्षकाचे काम आहे काय ? कोणी कोणत्याही कामासाठी शिक्षकाला जुंपावयाचे काय ? ही आताची गोष्ट मी सांगत आहे. मागच्या ईदच्या दिवसाची गोष्ट आहे. मी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की, आजच्या आज निर्णय घ्या. मग ठाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वायरलेसवरुन मेसेज पाठवले आणि ते सगळे थांबवले. मी त्यांना धन्यवाद देतो की, त्यांना सांगितल्यावर त्यांनी ते थांबवले.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही गंभीर घटना आहे . हे आदेश कोणी दिले होते हे सभागृहाला कळले पाहिजे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, कोणाचे आदेश होते हे तपासून बघू पण शिक्षण खात्याचा हा बिलकूल आदेश नाही. आम्ही असे कधी सांगतही नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : जे कोणी असा आदेश देतील त्यांचा आदेश मानायचा नाही असे सुस्पष्ट आदेश खालच्या स्तरावर माननीय शिक्षणमंत्र्यांनी पाठवावेत.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी शासनाची पूर्णपणे बदनामी करणारी गंभीर माहिती सभागृहासमोर दिलेली आहे. त्यानंतर माननीय शिक्षण मंत्र्यांनी असे सांगितले की, शिक्षण विभागाने असे कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यानंतरही सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील ठासून सांगत असतील तर त्यांनी सभागृहामध्ये कोणाचा आदेश होता ते सांगितले पाहिजे, अन्यथा सरकारची नाहक बदनामी करणे उचित होणार नाही. आपण त्यांना समज देण्याची आवश्यकता आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रिमहोदयांनी शिक्षण खात्याने असा आदेश दिलेला नाही असे सांगितल्यावर मी उभा राहिलो होतो. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जिल्हाधिका-यांनी आदेश स्थगित केल्याबद्दल त्यांना फोन करुन धन्यवाद दिले असे सांगितले आहे. याचा अर्थ कोणी तरी तसे आदेश दिले होते. मग असा आदेश देणारे कोण आहेत ते सभागृहासमोर आले पाहिजे. शिक्षकांनी पहाटे 4 वाजता उठून रस्त्यावर बसणा-या माणसांची मोजदाद करणे ही काय भानगड आहे ते समजले पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी त्या आदेशाचा पुरावा दिला पाहिजे. त्यांनी सभागृहात जबाबदारीने बोलले पाहिजे. अशाप्रकारे सरकारवर आरोप करुन कसे चालेल ?

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता )** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे सभागृहात देत असलेली माहिती सत्य मानून शासनाने चौकशी करावी. अशाप्रकारे कोणी चुकीचा आदेश दिला असेल तर संबंधितावर कारवाई करावी.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी या मुद्याची नोंद घेतली आहे. हा आदेश कोणी दिला होता ते पाहतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे संसदीय व्यवहारात तज्ज्ञ आहेत असे म्हटले जाते. सभापती महोदय, आपण शासनाला निदेश दिले त्याबद्दल मी आपला आभारी आहे. निवडणुकीशिवाय अन्य कामे शिक्षकांना दिली असतील तर त्याची चौकशी करावी. सार्वत्रिक निवडणूक आणि जनगणना या दोन कामाव्यतिरिक्त अन्य कोणतीही कामे शिक्षकांना देऊ नयेत. या कामांशिवाय त्यांना अन्य काम दिले जात असेल तर आपण संबंधितांकडे चौकशी करावी असे मला निवडणूक आयोगाने पत्राने कळविले आहे. त्यामुळे शिक्षण खात्यातील आपल्या शिक्षकांना या दोन कामाव्यतिरिक्त कोणतेही काम दिले जाणार नाही याची काळजी माननीय शिक्षण मंत्र्यांनी घ्यावयाची आहे. म्हणून मी ही मागणी करीत आहे.

सभापती महोदय, शिक्षकांवर अन्य विषयांच्या वाढत असलेल्या ओझ्याबाबत येथे चर्चा केली जात आहे. राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय शिकविण्यास सुरुवात केली त्याची फळे पहावयास मिळत आहेत. त्याबद्दल मी कदापि वेगळी भूमिका मांडणार नाही. भाषा विषयक जेवढे विषय आहेत ते वय वर्षे 9 ते 11 पर्यंत शिकण्यास विद्यार्थी तयार असतात, आत्मसात करण्याची त्यांची तयारी असते. 11 वर्षानंतर नवीन शिकण्याच्या संदर्भात मेंदूची खिडकी बंद होते असे म्हणतात.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

त्यामुळे जास्तीत जास्त भाषा शिकविण्याचा प्रयोग होत असेल तर तो चुकीचा आहे असे मानण्याचे कारण नाही. आपले विषय किती असतात ? त्यातच मार्काची मारामारी असते. म्हणून 600, 650 आणि 550 हे मार्कातील अंतर कसे कमी करता येईल हे पाहिले पाहिजे. त्रिभाषा सूत्र आपण स्वीकारले. हे सूत्र अनाठायी राबविण्याची आवश्यकता नाही. नववी पर्यन्त एक-दोन विषय कमी करता येतील. आठवी पर्यन्त मराठीची सक्ती असली पाहिजे, इंग्रजीची सक्ती असली पाहिजे. अन्य भाषा कोणती घ्यावयाची हे विद्यार्थ्याला ऐच्छिक ठेवावे. दहावी परीक्षेच्या वेळी हिंदीचा आग्रह कमी करावा. याचे कारण असे की, इतर बोर्डाचे विद्यार्थी दोनच भाषांची परीक्षा देतात आणि आपले विद्यार्थी तीन भाषांची परीक्षा देतात. तेव्हा हे अंतर देखील तातडीने कमी करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, 70:30च्या संदर्भातील निर्णय विश्वासात घेऊन केला असता तर आता गोंधळ झाला नसता. कोणताही नवा निर्णय घेताना तो शिक्षण मंत्र्यांनी शिक्षकांना, प्राचार्यांना, पालकांना विश्वासात घेऊन घेतला पाहिजे. हा निर्णय त्यांच्यापर्यन्त पोहोचला तर आता जसा होतोय तसा गोंधळ होणार नाही. तेव्हा या दृष्टीने काळजी घेण्याची आवश्यकता आहे. कोर्टाचा काहीही निर्णय असला तरी स्पर्धेमध्ये पुढे जायचे असेल किमान बरोबरीने जायचे असेल तर आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढविली पाहिजे, आराखडे, पुस्तके बदलली पाहिजेत. आपली पुस्तके वर्षानुवर्षे बदलली जात नाहीत. प्रत्येक पुस्तक हे दर तीन वर्षांनी बदलले गेले पाहिजे. विज्ञान विषयक पुस्तकाची दर तीन वर्षांनी समीक्षा केली पाहिजे. विज्ञान पुस्तकातील बदल शिक्षकांना आणि शाळांना कळविले पाहिजेत आणि परीक्षांमध्ये त्यांचा समावेश केला पाहिजे. उदा. प्लुटो पूर्वी सूर्यमालेत होता. आता तो सूर्यमालेच्या बाहेर आहे. परंतु आपल्या पुस्तकांमध्ये तो सूर्यमालेतच आहे. तेव्हा मागासलेले विचार न करता शास्त्रविषयक पुस्तकामध्ये तातडीने बदल करणे आवश्यक आहे आणि त्याची काळजी शिक्षण मंडळाने आणि खात्याने घ्यावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाढ (नामनियुक्त) : सभापती महोदय, अकरावी प्रवेशाच्या संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे मी अभिनंदन करतो, दुर्गम भागामध्ये काम करणारा आदिवासी कार्यकर्ता महाराष्ट्र राज्याचा शिक्षण मंत्री होतो आणि महाराष्ट्र राज्य हे फक्त ठाणे आणि मुंबई पुरते मर्यादित नाही हे दाखविण्याचा प्रयत्न करतो हे बिकट समाज व्यवस्थेमध्ये अडकलेला महाराष्ट्र स्वीकारील काय असा विचार माननीय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी केला नव्हता आणि त्याचे फळ त्यांना काही अंशी भोगावे लागत आहे. आजचे शिक्षण हे कोणासाठी आणि कशासाठी आहे याचा विचार करायला पाहिजे. सीबीएसई आणि आयसीएसईमध्ये कोणाची मुले जातात...(अडथळा)...

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

श्री. जितेंद्र आव्हाड....

सभापती महोदय, एकंदर शिक्षण पध्दतीमध्ये बदल झाला पाहिजे. मुंबई आणि ठाणे या शहरांची मक्तेदारी थोडी कमी करुन ग्रामीण भागातील आमचे विद्यार्थी शिकले पाहिजेत. एका शिक्षकाच्या मनातील भावना माननीय शिक्षण मंत्री श्री. पुरके यांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात व्यक्त होत आहे. एक शिक्षण मंत्री खेडया-पाडयात जातो, दूर्गम भागात जातो आणि मी ज्या परिस्थितीत शिकलो, माझ्या पायात रुतलेल्या काटयांच्या जखमा बघत तेथल्या शिक्षकांनी आणि तेथील शाळेतील विद्यार्थ्यांनी कसे शिकावे, यासंदर्भात स्वत: जाऊन प्रशिक्षण देतो यापेक्षा वेगळे माननीय शिक्षण मंत्र्यांकडून काय अपेक्षित आहे? सी.बी.एस.ई.आणि आय.सी.एस.ई. ही लढाई मोठया लोकांची आहे. गोरगरीब विद्यार्थी जो मराठी शाळेत जातो, तो विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्र हा 75 टक्के ग्रामीण भागात आहे. महाराष्ट्र हा मुंबई आणि ठाणे एवढया शहरांपूरता नाही. पर्सेटांईलची पध्दत असणे गरजेचे आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय शिक्षण मंत्र्यांना सांगू इच्छितो की, शिक्षण विभागाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले की, शिक्षण उप संचालक श्रीमती तिवारी मॅडम भेटत नाहीत. 70:30 चा निर्णय प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यानंतर तुमच्या विभागाचा जी.आर.महाविद्यालयांकडे जातो. ज्यांनी जी.आर.पाठविला त्या अधिका-यांना प्रथम घरी पाठवा. तुमच्या विभागातील अधिकारी चुका करतात आणि त्या चुकांना मंत्री महोदय, तुम्हाला सामोरे जावे लागते. प्रामाणिक माणसाला बदनाम करण्याचे काम तुमच्या विभागातील अधिकारी जाणीवपूर्वक करीत आहेत. एका आदिवासी माणसाला खाली खेचण्याचे काम अतिशय व्यवस्थित रचना आणि कट करुन तुमच्याच विभागातील अधिका-यांकडून होत आहे. तुमच्या अधिका-यांपासून तुम्ही सावध रहावे असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, इयत्ता 11 वी चा प्रवेशाच्या बाबतीत एवढा मोठा गोंधळ का असावा याचे कारण मला समजू शकले नाही. इयत्ता 11 वी 12 वी वर्ग प्रत्येक संस्थांनी सुरु केले तर प्रवेशाचा गोंधळ निर्माण होणार नाहीत. प्रवेश प्रक्रिया आपण सेंट्रलाईज केली तर महाविद्यालयांची मक्तेदारी संपुष्टात येईल. शिक्षण खात्यामध्ये उभ्या राहणा-या खटल्यांच्या मागे प्रिन्सीपल असोसिएशन आहे, शिक्षण संघटना त्यामागे आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांविरुध्द शिक्षकांना का राग आहे ? शिक्षकांनी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 16:20. जितेंद्र आव्हाड....

शिकविले पाहिजे, विद्यार्थ्यांनी शाळेत गेले पाहिजे, ग्रामीण महाराष्ट्रातील 70 टक्के विद्यार्थ्यांना इयत्ता 4 थी पर्यंत शाळेत गेल्यानंतरही स्वत:चे नाव लिहिता येत नसेल आणि याची जबाबदारी माननीय शिक्षण मंत्र्यांनी घ्यावयाची असेल, शिक्षण मंत्र्यांनी लावलेल्या शिस्तीला जर ते मानणार नसतील तर माननीय शिक्षण मंत्र्यांवर दोष देण्यात येणार असेल तर त्या माननीय शिक्षण मंत्र्यांचा बचाव करण्याची आपली जबाबदारी आहे. इयत्ता 4 थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना स्वत:चे नाव लिहिता येत नसेल तर ती एक फार मोठी शोकांतिका आहे. मग ही लॉबीची लढाई सुरु होते. माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना सूचना आहे की, या लॉबीला कुठे तरी आळा बसवा. त्या लॉबीची माणसे प्रत्येक ठिकाणी पेरलेली आहेत. त्यांच्या लॉबीची माणसे शिक्षण उप संचालक, संचालक यांच्या कार्यालयात बसलेली आहेत. त्या संचालनालयातील अधिकारी यांचे मोबाईल लागत नाहीत. आमदारांच्या दूरध्वनीला विचारत नाहीत. वर्षानुवर्षे त्यांच्या बदल्या होत नाहीत. त्यांच्याकडे अशी कोणती शक्ती आहे की, त्यांच्या बदल्या होत नाहीत. यामध्ये ब्युराक्रसीचा हात नाही असे माननीय शिक्षण मंत्र्यांनी आपल्या मनाला शांत करण्यासाठी वाटून घेऊ नये. यामागे पूर्णपणे ब्युराक्रसी आहे. कारण त्यांचीच मुले सी.बी.एस.ई.आणि आय.सी.एस.ई. मध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांचीच मुले आय.बी.मध्ये शिक्षण घेऊ शकतात. रिलायन्सच्या शाळेची अडीच लाख रुपये फी माझ्या सारख्या माणसाला तसेच गरीब माणसाला कशी परवडू शकेल....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

त्यातून सीबीएसई आणि आयबीएसई यांची लढाई सुरु झाली आहे ती लढाई थांबवावी लागेल. एसएससी बोर्डात 90 टक्के मुले जातात. परंतु वर्तमानपत्रात चर्चा असते आणि प्रचार आणि प्रसार असतो तो सीबीएसई आणि आयबीएसई यांचा. या संस्थांना वर्तमानपत्रे एवढे का महत्व देतात ते कळत नाही. सभागृहाची मागणी होती की सीबीएसई आणि आयबीएसई या संस्थांमध्ये मराठी सक्तीचे करा. यासंदर्भात आश्वासन देऊन दोन वर्षे झाली आहेत त्या आश्वासनाचे काय झाले ? मराठी भाषा माझ्या मातीची आहे. समाजव्यवस्था टिकविण्यासाठी, संस्कृती टिकविण्यासाठी आणि वाड:मय टिकविण्यासाठी मला मराठी भाषा आलीच पाहिजे ही भूमिका या मातीवर प्रेम करणाऱ्या माणसाची असेल तर त्याला विरोध करण्याचे कारण नाही. तुमच्या खात्यातील कोण विरोध करीत आहे आणि हे झारीतील शुक्राचार्य कोण आहेत याचा शोध घेतला पाहिजे. कारण प्रामाणिकपणे काम करणारे आमचे मंत्री त्यामुळे बदनाम होत आहेत याचे दु:ख नक्कीच आमच्या मनामध्ये आहे. सर्वशिक्षा अभियानामध्ये मंत्रीमहोदयांनी केलेले कार्य महाराष्ट्र कधीच विसरणार नाही. गावागावात जाऊन या कार्यक्रमाचा प्रचार आणि प्रसार केला म्हणून खरे तर मंत्रीमहोदयांना धन्यवाद दिले पाहिजेत. 2/4 प्रकरणे अशी झाली की त्यामुळे निष्कारण काही देणे-घेणे नसताना अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शिक्षणमंत्र्यावर टीका झाली. असे जे अधिकारी असतील त्यांना धडा शिकविला पाहिजे. पर्सेंटाईल पध्दत फक्त महाराष्ट्रातच आहे काय ? इतर राज्यात नाही काय ? ही पध्दत सर्वच ठिकाणी आहे. मध्यंतरी मी तामिळनाडूतील एका शाळेत गेलो होतो. तेथील सीबीएसईच्या शाळेत तामिळ सक्तीचे आहे. तामिळनाडूमध्ये हे शक्य होते तर आपल्याकडे का होत नाही ? कोटा सिस्टीम ठेवण्याची गरजच काय ? 11 वी आणि 12 वी या शाळांमधून सक्तीचे करा. 2/3 लाख रुपये फी घेतात त्यामुळे त्यांनी स्वत:ची महाविद्यालये काढली पाहिजेत. 11 वी 12 वी नंतर अभ्यासक्रम कॉमन असतो. कॉलेजची मक्तेदारी संपुष्टात आणली पाहिजे. हा जो काही प्रकार चालला आहे तो बरोबर आहे असे मला वाटत नाही. शिक्षण खात्यातील जातीव्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या आहेत त्याच्यावर थोडया सूक्ष्म नजरेने बघणे आवश्यक आहे. मी शिक्षणमंत्र्यांचे सुरुवातीसच कौतुक केले. तुमच्यातील शिक्षक जागा झाल्यामुळे या अडचणी आपल्यासमोर येत आहेत. परंतु आपण बिलकूल विचलित होऊ नका. कोर्ट काय निर्णय देते कशावर निर्णय देते याबाबतीत न बोललेले बरे. शासन नावाची गोष्ट कोर्टाने अस्तित्वात ठेवायची नाही असा विचार

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

करुन निर्णय दिले. सीबीएसई आणि आयबीएसईमध्ये 26000 मुले आहेत. 10 वीच्या परीक्षेला विद्यार्थी बसतात त्यांची संख्या किती ? म्हणजे लॉबी किती स्ट्राँग आहे हे आपल्या लक्षात येईल. ट्रान्सफरेबल जॉब असल्यामुळे आपली बदली कुठेही देशात किंवा परदेशात झाली तरी आपल्या मुलाला शिक्षण घेता येणे शक्य आहे. ही शिक्षण पध्दती जिवंत ठेवायची असल्यामुळे महाराष्ट्रातील शिक्षण पध्दती मेली तरी चालेल. त्यांच्याकडून घेतले जाणारे शुल्क, त्यांच्याकडील सिस्टीम, त्यांच्या शिक्षकांना दिली जाणारी मान्यता याबद्दल कुठे तरी निश्चित धोरण ठरवायला हवे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:30

श्री.जितेंद्र आव्हाड.........

शिक्षणमंत्री या नात्याने आपल्यावर टीका करीत नाही. परंतु एकूणच शिक्षण खातं हे फार खाते आहे. शिक्षकांचे पगार, शिक्षक पदांची मान्यता या बाबतीत शिक्षण विभागाचे अधिकारी फार वेगळ्या पध्दतीने काम करीत आहेत हे मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. शिक्षण विभाग हे फार मोठे खाते आहे. आज गावागावात शाळा आहेत. त्यामुळे कदाचित या सगळ्या तक्रारी आपल्यापर्यंत पोहोचत नसाव्यात. परंतु प्राथमिक किंवा माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांना मॅनेज केल्याशिवाय आठवी, नववी, दहावी, अकरावी, बारावीच्या प्रवेशाबाबत काहीही पुढे चालत नाही हेही मी आपल्या निदर्शनास आणून देतो. आपण सॅंपल म्हणून कुठल्याही शाळेतील प्रवेशाची माहिती मागवावी. ज्या ठिकाणी पर्सेंटेज हाय आहे अशा कॉलेजची कट ऑफ लिस्ट विचारात घ्यावी. तिथे 25-30 प्रवेश मॅनेज करुन दिले गेले असल्याचे निश्चित आढळून येईल. ज्याठिकाणी 80 टक्के, 75 टक्के, 60 टक्क्यापर्यंत कट ऑफ लिस्ट आहे. शिक्षणाधिकाऱ्यांना मॅनेज केल्याशिवाय हे होत असेल असे मला वाटत नाही. आपण पर्सेंटाईल पध्दत आणली. मी कालच आपल्याला सेंट्रलाईज ॲडमिशनसंबंधी पत्र दिले आहे. शासनाला या मुजोर झालेल्या मॅनेजमेंटचे कंबरडे मोडावयाचे असेल, त्यांची दादागिरी संपुष्टात आणायची असेल यांच्यावर अंकुश ठेवणे आवश्यकच आहे. आपण आजपर्यंत सहन करीत आहात. आयुष्यभर सहन केले. गरिबी काय असते हे आपण अनुभवले असल्यामुळे हे सगळे सहन करीत आहात, मला याची पूर्ण खात्री आहे. शिक्षण व्यवस्थेमध्ये बदल करावयाचा असेल तर आपल्यासारखी मानसिकता असणे गरजेचे आहे. आपला त्याबाबतीत उत्साह दांडगा आहे. जे आपल्याला करावेसे वाटते त्यामध्ये तसूभरही ढळू नका. कोर्टाने निर्णय दिला तरी आपल्या मनाला जे योग्य वाटले, ज्यामध्ये महाराष्ट्राचे हित आहे त्यादृष्टीने आपण निर्णय घेतला. उच्च न्यायालय हे भारतातील सार्वभौम कोर्ट आहे. त्यामुळे त्यांचे ऐकणे भाग आहे. परंतु एकंदरीत या व्यवस्थेमध्ये सुधारणा करीत असताना आपण घेतलेल्या निर्णयामध्ये महाराष्ट्राचे हित आहे हे आम्ही मानतो. आपल्या कोणत्याही निर्णयामध्ये आपला व्यक्तिगत स्वार्थ कधी दिसलेला नाही हे नमूद करु इच्छितो. अकोला किंवा यवतमाळसारख्या दुर्गम भागात जाऊन शिकवणी केली. आजचे शिक्षक शाळेत वेळेवर येत नाहीत. आले तर स्वेटर विणण्याचे काम करतात. मुलं बसली आहेत, खेळत आहेत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड.........

आणि शिक्षक स्वेटर विणत असल्याचे चित्र सर्वत्र दिसते. यामध्ये तुम्ही सुधारणा करावयास सुरुवात केल्यामुळे त्या सूया तुम्हाला टोचायला सुरुवात झाली हे सगळ्यांच्या लक्षात आले आहे.

सभापती महोदय, एकंदरीत प्रवेश प्रक्रियेत झालेल्या गोंधळाला जबाबदार कोण? प्रवेश प्रक्रियेला 2 जुलैला सुरुवात झाली. शासनाचे सर्क्युलर 4 जुलैला पाठविले गेले. ज्यांना हे कळत नाही त्याना विभागामध्ये का ठेवता? एव्हाना दोन-चार अधिकाऱ्यांना घरी पाठविले असेल असे आम्हाला वाटले होते. 70:30 चा निर्णय 2004 सालचा होता. पर्सेंटाईल पध्दत सुरु करावयाची होती तर तुम्हाला आयत्यावेळी यांनी कसे काय सुचविले? दहावीची परीक्षा मार्च महिन्यामध्ये होते. साधारणपणे मार्च-एप्रिल महिन्यात हा निर्णय झाला असता तर आजचा गोंधळ झालाच नसता. शिक्षण विभागातील ही हुशार माणसे आयत्यावेळी निर्णय घेतात आणि शिक्षणमंत्री मात्र टार्गेट ठरतात. माननीय शिक्षणमंत्र्यांचा शिक्षण या संज्ञेकडे पाहण्याचा जो हेतू आहे, शिस्त लावण्याची त्यांची धडपड आहे, त्याबद्दलची नाराजी या सगळया माध्यमातून दिसून येते. म्हणून मला वाटते की, माननीय शिक्षणमंत्र्यांनी जो निर्णय घेतला, पर्सेंटाईल पध्दत असो, 70:30 चे सूत्र असो, सेंट्रलाईज ॲडमिशनची पध्दत असो त्याबाबतीत माघार घेऊ नये. अकरावी, बारावीच्या शिक्षणासाठी त्या शिक्षण संस्थांकडे जागा आहे, ज्यांच्याकडे जागा नसेल त्यांच्या बाबतीत ठीक आहे. परंतु अकरावी, बारावीच्या शिक्षणाची व्यवस्था त्यांनी त्यांच्याच शाळेत सुरु करण्याबाबत त्यांच्यावर सक्ती करण्यात यावी.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

काही कॉलेजेसची दादागिरी मोडीत काढायची असेल तर आपण घेतलेले निर्णय योग्य आहेत, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. परत एकदा आपल्या महाराष्ट्राला खूप वर्षानंतर प्रेमळ, शिक्षकांच्या मनातील बोलणारा, विद्यार्थ्यांबद्दल प्रेम असणारा, शिक्षक-मंत्री म्हणून मिळाला आहे. त्यांचे अभिनंदन करतो. आपण असेच पुढे जात रहा. महाराष्ट्राला पुढे न्यायचे असेल तर आदिवासींनी पुढे गेले पाहिजे. दलितांनी, मागासवर्गीयांनी पुढे गेले पाहिजे, हे आपले स्वप्न आहे, ते पूर्ण करण्यासाठी या समाजामध्ये आपल्याला अनंत अडचणी येणार आहेत. समाज व्यवस्था आदिवासीला मोठ झालेले बघू शकत नाही. तेव्हा कृपया काळजी करू नका. आपण मोठे व्हा. महाराष्ट्र आपल्या मागे आहे. धन्यवाद.

......

**उपसभापती** : मी सदनाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, या ठरावावरील चर्चा दुपारी 2 वाजून 23 मिनिटांनी सुरू झाली. 4 वाजून 53 मिनिटांनी या प्रस्तावावरील चर्चा संपवाची आहे. या प्रस्तावावर बोलणारे सदस्य भरपूर आहेत. त्यामुळे मी फार तर दोन-तीन सन्माननीय सदस्यांना बोलायला अनुमती देईन. सर्वांना बोलायला अनुमती दिली तर या ठरावावरील चर्चा आज पूर्ण होणार नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही आमच्या पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे नाव मागे घेतो. आमच्या पक्षातर्फे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील बोलतील.

**उपसभापती** : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रात दैनंदिन वाढत चाललेला गोंधळ हा विषय खरे म्हणजे मागच्या अधिवेशनामध्ये चर्चेला आला होता. मला अनेक जुन्या गोष्टीची आठवण झाली. आम्ही देखील गरीबीतून आलो. मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतून शिकलो. आम्ही शिकत असताना आमच्या महानगरपालिकेच्या शिक्षकांना इतर काही कामे आहेत, असे कधी जाणवले नाही. 365 दिवसांपैकी 235 दिवस शाळा चालते. या 235 दिवसांमध्ये शाळेत शिक्षक येत असत. त्यावेळी शाळेतील मुख्याध्यापकांचा एक वेगळा दरारा होता. शिक्षकांबद्दल प्रचंड आदर होता. हे सर्व आम्ही पाहिले. आम्ही पाटीवर ग, म,भ,न, अ,आ,इ,ई शिकलेलो आहोत. संस्कृती आणि संस्काराची जडणघडण शाळेतच झाली. आता मात्र सीबीएससी, आयसीएससी ऐकतो. सीबीएससी, आयसीएससी ज्युनिअर, सिनिअर के.जी.पासून सुरू होते. यासाठी आईवडिलांनी देखील आता परीक्षा द्यावी लागत आहे. आम्हाला जेव्हा आमच्या आईने पहिल्या दिवशी शाळेत आणून सोडले तेव्हा रडलो आहे की नाही हे बघायला देखील कोणी नव्हते. डब्यामध्ये काही आहे की नाही हे देखील बघायला कोणी नव्हते. तरी पण आम्ही शिकत आलो. कारण शिक्षक सुद्धा एका दर्जाचे होते. वेगळ्या दृष्टीने बघणारे होते. अलीकडेच माननीय शिक्षण मंत्र्यांचे वक्तव्य वर्तमानपत्रात आले. ते खरे आहे की खोटे आहे, हे मला माहित नाही. शिक्षण खात्यातील उच्चस्तरिय काही पदे भरायची राहिली आहेत, याचे कारण त्या दर्जाचे उमेदवार मिळत नाहीत, असे त्यांचे वक्तव्य वर्तमानपत्रात आले. म्हणून संचालक, उपसंचालक ही पदे का रिक्त आहेत याची कारणे त्यांनी सांगितलेली आहेत. त्याच वेळी केंद्रातील एका मंत्र्याने शिक्षण हा उद्योग आहे, असे वक्तव्य केले. शिक्षण हा धंदा आहे, असे त्यांनी वक्तव्य केले. त्यामुळे धंदा आणि धर्म यातील ही लढाई आहे. ज्यांना शिक्षण हा धर्म वाटतो, कदाचित तोच विचार श्री.वसंत पुरके यांच्या मनामध्ये असेल. कारण त्यांची आणि माझी संगत विधिमंडळाच्या समितीमध्ये झाली आहे. ते एक कमिटेड, डिव्होटेड माणूस आहे असे वाटते. पण दुर्दैवाने त्यांना चांगली संगत मिळत नाही, असे दिसते. किंबहुना त्यांना चांगले सल्लागार मिळत नाही असे मला वाटते. आज शिक्षणातील धर्म निघून गेला आहे. आपल्याकडे कच्ची माती आल्यानंतर तिला घडवायचे असते. तिचे मडके करायचे की मूर्ती करायचे हे शिक्षकाला ठरवायचे असते. मला येथे आपल्याला प्रबोधनकारांसंबंधीचे एक उदाहरण द्यायचे आहे.

यानंतर श्री.पीखर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

परीक्षा झाल्यानंतर एक मुलगा ज्यावेळी आपला निकाल घरी घेऊन आला त्यावेळी त्या निकालाच्या खाली शिक्षकांनी असे लिहिलेले होते की, "जरा घरी लक्ष द्यावे" त्यावेळी प्रबोधनकार ठाकरेंनी लिहून पाठविले की, "आम्ही शाळेत दगड पाठवितो, त्याची मूर्ती करणे तुमचे काम आहे". म्हणून दगडाची मूर्ती करण्याचे काम करणारा शिक्षक हा आमच्या मनातील संस्कार, त्या शिक्षकाला शासनाने एवढी कामे लावलेली आहेत की, तो अध्यापनाचे काम नीट करु शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड म्हणतात त्याप्रमाणे शिक्षकांना तेवढी दोनच कामे नाहीत. मी लातूरमध्ये निवडणुकीच्या निमित्ताने गेलो असता शिक्षक संघटनेचे प्रतिनिधी मला भेटले होते. आणि त्यांनी मला सांगितले की, शाळेत अध्ययनासाठी संध्याकाळी शिक्षणाधिकारी आले असता दुर्देवाने त्याना सर्व शिक्षक खालीच बसलेले आढळून आले. अशा प्रकारे 45-50 वर्षांच्या महिला शिक्षक दिवसभर बसणार आणि उठताना कोणाचा तरी आधार घेऊन त्यांना उठायला लागते, हे मला योग्य वाटत नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या म्हणण्याप्रमाणे हा विषय केवळ मुंबई-ठाण्यापुरताच मर्यादित नाही तर आम्ही संपूर्ण राज्यात फिरत असतो, त्यामुळे राज्यातील परिस्थिती अत्यंत भयानक असल्याचे दिसून येते, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. आज जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुले जातात, तेथील चित्र पाहिले तर पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांना एकच शिक्षक असल्याचे दिसून येते. यासंदर्भात कॅगने आपल्या अहवालात म्हटले आहे की, देशात एकूण 82,800 शाळा एकशिक्षकी आहेत. वास्तविक केंद्रशासनाचेच धोरण असे आहे की, एक शिक्षकी शाळा चालवू नयेत........

श्री. जितेंद्र आव्हाड : महोदय, माझे नाव सन्माननीय सदस्यांनी घेतले म्हणून मला असे स्पष्टीकरण करावयाचे आहे की, मी माझ्या भाषणात मुंबई-ठाण्यापुरताच महाराष्ट्र मर्यादित नाही हे ओळखणारे माननीय शिक्षण मंत्री हे पहिलेच आहेत, असा उल्लेख केला.

श्री. अरविंद सावंत : मी देखील चांगल्याच उद्देशाने आपले नाव घेतले आहे. महोदय, आम्ही शाळेत अ, आ, इ, ई शिकत होतो. त्यातील "आई" आणि आजच्या शिक्षणातील A, B, C, D यामधील जो फरक पडतो त्याचा विचार होणे आवश्यक आहे. एका बाजूला जिल्हापरिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी आणि आयसीएसई, सीबीएसईच्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ......

शाळांमधील विद्यार्थी लक्षावधी फी देऊन शिकतात यातील फरक काय असतो याचाही विचार करण्याची गरज आहे. आपल्या माहितीसाठी मी सांगतो. भांडुप येथील पवार चॅरिटेबल ट्रस्टची शाळा पहा, तेथे किती गरिबांच्या मुलांना ॲडमिशन मिळते, पुणे येथील शरद पवार इंटरनॅशनल स्कूल पहा, त्या स्कूलमध्ये अधिकाऱ्याचा विद्यार्थी तरी जाऊ शकेल काय याचा विचार होणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : मी यासंदर्भात माझा अनुभव सांगतो की, पुण्याच्या शाळेत मी माझ्या स्वतःच्या गावातील पाच मुलांचे नाव होस्टेलसह सर्व शिक्षण सुविधा फ्री अशा प्रकारे टाकण्यास मदत केली आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, पुढील वर्षी मी सुध्दा दोन-चार मुलांना याच शाळेत ॲडमिशन मिळवून देण्यासाठी आपल्याकडे विनंती करणार आहे. माझे म्हणणे असे आहे की, आरक्षण सर्वच शाळांमध्ये ठेवण्यात यावे. मी माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांना बोललो होतो की, सच्चर समितीच्या अहवाल आलेला आहे. आपल्या कॉलेजेसमध्ये गरीब मुस्लिमांच्या मुलांना ॲडमिशन द्यावी. ती शुद्र मुले आहेत. शुद्रच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, "विद्येविना मती गेली, मतिविना निती गेली, नितीविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्तविना शुद्र खचले, एवढे सारे नुकसान एका अविद्येने झाले". या ठिकाणी "शुद्र" हा जातिवाचक शब्द म्हणून आलेला नाही तर शिक्षणापासून वंचित राहिलेला तो "शुद्र" असा त्याचा अर्थ धरला आहे. म्हणून जो गरीब माणूस आहे, शुद्र आहे तो शिक्षणापासून दूर राहता कामा नये याबाबत शासनाने सर्व उपाययोजना कराव्यात. आज शासनाने पर्सेंटाईल, 70:30 चे सूत्र स्वीकारले होते परंतु त्यालाही स्थगिती देण्यात आली. दहावीचा विद्यार्थी जो एसएससी बोर्डाच्या परीक्षेला बसलेला असतो. या एसएससीचे ज्युरिडिक्शन संपूर्ण कोकणापर्यंत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सिंधुदुर्ग, चिपळूण, रत्नागिरी मधील मुलांना 90-95 टक्के मार्क्स मिळाल्यानंतर त्यांना रुपारेल कॉलेजमध्ये ॲडमिशन घ्यावी असे वाटले तर त्यांचे काय चुकले? परंतु तुम्ही यासंदर्भात बंधने घातलेली आहेत. सीमा आखून दिल्या आहेत. वांद्रे येथे शिक्षण घेत असलेल्या मुलाला माहिमच्या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेता येत नाही, माहिमच्या मुलाला वांद्रे येथे शिक्षण घेता येत नाही. दुस-या जिल्हयाच्या मुलाला प्रवेश घ्यावयाचा असेल तर त्याला 30 टक्क्याचा रेशो लावला आहे. ॲडमिशनसाठी 70-30 टक्क्याचा रेशो आपण लावलेला आहे. शिक्षण विभागातील अधिका-यांची बुध्दिमत्ता आश्चर्य करणारी आहे. आज सीबीएसईची दादागिरी चालली आहे. खरे म्हणजे पुढील वर्षी तुम्हाला आमच्याकडे ॲडमिशन मिळणार नाही असे तुम्ही सीबीएसईला सांगितले पाहिजे. आपण खरे म्हणजे बॅनच केला पाहिजे. एसएससी बोर्डातील मुलगाच तेथे गेला पाहिजे. तुम्ही सीबीएसई, आयसीएसईला सांगितले पाहिजे की, तुम्हाला लागेल तिकडे जा, आमच्याकडे तुम्हाला ॲडमिशन मिळणार नाही. या शाळा आमच्या सर्वसामान्य मुलांना ॲडमिशन सुध्दा देणार नाहीत. आपल्या शिक्षण खात्यातील अधिकारी सीबीएसई, आयसीएसईच्या शाळेत गेले होते परंतु त्या शाळांनी आपल्या अधिका-यांना शाळेत साधा प्रवेश सुध्दा दिला नाही. शासनाला उडवून लावणारी ही माणसे आहेत. तुम्ही जर अशा प्रकारे वागणार असाल तर यापुढे आम्ही तुम्हाला प्रवेश देणार नाही असे आपण त्यांना ठणकावून सांगितले पाहिजे. कारण हे बोर्ड शेवटी आपल्याच प्रवाहात येतात. जिल्हापरिषद, प्राथमिक, माध्यमिक, महानगरपालिका, नगरपालिकांच्या शाळेतील गळती होणा-या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? या शाळेतील शाळा बाहय विद्यार्थ्यांची संख्या किती आहे? असे जर विचारले शिक्षण मंडळाला सांगता येत नाही. हा प्रकार बिरबलाच्या गोष्टीसारखा आहे. अकबर बादशहाने एकदा बिरबलला विचारले, "बिरबल, आपल्या राज्यात कावळे किती"? त्यावर बिरबलाने लगेच उत्तर दिले, "आपल्या राज्यात 1 लाख 20 हजार कावळे आहेत." राजा म्हणाला, "एवढया पटकन तु कावळे कसे काय मोजले, कमी झाले तर "? त्यावेळेस बिरबल म्हणाला "कावळे कमी झाले तर परराज्यात गेले असतील व जास्त झाले तर परराज्याचे कावळे आपल्याकडे आले असतील." तसाच प्रकार शाळा बाहय मुले किती आहेत ते शिक्षण विभागाला सांगता येत नाही. शाळा बाहय मुलांची संख्या, नापास मुलांची चिंता, कोणाची मुले नापास होत आहेत याची

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

शिक्षण मंडळाला काही सुध्दा तमा नाही. मागे शिक्षण विभागाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके देण्याचा निर्णय घेतला होता. चांगला विचार होता. परंतु बाजूच्या मुलाजवळ मागासवर्गातील मुलगा बसला आहे म्हणून त्याला नवीन पुस्तके परंतु त्याच्याजवळ सवर्ण मुलगा बसला असेल तर त्याच्या जवळ नवीन पुस्तक नाही, मोफत पुस्त नाही. आता आपण ही योजना सर्वांसाठी केलेली आहे. तोपर्यंत आपल्याला वर्तमानपत्राने झोडपून काढले होते. लोकांना वसंतराव पुरके नावाचे नवीन गि-हाईक मिळालेले आहे. खरे म्हणजे शिक्षण मंत्र्यांचे चुकत नाही परंतु मंत्रीमहोदय अधिका-यांच्या अधिन राहतात तेच त्यांचे चुकते. अधिकारी तुमच्या समोर गरिबिचे चित्र उभे करतात. आता सुध्दा 6-6 महिने मुलांना पाठयपुस्तके मिळत नाहीत. 16 टक्के प्राथमिक शाळेतील मुलांना पाठयपुस्तके मिळाली नाहीत, माध्यमिक शाळेतील 13 टक्के मुलांना मागील वर्षी पाठयपुस्तके मिळाली नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या संदर्भात भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी राज्य शासनावर ताशेरे झाडले आहेत. सर्व शिक्षा अभियानामध्ये आपल्याला 1052 कोटी रुपये मिळाले व त्यातील 782 कोटी रुपये खर्च झाले. म्हणजे 77 टक्के खर्च झाला. उरलेल 23 टक्के रक्कम ज्या शाळांना अनुदान नाही त्यांना द्यावयास पाहिजे होते. आपण फक्त अनुदानित शाळा विनाअनुदानित शाळा आणि कायम विनाअनुदानित शाळा असे तीन वर्ग सुरु केलेले आहेत. सर्व शिक्षा अभियान 2009 साली बंद होणार आहे. सर्व शिक्षा अभियानातील पैसे परत जातात त्यामुळे तुम्ही तुमच्या अधिका-यांचे कान खेचले पाहिजे. इतक्या मोठया प्रमाणात पैसे परत जात असतील आणि गरीब मुलांना शिक्षणासाठी त्याचा उपयोग होत नसेल तर त्या पैशाचा उपयोग काय ? त्यामुळे सर्व शिक्षा अभियान योजनेच्या पैशाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी लक्ष देण्याची गरज आहे. आपण एका ठिकाणी असे म्हटले होते की, "Money spent on education is not wasted but it is invested." If it is investment then why we are not utilizing the fund, which is given by the Central Government.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

सभापती महोदय, मी एक दोन मिनिटांमध्ये माझे भाषण संपविणार आहे. पाठयपुस्तकामध्ये चुका असतात हा देखील एक महत्वाचा विषय आहे . या चुका कमी झालेल्या आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे परंतु दहावीच्या भुगोलाच्या पुस्तकामध्ये अनेक चुका आहेत. महाराष्ट्रात 35 जिल्हे असतांना त्या पुस्तकामध्ये 32 जिल्हे दाखवले आहेत. त्याचबरोबर गोंदिया, वाशिम, नंदूरबार या जिल्हयांचा उल्लेखच केलेला नाही. मुंबई जवळ अरबी समुद्र आहे हे कोणीही सांगेल परंतु या पुस्तकामध्ये त्याचा उल्लेख "लक्षव्दीप समुद्र" असा केलेला आहे तेव्हा हा उल्लेख करणारा विव्दान माणूस कोण आहे ? या संदर्भात जेवढे बोलावे तेवढे कमीच राहणार आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगतो की, मदरशांचा विषय सुध्दा महत्वाचा आहे मदरशांना शाळेचा दर्जा देण्याचे शासनाने ठरविलेले आहे. त्यातून नक्की काय शिकवले जाते या संदर्भात एकदा चर्चा करावी लागेल असे मला वाटते. त्याचबरोबर या मदरशातून दिल्या जाणा-या शिक्षणामुळे देशभक्त घडतात काय हे सुध्दा पहाण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला परीक्षेच्या संदर्भात एक मुद्दा मांडावयाचा आहे. तीनही भाषासाठी 105 गुण ठरवून देण्यात आले असून त्यापैकी 20 गुण शाळेने द्यावयाचे आहेत त्याबाबतीत शासनाचे असे म्हणणे आहे की, विद्यार्थ्यांना 20 पैकी 20 गुण मिळाले पाहिजेत. मी शिक्षकांना भेटलो असतां त्यांनी मला असे सांगितले की ,शिक्षण मंत्र्यांचे असे म्हणणे आहे की या विद्यार्थ्यांना 20 पैकी 20 गुण मिळालेच पाहिजेत. कठीण शब्दांचे स्पेलिंग त्या परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना विचारले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना कमी गुण मिळतात. तेव्हा मी त्यांना असे म्हटले की, आपण विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवा. विद्यार्थ्यांना शिकविण्यामध्ये शिक्षकांना काही अडचण आहे काय असे मी त्यांना विचारले होते व त्या मुद्याबाबत मी आपली बाजू घेतली होती. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी असे सांगितले की, मराठी भाषा सक्तीची करण्यात यावी. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, दोन विषयात 40 -40 गुण मिळाले म्हणजे 80 गुण होतात आणि शाळेने द्यावयाचे 20 गुण तर त्या विद्यार्थ्याला मिळणार आहेतच. 105 गुण मिळाल्यानंतर विद्यार्थी पास होणार आहेत व पाच गुण ग्रेस म्हणून देखील मिळणार आहेत. त्यामुळे मराठी भाषा शिकली नाही तरी चालू शकते.तीन भाषांचे लेखी परीक्षेचे मार्क्स एकत्रित करण्यात आलेले आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

त्यामुळे प्रत्येक भाषेत तो पास झाला पाहिजे असे ठरविले गेले नाही. तर तीनही भाषांचे मार्क्स एकत्रित करण्यात आलेले आहेत. तेव्हा प्रत्येक विषयात किमान 25 मार्क्स मिळाले पाहिजेत असे तरी ठरविले पाहिजे.

प्रा.वसंत पुरके (बसून): तसेच करण्यात आलेले आहे

श्री.अरविंद सावंत : तसे जर करण्यात आले असेल तर ती चांगली गोष्ट आहे उत्तराच्या भाषणात त्याबाबतीत आपण खुलासा करावा. तीन विषयात पडलेले मार्क्स विचारात घेंऊन पासिंग ठरविले जात आहे तो प्रकार थांबविण्यात यावा आणि मराठी भाषेवरील अन्याच दूर करण्यात यावा.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. निर्णय सारखे बदलण्याची आणि नवीन निर्णय घेण्याची प्रक्रिया काही काळ थांबविण्यात आली पाहिजे. गाडी रुळावर आल्यानंतर आपल्या ज्या काही कल्पना आहेत त्या अंमलात आणाव्यात. त्याचप्रमाणे एखादा निर्णय अंमलात आणत असतांना त्याचा दूरगामी परिणाम काय होईल याचा विचार करुन ंनतर तो अंमलात आणावा अशी माझी विनंती आहे. त्याचप्रमाणे काही पालकांना , काही शाळा कॉलेजातील प्राचार्याना बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा करुन प्रवेशाच्या बाबतीत निर्णय घेण्यात यावा. प्रवेशाच्या संदर्भात त्यांना त्रास सहन करावा लागतो त्यामुळे यातून नेमका मार्ग काय काढावयाचा याबाबतीत तेच आपल्याला सांगू शकतील .त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करुनच निर्णय घेण्यात यावा केवळ अधिका-यांचे म्हणणे एकून निर्णय घेण्यात येता कामा नये. त्यांची मुले आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई.च्या शाळेत शिक्षण घेत असल्यामुळे त्यांचे भले कसे करता येईल हा एकाच विचार त्यांच्या डोक्यात असल्यामुळे त्यांच्याकडून कोर्टामध्ये वेगळे म्हणणे मांडले जाते .त्यातून सरकारचे नाक कापले जाते. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यामुळे सी.ई.टी.च्या परीक्षा घेतल्या जातात परंतु तामिळनाडू राज्य मात्र सुप्रीम कोर्टाला विचारत सुध्दा नाही. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, दहावी नंतर सी.ई.टी.ची परीक्षा बंद करण्यात आली पाहिजे. सी.ई.टी.ची परीक्षा घेतली जात असल्यामुळे बोर्डाच्या परीक्षेला काहीही किंमत राहिलेली नाही. त्या परीक्षेची गुणवत्ता यादी देखील आता जाहीर केली जात नाही.गुणवत्ता यादी जाहीर झाली असती तर काय झाले असते ?. सी.ई.टी.ची परीक्षा असल्यामुळे बोर्डाच्या परीक्षेला काहीही किंमत राहिलेली नाही त्यामुळे या विद्यार्थ्यांना सी.ई.टी.च्या परीक्षेला बसावे लागते .





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ..

दहावीच्या परीक्षेत जी मुले गुणवत्तेत आलेली आहेत. त्यांचे इंग्रजीमुळे बारावीच्या आणि सी.ई.टी.च्या परीक्षेत काय होते याचा कधीतरी वेगळा अभ्यास करण्याची गरज असल्यामुळे हा विषय मी नंतर सभागृहात मांडेन. आज सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यानी जो विषय मांडला आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या पुढे घिसाडघाईचे निर्णय घेण्यात येऊ नयेत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी त्याचे परिणाम काय होतील याचा विचार करुनच निर्णय घेण्यात यावा अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जयहिंद ,जय महाराष्ट्र.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या शिक्षणाच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, चिनॉय कॉलेजच्या संदर्भात या पूर्वी या सभागृहात अनेकदा चर्चा झाली असून आपण सुध्दा या संदर्भात निदेश दिले होते, त्याचबरोबर या कॉलेजला आपण स्वत: भेट देणार होता. शासनाने या कॉलेजमध्ये प्रशासक नेमला होता परतु प्रशसकाला प्रवेश दिला गेला नाही. शासनाचे जे अधिकारी कॉलेजमध्ये जात होते त्यांना सुध्दा आत येऊ दिले नाही म्हणून हे प्रकरण कोर्टात गेले होते . चिनॉय कॉलेज सुरु करण्यात यावे असे कोर्टाने देखील आदेश दिले होते. परंतु आज देखील चिनॉय कॉलेजच्या व्यवस्थापनाची मनमानी चालू आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

आज देखील प्रवेशाबाबत न्यायालयाने आदेश देऊन सुध्दा 500 विद्यार्थ्यांचे ॲप्लिकेशन घेऊन ठेवले परंतु त्यांची फी अजून कॉलेजने घेतली नाही. कालपासून ॲडमिशन बंद केली आहे, एवढे प्रशासन कमजोर झाले आहे काय? एक कॉलेज आपण आपल्या ताकदीवर चालवू शकत नाही काय?

**उपसभापती** : मंत्री महोदय, माननीय सदस्य याठिकाणी सांगत आहेत ते निश्चितपणे खरे आहे. आणि त्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केली नाही याबाबत मी देखील खेद व्यक्त करुन सभागृहाचे कामकाज 5 मिनिटे तहकूब करतो.

( 4.55 ते 5.00 बैठक स्थगित झाली.)

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)**

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सभागृहाची बैठक चिनॉय कॉलेजच्या विषयावरुन पाच मिनिटांसाठी तहकूब झाली होती. या कॉलेजच्या संदर्भात शासनाने जी भूमिका घेतलेली आहे, त्याला चिनॉय कॉलेज बिलकूल भीक घालत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये उपस्थित झालेल्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात असे सांगितले होते की, आम्ही आज शासनाच्यावतीने निवेदन करु. आज तेथील विद्यार्थ्यांचे भवितव्य जवळजवळ अंधकारामध्ये बुडालेले आहे. त्यांच्याकडून फॉर्म घेतले गेले आहेत, पण फी घेतली जात नाही. यासंबंधात हाय कोर्टाने निर्देशही दिलेले आहेत. परंतु हाय कोर्टाचे निर्देश कचऱ्याच्या टोपलीमध्ये टाकण्यात आले आहेत. अशा या निगरगट्ट प्रशासनावर शासन काय कारवाई करणार आहे ? असा प्रश्न आहे. सरकारी कामामध्ये अडथळा आणला म्हणून व्यवस्थापनाच्या विरोधात एफ.आय.आर.रजिस्टर झालेला आहे.परंतु आज पर्यंत याबाबतीत कोणालाही अटक झालेली नाही. या राज्य शासनाचे सर्वेसर्वा असलेले माननीय मुख्यमंत्री आदेश देतात, पण त्यांचे आदेश देखील पोलीस मानत नाहीत अशी विचित्र परिस्थिती चिनॉय कॉलेजच्या बाबतीत निर्माण झालेली आहे. तेथे कर्मचारी अतिरिक्त झाले म्हणून त्यांना काढून टाकण्यात आले आहे म्हणजे याबाबतीत देखील मनमानी केली जात आहे. तसेच कोणतीही नोटीस न देता विद्यार्थ्यांना सांगितले आहे की, उद्यापासून कॉलेजमध्ये यावयाचे नाही. म्हणजे केवळ जागा विकण्यासाठी मिळत आहे म्हणून या जागेचे कोट्यावधी रुपये हडप करण्याच्या दृष्टीकोनातून हे केले जात आहे. शासनाने यांना शिक्षणासारखे पवित्र काम करण्यासाठी भूखंड दिलेले आहेत. पण मुंबईतील हे भूखंड गिळंकृत करण्याचे काम चिनॉय कॉलेजच्या व्यवस्थापनाच्या वतीने होत आहे आणि अशा वेळी शासन केवळ हतबल होऊन बघत आहे. काहीही करु शकत नाही. हे कॉलेज कधीपासून सुरु करणार आहात ? असे व्यवस्थापनाला विचारण्यासाठी मी त्याठिकाणी पालकांना घेऊन गेलो होतो. पण मी जमाव बंदीचा आदेश मोडला आहे म्हणून पोलिसांनी माझ्यावरच गुन्हा दाखल केलेला आहे. म्हणजे ज्यावेळी आमच्यासारखा सामाजिक कार्यकर्ता शिक्षणाच्या एखाद्या गोष्टीसंदर्भात विचारणा करण्यासाठी जातो, तेव्हा त्याला देखील गुन्हेगार ठरविण्याचे काम शासनाच्यावतीने होत आहे. पण प्रत्यक्षात गुन्हेगार म्हणून ज्यांच्यावर एफ.आय.आर.रजिस्टर केलेला आहे, त्यांना आजपर्यंत कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नाही....

. . . .3 झेड-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब . . . .

मी अतिशय तळमळीने हा एकच विषय मांडत आहे. तेथील कर्मचाऱ्यांना देखील काढून टाकण्यात आलेले आहे. त्यांना कोणी वाली नाही आणि शासन त्यांच्याबाबतीत कोणताही सहानुभूतीपूर्वक निर्णय घेत नाही. म्हणजे या कॉलेजमधील ना कर्मचाऱ्यांना कोणतेही संरक्षण आहे, ना विद्यार्थ्यांना कोणतेही संरक्षण आहे. अशा प्रकारे सर्वांना वाऱ्यावर सोडण्याचे काम केले जात आहे. अशा वेळी जर शासनामध्ये खरोखर ताकद असेल, जरब असेल तर या कॉलेजच्या व्यवस्थापनाला एकदा कायमचा धडा शिकवावा. तसेच आपण नेहमी जी तळमळ दाखवत असता की, आम्ही विद्यार्थ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या, शिक्षकांच्या पाठिमागे मजबूतीने उभे राहू. तर तसे एकदा दाखविण्याची संधी आलेली आहे. कृपा करुन याबाबती बोटचेपेपणाचे धोरण स्विकारु नका, कचखाऊ धोरण स्विकारु नका. कारण चिनॉय कॉलेजच्या विषयाकडे संपूर्ण मुंबईतील विद्यार्थ्यांचे, पालकांचे देखील लक्ष आहे. जर एकदा हा प्रयोग यशस्वी झाला तर मुंबईतील सर्व शिक्षण संस्था ज्या मोक्याच्या जागेवर आहेत, त्या शिक्षण संस्था बंद होऊन, उद्या तुम्हाला तेथे कमर्शिअल मॉल दिसतील आणि त्या पापाचे धनी सरकार राहील एवढेच मी यानिमित्ताने तुम्हाला सांगू इच्छितो. कृपया शासनाने याची दखल घ्यावी एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री. अरविंद सावंत )** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, चिनॉय कॉलेजचा विषय अतिशय गंभीर आहे. या ठिकाणी जी चर्चा उपस्थित झालेली आहे त्या चर्चेचे उत्तर हा वेगळा विषय आहे. चिनॉय कॉलेजच्या संदर्भात शासनाला ताबडतोब निवेदन करण्यास सांगितले पाहिजे. त्यांच्या बाबतीत कारवाई व्हावयास पाहिजे. कारण चिनॉय कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज घेतलेले आहेत परंतु फी घेतली जात नाही. कोर्टाचे आदेश आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगून सुध्दा पोलीस सहकार्य करीत नसतील तर आपण निश्चितपणे यांसदर्भात उद्या अधिवेशन संपण्याच्या आत निवेदन करावे अशी मी आपल्याला सूचना करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : डहाणू (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल सुरु असणे

**मु.शी.** : डहाणू (जि.ठाणे) येथील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल सुरु असणे या विषयावरील सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि. प. स. यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी पदावर भारतीय प्रशासन सेवा संवर्गातील अधिकारी उपलब्ध न होणे यांसदर्भात आदिवासी विकास मंत्री यांचे निवेदन.

डॉ. विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, काल "डहाणू, जि. ठाणे येथील आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे हाल सुरु असणे" या विषयावर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि. प. स. यांनी दिलेल्या म. वि. प. नियम 101 अन्वये सूचनेवर दिनांक 24.5.2008 रोजी सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मी पुढील निवेदन करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या नियुक्तीच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित केला होता त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय कसे काय निवेदन करीत आहेत ? तो सामान्य प्रशासन विभागाचा विषय आहे. हे निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांनी केले पाहिजे. आपल्याला अधिकारी मिळत नाहीत असे आपणच सांगत आहात. मागूनही मिळत नाही अशी व्यथा आपण स्वत:च या ठिकाणी मांडली.

डॉ. विजयकुमार गावित : आम्ही त्यांच्याकडे नस्ती पाठवली होती आणि त्यावर त्यांनी स्पष्टपणाने ....

श्री. दिवाकर रावते : आम्हाला त्यांच्याकडून उत्तर पाहिजे.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांचे निवेदन पूर्ण होऊ द्यावे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

श्री. दिवाकर रावते : परवा मी या ठिकाणी उशिरा आलो तेव्हा सामुहिक जबाबदारी म्हणून माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे उत्तर देत होते. महसूल मंत्री वेगळ्याच खात्याचे उत्तर देत होते. वरुन सांगतात की, सामुहिक जबाबदारी आहे. हे काय चालले आहे ? या सदनाला काही महत्व नाही काय ? हा सामान्य प्रशासन विभागाचा विषय आहे. हे या खात्याचे कायम स्वरुपाचे दुखणे आहे. त्यांनी या ठिकाणी व्यथा मांडली. तुम्ही ते बघून घ्या, तुमची नस्ती वाचा असे सर्व चालले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी व्यथा मांडली की, मी मागूनही मला मिळत नाही. हे काय चालले आहे ?

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती** : आपण माननीय मंत्रिमहोदयांचे निवेदन आधी ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, 1993 साली प्रकल्प कार्यालयांवर आय.ए.एस. अधिकारी किंवा ....

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा सामान्य प्रशासन विभागाचा विषय आहे. हा भरतीचा विषय आहे. त्यांनी आपली व्यथा मांडलेली आहे आणि त्यावर सामान्य प्रशासन विभागाच्या वतीनेच उत्तर आले पाहिजे.

**तालिका सभापती** : माझे असे म्हणणे आहे की, आपण माननीय मंत्रिमहोदयांचे निवेदन ऐकून घ्यावे. आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या संदर्भात ते काय प्रयत्न करीत आहे ते कळू द्यावे. त्यानंतर आपण बोलावे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, 1993 साली आदिवासी विकास विभागातील संवेदनशील एरियामध्ये बळकटीकरण करावयाचे होते. त्या ठिकाणी 11 संवेदनशील विभाग आहेत त्या ठिकाणी आय.ए.एस. अधिकारी किंवा वन विभागाचे अधिकारी नेमावेत अशा पध्दतीचे आदेश झाले होते. परंतु 2002 साली असे निदर्शनास आले की, मोठ्या प्रमाणामध्ये आय.ए.एस. अधिकारी मिळत नाहीत. म्हणून नंतर त्याच्यामध्ये पुन्हा सुधारणा करण्यात आली. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी किंवा वन अधिकारी किंवा क्लास वन अधिकारी महसूल

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित ....

विभाग, कृषी विभाग किंवा जिल्हा परिषदेमधील क्लास वन अधिकारी नेमावेत असे निदेश झालेले आहेत. तरी सुध्दा सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा केल्यानंतर पुढीलप्रमाणे निवेदन करीत आहे.

राज्यात सध्या भा.प्र.से.चे संवर्ग बल (केडर पोस्ट) 350 इतके आहे. त्यापैकी 317 इतके भा. प्र. से. अधिकारी कार्यरत आहेत. भा.प्र.से. संवर्गामध्ये 33 अधिकाऱ्यांची कमतरता असल्यामुळे संवेदनशील क्षेत्रातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या पदावर नियुक्तीसाठी भा.प्र.से. संवर्गातील अधिकारी उपलब्ध करुन देता येत नाहीत. पुढील काळात भा. प्र. से. संवर्गातील अधिकारी उपलब्ध झाल्यास संवेदनशील क्षेत्रातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प या पदावर नियुक्तीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतील असे सामान्य प्रशासन विभागाने आदिवासी विकास विभागास आज दि. 25.07.2008 रोजी कळविले आहे.

---

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या एकंदरीत नियोजनामध्ये व्यवस्थितपणा यावा याकरिता भारतीय प्रशासन सेवेतील अधिका-यांना नेमण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला डावलून मंत्रिमहोदय आता शासनाने अमुक केले, तमुक केले असे सांगत आहेत. काल सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मंत्रिमहोदय म्हणाले होते की, मी आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी मागत आहे, पण आय.ए.एस.अधिकारी त्या जागांसाठी दिले जात नाहीत. आज 25 तारीख आहे. माननीय सामान्य प्रशासन मंत्र्यांनी आदिवासी विभागाच्या मंत्र्यांना कळविले की, तुम्ही सभागृहात ही माहिती द्यावी. आपण त्या विभागाचे पोस्टमन आहात काय, मंत्री म्हणून आपल्याला स्वत:चे स्थान आहे की नाही ? आपण एक कॅबिनेट मंत्री आहात, तुम्ही तुमच्या खात्याचे प्रमुख आहात. सामान्य प्रशासन विभागाने तुम्हाला सांगितले की, तुम्ही तुमचे सभागृहात जाऊन निस्तरावे. यामध्ये घटनात्मक मुद्दा आहे. हा सरकारच्या किंवा अधिका-यांच्या मर्जीचा विषय नाही. घटनेप्रमाणे तरतुदी निर्माण झाल्या त्या संपूर्ण देशाकरिता आहेत. त्यातून या नियुक्त्यांच्या घटना घडत आहेत. आपल्याला हे निवेदन करावे असे त्यांनी सांगावयाचे. या सरकारचे काय चालले आहे, या सदनाला काही महत्व आहे की नाही ? काल सभागृहात हरकत घेतल्यानंतर आपल्याला आज निवेदन करण्यास सांगितले आहे. हा आपला अपमान आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आदिवासी विकास विभागाची वासलात कशी लावली जाते त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. काल मी विचारले होते की, प्रकल्प अधिकारी या पदावर आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी पाहिजेत. त्यामुळे या पदांवर किती आय.ए.एस.अधिका-यांची नेमणूक केली आहे. त्यानंतर हया प्रश्नाला सुरुवात झाली आहे. मंत्रिमहोदय, 2 वर्षापूर्वी हाच प्रश्न मी उपस्थित केला होता हे आपल्याला स्मरत असेल. प्रकल्प अधिकारी या पदावर आय.ए.एस.दर्जाचे अधिकारी असावेत असे राज्याचे धोरण आहे. यासंबंधी हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत. यासंबंधी मेळघाटचे सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यामुळे आपण त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे. माननीय आदिवासी विकास मंत्र्यांची माननीय मुख्यमंत्र्यांकडून अशी अवहेलना केली जात आहे ही

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/

डॉ.दीपक सावंत....
दुर्दैवी गोष्ट आहे. हा अतिसंवेदनशील भाग आहे. त्याबाबत निवेदन करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ नाही त्याचा मी निषेध करतो.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, आदिवासी समाजाचा, या सभागृहाचा आणि उच्च न्यायालयाचा अवमान करणारे निवेदन याठिकाणी करण्यात आले आहे. 1994 मध्ये उच्च न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले होते की, प्रकल्प अधिकारी म्हणून आय.ए.एस.दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती करावी. या निवेदनामध्ये उच्च न्यायालयाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. उच्च न्यायालयाचे आदेश शासन पाळत नाही. त्यामुळे ही न्यायालयाचा अवमान करणारी घटना आहे. उच्च न्यायालयात हा विषय मांडला होता. आदिवासी क्षेत्रात विविध विभागांचा एकमेकांशी समन्वय नसल्यामुळे त्यांना न्याय मिळत नाही, आदिवासींचे कुपोषण होते. म्हणून उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असताना आणि वारंवार शासनाकडे मागणी होत असल्यामुळे प्रकल्प अधिकारी पदावर आय.ए.एस.दर्जाच्या अधिका-यांची नियुक्ती केली पाहिजे. पण शासन त्यावर निर्णय घेत नाही. हा उच्च न्यायालयाचा, सभागृहाचा अवमान आहे याची गंभीर दखल घेतली पाहिजे. शासनाला आपण निर्देश दिले पाहिजेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जगदीश गुप्ता...)

जर उच्च न्यायालयाने आदेश दिले असतील तर त्यानुसार तातडीने त्याठिकाणी आय.ए.एस. अधिका-यांची नियुक्ती झाली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी निवेदन वाचून हे अधिकारी बदलले, ते अधिकारी बदलले असे सांगितले. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार हे बदललेले आहेत काय ? कोर्टाच्या निर्णयाचा अवमान आपणाकडून होत असेल तर त्याबाबतीत आम्ही आपणावर खटला दाखल करु.

डॉ. विजयकुमार गावित : 1993 सालामध्ये आदिवासी विकास विभाग सक्षम करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी असे ठरविले होते की, आय.ए.एस. अधिकारी किंवा वन विभागाचे अधिकारी..

श्री. दिवाकर रावते : हे कोर्टाचे आदेश आहेत काय ?

डॉ. विजयकुमार गावित : ...अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर 2002 साली आय.ए.एस. अधिकारी किंवा वन विभागाचे अधिकारी...

श्री. जगदीश गुप्ता : तालिका सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांनी असा निर्णय झाला एवढाच उल्लेख केला. हा कोर्टाने दिलेला आदेश आहे, असा उल्लेख रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी स्वतंत्रपणे निर्णय घेतला की न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार निर्णय घेतला आहे ?

डॉ. विजयकुमार गावित :... मी हे सांगत होतो की, आय.ए.एस. आणि वन अधिकारी उपलब्ध होत नसतील तर त्याठिकाणी महसूल विभागाचे आणि इतर विभागाचे वर्ग-1चे अधिकारी नेमण्याचा निर्णय 2002 साली झाला. सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत न्यायालयाचे आदेश आहेत की नाहीत हे मी तपासून पाहतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : या प्रकरणी सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी रिट दाखल केल्यानंतर हायकोर्टाने दिलेले आदेश आणि त्यानुसार शासनाने केलेली कार्यवाही या ठिकाणी सांगितली पाहिजे. कोर्टाने काय आदेश दिले हे निवेदनामध्ये सांगितले नाही तर ते निवेदन अपूर्ण होईल. म्हणून कोर्टाने काय आदेश दिले ते सांगावे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : ही सामान्य प्रशासन विभागाची जबाबदारी असून, आदिवासी विकास विभागाने ती स्वत:वर ओढवून घेण्याची आवश्यकता नाही. माननीय मंत्री महोदयांनी कोर्टाने आदेश दिलेले आहेत किंवा कसे हे तपासून पाहू असे सांगितले. तेव्हा आता हे निवेदन मागे घेऊन कोर्टाचे आदेश तपासून योग्य पध्दतीचे निवेदन सभागृहामध्ये करावे अन्यथा कोर्टाच्या आदेशांचा अवमान होईल.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी या विषयाच्या संदर्भात केलेल्या दाव्याची दखल घेतली गेली नाही. न्यायालयाचे आदेश आहेत की नाहीत हे तपासून पाहतो असे मंत्री महोदयांनी सांगितले. कोर्टाच्या आदेशांचा उल्लेख नसेल तर ती बाब आक्षेपार्ह आहे. याबाबतीत आदिवासी विकास मंत्र्यांनी सामान्य प्रशासन विभागाला निवेदन करण्यास सांगावे.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: यंदाच्या अकरावी प्रवेशाच्या वेळी शासनाने पर्सेंटाईल पध्दत सुरु करण्याबाबत घेतलेलेला निर्णय, गतवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षीही क्रमिक पुस्तकांमध्ये आढळून आलेल्या चुका, लैंगिक शिक्षणाबाबत शासनाने स्पष्ट भूमिका न घेतल्याने निर्माण झालेली संभ्रमावस्था

**मु.शी.**: यंदाच्या अकरावी प्रवेशाच्या वेळी शासनाने पर्सेंटाईल पध्दत सुरु करण्याबाबत घेतलेलेला निर्णय, गतीवर्षाप्रमाणे यंदाच्या वर्षीही क्रमिक पुस्तकांमध्ये आढळून आलेल्या चुका, लैंगिक शिक्षणाबाबत शासनाने स्पष्ट भूमिका न घेतल्याने निर्माण झालेल्या संभ्रमावस्था यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, अनिल परब, संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, भगवान साळुंखे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सरु....)

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, शिक्षण विभागासंबंधी चौकटीची चर्चा आपण खूप केली. 70:30 प्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा, प्रवेश शुल्क कमी असावे की जास्त असावे यासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चा उपस्थित केली आहे. परंतु शिक्षणाचा जो आत्मा आहे, त्यासंदर्भात कोणीही सदस्य बोलले नाहीत. 1975 या वर्षी इयत्ता 10 वी आणि इयत्ता 11 वी च्या परीक्षा एकाच वेळी झाल्या. 1975 या वर्षी निर्णय घेतला गेला की, 1975 हे 11 वी चे शेवटचे वर्ष आहे. 1975 पासून 10+2+3 असा अभ्यासक्रम सुरु होईल. 10+2+3 हा पॅटर्न स्वीकारुन जवळपास 33 वर्षे झाली आहेत. परंतु गेल्या 33 वर्षात या अभ्यासक्रमाचा आढावा आजपर्यंत घेतला गेलेला नाही. 10+2+3 अभ्यासक्रम सुरु करताना कल्पना

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

अशी होती की, राज्यात एकाच पध्दतीचे मोठया प्रमाणात शिक्षण चाललेले आहे. 11 वी त्यानंतर ग्रॅज्यूएशन अशी पूर्वी शिक्षण पध्दती होती. त्या शिक्षण पध्दतीमुळे कोठे तरी बँकेत नोकरी मिळेल, कोठे तरी एल.आय.सी.मध्ये नोकरी मिळेल अशी शिक्षण पध्दती होती. ब्रिटीशांनी कारकून तयार करणारे शिक्षण सुरु केले होते. ते बदलण्यासाठी आपण 10+2+3 असा शिक्षणाचा पॅटर्न या राज्यात सुरु केला आहे. त्यात कल्पना अशी होती की, इयत्ता दहावी नंतर या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमूख शिक्षण मिळावे. व्यवसायाभिमूख कोर्सेस सुरु व्हावेत आणि ज्याच्या आधारे पुन्हा त्याच आर्ट, सायन्स, कॉमर्सच्या चाकोरीत विद्यार्थी न येता प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला मिळालेल्या शिक्षणाच्या आधारावर स्वयंरोजगार सुरु करावा, आपण पैसे कमवावेत, आणि दुस-यांनाही रोजगार उपलब्ध करुन द्यावा. ज्याला आपण एम.सी.व्ही.सी. म्हणतो ते कोर्सेस सुरु झाले. परंतु गेल्या 33 वर्षात या अभ्यासक्रमात किती महत्व दिले यासंबंधीचा आढावा घेतला गेला पाहिजे. किती विद्यार्थी आर्टस्,कॉमर्स,सायन्सपासून डायव्हर्ट करु शकलो ? किती विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या व्यवसायाभिमुख शिक्षणाने स्वत:चे उद्योगधंदे सुरु केले ? या संबंधी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर निगेटिव्ह येईल. त्यामुळेच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज तेच विद्यार्थी इयत्ता 12 वी उत्तीर्ण झाल्यानंतर पुन्हा आर्ट, कॉमर्स आणि सायन्स क्षेत्रात प्रवेश घेण्यासाठी रांग लावतो आहे. हा अभ्यासक्रम सुरु होऊन 33 वर्षे झालेली आहे,त्यामुळे त्या शिक्षण पध्दतीचा आढावा घेण्याची नितांत आवश्यकता आहे. तो आढावा यासाठी आवश्यक आहे की, व्यवसायाभिमुख शिक्षणाचे कोर्सेस आपण का वाढवू शकलो नाही ? कोर्सेसमध्ये प्रवेश घेण्या-या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ का करु शकलो नाही ? व्यवसायाभिमूख अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर किती विद्यार्थ्यांनी स्वत:चे रोजगार सुरु केले ? यासंबंधीचा आढावा घेण्याची खूपच आवश्यकता आहे.

माननीय सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री हे ग्रामीण भागातील असून ते आदिवासी समाजातले आहेत. व्यवसायाभिमुख शिक्षणामध्ये जे कोर्सेस सुरु केले गेले. वेल्डींग, रेडिओ रिपेअरींग, संगणक दुरुस्ती अथवा संगणकाशी संबंधित कोर्सेस असतील, त्या कोर्सेसचे विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणात प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील गावातील मुलगा आपले गाव सोडून शहराकडे येणार नाही, त्या मुलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा म्हणून शेतीवर आधारित उद्योग

3...





श्री.चंद्रकांत पाटील....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सुरु करण्यात आले पाहिजेत आणि त्यासाठी शिक्षणात काही प्रमाणात बदल करणे आवश्यक आहे. विदर्भात, तसेच कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज आणि गारगोटी तालुक्यात भात मोठया प्रमाणात पिकतो. भाताला विदर्भात धान म्हटले जाते. त्या धानाच्या टरफलापासून वीज निर्मिती करता येते. हा उद्योग सुरु करण्यासाठी एवढी मोठी संधी उपलब्ध असताना तेथील विद्यार्थ्यांना यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन सरकारच्या माध्यमातून दिले जात नसल्यामुळे तेथील विद्यार्थ्या आर्टस्, कॉमर्स, सायन्स क्षेत्राकडेच वळत आहेत. भंडारा, गडचिरोली जिल्हयात मोठया प्रमाणात धान पीक होते. परंतु धानाच्या टरफलापासून वीज निर्मिती केली जात नसल्यामुळे ते तरुण पुन्हा बँकेच्या आणि एल.आय.सी.च्या दारात उभे राहणार आहे. ज्या गावात ज्या पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते, त्या पिकावर प्रोसेसिंग करण्याचे प्रशिक्षण तेथील तरुणांना दिले पाहिजे. त्यांचा शेतमाल 100 रुपये दराचा असेल तो 150 रुपये दराने जोपर्यंत विकला जाणार नाही तोपर्यंत ग्रामीण भागातील तरुण शहराकडे येण्याचे थांबविणार नाही.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील....

सभापती महोदय, कशा प्रकारचे कोर्स सुरु करता येतील याची यादी वाचून मी सदनाचा वेळ घेऊ इच्छित नाही. गावामधून आता गाईचे शेण सुध्दा विकले जाणार आहे. दूध डेअरीच्या शेजारी गाईचे शेण घेणारी डेअरी, गाईचे गोमुत्र घेणारी डेअरी अशा तीन डेअऱ्या सुरु झाल्या तर आश्चर्य वाटणार नाही. कारण जर्मनीमध्ये घरात अग्निहोत्र केल्याशिवाय कोणी झोपत नसल्यामुळे त्यांना गाईचे शेण हवे आहे. एक्सपोर्ट करणे लांब पण गाईच्या शेणापासून तयार होणारा साबण वापरला तर त्वचेचे रोग होणार नाहीत हे सिध्द झालेले आहे त्यासाठी मोठमोठे कारखाने सुरु झालेले आहेत. त्याला प्रोसेस कसे करावयाचे, त्याचा साबण कसा तयार करावयाचा आणि ते जर एक्सपोर्ट करावयाचे असेल तर त्यासाठी काय करावे लागेल याचा अभ्यासक्रम आम्ही देणार नाही आणि ज्याचा विद्यार्थ्याला काहीही उपयोग नाही असा सायन्स,आर्टस्,आणि कॉमर्सचा अभ्यासक्रम आपण शिकविणार असाल तर गावातील तरुण गावामध्ये न राहता शहराकडे वळणार आहे. शहरातील समस्या वाढविणार आहे. चौकटीची चर्चा खूप केली परंतु अभ्यासक्रम बदलणे आवश्यक आहे. परंतु अभ्यासक्रम बदलणे आणि त्या माध्यमातून त्या गावातील तरुण स्वत: तर रोजगार मिळवीत परंतु गावातील चार तरुणांनाही तो रोजगार मिळवून देईल असे वाटते. या बाबत विचार करण्याची आवश्यकता आहे. चौकटीबद्दल थोडेसे बोलले पाहिजे. कारण चौकट म्हटले की शाळेला ॲडमिशन घेण्यापासून त्याच्या समस्या सुरु होतात. शाळेचे किंवा कॉलेजचे दार उघडतो त्यावेळी तेथेच त्याला विचारले जाते की तू देणगी किती देणार आहेस ? गुणवत्ता किती आहे आणि मार्क किती आहेत हा महत्वाचा मुद्दा नाही. एकूण शिक्षणाचा प्रवेश ते परीक्षा घेऊन बाहेर पडणे याचा एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. तुकडया तुकडयांमध्ये विचार करुन चालणार नाही. मॅनेजमेंट कोटा चिंतेचा विषय आहे. त्याच शाळेमध्ये 93 टक्क्याला प्रवेश बंद होतो परंतु देणगी देऊन 60 -65 टक्के मार्क असतील तर प्रवेश मिळतो. हा एका अर्थाने लोकशाही स्वीकारली आणि समानतेचे सूत्र मांडतो त्याला छेद देणारे आहे. ही विषमता आहे. एखाद्या कॉलेजमधील विद्यार्थी 85-85 टक्के मार्क मिळवून सुध्दा त्याला पाव किंवा एक टक्का मार्क कमी मिळाल्याने प्रवेश घेऊ शकत नाही आणि अडीच-तीन लाख रुपये देणगी देऊन प्रवेश घेणारा विद्यार्थी हा त्याच कॉलेजमध्ये असतो. हा दुजाभाव आहे. शाळा किंवा कॉलेजचे दार उघडल्यापासून विचार केला तर त्याला कुठल्याही प्रकारचे क्रीडांगण नसते, त्याच्या गाडया पार्कींग करण्यासाठी स्टॅन्ड नसतो, वर्गात

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

पुरेसे शिक्षक नसतात, परीक्षा देतो त्याचे पेपर्स चुकीचे निघतात. रिझल्ट चुकीचे लागतात. आताच मला कोल्हापूर जिल्हयातील जयसिंगपूर येथून फॅक्स आलेला आहे तेथील मगदूम पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये 84 पैकी 80 विद्यार्थी नापास झाले. मायक्रोप्रोसेसर ॲन्ड प्रोग्रॅमिंग या विषयामध्ये ते नापास झाले. आपण ज्यावेळी यामध्ये लक्ष घातले त्यावेळी 8 दिवसांनी असे लक्षात आले की हा रिझल्ट चुकीचा लागला. 80 मुले नापास होती त्यातील 70 मुले पास झाली. जो विद्यार्थी नापास होतो त्याची मानसिकता काय असेल याची आपल्याला कल्पना आहे. कारण नंतर त्याची चौकशी करणार,चौकशीनंतर चुकीने रिझल्ट लागला हे सिध्द होणार. परंतु मुळातच परीक्षा पध्दती आणि त्यानंतर पेपर्स तपासण्याची सिस्टीम आहे त्यावर विचार करण्याची आवश्यकता आहे. एकूणच आपल्याकडील शिक्षणाचा खेळखंडोबा झालेला आहे. अन्य देशांमध्ये ज्यावेळी एखादा विषय मार्गी लावायचा असतो त्यावेळी काही क्रांतिकारी विचार केले जातात. आपल्या देशामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील शिक्षण एक वर्ष बंद करुन एक वर्ष शिक्षणामध्ये कुठल्याही प्रकारच्या परीक्षा नाहीत, रिझल्ट नाहीत एक वर्ष शिक्षण बंद करुन त्याचा एक मूलभूत विचार करण्याची आवश्यकता आहे. एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. या महाराष्ट्रामध्ये कुठल्या प्रकारचे कोर्सेस देणार त्याची महाविद्यालये कशी असतील आणि त्याचा कालावधी किती असेल तसेच परीक्षा कशी घेतली जाईल, रिझल्ट कसे लागतील आणि नोकऱ्या कशा मिळतील याचा एकत्रित विचार करण्यासाठी पूर्ण वर्ष एका अर्थाने रुटीन पध्दती बंद करुन विचार करण्याची आवश्यकता आहे. शिक्षणामध्ये क्रांती हा शब्द वापरुन बदल केला पाहिजे. जशी हरितक्रांती झाली तशी शिक्षणामध्ये क्रांती होण्यासाठी फार मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता आहे. एखादे कॉलेज एखाद्या व्यक्तीचे असते त्यावेळी दारोदार फिरुन मी देणग्या गोळा करतो आणि अतिशय जिद्दीने कॉलेज चालवितो. हजारो-लाखो शाळा आणि महाविद्यालये असणारी सरकार नावाची शिक्षण संस्था आहे. या शिक्षणासाठी लागणारा पैसा उभा करण्यासाठी मिळणाऱ्या टॅक्सेसमधून आम्हांला अनुदान मिळण्याची वाट न पाहता लोकांकडे झोळी पसरण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.भोगले

SGB/ SBT/ 17:30

श्री.चंद्रकांत पाटील.........

त्या माध्यमातून फंड निर्माण करावा. ज्याच्यामध्ये लोक आवाहन केल्यानंतर प्रतिसाद देतील आणि त्यातून निर्माण होणाऱ्या फंडामधून आवश्यक असलेले अनुदान देता येईल. नवीन कोर्सेस सुरु करता येतील. प्रत्येकवेळी सरकार पैसा नाही म्हणून सांगते. एक शिक्षण संस्थाचालक करु शकतो. सरकारच्या हातामध्ये सगळ्या प्रकारची हत्यारे आहेत. ते सरकार अशा प्रकारचा फंड का निर्माण करु शकत नाही?

सभापती महोदय, म्हणून माझी विनंती आहे की, दोन-अडीच तासाच्या चर्चेतून शिक्षण या विषयाला न्याय मिळणार नाही. बेसिक चर्चा होण्याची आवश्यकता आहे. मूळ प्रश्नामध्ये जाण्याची आवश्यकता आहे. केवळ चर्चा झाली आणि विषय संपला असे न होता या विषयाला न्याय द्यावा अशा प्रकारची विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : यानंतर माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते हे या प्रस्तावावर आपले विचार मांडतील व त्यानंतर मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय..........

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्हाला बोलण्याची संधी देण्यात यावी. आम्ही शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधी आहोत.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांचे भाषण संपल्यानंतर माननीय मंत्रीमहोदय उत्तराचे भाषण सुरु करतील. आजच्या कामकाजपत्रिकेनुसार ही चर्चा संपल्यानंतर नियम 97 अन्वये 1 तासाची चर्चा घेण्यात येणार आहे. त्यानंतर विधेयके, अशासकीय कामकाज व अर्धातास चर्चा असे सर्व कामकाज आज पूर्ण करावयाचे असल्यास शिक्षणविषयक प्रस्तावावरील चर्चा पूर्ण होणे आवश्यक आहे. माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्हाला बोलण्याची संधी देण्यात यावी.

**तालिका सभापती** : तुमच्या प्रतोदांकडून कोणाचे नाव दिले जात नाही आणि नंतर वैयक्तिक चिठ्ठया दिल्या जातात. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांचे नाव यादीमध्ये नव्हते. मागाहून पेन्सिलने लिहिले गेले आहे. चर्चा सुरु झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी सदनामध्ये हजर असणे आवश्यक आहे. प्रतोदांकडून बोलणाऱ्या सदस्यांची नावे दिली गेली पाहिजेत. मागाहून वैयक्तिक पत्र दिले जाते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे नाव यादीमध्ये होते, परंतु त्यांना बोलण्याची संधी दिली गेली नव्हती. आता त्यांनीही विचार मांडण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व दिवाकर रावते यांच्या भाषणानंतर मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल असे आपण सांगितले आहे. परंतु मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण उद्या सकाळी ठेवावे. नियम समितीमध्ये सभागृहाचे कामकाज किती वेळ चालवावयाचे हे ठरले आहे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, सभागृहाच्या कामकाजाचा क्रम ठरलेला असतो. माननीय सभापती ज्यावेळी आसनस्थ असतात त्यावेळी त्यांच्या ही बाब निदर्शनास आणणे आवश्यक होते. माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी भाषण सुरु करावे.

..3..



SGB/ SBT/ 17:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील अधिवेशनामध्ये शिक्षण विषयावर फार चांगल्या प्रकारची चर्चा झालेली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा त्या विषयाचा परामर्श घेणे किंवा त्या संदर्भात विचार व्यक्त करणे हे मी टाळण्याचा प्रयत्न करणार आहे. दरम्यान या प्रस्तावाच्या अनुषंगाने हा प्रस्ताव कोणत्या परिस्थितीतून आला आहे, अशा काय घटना घडल्या की, ज्यामुळे हा प्रस्ताव तीन महिन्यापूर्वी या विषयावर चर्चा झालेली असताना पुन्हा एकदा शिक्षण या विषयावर प्रस्ताव चर्चेला येण्याची गरज निर्माण झाली. ज्या काही घटना घडल्या त्या संदर्भात माझे मनोगत मी व्यक्त करणार आहे.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी दहावीच्या मराठीच्या पुस्तकात झालेल्या चुकांसंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. मागच्या वर्षीच्या मराठीच्या दहावीच्या पुस्तकात अनेक चुका होत्या. याबाबत शासनाने एक समिती गठित केली आहे. या समितीचे कामकाज अद्याप सुरू आहे. या समितीचा अद्याप कोणताही निर्णय झालेला नसताना शासनाने मराठी दहावीचे नवीन पुस्तक छापून बाजारामध्ये आणले. शाळा सुरू झाल्यानंतर नवीन पुस्तक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले. या प्रकारामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यामध्ये गोंधळ होऊन संतापाची लाट निर्माण झाली. याला प्रमुख कारण म्हणजे नववी परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी एप्रिल महिन्यापासून दहावीच्या अभ्यासाला सुरूवात करतो. आता नवीन आलेल्या पुस्तकासंबंधी कोणाची विशेष तक्रार आहे असे नाही. ते पुस्तक चांगले. किरकोळ चुका असू शकतील. पण पहिल्या पुस्तकात चुका होत्या, तक्रारी होत्या. तशाप्रकारच्या गंभीर आणि मोठ्या प्रमाणावर चुका नवीन मराठीच्या पुस्तकात नाहीत. संतापाची लाट यासाठी होती की, या विषयाचे पुस्तक लवकरात लवकर यायला पाहिजे होते. जून मध्ये नवीन पुस्तक येणार आहे याची विद्यार्थी-पालक-शिक्षकांना कल्पना द्यायला पाहिजे होती. नवीन पुस्तक लागू करणार आहे हे सांगायला पाहिजे होते म्हणजे दहावीच्या विद्यार्थ्यांनी तीन महिने जुन्या पुस्तकाचा अभ्यास केला नसता. त्यामुळे हा खरा गोंधळ निर्माण झाला आहे. पर्यायाने माननीय शिक्षणमंत्र्यांबद्दल नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : माझी काल माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर चर्चा झाली होती. आज कामकाज जास्त आहे, ही वस्तुस्थिती आहे. सदर प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह अडीच तासामध्ये पूर्ण करायची असे आपण ठरविले होते. त्यामुळे या प्रस्तावावर अजून किती मिनिटे भाषण आपण करणार आहात ?

श्री.रामनाथ मोते : मी आताच माझ्या भाषणाला सुरूवात केली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : कालच्या नियम समितीमध्ये विधान परिषदेचे दैनंदिन कामकाज 5.00 तास करावे असे जरी ठरविले असले तरी आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये अर्धा तास चर्चा जास्त दाखविण्यात आल्या आहेत. आपण जर सर्वांनी सांगितले की, आजच्या अर्धा-तास चर्चा घेण्याचे काही कारण नाही तर त्या सहजगत्या बाजूला होतील. या अर्धा-तास चर्चेमध्ये काही महत्त्वाचे इश्यू अडकलेले आहेत. त्याचाही आपण विचार करावा. सदर चर्चा संपल्यानंतर नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा आहे. त्यानंतर अशासकीय कामकाज आहे. तद्नंतर अशासकीय कामकाज आहे. म्हणून मला असे वाटते की, ही चर्चा आपण लवकर संपवू या. असे जर केले तर आपल्याला पुढच्या चर्चेकडे जाता येईल. मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आज जास्तीतजास्त कामकाज संपविण्याच्या दृष्टीने सभागृहात बसणे गरजेचे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, दुसऱ्या एका विषयामुळे विद्यार्थी,पालक,शिक्षक यांच्यामध्ये संभ्रम निर्माण होऊन गोंधळाचे वातावरण आहे. त्यावर देखील सोल्यूशन मिळालेले नाही. या वर्षापासून नववीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन गणिताचा विषय सुरू केला आहे. तो विषय म्हणजे सामान्य गणित. आता बीजगणित आणि भूमिती असे गणितामध्ये दोन विषय आहेत. शासनाने आता दोन स्तरावरील गणित शिकविण्याची भूमिका घेतली आहे. शालांत परीक्षेत गणित विषयात नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी सामान्य गणित हा विषय शिकविण्यात येणार आहे. मुलांवर नापासाचा शिक्का येतो, तो टाळण्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु, गेल्या 4-5 वर्षाचा निकाल बघितल्यानंतर असे दिसून येईल की, 75-76 टक्क्यावरून 86-87 टक्क्यांवर आलो आहोत. राज्यातील वेगवेगळ्या विभागाचे बोर्डाचे सरासरी निकाली 85 ते 86 टक्के लागत आहेत. याचाच अर्थ गणित विषयातील 86 टक्के आमचे विद्यार्थी पास होत आहेत, असा होतो.

यानंतर श्री.पी खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. रामनाथ मोते ......

आणि मग अशा परिस्थितीमध्ये आपल्याला सामान्य गणित विषय सुरु करणे, दोन स्तरावरील गणित सुरु करण्याची गरज काय आहे ? याचा अर्थ अजूनही 100 टक्के विद्यार्थी पास व्हावेत अशी शासनाची अपेक्षा दिसत आहे. परतु ज्यावेळी हे सामान्य गणित आणले तेव्हा दहावीचे वर्ग सुरु होऊन गेलेले होते, बाजारात पुस्तक अद्यापही आलेले नाही म्हणून पालक आणि विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे की, हा विषय आपण घेतला नाही तर आपल्याला इंजिनिअरिंग, मेडिकलला जावयाचे असेल तर जाता येईल की नाही ? म्हणजे आतापासून या विद्यार्थ्यांचे करियर काय होणार आहे ? इंजिनिअर, मेडिकल की रिक्षा ड्रायव्हर यापैकी काय राहील यादृष्टीने विचार करुन विद्यार्थ्याला त्या विषयाची निवड करावयाची आहे. अशा प्रकारचा गोंधळ पालक व विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत आहे.

महोदय, दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, ज्या पध्दतीने राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्तीच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला त्यामुळेच लोकांच्या मनात गोंधळ निर्माण झाला आहे. तो म्हणजे जुन्या डी.एड. झालेल्या विद्यार्थ्यांच्या संदर्भात शासनाने जी.आर. काढला, म्हणून त्या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले, नवीन डी.एड. विद्यार्थ्यांच्या संदर्भात जो निर्णय घेतला त्यावरुनही त्या नवीन मुलांनी आंदोलन केले, या दोघांनाही समजावण्यासाठी शासनाने मग तिसरा निर्णय घेतला तर पुन्हा सीमा भागातील डी.एड. झालेल्या मुलांनी आंदोलन सुरु केले, म्हणून चौथा निर्णय घेतला. अशा प्रकारे शासनाने आतापर्यंत डी.एड. धारकांच्या संदर्भात चार निर्णय घेतले व ते सगळे निर्णय रद्द करावे लागले. आणि आता या सर्वांवर तोडगा म्हणून शासनाने या सर्व मुलांची सामाईक स्पर्धात्मक परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला व त्याची प्रक्रिया आता सुरु होईल. ही प्रक्रिया साधारणत: ऑगस्ट-सप्टेंबरपर्यंत सुरु पूर्ण होऊन ऑक्टोबर म्हणजेच पहिल्या सत्रापर्यंत तरी आम्हाला शिक्षक मिळणार नाही. त्याचप्रमाणे नवीन वस्ती शाळांचे प्राथमिक शाळांमध्ये रुपांतर आपण केले त्या शाळांमध्ये 5 हजार पेक्षा अधिक शिक्षकांची गरज आहे. याचा अर्थ एवढ्या शाळा शिक्षकाविना सुरु झालेल्या आहेत. म्हणून या डी.एड. धारकांच्या संदर्भात वेगवेगळे निर्णय घेतले त्यामुळेच हा गोंधळ निर्माण झाला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. रामनाथ मोते......

महोदय, नवीन शाळांना मान्यता देण्याच्या संदर्भात अनेक कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये वाढीव तुकड्यांना शासनाने मान्यता दिली. परंतु अशा प्रकारे त्या महाविद्यालयांना खरोखरच गरज होती काय याचाही विचार करणे आवश्यक होते. मला काल वेगळाच अनुभव आला आणि तो म्हणजे आमच्या अंबरनाथ तालुक्यात एका शाळेला 11-12 च्या वर्गांना मान्यता दिली परंतु तेथे फक्त 16 मुलांच्या ॲडमिशन झाल्या. आणि ज्या शाळेचे रेप्युटेशन चांगले आहे, ज्या ठिकाणी पाच तुकड्या सुरु होतील एवढी विद्यार्थी संख्या आहे, ॲडमिशन मिळत नाही त्या ठिकाणी खरे तर अशा तुकड्या वाढवून देण्याची गरज आहे परंतु ज्या शाळांमध्ये अजुनही विद्यार्थी नाहीत त्या शाळांना मान्यता दिली जाते, याचाही विचार करण्याची गरज आहे. तसेच ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे वाणिज्य शाखेची मागणी शासनाकडे केली असता कला शाखेला मान्यता देण्यात येते तर विज्ञान शाखेची मागणी केल्यावर वाणिज्य शाखेला मान्यता दिली जाते, म्हणून त्या त्या भागातील विद्यार्थ्यांचा कल आणि मागणी पाहूनच न्याय देण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

त्याचप्रमाणे कायम विना अनुदानित शाळांसाठी अनुदान मिळण्याबाबत आमचा जो संघर्ष चालू आहे त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, "कायम" हा शब्द काढून सर्व शाळांचे मुल्यांकन करुन टप्प्याटप्प्याने त्या शाळांना अनुदान द्यावे. हा संघर्ष सुरु असताना पुन्हा आता शासनाकडे 20 हजार शाळांचे प्रस्ताव आले आहेत, त्यांची आता छाननी सुरु असून नजिकच्या महिनाभराच्या काळात कोणत्याही परिस्थितीत या नवीन शाळांना मान्यता शासन देणार आहे. म्हणजे पुन्हा अशाच प्रकारच्या समस्या निर्माण करणार आहेत. म्हणून शासनाला केव्हा तरी यासंबंधीचा निर्णय घ्यावा लागणार आहे की, या राज्यात खरोखरच किती शाळांची निकड आहे हे पाहून तेवढ्याच शाळांना मान्यता द्यावी, हजारो शाळांना मान्यता देऊ नका आणि ज्यांना मान्यता द्यावयाची आहे त्यांना 100 टक्के अनुदानावर मान्यता द्यावी. निदान विना अनुदानित तत्वावर तरी मान्यता द्यावी, याचाही विचार होणे आवश्यक आहे. तसेच जे 20 हजार प्रस्ताव आले आहेत त्यांच्याकडून प्रत्येकी 5 हजार रुपये घेतले असतील, त्यांना मानयता नाकारली तर तो देखील गंभीर प्रश्न निर्माण होणार असून त्यांचे पैसे परत करावे लागतील. माझा माननीय शिक्षण मंत्र्यांवर रोष नाही परंतु ज्या पध्दतीने आपण निर्णय घेतला त्यामुळे गोंधळ झाला. तसेच ज्या पध्दतीने त्यांचे वक्तव्य होते त्यामुळेच संतापाची भावना निर्माण होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

मी मुद्दाम ते भाषण वाचून दाखवतो. त्यामध्ये आपण म्हटले आहे की, "ब-याच शाळांना 100 टक्के अनुदान दिलेले आहे, 100 टक्के सवलती आहेत, 1 टक्काही रिस्क नाही, आदिवासी प्रोत्साहन भत्ता दिला जातो, घरभाडे भत्ता दिला जातो, नक्षलग्रस्त प्रोत्साहन भत्ता दिला जातो, 100 टक्के वैद्यकीय बिलाची प्रतिपूर्ती केली जाते, वाहन भत्ता, मुलांना मोफत शिक्षण एवढया सोयी असतांना या शाळेमध्ये मुले तर जाऊ द्या परंतु कुत्रे देखील जाण्यास तयार होत नाही." परंतु सभापती महोदय, आम्हाला प्रत्यक्षात काय मिळते, रोज शिक्षणाच्या संदर्भात या ठिकाणी आम्हाला प्रश्न मांडावे लागतात.

माननीय मंत्रीमहोदयांनी अशा प्रकारे भावना व्यक्त करणे योग्य नाही असे मला वाटते. आम्ही आपल्याला गुणवत्तेच्या संदर्भात सहकार्य करण्यास तयार आहोत परंतु गुणवत्तेच्या संदर्भात आम्ही तडजोड करण्यास तयार नाही. मी स्वत: 28 वर्षे शिक्षकाचे काम केलेले आहे. मी काही या ठिकाणी राजकीय पक्षाचा पुढारी म्हणून आलेलो नाही. मला शिक्षणाच्या संदर्भात सर्व गोष्टी माहिती आहेत. या ठिकाणी उपचारक अध्यापनाच्या संदर्भात आपण असे म्हटले आहे की, " अ, ब, क, ड तुकडयांमध्ये किती मुले-मुली आहेत हे त्यांना माहिती पाहिजे. अप्रगत मुले असतील तर त्यांचे रेमिडीयल टिचिंग झाले पाहिजे. ख-या अर्थाने उपचारात्मक वर्ग झाले पाहिजेत. अशा प्रकारे आम्ही प्रथम ही भूमिका घेतली आहे. लेखन वाचन हमी कार्यक्रमानंतर महाराष्ट्रामध्ये गुणवत्ता विकास कार्यक्रम सुरु केलेला आहे. बेस्टलाईन टेस्ट महाराष्ट्रामध्ये आम्ही सुरु केली आहे. गुणवत्ता विकास कार्यक्रम सुरु करण्यापूर्वी मुंबईकरांनी मोठा आगडोंब उसळविला होता. सर्व लोक माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे गेले. त्यांनी लोकांच्या भावनांचा आदर केला. परंतु बेस्टलाईन टेस्टची भूमिका बंद झाल्यामुळे अडीच कोटी मुलांचे शिक्षणाचे वाटोळे झाले आहे." अशा प्रकारचे विधान माननीय शिक्षण मंत्र्यांनी केलेले आहे. याला जबाबदार शिक्षक आहे किंवा शासनाचे धोरण आहे असे नाही परंतु आपण ज्या पध्दतीने निर्णय घेत आहात, ज्या पध्दतीने विचार करीत आहात त्याचाही गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

धन्यवाद.

----------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव म्हणाले की, शिक्षणाच्या संदर्भातील चर्चा आता खूप झाली. परंतु एक बाब मला त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, या देशामध्ये जेथे जेथे विधानपरिषद आहे तेथे तेथे शिक्षक मतदार संघातून शिक्षक आमदार निवडून जावा आणि त्या त्या राज्याच्या सर्वंकष शिक्षणामध्ये उपयुक्त चर्चा होऊन शासनाला योग्य मार्गदर्शन व्हावे यासाठी शिक्षक मतदारसंघाची निर्मिती करण्यात आलेली आहे. यासंदर्भात मला अशी विनंती करावयाची आहे की, प्रत्येक अधिवेशनात शिक्षणाच्या संदर्भात अडीच तासाचा एक ठराव माननीय सभापती महोदयांकडून आला पाहिजे.

शिक्षणाच्या संदर्भात मी काही बाबी निदर्शनास आणून देणार आहे. या सदनामध्ये शिक्षक आमदार आल्यानंतर शिक्षकांच्या प्रश्नाच्या संदर्भात जे काही चालते ते गैर आहे असे मी म्हणणार नाही. शिक्षकांच्या संदर्भातील उणिवा, त्रुटी, व्यथा या ठिकाणी मांडल्या जाव्यात हे मला मान्य आहे. परंतु घटनेच्या 21 (क) कलमा मध्ये असे म्हटले आहे, "राज्य शासन 6 ते 14 या वयाच्या सर्व बालकांसाठी राज्यात विधीद्वारा निर्धारित करता येईल अशा रितीने मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद करील". मोफत आणि सक्तीचे शिक्षण घेणे हा या राज्यात जन्माला आलेल्या मुलाचा अधिकार आहे. या सदनात विना अनुदानित, कायम विना अनुदानित, कायम करता की, नाही बोला? उठता की, नाही बोला ? बसता की, नाही बोला ? यामध्ये जो वेळ जातो तो योग्य नाही. मला एक गोष्ट कळत नाही की, शिक्षण मंत्री महोदय, आपण या सर्वांना निमंत्रण दिले होते का, या या आणि मोफत शाळा घ्या म्हणून. ज्या ज्या मंडळींनी तुमच्याकडून या शाळा घेतलेल्या आहेत, मग त्या अनुदानित असतील, कायम विनाअनुदानित असतील. शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे ती जबाबदारी शासन पूर्ण करणार आहे. मग येथे कशासाठी हा लढा उभारला जात आहे, त्यांच्यावर बंधने घाला. कायम अनुदानितचा कायम शब्द काढा, त्याना विना अनुदानित करा मग ते सात आठ वर्षानंतर अनुदानावर येतील, मग त्यांचे भले कसे होईल. हे संस्था चालक या महाराष्ट्रात ज्या पध्दतीने शिक्षणाचा खेळखंडोबा करीत आहे ते फार गंभीर आहे. परभणीमध्ये डी.एड. च्या विद्यार्थ्यांकडून 70-80 हजार फी घेऊन ॲडमिशनसहित नोकरीची गॅरंटी देते. हा काय प्रकार आहे ? शिक्षण विकायला काढले आहे का ? या कॉलेजेस वाल्यांनी मस्तपैकी कॉम्पलेक्स उभे केले आहेत. त्यामुळे हे कशासाठी चालले आहे हे दिसून येते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 17.50

श्री.दिवाकर रावते.............

तेथील कॉलेज बी.एड.च्या प्रवेशासह नोकरीचीसुध्दा गॅरटी देते. हा काय प्रकार आहे ? आपण शिक्षण विकण्यासाठी या शैक्षणिक संस्था सुरु केलेल्या आहेत काय या शैक्षणिक संस्थाच्या कॉम्पलेक्समध्ये जर आपण जाऊन पाहिले तर ते कॉम्पलेक्स किती मोठे आहे हे आपल्याला दिसून येईल. अशा प्रकारची भयानक परिस्थिती ज्यावेळी निर्माण होते त्यावेळी असा प्रश्न पडतो हा सर्व प्रकार नेमका कशासाठी सुरु आहे.? या राज्यात मराठी विषय शिकवला पाहिजे असे काही शाळांना दम देऊन सांगण्याची वेळ माननीय शिक्षण मंत्र्यांवर का येते ? ज्या शाळांना मराठी विषय शिकवावयाचा नसेल त्या शाळा बंद करण्यात याव्यात. त्या शाळांची काहीही गरज नाही. आय.सी.एस.ई बोर्डाच्या शाळा कोणी सुरु केल्या आहेत.? ब्रिटीशांच्या काळात या शाळा सुरु करण्यात आल्या होत्या. ज्याप्रमाणे गणपती मंडळ असते त्याप्रमाणे या संस्था आहेत त्या काही शासकीय नाहीत तर खाजगी संस्था आहेत. डॉ. सरोजिनी नायडू यांनी त्यावेळेला ब्रिटीशांच्या वेळी अशा प्रकारची शाळा काढली होती . या संस्थेमध्ये मराठी शिकवले जात नाही. राज्याच्या शिक्षणाच्या धोरणाशी विसंगत शिक्षण ज्या मुलाना हवे आहे त्या मुलांसाठी या शाळा सुरु आहेत. त्यामुळे आमच्या संस्था आपण सांभाळाव्यात असे कोर्टात जाऊन त्या शाळांचे चालक सांगतात मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, याबाबतीत तुम्ही कोर्टात खंबीर भूमिका मांडणार आहात काय ? या राज्यात जे कोणी आमचा कायदा स्वीकारतील त्यांच्याच संस्था चालतील इतर संस्थां बंद केल्या जाव्यात किंवा त्यांना हद्दपार करण्यात यावे अशा प्रकारची कडक भूमिका शासन स्वीकारणार आहे किंवा नाही ? वर्तमानपत्रामध्ये सी.बी.एस.ई. च्या संदर्भात सारख्या बातम्या येत असतात. सभापती महोदय, या संस्था कोर्टामध्ये जातात . आपल्या राज्याची शिक्षण व्यवस्था मोडीत काढून या संस्था केवळ आपल्याकडे मधमाशाप्रमाणे सर्वाना खेचून घेण्यात येत असेल तर ती गोष्ट बरोबर नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याना शिक्षण मिळण्याची विवंचना असतांना श्रीमंताच्या मुलासाठी चिता करणा-या या संस्था आहेत त्यामुळे त्यांना हद्दपार करण्यात आले पाहिजे.

सभापती महोदय, सी.बी.एस.ई. हे कोणते बोर्ड आहे.? ज्यावेळी आपला देशाला स्वातंत्र्य मिळाले नव्हते त्यावेळी उत्तर भारतातील नॉर्थ प्रोव्हीन्सची ती एक शाळा होती. ज्यावेळी आपला देश स्वतंत्र झाला आणि भाषावार प्रांत रचना करण्यात आली त्यावेळेला प्रत्येक राज्यासाठी स्वतंत्र

श्री.दिवाकर रावते ...

बोर्ड स्थापन करण्यात आले आणि जेथे केन्द्र शासित प्रदेश आहे आणि ज्या राज्यामध्ये अशा प्रकारचे बोर्ड स्थापन करण्यात आले होते त्यांच्याकरिता त्या शाळा होत्या परंतु सी.बी.एस.ई.च्या शाळा सुध्दा आपल्या राज्यात सुरु करण्यात आल्या होत्या . आमच्या राज्यात अशा प्रकारच्या शाळा सुरु करण्याची काहीही गरज नाही आमच्या मुलांना शिक्षण देण्याकरिता आमचे राज्य समर्थ आहे असे त्यांना सांगण्यात आले पाहिजे. या शाळांना ज्या केन्द्र शासित प्रदेशात जावयाचे असेल त्या ठिकाणी जाऊन त्यांनी जरुर धुमाकूळ घालावा आणि जर या राज्यामध्ये तुम्हाला शाळा चालवावयाच्या असतील तर या राज्याच्या धोरणाप्रमाणेच वागावे लागेल. अशा प्रकारची कणखर भूमिका मांडण्यात येणार आहे किंवा नाही .? त्या संस्था कोर्टामध्ये जातात तेव्हा आपण कणखर भूमिका तेथे मांडली पाहिजे.कोर्टाच्या बाबतीत मला आक्षेप घ्यावयाचा नाही त्या संदर्भात येथे बोलणे सुध्दा अयोग्य आहे. कोर्टाच्या बाबतीत येथे उल्लेख करावा की नाही असा प्रश्न मला सुध्दा पडतो.

एक सन्माननीय सदस्य (बसून) : या ठिकाणी उल्लेख करावा.

श्री.दिवाकर रावते : कोर्टामध्ये निर्णय देणारे जज्ज कोण आहेत.? सर्व जज्ज पर प्रांतीय आहेत. या राज्यामध्ये परप्रांतीय चीफ जस्टीस नको यासाठी वकिलांनी आंदोलन केले होते. निर्णय देत असतांना मराठी भाषा आणि मराठी राज्याबद्दल आकसाने पर प्रांतातील जज्ज निर्णय देतात असे आम्हास वाटावयास लागले आहे. या संदर्भात मी कोणावरही आरोप करीत नाही.ज्यावेळी कायद्याकडे पाहत असतांना नि:पक्षपातीपणाने पाहिले पाहिजे व या राज्याच्या शिक्षण खात्याने घेतलेल्या धोरणाप्रमाणे त्या संस्थांच्या बाबतीत त्यांनी निर्णय दिले पाहिजेत. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. मेडिकल, इंजिनिअर या सारखे जे विषय आहे तें संपूर्ण देशाशी संबंधित आहे परंतु प्रांतिक बाबतीत वेगळे निर्णय दिले जातात त्यावेळी चिंता वाटते म्हणूनच सी.बी.एस.ई. बोर्ड बंद करण्यात आले पाहिजे आणि इंग्रजी शाळांना सक्त ताकीद देण्यात आली पाहिजे. या शाळांमध्ये श्रीमंताची मुले शिकतात . ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांच्या मुलांना या शाळेत शिकवा. त्यांना ए.सी.वर्गात शिकवा, त्यांना तेथे जेवण द्या, सकाळी सात वाजल्या पासून ते रात्री दहा वाजे पर्यत बसवा त्या विद्यार्थ्यांना आंगडी टोपडी घालावी, त्यांना आघोळ घालावी......

एक सन्माननीय सदस्य (बसून): त्यांना साबण लावा

श्री.दिवाकर रावते : गाईच्या शेणापासून तयार केलेल्या साबणाने त्यांना आंधोळ घालावी त्याबाबतीत आमचे काहीही म्हणणे नाही.परंतु शिक्षण खात्याने जे काही निणर्य घेतलेले आहेत त्या निर्णयाची अंमलबजावणी या शाळा करणार आहेत किंवा नाही हा खरा प्रश्न आहे . त्या ठिकाणी मराठी भाषा ही दुय्यम भाषा म्हणून शिकविण्याचा प्रकार थांबविण्यात आला पाहिजे. यासाठी कणखर भूमिका घेण्यात येणार आहे किंवा नाही. असे मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे या वर्षी विना अनुदानित संस्था सुरु करण्यासाठी 20 हजार अर्ज आलेले आहेत. त्याना तंबी देऊन त्यांच्याकडून बॉन्ड लिहून घेण्यात आला पाहिजे तसेच त्यांची प्रॉपर्टी मॉर्गेज करण्यात आली पाहिजे.नांदेड महानगरपालिकेला विकासाची कामे करावयाची असल्यामुळे त्यांनी संपूर्ण् महानगरपालिकेची प्रॉपर्टी गहाण टाकली आहे. मग या शिक्षण संस्थांची प्रॉपर्टी मॉर्गेज करण्यास काय हरकत आहे मला असे सांगावयाचे आहे की ,या संस्थांची सगळी प्रॉपर्टी मॉर्गेज करण्यात यावी आणि जर शक्य झाले नाही तर त्यांची प्रॉपर्टी जप्त करण्यात यावी या सस्था मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी कशाच्या जोरावर घेत आहेत ? ही जबाबदारी घेण्यास या संस्थांना कोणी सागितले आहे? ज्यांना शिक्षण सस्था चालवावयाच्या असतील त्या शिक्षण संस्थांनी संपूर्ण वर्षाचा शिक्षकांचा पगार शासनाकडे डिपॉझिट करावा आणि शिक्षण खाते त्या शिक्षकांना चेकने पगार देईन. अशा प्रकारची अट त्यांच्यावर टाकण्यात आली पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ग्रामीण भागात शिक्षक 500 रुपयामध्ये वेठ बिगारीसारखे राबतात. त्यांना दोन दोन वर्षे पगार मिळत नाही. ते आशेवर जगत असतात. शाळा विनाअनुदानित आहे, शासनाकडून अनुदान येईल तेव्हा तुमचा पगार देऊ असे संस्था चालक सांगत असतात. त्यामुळे त्यांची अत्यंत हलाखीची परिस्थिती आहे. सभापती महोदय, विना अनुदानित शाळांबाबत महत्वाचा विषय मला याठिकाणी मांडावयाचा होता. शिक्षण देण्याची नैतिक जबाबदारी राज्य शासनाची आहे. माननीय मंत्रीमहोदय मी याठिकाणी सर्व वाचून दाखविणार नाही. परंतु आपल्यासंदर्भात वर्तमानपत्रामध्ये जे जे छापून येत आहे त्याचे आपल्याला खंडन करावे लागेल. दै. लोकसत्तामध्ये "पुरके आता पुरे झाले" या शीर्षकाखाली अग्रलेख छापून आलेला आहे, त्यामध्ये सर्व काही दिग्दर्शित केले आहे. मंत्रीमहोदय शिक्षण खात्याचे मंत्री असल्यामुळे त्या खात्याच्या धोरणासंबंधी या अग्रलेखामध्ये मुद्दे लिहिले आहेत. अकरावीच्या प्रवेशासंदर्भात जो घोळ झाला त्याकरिता माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते श्री. रामदास कदम यांनी आपला राजीनामा मागितला होता. सभापती महोदय, यंदा मोठा वाद झाल्यानंतर दहावीचे मराठीचे नवीन पुस्तक प्रकाशित करण्यात आले. मुळात नव्या पुस्तकातील पाठ कां बदलले? हे मंत्रीमहोदयांनी अद्यापि जाहीर केलेले नाही. हे नवे पुस्तक निरस आहे, त्यात व्याकरणाच्या असंख्य चुका आहेत. नव्या अभ्यासक्रमाची सर्व पुस्तके फारच उशिरा आलेली आहेत. त्यामुळे लोअर मॅथेमेटिक्स घेतलेल्या विद्यार्थ्यांना सायन्स आणि कॉमर्सला जाता येणार नाही. हे आपण धोरणात्मक सोपे गणित केले आहे. सर्वच पक्षी एका झटक्यात मारुन टाकले आहेत. अनुदानित शाळांना वेतनेतर अनुदान देण्यासाठी शिक्षण खात्याकडे पैसा नाही. या सभागृहात नेहमी होत असलेली चर्चा लक्षात घेतली तर हेच दिसते की, शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाही. त्याची चर्चा आम्ही याठिकाणी ऐकतो. त्यासंदर्भात अर्थखात्याने काय केले? हे सांगण्याची आपणावर पाळी येते. अग्रलेखात त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, "तरीही राज्यभर सरसकट सर्वांना मोफत शालेय शिक्षण वाटण्याची हौस तुम्हाला कां आली आहे?" हा अग्रलेख लाखो जनतेने वाचला आहे. तुम्हाला या प्रश्नाची उत्तरे ध्यावी लागतील. लाखो जनतेपुढे हा प्रश्न गेला आहे. अग्रलेखातील सर्व भाग मी याठिकाणी वाचत नाही. "परंतु पुढील पिढी घडविण्यामध्ये पुरके साहेब आपण अक्षम्य बेफिकिरीने वागत आहात." हा या अग्रलेखाचा मतितार्थ आहे. "पुरे झाले, घरी कधी जाता" असे त्यांनी विचारले आहे. लोकसत्ताकारांनी असे विचारल्यानंतर त्यांच्यावर दगड मारायला तुमच्या वतीने कोण जाईल? हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

.श्री. दिवाकर रावते...

मला माहीत नाही. परंतु शिवाजी महाराजांविषयी अग्रलेख छापून आल्यानंतर लेखकांच्या घरावर दगड पडले. आता तुमच्या बाजूने असे काही झाले तर तो राग पुन्हा उत्पन्न कां होत नाही? त्यामुळे माननीय पुरके साहेब अग्रलेखातून सर्वसामान्य लोकांपर्यंत आपली जी प्रतिमा गेली आहे, ती आपण उत्तर देतांना स्पष्टपणे मांडावी. ती योग्य आहे की अयोग्य आहे याचा निपटारा करावा. त्यांनी अग्रलेखात जर योग्य मांडले असेल तर ते स्वीकारा आणि बदल करु असे तरी सांगा. या माध्यमातून इंग्रजीच्या माध्यमातून या सर्वांचे माज उतरवा. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून जी मस्ती आमच्या महाराष्ट्रामध्ये आली आहे, ती मस्ती आणि तो माज आपण उतरविला पाहिजे. ॲडमिशन देणर नाही, कुणाला विचारणार नाही, तुम्ही आतमध्ये यायचे नाही अशाप्रकारची त्यांची वर्तणूक आहे. कुणीतरी मघाशी म्हणाले की, या शाळा आमच्या अधिकाऱ्यांना आतमध्ये सुध्दा घेत नाहीत. इतके जर ते अतिरेकी झाले आहेत तर त्यांच्या शाळेची टाळी तोडा आणि आतमध्ये जा. हे लोक या राज्यामध्ये स्वत:ला समजतात काय? हा महाराष्ट्र काश्मीर नाही. त्यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये कुणाचीही अरेरावी अशापध्दतीने खपवून घेतली जाणार नाही. जाता जाता एकच सांगतो की, या सभागृहात शिक्षक आमदार आहेत. एक घडलेला प्रसंग माझ्या अत्यंत जिव्हारी लागला आहे. तुम्ही कोणत्या पक्षाचे आहात, यापेक्षा तुम्ही माझ्या राज्याचे शिक्षण मंत्री आहात. एका शिक्षिकेच्या पतीने आपल्या पत्नीला पगार मिळत नाही म्हणून आपली गच्ची धरावी, हा दोष तुमचा नव्हता दोष त्या शाळेचा होता. त्या शाळेचे आपण काय केले? त्यांना काय जाब विचारला हे आम्हाला समजले पाहिजे? म्हणजे पगार न मिळणाऱ्या एका शिक्षिकेच्या पतीने पगार मिळत नाही म्हणून माझ्या घरात शिजवायला अन्न नाही, अशापरिस्थितीत अमरावतीमध्ये पुरके साहेबांची गच्ची धरुन त्यांना धक्काबुक्की करावी हा प्रकार लांच्छनास्पद आहे. ज्या शाळेने शिक्षकांचे पगार रखडविले त्या शाळेवर आपण काही कारवाई केली काय? याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी दुपारी 2 वाजून 23 मिनिटांनी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात केली. आता 5 वाजून 59 मिनिटे झाली असल्यामुळे जवळ जवळ साडे तीन तासापेक्षा अधिक वेळ चर्चा झालेली आहे. तेव्हा आता माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी उत्तराचे भाषण सुरु करावे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी फक्त एकच मुद्दा मांडून माझे भाषण संपवितो.

**सभापती** : ठीक आहे, माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात संपवावे.

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, याठिकाणी या प्रस्तावाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी विशेष करुन शिक्षकांच्या प्रतिनिधींनी सर्व मुद्यांबाबत प्रकाश टाकलेला आहे. मात्र मी एक महत्वाचा मुद्दा मांडून भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, आतापर्यंत या राज्यामध्ये एकही गाव असे राहिलेले नाही, ज्या गावामध्ये आता नवीन शाळा देण्याची गरज आहे. मग ती प्राथमिक शाळा असे, माध्यमिक शाळा असेल किंवा उच्च माध्यमिक शाळा असेल. सगळीकडे शाळा देऊन झालेल्या आहेत. फक्त ज्या शाळा देण्यात आलेल्या आहेत. त्या शाळा अनुदानावर आणण्यासाठी आम्ही शिक्षक आमदार सातत्याने सदनामध्ये आवाज उठवित आहोत, आम्ही मागणी करीत आहोत, ती विचारात घ्यावयाची, पण ते बाजूलाच राहिले. उलट पेपरमध्ये नव्याने जाहिरात दिली की, ज्यांना शाळा काढावयाची आहे, त्यांनी प्रस्ताव दाखल करावेत. हे प्रस्ताव मागवत असताना त्यामध्ये काही अटी टाकलेल्या आहेत काय ? पहिल्यांदा असे सांगितले की, 20 रुपयांचा बॉण्ड द्यावा. पुन्हा दहा दिवसानंतर सांगितले की, 100 रुपयांचा बॉण्ड द्यावा. तसेच बँक बॅलन्स सर्टीफीकेटही द्यावे. आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब म्हणाले, तशी अट घातली असती म्हणजे संबंधितांनी बँकेमध्ये 5 लाख रुपये डिपॉझिट असलेली पावती प्रस्तावासोबत जोडावी तर या राज्यामध्ये 20,400 प्रस्ताव आले आहेत, त्यापैकी 100 प्रस्ताव देखील दाखल झाले नसते. बँक बॅलन्स सर्टीफीकेट दाखल करावयास सांगितल्यानंतर या सगळयांनी काय केले ? तर एकाचेच पैसे वापरले. म्हणजे जर मी आज बँकेमध्ये पैसे भरल्यानंतर ते एक तासाने काढून घेतले. लगेच मी ते पैसे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना देऊन सांगितले की, हे पैसे बँकेमध्ये भरावेत आणि बँक बॅलन्स सर्टीफीकेट घ्या. मग सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी लगेच एक तासानंतर पैसे काढले आणि ते सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना दिले आणि सांगितले की, हे पैसे बँकेमध्ये भरुन बँक बॅलन्स् सर्टीफीकेट घ्या. असे प्रकार केल्यामुळे प्रस्तावांची संख्या 20,400 झालेली आहे. सभापती महोदय, अशा प्रकारे शाळा सुरु होतील, पण मुले कुठून येणार आहेत ? एका गावामध्ये जी शाळा गुणवत्ता विद्यार्थी घडविते, त्या गावामध्ये गरज नसताना कोणत्या तरी राजकीय लोकांना खुष करावयाचे म्हणून, कोणत्या तरी राजकीय कार्यकर्त्याला खुष करावयाचे म्हणून तेथे दुसरी शाळा दिली जाते. मग तेथे जी चांगल्या प्रकारे शाळा सुरु असते, ती देखील चालत नाही. आज जून-जुलै महिना सुरु आहे आणि आमचे शिक्षक वाड्या-वस्त्यांवर फिरत आहेत. शेतकऱ्याच्या ....

. . . .4 एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

दारात जाऊन विनंती करतात की, तुमच्या मुलाला आमच्या शाळेमध्ये घालावे. मग आम्ही तुम्हाला खताचे पोत देतो. बियाणाची पिशवी देतो, पण मुलाला आमच्या शाळेमध्ये घालावे. एवढेच नाही तर आमचे शिक्षक कपडयाचे माप घेण्यासाठी टेप घेऊन फिरत आहेत आणि सांगतात की, तुला कपडे सुध्दा शिवून देतो, पण तुमच्या मुलाला आमच्या शाळेमध्ये घालावे. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे पुढच्या काळामध्ये अशा प्रकारे मुले पळवापळवीचे प्रकार होणार आहेत. माझी माननीय शिक्षण मंत्री महोदयांना विनंती आहे की, अजून यासंबंधीचे प्रस्ताव शासनाकडे पोहोचलेले नाहीत. आपण त्या मध्ये दुरुस्तीपत्रक काढावे की,ज्याला शाळा काढावयाची असेल, त्याने 5 लाख रुपयांच्या डिपॉझिटची पावती शिक्षण खात्याकडे जमा करावी. जो असे करील त्यालाच आम्ही शाळा देऊ. अशा पध्दतीचे नवीन सूत्र आणण्याचा बाणेदारपणा आमचे माननीय शिक्षण मंत्री पुढच्या काळामध्ये दाखवतील अशी अपेक्षा आहे. माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरकेसाहेब, कोणत्याही मंत्री महोदयांनी काहीही सांगू द्या, पण याबाबतीत तुम्ही बाणेदारपणा दाखवावा की, मी स्वत: प्राध्यापक आहे आणि मला या शिक्षणामध्ये जास्त कळते. त्यामुळे तुम्ही काहीही सांगू नका आणि नवीन शाळेच्या बाबतीत जे 20,400 प्रस्ताव आलेले आहेत, त्यातील केवळ 1000 प्रस्तावांना जरी मान्यता दिली तर खऱ्या अर्थाने तुम्ही या शिक्षण क्षेत्रातील आहात असे मी याठिकाणी सांगतो आणि सर्व शिक्षक आमदार याबाबतीत तुमच्या पाठीशी उभे रहातील एवढे मी सन्माननीय सदस्यांच्यावतीने अभिवचन देतो आणि मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो.

-----

. . . .4एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : माननीय सभापती महोदय याठिकाणी नियम 230 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, सन्माननीय सदस्य सर्वश्री.दिवाकर रावते, नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे, अरविंद सावंत, मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामनाथ मोते, अनिल परब, संजय केळकर, परशुराम उपरकर, चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, भगवान साळुंखे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी सहभागी होण्याचा प्रयत्न केला आहे. मी आदरणीय सभापती महोदय, आपल्याला आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांना मनापासून धन्यवाद देतो. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य जे-जे बोलले असतील, त्यातील एकही शब्द मी वैयक्तिक पातळीवर घेणार नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके ......

कारण मी या ठिकाणी वारंवार विनंती करतो. मी यापूर्वी सुध्दा विनंती केलेली आहे. मी हात जोडून, लोटांगण घालून विनंती केली की, या सभागृहामध्ये शिक्षणावर चर्चा व्हावयास पाहिजे. अशा संदर्भात शासनाकडून काय चुकते, शासनाकडून किती पैसे खर्च होतात, पैसे खर्च होतात की नाही, पैसे अखर्चित का राहतात ? शिक्षक आहेत, प्रशासन व्यवस्था आहे तसेच शासन आहे या सगळ्यांना मार्गदर्शन मिळेल या हेतूने या ठिकाणी चर्चा झालेली आहे. मी कोणाचेही बोलणे मनाला लावून घेतलेले नाही. मी अतिशय खिलाडू वृत्तीने माझे विचार व्यक्त करणार आहे. प्रस्तावावरील चर्चेत सहभागी झालेले सन्माननीय सदस्य आमचे मित्र श्री. विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, त्यानंतर नवीन आलेले सन्माननीय सदस्य श्री. साळुंखे, आमचे जिवलग मित्र सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. अरविंद सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले. तसेच सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी अतिशय महत्वपूर्ण मुद्दा या ठिकाणी लक्षात आणून दिला त्याचीही मी अतिशय गांभीर्याने दखल घेणार आहे. त्यानंतर नवीन आलेले सदस्य श्री. चंद्रकांतजी पाटील यांनीही आपले विचार व्यक्त केले आणि अतिशय अमूल्य असा सल्ला दिला की, शिक्षण हे व्यवसायाभिमुख असावे. त्याचीही मी दखल घेणार आहे. आम्हाला नेहमी भंडावून सोडणारे, वेतन, वेतनेतर अनुदान याबाबत नेहमी प्रश्न उपस्थित करणारे आदरणीय सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेब यांनी आपले विचार व्यक्त केले. सभापती महोदय, मला सर्वच व्यक्ती आदरणीय आहेत. परंतु या सभागृहामध्ये आणि राज्यामध्ये आंतरभारती प्रवृत्ती आणि विश्वभारती प्रवृत्ती यांचे विचार जोपासले जाऊ शकतात. मी स्तुती करणार नाही परंतु वस्तुस्थिती मला नाकारता येत नाही.

"भव्य हिमालय तुमचा आमचा, केवळा माझा सह्यकडा
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजीन रायगडा"

जगात उत्तुंग असलेला हिमालय पर्वत तर आहेच. त्याच्याविषयी आदर आहे, अभिमान आहे, प्रेम आहे. पण त्याहीपेक्षा या रायगडाची ताकद, या रायगडाची रग, या रायगडाने दिलेली दिशा ही आम्हाला नाकारता येत नाही. अशा बुलंद ताकदीची काही माणसे आपल्या महाराष्ट्रामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

प्रा. वसंत पुरके .....

हवी असतात. पक्षाच्या बाहेर जाऊन, पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेऊन पाहणे आवश्यक आहे. शिक्षण हीच सर्वांगीण विकासाची गंगोत्री आहे, शिक्षण हेच विकासाचे व्दार आहे. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत असे म्हणाले की, महाकाव्याच्या तोडीचे छोटेसे वचन तुम्हा-आम्हाला ऐकवावे आणि खऱ्या अर्थाने दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करावे. मी वारंवार सांगतो आणि भविष्यातही सांगणार आहे. आमच्या एनसीईआरटीमध्ये सुध्दा लिहिले गेले होते पण एक ओळ सुटली होती. ती ओळ वसंत पुरके यांनी काही वर्षानंतर दुरुस्त केली.

"विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले"

सन्माननीय सभापती महोदय आपणही जाणकार आहात. आपणही कोकणचे आहात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी माझी बॅटरी चार्ज करण्याचा अतिशय प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की, बाणेदारपणे उत्तर द्यावे. अशा प्रकारे आगलावे धोरण कधीपासून सुरु केले आहे, हे माहीत नाही. या चर्चेचा जो रोख आहे, या प्रस्तावाचा जो मुख्य मुद्दा आहे त्यामध्ये तीन-चार बाबी आहेत. आमच्या घेतलेल्या निर्णयांमुळे परीक्षेच्या संदर्भात, प्रवेशाच्या संदर्भात, पर्सेंटाईलच्या संदर्भात, 70:30 च्या संदर्भात घेतलेल्या निर्णयांमुळे जो सर्वसामान्य पालक आपल्या मुलाच्या माध्यमातून, त्याच्या विकासाच्या माध्यमातून स्वत:च्या सुंदर स्वप्नांची मूर्तता आपल्या हातात कशी येईल याचे स्वप्न पाहात असतो. या पार्श्वभूमीवर प्रवेशाच्या संदर्भात सांगावयाचे तर काही खूप चांगले कॉलेजेस आहेत पण त्या ठिकाणी प्रवेश मिळत नाही. पण आपल्या मुलाला मात्र चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा अशा प्रकारच्या या पार्श्वभूमीवर अनेक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

प्रा. वसंत पुरके .......

पालकांचा गैरसमज आणि संभ्रम झाला असेल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काही वृत्तपत्राचे दाखले दिले. त्याचा मी निश्चितपणे यथाशक्ती, यथामती आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहे. एक बाब शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला गोंधळ तसेच चाचण्यांमुळे माझ्या शिक्षकांच्या मनावर, विशेषत: आमच्या विद्यार्थ्यांच्या मनावर निर्माण झालेला तणाव याबाबत आहे. दुसरी बाब पुस्तकांच्या चुकांच्या बाबतीत आहे आणि ज्या विषयाचा तुम्ही आम्ही नेहमीच विचार करतो तो विषय मात्र संवेदनशील आहे. तो विषय महत्वाचाही आहे पण अतिशय काळजीपूर्वक हाताळला गेला पाहिजे. तो विषय सुध्दा किशोरवयीन मुलींना आरोग्य शिक्षण किंवा शालेय मुलींचे आरोग्य विषयक शिक्षण म्हणून शिकवता येईल. खरे तर मी हा विचार करतो की, आपण एखादे सुंदर नामाभिधान द्यावे किंवा चांगले शीर्षक द्यावे, त्याचाही आपण विचार करु. परंतु कोणाच्याही भावना दुखावणे किंवा कोणाच्याही संस्कृतीच्या विरोधात जाणे हा माझा बिलकूल हेतू नाही.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि अन्य सदस्यांबरोबर बसून चर्चा करु. या विषयावर ख-या अर्थाने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. If the nation is firmly committed to provide education to all. तेही मोफत व सक्तीचे असेल. या राज्याच्या बजेटमधून शिक्षणावर किती खर्च होतो ते सांगतो. सन 2005-06 या वर्षी 1918 कोटी झाला होता, सन 2006-07 मध्ये 11,249 कोटी, सन 2007-08 12,303 कोटी आणि सन 2008-09 मध्ये 13,042 कोटी रुपये खर्च होणार आहे. यावर्षी गुजरात, कर्नाटक, केरळ, राजस्थान आणि उत्तर प्रदेश या राज्यांच्या तुलनेमध्ये 22.65 टक्के खर्च होत आहे. याचा अर्थ आम्ही खूप समाधानी आहोत असे मानण्याचे कारण नाही. कारण हे प्रगतीशील राज्य आहे. ज्या राज्यामध्ये संत महंतांनी, विचारवंतांनी, शाहू, फुले, आंबेडकरांनी ज्या शिक्षणाला प्रथम प्राथम्य दिलेले आहे. त्या शिक्षणावर अधिक खर्च झालाच पाहिजे ही तुमची आणि आमची भूमिका आहे. हे कोणीही नाकारीत नाही आणि मी देखील नाकारत नाही. पण आहे त्या पैशाचे प्रत्यक्षात वापर होतो किंवा नाही. विभागाला दिलेला पैसा वेळेवर खर्च होतो किंवा नाही. याकडे मात्र लक्ष देण्याची गरज आहे. सर्वशिक्षा अभियानासाठी मिळालेला पैसा पुरेसा का खर्च नाही असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी उपस्थित केला आहे. मी आपल्याला नम्रपणे सांगेन की, मी खात्याचा कार्यभार स्वीकारला त्यावेळी केवळ 52 वर्ग खोल्या बांधून झाल्या होत्या. त्यावेळी 25 टक्के, 30 टक्के, 40 टक्के खर्च होत होता. आता अधिकारी, पदाधिका-यांबरोबर चर्चा केल्यानंतर, आढावा घेतल्यानंतर सर्वशिक्षा अभियान अंतर्गत खर्च करणारे महाराष्ट्र हे देशामध्ये तिस-या क्रमांकावर गेले आहे. 47 हजार वर्ग खोल्यांपैकी 43.50 हजार वर्ग खोल्या बांधून झालेल्या आहेत. आता 89 टक्के खर्च केला जात आहे. तरीही मी नम्रपणे सांगेन की, हा खर्च झालाच पाहिजे. प्रशासकीय यंत्रणा सुस्त रहात असेल, मोठया पदावरील अधिकारी काहीच कामे करीत नसतील तर अशा अधिका-यांना मी पाठीशी घालणार नाही. मी स्वत: दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती गठित केलेली आहे. या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, खालच्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख, माननीय श्री.अनंतराव थोपटे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. या सर्वशिक्षा अभियानासाठी केंद्राकडून किती निधी मिळतो, राज्याचा वाटा किती आहे, मॅचिंग ग्रँट शासन त्यात मिळविते की नाही ? हे पाहिले जाते. माझ्या खात्यातील चुका किंवा उणिवा मला लपवून ठेवावयाच्या नाहीत. कारण सत्या, असत्याशी मन केले ग्वाही, जुनानले नाही बहुमता. ही कठोर आत्मपरीक्षण करण्याची ताकद तुमच्या आमच्या मनामध्ये निर्माण व्हावी असे वाटत असेल, एवढेच नव्हे तर सर्वसामान्य पाल्यांच्या, पालकांच्या, शिक्षकांच्या मनामध्ये निर्माण व्हावा असे वाटत असेल तर येणा-या पैशाचा प्रत्यक्ष वापर झाला पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत असा मुद्दा मांडण्यात आला आहे. यासंदर्भातील जी.आर.माझ्या हातामध्ये आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे जनगणना व सार्वत्रिक निवडणूक याशिवाय कोणतेही काम त्यांना देऊ नये असे आदेश पुन्हा निगर्मित केले जातील. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी म्हटल्याप्रमाणे एखाद्या जिल्हाधिका-यांनी सकाळी रस्त्यावर बाहेर किती लोक बसतात ते मोजावे असे सांगितले असेल तर ते योग्य नाही. अशा घटना ब-याच ठिकाणी घडतात. आमचे शिक्षक देखील ऑर्डरप्रमाणे करतात, असे घडत असेल तर मी स्वत: पुढाकार घेण्यास तयार आहे. पण दुर्दैवाची स्थिती अशी आहे की, शिक्षकांच्या नेमणूका शिक्षण विभागाकडून केल्या जातात, पण त्यांच्या दैनंदिन कामावर नियंत्रण ठेवण्याचे किंवा त्यांच्या बदल्या करण्याचे काम ग्रामविकास विभागाकडे आहे. खात्याचा प्रभार आम्ही स्वीकारतो पण स्टेअरिंग मात्र दुस-याच्या हातामध्ये आहे. ही अडचण आहे. 73 व्या घटना दुरुस्तीमुळे शिक्षणाचे विकेंद्रीकरण झाले असल्यामुळे माननीय ग्रामविकास मंत्र्यांमार्फत त्याची अंमलबजावणी होते. माझ्या सर्व शिक्षक बांधवांना विनंती आहे की, अशैक्षणिक काम सांगितले जात असेल तर आपण त्याच्या विरोधात युध्द का केले नाही ? लेखन, वाचन कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सुरु झ ाल्यानंतर आंदोलन सुरु होते. लेखन, वाचन कार्यक्रम सुरु झाल्यामुळे शिक्षक एकत्र येतात. पण वनराई बंधारे, ग्रामस्वच्छता मोहिम, स्वच्छता मोहिम, अशाप्रकारचे कार्यक्रम त्यांच्यावर लादले जातात तेव्हा मात्र हेच शिक्षक एकत्र का येत नाहीत ? ती कामे त्यांनी करु नयेत, त्यांनी केवळ अध्ययनाचे व अध्यापनाचे काम करावे. म्हणून माझी शिक्षक आमदारांना विनंती आहे की, यासंबंधी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

पुन्हा एकदा विचार करावा. शिक्षकांना दिलेली ही अशैक्षणिक कामे आहेत ती कमी करण्यात येतील. पण शिक्षकांची 10-10 दिवसांचे अधिवेशन कशासाठी घेतले जाते, त्यामध्ये त्यांना काय स्वारस्य आहे, काय स्वार्थ आहे ? त्यांच्या वेतनासाठी, घरभाडे भत्त्यासाठी, वैद्यकीय भत्त्यासाठी तुम्ही आणि आम्ही याठिकाणी चर्चा करीत असू तर त्यांनी 10-10 दिवसाच्या अधिवेशनाचा अट्टाहास कशासाठी करावा ?

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. वसंत पुरके...)

असे या ठिकाणी प्रश्न चिन्ह निर्माण होते ते निर्माण होता कामा नये. मी खेड्यापाड्यात, झोपडपट्टीत वाढलेला आदिवासीय माणूस आहे. शिक्षणाच्या बाबतीत या महाराष्ट्राचा विचार केला तर अध्ययन आणि अध्यापनासाठी महाराष्ट्राच्या वाटयाला किती दिवस येतात हे कोणी तरी शोधायला पाहिजे. महाराष्ट्रामध्ये अध्ययन आणि अध्यापनाच्या तासिका किती आहेत ? त्या 235 असल्या पाहिजेत. राज्यातील छत्रपती शाहू महाराजांचा सोलापूर जिल्हा हा एकच असा जिल्हा आहे की त्या जिल्ह्यामध्ये सर्व शिक्षक, अधिकारी आणि पदाधिकारी 245 टिचिंग डेज घेतल्या शिवाय राहात नाहीत. जगाच्या पाठीवर सर्व संकटांना तोंड देणारा, हिरोशिमा आणि नागासकी बेचिराख झाल्यानंतर जिद्दीने आणि दुर्दम्य आत्मविश्वासाने उभा राहाणारा जपान सारखा देश आहे. त्या देशाच्या वाट्याला 250 टिचिंग डेज येतात. तुमच्या आमच्या वाटल्या ते 235 किंवा 230 तरी आले पाहिजेत. परंतु ते तितके न येता मोठ्या मुश्किलीने 190 टिचिंग डेज येतात. सभापती महोदय, 10-10 दिवस 3-3 दिवस अधिवेशने असतात, जिल्हाधिका-यांनी जाहीर केलेल्या सुट्टया असतात, खासदार आमदार आला तर मुलांना डफली वाजवायला नेले जाते. पाऊस असताना एखादा विद्यार्थी शाळेत आला तर त्याला, शाळेत येणारा तूच का एकटा हुशार विद्यार्थी आहेस, तूच कसा शाळेस आलास ?असे त्याला विचारले जाते. या आणि अशा अनेक कारणामुळे अध्ययन आणि अध्यापनाचे दिवस कमी झालेले आहेत. मी या शिक्षण क्षेत्रामध्ये काय नवीन केले, कोणती क्रांती केली, असे विचारले जाईल. मी प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, प्राध्यापक या सर्व रस्त्यातून, काटयाकुटयातून, नदी-नाल्यातून, दगडगोट्यातून गेलो आहे. मी नवीन काय केले ? मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, डेली नोटस् काढणे हे नवीन आहे काय ? शाळेमध्ये शिक्षकाने अर्धातास अगोदर गेले पाहिजे आणि अर्धा-तास उशीरा थांबायला पाहिजे हे नवीन आहे काय ? दैनंदिन टाचण लिहून काढणे हे शिक्षकाचे काम नाही काय ? वर्गावर जाताना युनिटचे आधी वाचन करणे हे शिक्षकाचे काम नाही काय? मासिक, त्रैमासिक, वार्षिक इव्हॉल्यूशन करायला नको काय ? वर्तनातून परिर्वन घडविणारे शिक्षण द्यायला पाहिजे. नेल्सन मंडेला असे म्हणतात की, Education is a powerful weapon that you can use to change the world. अशा प्रकारची प्रचंड अशी ताकद माझ्या हातामध्ये असली पाहिजे. शिक्षकांना मॉरल सपोर्ट देण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील एक आदिवासी मुलगी 52 कोटी 53

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. वसंत पुरके....)

लाख हा आकडा लिहू शकली. परंतु तो आकडा एखाद्या शिक्षकाला लिहिता येत नसेल तर त्याबाबतीत काय म्हणायचे ? पहिली पासून चौथी पर्यन्त इंग्रजी शिक्षण सुरु केलेले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये देखील शिक्षण विषयक प्रस्तावावर सन्माननीय मंत्री महोदयांनी अशाच प्रकारे मुद्यांना सोडून खूप सुंदर भाषण केले होते. आम्ही जे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. बाजारामध्ये कोणतीही पुस्तके आलेली नाहीत असे मी माझ्या भाषणात सांगितले. त्याबाबत मंत्री महोदय काही बोललेच नाहीत.

प्रा. वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या सोयी प्रमाणे भाषण केले. मी त्यांचा एकही मुद्दा सोडणार नाही. इंग्रजी माध्यमाची गणिताची पुस्तके छापून झालेली आहेत. मराठी माध्यमाची पुस्तके देखील छापून झालेली आहेत. आम्ही ती सर्वांना वितरित करणार आहोत. युतीच्या काळामध्ये विद्यार्थ्यांना दिवाळीपर्यन्त पुस्तके मिळाली नव्हती. मी सांगू इच्छितो की, शिक्षकांना अन्य कामे दिली जाऊ नयेत. माझी विनंती आहे की कोणत्याही आमदारांच्या, लोकप्रतिनिधींच्या मताचा विचार न करता अपार्ट फ्रॉम पॉलिटिक्स याबाबतीत विचार केला पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

त्यांना विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्या शिक्षकांना नोट लिहिण्यास, टाचण वही पूर्ण करण्यास वेळ मिळत नाही, अध्यापनासाठी वेळ मिळत नाही. "Nothing is taught, unless it is learned" जर अशी भूमिका स्वीकारावयाची असेल तर माझ्या शिक्षक बांधवांना अध्यायनासाठी किती वेळ मिळतो ? माझे शिक्षक बांधव दोन-दोन, तीन-तीन तास दूर अंतरावरुन शाळेत जाणे-येणे करीत असतील तर त्यांची विद्यार्थ्यांना शिकविण्याची मानसिकता काय असेल याचा देखील विचार केला पाहिजे. शिक्षणाचा स्तर उंचावला पाहिजे अशी आपण अपेक्षा करतो. मी सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, कपिल पाटील, रामनाथ मोते यांना विचारु इच्छितो की, खरोखरच आमचा शिक्षक दररोज युनिट प्रमाणे टिचींग करतो काय ? दिनांक 20 मार्च ते 30 एप्रिल पर्यत असे एकूण 40 दिवस शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवितात काय ? एकूण 290 दिवस शिकविण्यासाठी गेले असतील, त्यात हे 40 दिवस गेले असतील तर माझ्या विदर्भ, मराठवाडा तसेच उर्वरित महाराष्ट्राच्या वाटेला टिचींग दिवस किती येतात ? महाराष्ट्रात एकाच दिवशी शाळा सुरु कराव्यात असा माझा मानस या कारणामुळेच होता. परंतु या संदर्भात अनेक लोक कोर्टात गेले. गुणवत्ता विकासाच्या विरुध्द कोर्टात कोण गेले ? माझा शिक्षक बांधव गेला. लेखन-वाचन हमी कार्यक्रमासाठी 1992 ते 1994 या काळात माझी 20 लाख मुले शिक्षणापासून वंचित राहिली होती. ती मुले शिक्षणापासून वंचित का राहिली, त्याची कारणे आम्ही शोधून काढली. अनेक विद्यार्थ्यांचे पालक अडाणी आहेत, अनेक विद्यार्थ्यांची घरची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही इत्यादी कारणामुळे ती मुले शिक्षणापासून वंचित राहिली होती. परंतु निरस अध्यापनामुळे मुलांच्या मनामध्ये, मराठी, भूगोल इत्यादी विषयांच्या बाबतीत अभिरुची आम्हाला निर्माण करता आली नव्हती. यामुळे 20 लाख मुले शिक्षणापासून वंचित राहिली होती. शिक्षकांना अन्य कामे सांगितली जाणार नाहीत पण त्याच वेळेस शिक्षक बांधवाकडून होणारे अशैक्षणिक कामे कमी केल्याशिवाय राहणार नाही. अनेक शिक्षकांचे टिचींग क्लासेस आहेत. शेती बियाण्यांची दुकाने आहेत. विमा योजनेची कामे आहेत, पत्रकारिता आहे, जर असेच असेल तर खरोखरच माझ्या पत्रकारिता करणा-या माझ्या शिक्षकांचे शाळेत जाताना मन लागेल काय ? हा माझा प्रश्न आहे.

-2-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : शिक्षक काम करीत नाहीत अशा प्रकारची माहिती माननीय मंत्री महोदय या ठिकाणी सांगत आहेत. परंतु हा प्रश्न मी या सभागृहात अनेक वेळा विचारला आहे. या शिक्षकांवर सुपरव्हीजन करण्यासाठी विस्तार अधिकारी नेमलेले आहेत, गट शिक्षण अधिकारी नेमलेले आहेत, शिक्षण अधिकारी यांची नेमणूक केलेली असते, त्यानंतर गटविकास अधिकारी नेमलेले आहेत, त्यानंतर शिक्षणाधिकारी, शिक्षण उप संचालक, शिक्षण संचालक, शिक्षण सचिव यांचे नियंत्रण असते. परंतु शिक्षकांनी दररोजचे टाचण केले किंवा नाही, त्यांनी दररोज किती तास शिकविले याबाबतची कधीही माहिती नियंत्रण अधिका-यांकडून घेतली जात नाही, त्याची तपासणी केली जात नाही. सदर नियंत्रण अधिकारी नियंत्रणाचे काम का व्यवस्थित करीत नाहीत याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. या ठिकाणी शिक्षणावरील चर्चा गेल्या चार तासापासून चाललेली आहे. त्या चर्चेतून आम्ही काही तरी घेऊन गेलो पाहिजे. आम्हाला देखील शिक्षण विषयाबाबतचा बोध झाला पाहिजे अशा प्रकारची माहिती माननीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहाला द्यावी.

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ) : माझी सभागृहाला विनंती आहे की, या प्रस्तावावर गेल्या चार तासापासून चर्चा सुरु आहे. चर्चा सुरु झाल्यापासून माननीय शिक्षण मंत्री एक क्षण देखील बाहेर न जाता त्यांनी सगळया वक्त्यांची भाषणे त्यांनी ऐकून घेतली आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे माननीय मंत्री महोदयांनी शांतपणे ऐकून घेतले आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांचे उत्तराचे भाषण सुरु होऊन दहा मिनिटे झालेली आहेत. त्यांच्या उत्तराच्या भाषणात जर आपण अडथळे आणत गेलात तर त्यांना त्यांचे भाषण पूर्ण करणे कसे शक्य होईल ? सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम माननीय शिक्षण मंत्र्यांचे उत्तराचे भाषण पूर्णपणे ऐकून घ्यावे.

प्रा.वसंत पुरके : मी सगळयाच वक्त्यांचे भाषण मनापासून ऐकलेले आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या सूचनांच्या मी नोंदी घेतलेल्या आहेत. माझे उत्तराचे भाषण पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक सदस्यांच्या शंकेला मी उत्तर देण्यास तयार आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण पूर्ण करावे.

प्रा. वसंत पुरके : आमचा हेतू असा होता की, सी. बी. एस. ई. आणि आय. सी. एस. ई.,एस.एस.सी. बोर्डातील मुलांना न्याय मिळावा. सी.बी.एस.ई.आणि आय.सी.एस.ई.मध्ये-

3...





प्रा.वसंत पुरके....

आय.ए.एस.,आय.पी.एस. तसेच हाय-फाय सोसायटीतील लोकांची मुले शिक्षण घेतात. या उच्चभ्रू वर्गातील अधिकारी व कुटुंबियातील मुले या शाळांमध्ये शिकतात. त्यांचे कुटुंबिय फार बाऊ करतात की, आमची मुले खूप हुशार आहेत. मला मान्य आहे ती मुले हुशार असतील. या अनुषंगाने मी एक निर्णय निर्गमित केला आहे. स्वत:ची मुले, शिक्षक आणि स्वत:च्या संस्था इंटेलिजन्ट असतील, बुध्दिमान असतील तर त्या प्रज्ञावंत संस्थांनी इयत्ता 11 व 12 वी वर्ग का सुरु करु नयेत? पुढच्या वर्षी सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. बोर्डातील संस्थांनी इयत्ता 11 व 12 वी चे वर्ग सुरु केले नाहीत तर त्या संस्थांना धडा शिकविल्याशिवाय मी राहणार नाही.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री. कानडे...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके....

शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. जर तुमची एवढी मुले हुशार आहेत तर तुम्ही स्वत: 11वी चे वर्ग का सुरु करीत नाही ? 10 वी ला ही मुले टॉपर्स ठरतात कारण त्यांचे इंटरनल मार्क्स, इन्सेटीव्ह मार्क्स, त्यांना एक भाषा कमी आहे म्हणून त्यांना मार्क जास्त मिळतात. पहिल्या वर्षी इंटरनल मार्क्स देण्याचे ठरविले आणि ग्रामीण भागामध्ये 2/2 लाख मुले पास झाली म्हणून तुमची जळायला लागली ? ग्रामीण भागातील मुलाला अनुकूल वातावरण नाही, पालक निरक्षर आहे. त्याला समजत नाही. त्याला सीबीएसई,आयबीएसई समजत नाही. यावर्षी त्याला 20 गुण दिले हे अकारण दिले नाही. माझ्या मुलाच्या मनामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे, संवादक्षमता वाढली पाहिजे. इंग्लीशमधून बोलता आले पाहिजे. बेस्ट सोअर्स ऑफ कम्युनिकेशन हे इंग्लीश आहे हे त्याला समजले पाहिजे. मराठी असेल तर केवळ मराठी नाही तर त्याला कुसुमाग्रज, सुर्वे, केशवसुत, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर हे कळले पाहिजेत. मी आदिवासी माणूस आहे मला समजून घेतले पाहिजे. कोटयवधी जगतात जिवाणू ना जगती ना मरती हे माझी कविता नाही तर कुसुमाग्रजांची आहे. तुमच्या आणि माझ्या मनामध्ये दुर्दम्य आत्मविश्वास कोणामुळे निर्माण झाला ? वि.वा.शिरवाडकर जन्माला आले नसते तर वसंत पुरके दिसले नसते. कोटयवधी जगतात जिवाणू, ना जगती ना मरती जशी ती गवताची पाती. नाविका मी फिरतो सात नभांखाली, निर्मिती नवी क्षितिजे पुढती. अशी कविता कुसुमाग्रजांची होती म्हणून वसंत पुरके इथपर्यंत आला. बाळकडू हे टॉनिक कुणी दिलेले आहे ? मराठीचे गोडवे गायचे परंतु चार कवींची नांवे माहीत नाहीत. कुसुमाग्रजांचे नांव माहीत नाही, सुर्वेंचे नांव माहीत नाही, गोविंदाग्रजांचे नांव माहीत नाही. आधुनिक मराठी कवितांचे जनक केशवसुतांचे नांव माहीत नाही. नवे धैर्य नम्रता जे जे पाहणे, वाकुदे बुध्दीस माझ्या तप्त पोलादाप्रमाणे ही नम्रता,धैर्य आणि ताकद मर्ढेकरांनी शिकविली आहे. 70:30 चा रेषो आम्ही मान्य केलेला आहे. सीबीएसईची मुले टॉपर्स ठरतात. दुर्देव आहे की त्यांना कमी मार्क्स मिळाले म्हणून त्यांना 5 टक्के बोनस मार्क्स द्या. का म्हणून बोनस मार्क्स द्या ? माझ्या खेडया-पाडयातील , डोंगरदऱ्यामध्ये राहणाऱ्या मुलाला बोनस गुण दिले नाहीत. केवळ त्याला 20 गुण यावर्षी दिल्यामुळे अनेक लोकांच्या नाकातील केस जळले आहेत. मी नमप्रणाने सांगतो की, यावर्षीनंतर सीबीएसईची ज्यांची ज्यांची शाळा आहे त्यांच्याकडे 12 वी चा वर्ग नसेल तर माझ्या खात्याचा शासन निर्णय आहे. त्याची अंमलबजावणी करणार नाही त्यांना कायद्याचा बडगा

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री.गिते 18:25

प्रा.वसंत पुरके ....

दाखविला जाईल. माझा तब्बेत कशीही असो पर "मेरा अज्म इतना बुलंद है कि मुझे पराये उसूलों का डर नही. मगर खूब आतिश गुल से है कि चमन तो जला करे." त्याला कळले पाहिजे की तुमची मुले हुशार आहेत तर हीच मुले सीबीएसईमधून 11 वी 12 वी का करीत नाही. सगळया दुबळयांशी स्पर्धा करता. ते सांगतात की माझी हिस्ट्री इंटरनॅशनल लेव्हलची आहे, जागृफी इंटरनॅशनल लेव्हलची आहे. इंटरनॅशनल लेव्हलचा असताना नॅशनल लेव्हलला येतो कशाला कारण येथे कमजोरांशी स्पर्धा करावयाची आणि वासरात लंगडी गाय शहाणी या म्हणीप्रमाणे येथे टॉपर ठरायचे तर तेथे तो टॉपर का नाही ? 70:30 चा रेषो आम्ही लागू केला. हे माझ्या मनातील नाही. बीजेपीचे श्री. राज पुरोहित नंतर श्री.गोपाळ शेट्टी या दोघांचे भांडण झाले. पत्र घेऊन आले की जर तुम्ही 70:30 चा रेषो लागू केला नाही तर आम्ही कोर्टात जाऊ. नंतर एनसीपीचे दोन ग्रुप तयार झ ाले. कोण हे हाणून पाडतो आणि कोण पुढे करतो अशी परिस्थिती निर्माण झाली. जबरदस्त वाद झ ाला, भांडण झाले. मी म्हणालो तुमची हरकत नाही तर आमचा जीआर आहेच. 70:30 चा हा निर्णय आमच्याकडून अगोदर व्हायला पाहिजे होता ही चूक मी मान्य करतो. 70:30 रेषो पहिली लिस्ट लागण्यापूर्वी लावला असता तर आम्हांला यश आले असते. डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, पुढील वर्षी पहिल्यापासून लागू करु. यामध्ये स्थानिक लोकांना प्रवेश मिळाला पाहिजे. माझा जिल्हा येथे आहे. माझे सुंदर कॉलेज येथे आहे. एज्युकेशन ॲटमॉसफिअर आहे,क्वॉलिफाईड स्टाफ आहे, छानपैकी लॅबोरेटरी आहे, अतिशय देखणी इमारत आहे तरी त्याला प्रवेश मिळत नही. जिल्हा हे युनिट करुन त्याठिकाणी त्याला प्रवेश मिळाला पाहिजे अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र करुन दिलेले आहे. पुढल्या वर्षी याची अंमलबजावणी केल्याशिवाय राहणार नाही फक्त तुमचा नैतिक पाठिंबा मला हवा आहे. मी कोणता निर्णय मागे घेतला आहे ? एकही निर्णय मी निर्णय घेतल्यानंतर मागे घेतला नाही. काही ठिकाणी कोर्टाने निर्देश दिले असतील तर ते पाळण्याची मला गरज आहे. माझा हेका नाही. माझा हट्ट नाही. श्री. कपिल पाटील यांनी सांगितले की शिक्षणाचा दर्जा वाढवा.....

यानंतर श्री. भोगले

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके........

दर्जा वाढवावयास हरकत नाही. परंतु दर्जा वाढवायचा आणि टेस्ट मात्र घ्यायची नाही. दर्जा वाढवावयाचा आणि युनिट टेस्ट घ्यायची नाही. यावर इलाज म्हणून मी लेखन वाचन हमी कार्यक्रम लागू केला. विरोध कोणी केला? विद्यार्थ्यांनी केला? पालकांनी केला? ज्या दिवशी पाल्य, पालक, जनतेचा विरोध असेल त्या दिवशी एकही निर्णय मी त्यांच्या विरोधात घेणार नाही. परंतु हे केल्याशिवाय राहणार नाही. आज औपचारिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण ग्रामीण भागात थांबले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे, कृपा करुन मताचे राजकारण करु नका. मी शिक्षक बांधवांना जाहीर आवाहन केले. त्यांना कितीही वाईट वाटले तरी हरकत नाही. परंतु दुर्लक्ष करण्यामुळे आणि शिक्षकांच्या उदासिनतेमुळे ग्रामीण भागातील वेठबिगार समाजाची मुले उपेक्षित राहिली आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी पाठ्यपुस्तकातील चुकांचा मुद्दा उपस्थित केला. खूप चुका झाल्या. मंत्री गायब. माझे रेकॉर्ड आहे. दुर्दैव असे की, दोन-दोन दिवस हजर राहतो, इलेक्शन 19 तारखेला संपले आणि 22 तारखेला आलो. चार दिवस थांबलो. एका पत्रकार बांधवाचा फोन घेतला नसेल, त्यामुळे 'मंत्री गायब' या शीर्षकाखाली वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली. दुसऱ्या दिवशी म्हणतात, बाईट काय? माझी स्टोरी तयार होत आली आहे. जर एखाद्या मित्राला बाईट दिली नाही म्हणून मंत्री गायब होत असेल ते चूक आहे.

सभापती महोदय, मी बैठकीत व्यस्त असेल तर कोणाचाही फोन घेत नसतो. अशा अवस्थेत मंत्री गायब. लिहिण्याबद्दल माझी हरकत नाही. लाख संकटे आली तरी हरकत नाही. लाख संकटे झेलून घेईल अशीच माझी छाती आहे. मी चार दिवस मोकळा बसलो नव्हतो. माझ्या विभागाचे सचिव, उपसचिव यांच्यासोबत बसून निकाल कसा लागला पाहिजे, अकरावीला मुलांना प्रवेश कसा मिळाला पाहिजे या संदर्भात चर्चा करीत होतो. त्या दोन-तीन दिवसात कोणी आले नाहीत. मी निघालो त्या दिवशी मात्र मंत्री गायब. मी म्हणतो, मला कितीही लोकांनी गायब केले तरी महाराष्ट्रातील शिक्षण गायब होऊ नये.

सभापती महोदय, पर्सेंटाईल पध्दतीबाबत बोलत असताना मी हेच सांगू इच्छितो की, मी टेक्नीकल आहे का? मुंबईतील चांगले प्राचार्य, गणित विषयातील तज्ज्ञ यांना एकत्र केले. सीबीएसई टॉपर, आयसीएसई टॉपर, एसएससी बोर्डातील टॉपर या तिघांच्या गुणांचे कॅलक्युलेशन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके........

केले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मुले पुढे यावीत हा उद्देश होता. पूर्वी 5-6 मुलांना प्रवेश मिळत होता. आता रुपारेलसारख्या नावाजलेल्या कॉलेजमध्ये सुध्दा 60-60 मुलांना प्रवेश मिळाला. अशा वेळी तुम्ही म्हणता भूमिपुत्रांचे काय? तुमचा नारा आहे, भूमिपुत्रांचे काय? परंतु पर्सेंटाईल पध्दतीची मागणी कोणी केली होती?

डॉ.दीपक सावंत : ही मागणी आम्हीच केली होती, आम्ही या पध्दतीच्या विरोधात नाही.

प्रा.वसंत पुरके : मी ते मान्य करतो. पर्सेंटाईल पध्दत एनसीईआरटीने ठरविलेल्या सूत्रानुसार निश्चित केली जाते. पात्र कोण? कोणी कशीही सूचना करा, जी ग्राह्य आहे ती आम्ही स्वीकारल्याशिवाय राहणार नाही. आपण सर्वजण जाणकार नेते आहोत. तुमची सूचना आहे. पर्सेंटाईल पध्दत प्रवेश सुरु होण्यापूर्वीच सुरु केली आहे. पाठ्यपुस्तकातील चुकांबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, पाठ्यपुस्तक ठरविणारे कोण आहेत? या शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षकांचा सहभाग किती आहे असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी मांडला होता. 34-35 अभ्यासू मंडळी आहेत. 10-15 तज्ज्ञ लोक असतात. कोण कोण आहेत? पाच-पाच Ph.D झालेले लोक आहेत. ज्यांनी Ph.D दिल्या. कलेक्शन आणि सबमिशन असे लोक या मंडळावर आहेत. म्हणजे जिथे कुंपणच शेत खात असेल तर काय करायचे? 20-20 बैठका झ ालेल्या आहेत. परंतु याच्याकडे लक्ष दिले नाही. म्हणून या चुकांच्या संदर्भात, 350 चुका आहेत असे कोणीतरी म्हटले, संबंधित व्यक्तिंनी अगोदरच पुस्तकाचे मायक्रो रिडींग करुन चुका दाखविणे आवश्यक होते. यावर्षी चांगली संधी मिळाली हे बरे झाले. सुदैवाने मी मराठी विषयाचा प्राध्यापक आहे.

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके...

मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्राला गती दिल्याशिवाय राहणार नाही, गतिमान केल्याशिवाय राहणार नाही. मराठी पुस्तकातील ज्या चुका दाखविण्यात आलेल्या आहेत त्या पूर्वग्रहदूषिताने दाखविण्यात आल्या आहेत. सर्जनशील आणि सृजनशील या शब्दांमध्ये काय फरक आहे ? प्रतिभा या शब्दामध्ये काय फरक आहे ? प्रतिभा म्हणजे नवनिर्माण क्षमता. सृजनात्मक म्हणजे सर्जनशीलता. येथे व्यक्तिनिष्ठ अशा चुका दाखविण्यात आलेल्या आहेत. पुस्तकामध्ये एका लेखकाचा पत्ता दिलेला आहे. त्यात कॉंग्रेसचा पत्ता. म्हणजे हे पुस्तक कॉंग्रेसचा प्रचार करणार आहे काय ? मी येथे सांगू इच्छितो की, ज्यांनी चुका केलेल्या आहेत, त्यांना पाठिशी घालणार नाही. त्यांना धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही. फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी इत्यादी देखील विषय आहेत. या खात्याचा प्रमुख म्हणून मी व माननीय राज्यमंत्री आहेत. कुठलेही पुस्तक प्रकाशनासाठी जाईल त्यावेळी प्रकाशनपूर्व प्रत तज्ज्ञ लोकांकडून तपासून घेतल्याशिवाय राहणार नाही. अशा चुका होऊ नयेत म्हणून हा निर्णय आम्ही घेतलेला आहे. 500 चुका करायच्या आणि त्याची टिप्पणी विद्यार्थ्यांसमोर द्यायची. मूळात पुस्तकातीलच बरोबर शिकविले जाते नाही. मग त्या टिप्पणीतील पुन्हा कोण शिकवणार आहे ? म्हणूनच मी दखल घेतली आहे की, अशा चुका पुन्हा होता कामा नयेत.

द्विस्तरीय गणित आपण का आणले आहे ? फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजीमध्ये गणित हा विषय महत्त्वाचा आहे. जगात ॲक्युरसी देणारा विषय गणित आहे. अचूकपणा देणारा विषय आहे. इंजिनिअर घडविणारा विषय आहे. 12 ते 15 टक्केच मुले इंजिनिअर होत असतील तर मग द्विस्तरीय गणित पद्धती आपण का सुरू करू नये ? असा विचार मी केला. याबाबत 2-3 कॉन्फरन्स झालेल्या आहेत. डॉ.टिपरीवाला, डॉ.लहाने, डॉ.सतिश खडसेसह अनेकांनी मान्य केले आहे की, ज्या विद्यार्थ्यांना इंजिनिअर व्हायचे असेल त्यांना नंबर वन चे गणित ठेवावयचे आणि मेडिकलला जायचे, बी.एससी.ला जायचे, बायोलॉजिकल विषय घ्यायचा आहे, एम.ए. व्हायचे, बी.कॉम.व्हायचे आहे, अशांसाठी द्विस्तर गणित ठेवणे योग्य होईल. इंजिनिअरिंग शाखा सोडून सगळया शाखा ह्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके...

गणित द्विस्तरासाठी ओपन आहेत. कोणीही वेठबिगार होता कामा नये ही त्या मागची भूमिका आहे. आज अनेक मुले गणितामध्ये नापास होत आहेत. गणितामध्ये नापास झाल्यानंतर तो पुन्हा परीक्षेसाठीचा अर्ज भरत देखील नाही. एखाद्या विषयाची मुलाला भीती झाली की तो शिकवणी देखील लावत नाही आणि मग तो वेठबिगार बनतो. म्हणून सर्व तज्ज्ञांचे मत घेऊन, कॉन्फरन्स घेऊन द्विस्तरीय गणित पद्धती आपण स्वीकारलेली आहे.

आज कृषिची गरज आहे. निसर्गाच्या कवितेचा येथे उल्लेख करण्यात आला. निसर्गातून सुद्धा आपल्याला भरपूर काही शिकता येते. बहिणाबाई चौधरीसारखी महिला काहीच शिकली नाही. त्यामुळे प्रतिभा, सर्जनशीलता, सृजनात्मकता पॉवर ज्या लोकांना आहे, त्यांना निसर्गात शिकता येते. याचा अर्थ सर्व शिक्षणच बंद केले तर कोणीच तयार होणार नाही.

मन जहिरे जहिरे, त्याचे न्यारे रे तंतर
इचु साप बरा, त्याले उतारे मंतर

असे बहिणाबाई चौधरी यांनी म्हटले आहे. म्हणून माझी विनंती आहे की, पुढच्या वर्षीपासून कृषि विषय हा इन्ट्रोडयूस करीत आहोत. म्हणून माझी विनंती आहे की, कृषि विषयक संदर्भात निसर्गरम्य धाडा दाखविला आहे, त्यात बदल करता येत नाही. बोली भाषा असेल तेथे काही सूचना करता येत नाही.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा मराठीच्या शिक्षकांना प्रशिक्षण दिले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा असे घडले आहे की, मराठीच्या पुस्तकाचे प्रकाशन झाल्यानंतर शेकडो लोकांसमवेत व्हिडिओ कॉन्फरन्सिंग झाले आहे. सुंदर संवाद झाला आहे. असे असताना प्रवेश प्रक्रिया ऑन लाईन कधी होईल असे विचारले आहे. या वर्षी जरी आमची प्रक्रिया यशस्वी झाली नसली तरी पुढच्या वर्षी पासून सेंट्रलाईज पद्धतीने प्रवेश कसा देता येईल याचा विचार आम्ही करीत आहोत. म्हणून या वर्षीच्या पद्धतीची आम्ही दखल घेतली आहे.

लैंगिक शिक्षण हा महत्त्वाचा विषय आहे. लैंगिक शिक्षणासंबंधी माझा बिलकूल अट्टाहास नाही. या विषयाला कुठले नाव द्यायचे यासंबंधी देखील माझे दुमत नाही. पाचवी पासून, सहावी पासून, सातवीपासून टप्प्याटप्प्याने कुठल्याही प्रकारचा गैरसमज होणार नाही, भावनांना आवाहन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके...

केले जाणार नाही, भावना चाळवल्या जाणार नाही, अशाप्रकारचे शिक्षण देता येईल काय ? यासंबंधी चर्चा करू. आपल्या सारखे जे कोणी तज्ज्ञ असतील त्यांना देखील आम्ही बोलावू. या विषयासंबंधी अट्टाहासी भूमिका नाही. वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट झाली नसेल आपल्याला काहीच करता येत नाही. आदिवासींमध्ये कुमारी मातांचे प्रमाण बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आहे. सांगली,सातारा,सोलापूर सारख्या ठिकाणी जावून मुलांना रोग लागत असेल तर या विषयाचा आपण सर्वांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे. किशोरवयीन मुलांना आरोग्य शिक्षण हा देखील विषय शिकविण्यास आम्ही तयार आहोत. तेव्हा आपण कुल्याही प्रकारचा गैरसमज करून घेऊ नका. येथे कॉलेजच्या फी संबंधी देखील मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

यानंतर श्री.पी.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. भारवि.... 18:40

प्रा. वसंत पुरके .....

माझ्या शाळेची इमारत अत्यंत सुंदर असूनही फक्त टॉयलेटमध्ये टाईल्स बसविण्याचे काम सुरु असताना आमचे पत्रकार मित्र मात्र एवढे हुशार की त्यांनी टॉयलेटची फरशी बसवित असताना नेमके तेथेच तीन मुलांना उभे करुन मागून फोटो काढला व वर्तमानपत्रात त्या पडक्या टाईल्सविना असलेल्या व काम सुरु असलेल्या टॉयलेटचा फोटो छापला होता. म्हणून माझी अशी विनंती आहे की, जी वस्तुस्थिती आहे तेच पेपरमध्ये दिले पाहिजे. या ठिकाणी सांगण्यात आले की, शिक्षण मंत्र्यांचा अधिकाऱ्यांवर वचक राहिला नाही. तसेच वारंवार सांगण्यात येते की, शिक्षकांचे ट्रेनिंग सुरु केले, त्यामुळे शिक्षकांना शिकविता येत नाही. परंतु खऱ्या अर्थाने या ट्रेनिंगची कशी आवश्यकता आहे हेच मी समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे Training programs are expected to provide trainings not only in pedagogy but also in behavioural attributes, perceptions, appreciation, motivation. आणि म्हणून हे ट्रेनिंग आम्ही स्वीकारलेले आहे. पण आमचे शिक्षक मात्र सकाळी प्रशिक्षण, संध्याकाळी प्रशिक्षण, दिवाळीत प्रशिक्षण अशा प्रकारच्या तक्रारी सुरु झाल्या. परंतु इतक्या वेळांमध्ये हे ट्रेनिंग नाही. त्यावर आमचेच अधिकारी सांगतात की, हे शिक्षण मंत्र्यांचे काम आहे. अशा प्रकारे बदमाशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना धडा शिकविणारा शिक्षणमंत्री कोण असेल तर तो हा वसंत पुरके आहे, हे मी अभिमानाने सांगतो. नागपूर भागातील 10 अधिकाऱ्यांना यासंदर्भात सस्पेंड करण्याचे काम कोणी केले, त्यांचे इन्क्रीमेंट बार करण्याचे काम कोणी केले तर ते या शिक्षणमंत्र्यांनी केले. त्यासाठी आपल्यासारख्या सन्माननीय सदस्यांचे पत्र येतात की, या अधिकाऱ्यासारखा दुसरा अधिकारी कोणीच नाही, अशा वेळेस मी करावं तर काय करावं ? असा मला प्रश्न पडतो. म्हणून माझी विनंती आहे की, यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनीही विचार करावा. मग ज्यांची बदली केली आणि आपल्या जागेवर जॉईन होणार नसेल तर अशा अधिकाऱ्यांना निलंबित केल्याशिवाय मी राहत नाही. अशा प्रकारे 10 अधिकाऱ्यांना मी निलंबित केले होते. त्याचाच परिणाम म्हणून मागील वर्षी 35 टक्के शिक्षक प्रशिक्षणासाठी होते आणि यावर्षी मात्र 100 टक्के शिक्षक या प्रशिक्षणासाठी हजर झाले, हे सभागृहाला सांगू इच्छितो. म्हणजेच "दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए".

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

सन्माननीय सदस्य श्री. विनोदजी तावडे आपल्यासारख्या तब्येतीचा माणूस माझ्यासोबत असेल तर मी आणखी घाबरणार नाही....(अडथळा).....ज्या सन्माननीय सदस्यांनी अत्यंत पोटतिडिकीने आपले विचार मांडले त्यांच्यावर संपूर्ण समाजाचा विश्वास आहे. म्हणून मी असे सांगू इच्छितो की, वारंवार सांगून देखील जे अधिकारी ऐकत नसतील, मुळात मघाशी सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे "मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास" परंतु एखादा माणूस नेहमी नेहमी सांगुनही सुधारत नसेल तर संत तुकारामांनी अशा लोकांच्या बाबतीत म्हटले आहे की, "शिंदाळा साल्याचा नाही हा विश्वास, बाईल तो त्याचा नर समजुनी". अशा प्रकारे बदमाशी करणारे जे कोणी असतील त्यांच्या बाबतीत "तुकाराम महाराज पुढे म्हणतात की, "तुका म्हणे ऐशा नरा, मोजूनी माराव्या पैजारा" ही भूमिका घेतल्याशिवाय सोडणार नाही. मी राज्यात काय सुरु केले तर खेड्यापाड्यात जातो, मराठी, गणित, भूगोल, जॉमेट्री, आल्जिब्रा अशा विविध बेसिक कन्सेप्ट क्लिअर झाल्या पाहिजेत म्हणून प्रयत्न करतो. अशा प्रकारे मी 100-125 शाळांना भेटी दिल्या. अशा एका शाळेत गेल्यानंतर एका मुख्याध्यापकांना चार शब्द इंग्रजीत लिहून दिले आणि ते वाचायला लावले तर तो मुख्याध्यापक बाहेर जायला लागला, मी त्यांना म्हणालो की, अहो गुरुजी, आपण कुठे चाललात ? तो म्हणाला की मला इंग्रजी वाचता येत नाही, मी म्हणालो कसे इंग्रजी येत नाही ? अशा प्रकारे अनेक शिक्षक गणित व इंग्रजी नाकारणारे आहेत. म्हणून यावर्षी मी निर्णय घेतलाआहे की, या राज्याला ग्लोबलायझेशन, कंप्युटरायझेशन, ऑटोमायझेशनच्या युगात टिकावयाचे असेल तर.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंतराव पुरके .....

आता इंग्रजी भाषा तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही. म्हणून आदिवासींच्या शाळेमध्ये, जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये, नगरपालिकेच्या शाळेमध्ये 20 टक्के जागा आरक्षित ठेवण्याचा निर्णय आम्ही केलेला आहे. ज्यांनी इंग्रजी माध्यमातून डी.एड. केले असेल, इंग्रजी माध्यमातून 12 वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहे त्यांना डि.एड. मध्ये 20 टक्के आरक्षण ठेवण्याचे काम आम्ही केलेले आहे. शैक्षणिक योजना पुष्कळ आहेत परंतु युनिट टेस्टच्या संदर्भात बिलकुल संभ्रमावस्था असता कामा नये. राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयामध्ये दर पंधरा दिवसाने टेस्ट् होत असते. अशाच प्रकारच्या शाळांमध्ये आमच्या शिक्षकांची मुले शिक्षण घेत असतात. तुमच्या शाळेत टेस्ट नको परंतु आपला मुलगा ज्या शाळेत शिकतो तेथे मात्र तुम्हाला दर पंधरा दिवसाने टेस्ट घेतलेली चालते. मिशन-यांच्या शाळेत दर आठवडयाने टेस्ट् होते. आमचे विजयभाऊ दर्डा यांच्या शाळेत सुध्दा दर आठवडयाने टेस्ट घेतली जाते. या शाळेत लवकर ॲडमिशन सुध्दा मिळत नाही. ज्या टेस्ट् सुरु केलेल्या आहेत त्या टेस्ट्ची आपल्याला का भिती वाटावी ? शिक्षकाने जे शिकवले आहे ते मुलांना अवगत झाले आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी टेस्ट् शिवाय पर्याय नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील म्हणाले की, शिक्षणाचा दर्जा वाढवा, नसेल जमत तर सोडून द्या, ॲम्ब्यूलन्स पाठवा. सभापती महोदय, मी अजून बिमार पडायचो आहे. परंतु जे मानसिक रुग्ण असतील, जे अज्ञानी रुग्ण असतील त्यांना ॲम्ब्यूलन्सची गरज पडू नये यासाठी हा सर्व प्रयास मी करीत आहे. शाळा बाहय मुले तुम्हा-आम्हाला शोधली पाहिजे. मी शिक्षणमंत्री झाल्याबरोबर या महाराष्ट्रात ज्या बाबासाहेबांनी घटनात्मक चौकट निर्माण केली. We the people of India having so many reasons to constitute India as a soverign, secular, socialist, federal हे कोणी निर्माण केले आहे? पुस्तकात घटनेची चौकट सुरु केली ती कशासाठी सुरु केली ? स्वातंत्र्य, समता, बंधुता हे सुरु करीत असतांना जी शाळा बाहय मुले आहेत त्यांचा आपण शोध घेऊन त्यांना शिक्षण देण्याचे काम आपल्याला करावयाचे आहे. नंदीवाले, माकडवाले यांची मुले भटकंती करणारे आहेत. या लोकांना ख-या अर्थाने न्याय मिळाला पाहिजे म्हणून महाराष्ट्रात झटपट सर्व्हेक्षण पहिल्यांदाच सुरु केले आहे. झटपट सर्व्हेक्षणामध्ये जे अपंग होते, ज्यांना दिसत नव्हते त्यांचा शोध घेतला. अशा प्रकारे आम्ही 4.27 लक्ष मुलांचा शोध घेतलेला आहे. महोदय, 82 टक्के मुलांना आम्ही इनरोल केलेले आहे. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अडथळा )

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांचे उत्तर ऐकण्यास आम्ही तयार आहोत परंतु सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांना मंत्री महोदयांनी उत्तर दिले तर बरे होईल. या ठिकाणी मंत्री महोदय, दोष सांगत आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जे सांगितले ते न करता मानसिक रुग्ण शोधत बसण्यापेक्षा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मा.मंत्रीमहोदयांना उत्तरे द्यावी ही विनंती.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात त्या प्रमाणे येथे कोणीही रुग्ण नाही. सन्माननीय सदस्यांनी तेच तेच प्रश्न विचारावयाचे आणि त्या प्रश्नांना मी उत्तर द्यावयाचे नाही हे कसे काय शक्य आहे? सन्माननीय सदस्यांनी दर्जा वाढीच्या संदर्भात मला सांगावे, माझा गुणवत्ता विकास कार्यक्रम कोणी लंबा केला ? बेस्ट लाईन टेस्ट कार्यक्रम कोणी लंबा केला ? ज्या शाळेत 90 टक्के गुण मिळविणारे विद्यार्थी आहेत त्यांना बेस्ट लाईन टेस्ट्ची भिती का वाटावी ? शाळा बाहय मुलांचा शोध घेणे हे तुमचे आमचे कर्तव्य आहे. म्हणून मी माझ्केंद्र प्रमुखांना, बीईओ यांना जबाबदारी दिलेली आहे की, जर एखाद्या तालुक्यात 15-20 मुले सापडले तर कारवाई केल्याशिवाय मी सोडणार नाही. माझ्या शिक्षक बांधवानी युनिट टेस्ट्च्या संदर्भात बिलकुल संभ्रम बाळगता कामा नये. जे शिकवले आहे ते मुलांना अवगत झाले आहे किंवा नाही, इ ाान संपादन झाले किंवा नाही यासंदर्भात टेस्ट् घेतली जाते. महाराष्ट्रात पहिल्यांदाच एका वर्गात एकूण मुले किती? अ, ब, क, आणि ड ग्रेडची मुले किती ? जी "ड" ग्रेडची मुले आहेत त्यांच्यासाठी उपचारक वर्ग झाले पाहिजे म्हणून एक तास जास्त शिकवले पाहिजे अशा प्रकारची मी शिक्षक बांधवाना विनंती केली. माझ्या सर्व शिक्षक बांधवानी ही बाब मनापासून मान्य केली व त्यामुळे माझ्या शिक्षक बांधवानी डिव्होशन आणि डेडीकेशनने शिकवण्यास सुरुवात केली आहे. एक शिक्षकी शाळा असू नये, शिक्षणाच्या संदर्भात लोकांची गरज भागावी म्हणून शिक्षकांची पदे भरण्यास मी प्रारंभ केलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके..

सर्व शिक्षकांची पदे भरण्यास देखील मी सुरुवात केली आहे. एवढेच नव्हे तर या शिक्षकांना प्रॅक्टीकल नॉलेज मिळाले पाहिजे या दृष्टीने त्यांनी इंटर्नशीप करावी असे देखील मी सांगितले होते. प्रत्येक शाळेला शिक्षक मिळाले पाहिजेत त्याचबरोबर शिक्षकाला प्रॅक्टीकल नॉलेजही असावे असा माझा हेतू होता म्हणून या डी.एड.च्या विद्यार्थ्याची इंटर्नशीप सुरु करण्यात आलेली आहे.त्याचबरोबर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावत यांनी अपंग मुलाची स्थिती काय आहे याबाबतीत देखील येथे उल्लेख केला होता. त्यामुळे विविध प्रकारचे जे अपंगत्व आहे त्याचे आयडेंटीफिकेशन करणे, अंपग मुलांना शोधून काढणे, त्यांच्यावर औषधोपचार करणे, त्यांची नोंदणी करणें, इनव्हेस्टीगेशन आणि सर्जरी करणे इत्यादी गोष्टी महाराष्ट्रात प्रथम करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात केन्द्र सरकारला शासनाने सांगितले आहे की, विविध प्रकारच्या अपंगत्व असणा-या मुलांचा शासनाने शोध घेतलेला आहे. त्याच बरोबर आम्ही त्यांना जे काही सांगितले होते ते केन्द्र सरकारने देखील मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये 3 लाख 98 हजार मुले अपंग आहेत . तेव्हा हया मुलांचा शोध घेऊन त्यांच्यावर उपचार करावयाचा आहे. त्यांचा जो काही आकडा सांगण्यात येत आहे तो मला नाकरावयाचा नाही ज्या ज्या ठिकाणी अपंग मुले असतील त्यांचा शोध घेणे व त्यांच्यावर उपचार करणे हे शासनाचे काम आहे व ते काम करण्यास शासनाने सुरुवात केली आहे

सभापती महोदय, सर्व मुलांना अकरावीच्या वर्गात प्रवेश देण्यात येणार आहे. त्यामुळे दहा टक्के जागा वाढवून देण्याच्या बाबतीत मी भूमिका घेतलेली आहे . संपूर्ण राज्यात नव्याने जवळजवळ 1200 तुकडयांना मान्यता देण्यात आलेली आहे. कोणताही विद्यार्थी अकरावीच्या प्रवेशापासून वंचित राहणार नाही यासबंधीची दखल शासनाने घेतली असून सी.बी.एस.ई आणि आय. सी.एस.ई.आणि एस.एस. सी. परीक्षेचे जे गुणोत्तर आपण मान्य केलेले आहे त्या संदर्भात पुढच्या वर्षी स्थानिक मुलांना देखील प्रवेश मिळेल याची दखल घेण्यात येणार आहे या क्षेत्रातील ज्या तज्ज्ञ व्यक्ती असतील त्यांचे मत विचारात घेऊनच ही बाब निश्चित केली जाईल अशी मी आपल्याला ग्वाही देतो

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा..वसंत पुरके..

सभापती महोदय, या ठिकाणी पर्यावरणाच्या ग्रेडच्या संदर्भात एक मुद्दा मांडण्यात आला होता जर शिक्षक जागरुक असतील व चांगले शिक्षित असतील तर त्यांच्याकडून चूक होणार नाही या ग्रेडचे महत्व त्यांना वारंवार समजावून सांगितले असतांनासुध्दा फक्त मुंबईमध्येच हा प्रकार का घडावा ? बाकीच्या ग्रामीण भागात हा प्रकार अजिबात घडला नसून तेथील शिक्षकांनी विद्यार्थ्याना" ए.बी.सी.डी ". या ग्रेडस बरोबर दिल्या होत्या. "डी" ग्रेड ही नापासची असतांना सुध्दा काही कॉलेजेसमधील विद्यार्थ्याना ही ग्रेड जाणीवपूर्वक देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्याना कोणती ग्रेड द्यावयास पाहिजे होती हे शिक्षकांनी जाणून घ्यावयास पाहिजे होते परंतु आमच्याकडून चूक झालेली आहे ही गोष्ट देखील मान्य करण्यास ते तयार नाहीत . पुढच्या वर्षी अशा प्रकारची चूक होता कामा नये या दृष्टीने शिक्षण विभाग दखल घेईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.साळुंखे यांनी असे सागितले की विद्यार्थ्यावर हे ओझे असता कामा नये त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की विद्यार्थ्यावर कोणत्याही प्रकारचे ओझे नाही परंतु शिक्षक बांधवांनी डिव्होशनने काम करण्यास सुरुवात केली तर विद्यार्थ्याच्या आणि पालकांच्या मनामध्ये शिक्षणाच्या बाबतीत निर्माण झालेला संभ्रम निश्चितपणे दूर होईल.

सभापती महोदय, पहिली पासून इंग्रजी शिकविण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे त्याबाबतीत सर्व शिक्षकांनी डिव्होशनने कामे केली व स्वत:ची क्षमता जर विकसीत केली तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्याना चांगले इंग्रजी लिहिता वाचता येईल. इंग्रजीचे प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने आम्ही नवीन नवीन वर्ग निश्चितपणे सुरु करु अशा प्रकारची ग्वाही मी आपल्याला देतो. वर्तनामध्ये परिवर्तन व्हावे असे जर शिक्षक बांधवांना वाटत असेल तर त्यांनी ख-या अर्थाने त्याकडे विशष लक्ष दिले पाहिजे. त्याचबरोबर पर्यवेक्षीय यंत्रणांना मजबूत करण्याचे शासनाने

प्रयत्न केलेले आहेत शिक्षणाच्या बाबतीत केवळ एका माणसाची जबाबदारी आहे असे नाही तर या संदर्भात लोक चळवळ निर्माण व्हावी या साठी ग्राम शिक्षण समिती गठीत करण्यात आलेली आहे व त्या समितीला शिक्षणाच्या बाबातीत अधिकार दिले आहेत त्याचबरोबर तालुका शिक्षण समिती व जिल्हा शिक्षण समिती देखील गठीत करण्यात आली असून या निमित्ताने माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी किमान तीन चार महिन्यातून एखादी बैठक घ्यावी व या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके..

कामाला अधिक गती देण्याचा प्रयत्न करावा. हे अधिवेशन उद्या संपत आहे तेव्हा उद्या या सबंधीच्या जी.आर.च्या प्रती मी आपल्याला देण्यास तयार आहे. शिक्षण क्षेत्र हे गतीमान करण्यासाठी सर्वानी नैतिक पाठिंबा द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय,गुणवत्ता कार्यक्रम विकास राबविण्यात येतो या कार्यक्रमामध्ये सर्व मुलांना जर सामावून घ्यावयाचे असेल तर दररोज शिकविल्याशिवाय या विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही तेव्हा त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना दररोज शिकविण्यात यावे अशी माझी शिक्षकांना विनंती आहे. पर्यावरणाच्या विषयाच्या संदर्भात कोणताही संभ्रम नाही फक्त विद्यार्थ्यांना जी ग्रेड देण्यात येते ती व्यवस्थितपणे देण्यात यावी अशी मी शिक्षक बांधवांना व प्राचार्यांना विनंती करतो

सभापती महोदय, गेल्या तीन वर्षापासून या संदर्भात चर्चा सुरु आहे मात्र त्यात काहीही सुधारणा झालेली नाही तेव्हा जमत नसेल तर शिक्षण मंत्र्यांनी सोडून द्यावे असे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले आहे. मला त्यांना असे सांगावयाचे आहे की एक मे 1960 पासून जन्माला आलेल्या महाराष्ट्र राज्यातील शिक्षण खात्यातील कोणत्या शिक्षण मंत्र्यांनी गुणवत्ता विकास कार्यक्रमामध्ये लक्ष दिले होते, शिक्षकांच्या उपस्थितीवर कोणी लक्ष दिले होते ? आज 15 ते 25टक्के शिक्षक अनुपस्थित रहात आहेत. 95 टक्के शिक्षक अप्रामाणिक आहेत असे मी म्हटल्याचे लोकांना सांगितल्यानंतर शिक्षकांनी चिडून जाण्याचा प्रकार आता थांबला पाहिजे. शिक्षकासाठी आचारसंहिता लावण्यात येणार आहे असे सांगितले जाते. वास्तविक तो विषय अजेंडयावर नाही. परंतु मी विचारु इच्छितो की, शिक्षकासाठी आचारसंहिताच नसावी काय ? महाराष्ट्रातील सर्व कर्मचा-यांना नियम लागू असतील व त्यांना कोणत्याही पत्रकारासमोर जाता येत नसेल तर शिक्षकांनीसुध्दा काही नियम का पाळू नयेत असा माझा मुलभूत प्रश्न आहे. आज आचारसंहितेचा विषय अजेंडयावर नाही.तरी सुध्दा शिक्षकांना दुसरी बायको करता येणार नाही, तिसरी बायको करता येणार नाही, अमुक खर्च करता येणार नाही असे विषय आचारसंहितेत असल्याचे सांगितले जाते . हा आमचा बिलकूल अजेंडा नाही तरीही मी सांगू इच्छितो की, एक आदर्श संहिता महाराष्ट्रात लागू केल्याशिवाय मी राहणार नाही .त्या आचारसंहितच्याबाबतीत कोणीही बाऊ करण्याचे कारण नाही. आचारसंहितेमुळे कोणाला त्रास व्हावा असा माझा बिलकूल हेतू नाही.



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 18.50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके..

केवळ शिक्षकांना धडा शिकविण्यासाठी असे करण्यात येत आहे असे आपण मानता कामा नये शिक्षण खाते व्यवस्थितपणे  चालविण्यासाठी तुम्हा सर्वाचे नैतिक पाठिंबा मला मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ SBT/ MMP/ 18:55

प्रा. वसंत पुरके...

सभापती महोदय, याठिकाणी शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शासन जे जे काही करील ते करण्यामध्ये विरोधी पक्षाचे सहकार्य अपेक्षित आहे. माननीय श्री. दिवाकर रावते यांनी लोकसत्ता वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या अग्रलेखाबाबत याठिकाणी सांगितले. अग्रलेखात असे म्हटले आहे की, "हे मंत्री अध्यात्माचे खूप धडे गिरवितात परंतु समाजाचे यांच्याकडून काहीही चांगले झाले नाही." आणि म्हणून मी याठिकाणी अभिमानाने सांगतो की, आज सर्व शिक्षक हे राईट टाईम नाही तर बिफोर टाईम शाळेत जायला लागले आहेत. माझी मुले इंग्रजीमध्ये, मराठीमध्ये बोलायला लागली आहेत. मुलांच्या गणिताच्या कन्सेप्ट क्लिअर व्हावयास लागल्या आहेत. शाळा स्वच्छ व्हावयास लागल्या आहेत. ज्याप्रमाणे ग्राम स्वच्छता अभियानाचा कार्यक्रम राबविला जातो त्याप्रमाणे शाळेचा परिसर आणि शाळेतील शौचालये सुध्दा स्वच्छ होऊ लागली आहेत. याबाबत सर्व शिक्षक बांधवांना आपण धन्यवाद दिले पाहिजे. सभापती महोदय, 47 हजार शाळा खोल्या बांधण्यामध्ये माझ्या शिक्षक बांधवांचा मोठा वाटा आहे. अशा परिस्थितीत त्या शिक्षकांच्या मनामध्ये अविश्वास आणि संभ्रम निर्माण करणे बरोबर होणार नाही. त्याठिकाणी पर्सेंटाईल सिस्टीम, हायफाय मुलांची जबाबदारी, पहिलीपासून इंग्रजी, त्रिभाषा सूत्री संदर्भात माझी आपणास विनंती आहे की, आपण दोन भाषा स्वीकाराव्यात. दहावी आणि बारावीमध्ये जर आपण दोनच भाषा स्वीकारल्या तर माझ्या मुलांचा वेळ वाचेल, त्यांना अभ्यास करता येईल. त्यांना आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई. च्या मुलांसोबत स्पर्धा करता येईल. माझी अशाचप्रकारची मानसिकता आहे. म्हणून आपण याबाबतीत शासनाला सहकार्य करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, शासनाने ॲडमिशनच्या बाबतीत निर्णय घेतांना सर्वांना विश्वासात घेतले पाहिजे. पुढील वर्षापासून आम्ही ॲडमिशन सेंट्रलाईज करण्याच्या मनस्थितीत आहोत. तरीसुध्दा या राज्यात होणाऱ्या परीक्षांमध्ये जे गैरव्यवहार होतात, ते बंद करावयाचे असतील तर याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, या वर्षी दहावी आणि बारावीची परीक्षा जर आपण जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सुरु केली तर हे सर्व बोगस प्रकार बंद झाल्याशिवाय रहाणार नाहीत. याबाबतीत आपण मला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. कारण कॉप्या पुरविणे, मुलांना कोरे ठेवणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण न करणे असे जर प्रकार होत असतील तर माननीय उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत आम्हाला सहकार्य करावे. माननीय श्री. रावते साहेब मी आपणास देखील विनंती करतो की, लोकसत्ता वर्तमानपत्रातील अग्रलेखामध्ये जरी काही लिहिले असले तरी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

मी त्याबाबत खुलासा करण्याचे कारण नाही. कारण त्यांनी जाणून न घेता म्हणजे आपण ज्याला "Art of understanding other people" असे जर काही लोकांच्या स्वभावामध्ये असेल तर ते समजून घेतील. पुरेशी माहिती न घेता सुध्दा काही लोक चांगल्या प्रकारे लेख लिहू शकतात. दोन स्तरीय गणिताची पध्दत सुरु केली आहे आणि त्यामुळे जर आपली 13 ते 15 टक्के मुले उत्तीर्ण होत असतील आणि बाहेरची मुले जर याठिकाणी येत असतील तर व्दिस्तरीय गणित आवश्यक आहे. इंजिनिअरींगसह सर्वच प्रकारचे मार्ग त्यांच्यासाठी खुले आहेत. त्याबाबत पाल्य आणि पालकांच्या मनात कोणत्याही प्रकारचा संभ्रम असताकामानये अशी माझी सूचना आहे. पुढील वर्षीपासून केंद्रीय पध्दतीने प्रवेश देण्याची पध्दत सुरु करण्यात येईल. सी.बी.एस.ई.आणि आय.सी.एस.ई. मध्ये मराठीची सक्ती करण्यासंदर्भात जर ते घमेंडखोर पध्दतीने वागत असतील तर त्यांना धडा शिकविण्यात यावा असे माननीय सदस्य श्री.रावते यांचे म्हणणे आहे. आम्ही दिलेले निकष जर सी.बी.एस.ई.आणि आय.सी.एस.ई. पाळीत नसेल तर त्यांना देखील धडा शिकविल्याशिवाय मी रहाणार नाही.

डॉ.दीपक सावंत : म्हणजे नक्की काय करणार?

प्रा.वसंत पुरके : आम्ही त्यांना एन.ओ.सी. देणार नाही...

डॉ. दीपक सावंत : त्यांनी ऑलरेडी एन.ओ.सी. घेतली आहे...

प्रा. वसंत पुरके : माननीय सदस्यांनी माझे थोडे ऐकून घेतले पाहिजे. यावर्षी आम्ही सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. ला स्वतंत्र पॅरामीटर लावणार आहोत. ज्या लोकांना आम्ही एन.ओ.सी.देतो ते जर खऱ्या अर्थाने अँटी नॅशनल ॲक्टिव्हिटीज राबवीत असतील, वंदे मातरम आणि राष्ट्रगीत म्हणत नसतील तर त्यांच्यावर देखील आम्ही कारवाई केल्याशिवाय रहाणार नाही. प्रश्न असा आहे की, सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. मध्ये समतेचे तत्व येण्यासाठी जे काही करणे आवश्यक आहे ते निश्चितपणे केल्याशिवाय रहाणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री प्रा. पुरके साहेबांचे पत्र मी सभागृहात वाचून दाखविले. ते बऱ्याच माननीय सदस्यांनी ऐकले आहे. त्यात म्हटले आहे की, आम्ही ना हकरत प्रमाणपत्र दिल्यानंतर त्या शाळांना आपण वंदे मातरम आणि राष्ट्रगीत म्हणावयास सांगणार आहात. परंतु ज्या संस्थांना ऑलरेडी परवानगी दिली आहे, आणि ज्या शाळा मुळातच सुरु आहेत..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : त्या शाळांची एन.ओ.सी. काढून घेतल्याशिवाय आम्ही रहाणार नाही. राष्ट्रविरोधी काम करतांना जर कुणी आढळले तर त्यांच्याविरुध्द आम्ही निश्चितपणे कारवाई करु. किमान त्याबाबत केंद्र सरकारला आम्ही विनंती करुन कळवू.

डॉ. दीपक सावंत : चिनॉय कॉलेजचे काय झाले? त्याबाबत सांगा.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, चिनॉय कॉलेजच्या संदर्भात सांगू इच्छितो की, जर अशाप्रकारे एखादा संस्था चालक जमिनीच्या हव्यासापोटी, जमिनीच्या किंमतीपोटी, मॉल उभा करण्याच्या हव्यासापोटी जर कुणी नखरे करीत असेल तर आम्ही निश्चितपणे त्याकरिता एक नवीन विधेयक आणू.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. खरे म्हणजे चिनॉय कॉलेजच्या बाबतीत विधेयक आणण्याचा प्रश्नच नाही. कारण हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे आणि या निर्णयाप्रमाणे तुमचे जे निकष आहेत, त्याप्रमाणे ते महाविद्यालय सुरु आहे. पण जर तुमच्या निकषाप्रमाणे महाविद्यालय चालविण्यासाठी तेथील प्रशासन मज्जाव करीत असेल, तयार नसेल तर ते बरखास्त करण्यात यावे आणि तुम्ही ते कॉलेज ताब्यात घेऊन चालवावे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना सांगू इच्छितो की, यामध्ये थोडी टेक्नीकल अडचण आहे. यामध्ये आमचा संबंधितांना बिलकूल पाठीशी घालण्याचा प्रयत्न नाही आणि प्रशासक वगैरे नेमण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आलेली आहे. त्यादृष्टीने कारवाई देखील सुरु झालेली आहे. आम्ही यासाठी स्पेशल, खाजगी वकील नेमलेला असून ज्यामुळे आपल्यावर कोणत्याही प्रकारे डिफीट होण्याची वेळ येणार नाही आणि जर समजा असे झाले तर आपण सुप्रीम कोर्टामध्ये जाऊ. पण संबंधितांना धडा शिकविल्याशिवाय रहाणार नाही अशी मी ग्वाही देत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टामध्ये जाण्याचा प्रश्न कुठे येतो ? सुप्रीम कोर्टामध्ये केव्हा जाणार, ज्यावेळी . . . ..

**उपसभापती** : मला एक मिनिट बोलू द्यावे. एक सरळ साधी गोष्ट आहे की, या कॉलेजला शिक्षण संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे. तेथे शैक्षणिक ॲक्टीव्हीटीज सुरु आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये सदरच्या वापरामध्ये बदल करता येणार नाही. राज्य शासनाने त्यांना तशा प्रकारची एन.ओ.सी.देऊ नये. जेणेकरुन संबंधितांना शैक्षणिक ॲक्टीव्हीटीशिवाय इतर कोणती तरी ॲक्टीव्हीटी सुरु करता येईल.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, एन.ओ.सी.विड्रॉ करण्यामध्ये थोडीशी अडचण आहे. पण आम्ही निश्चितपणे सरकार म्हणून विद्यार्थ्यांच्या हितासाठी जे-जे काही करणे शक्य आहे, ते आम्ही हमखास करु आणि आता ही सर्व प्रक्रिया अंतिम टप्प्यमध्ये आलेली आहे. आपण निश्चितपणे निर्णयाप्रत येऊ. याठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी . . . .

(काही सन्माननीय सदस्य बोलतात.)

**उपसभापती** : या प्रस्तवावरील चर्चा पाच तास सुरु आहे. अजून किती वेळ लागणार आहे?

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

. . . .4 एक्स-2

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आता फक्त दोनच महत्वपूर्ण बाबी राहिलेल्या आहेत. माझ्या सर्व शिक्षक आमदार महोदयांनी दोन विषय उपस्थित केले होते. यातील एक विषय असा होता की, आता नव्याने कोणालाही शाळा देण्यात येऊ नयेत. हा एक महत्वाचा विषय आपल्यासमोर आलेला आहे. दुसरा विषय म्हणजे वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीतही भूमिका मांडण्यात आली. मी याठिकाणी अभिवचन देऊ इच्छितो की, वेतनेतर अनुदान देण्याच्या संबंधात या राज्याचे माननीय वित्तमंत्री, या राज्याचे माननीय उच्च शिक्षण मंत्री, मी स्वत: आणि बाकी अन्य लोक यांची एक समिती गठित झाली होती. या विषयाच्या संबंधातील निर्णय अंतिम टप्प्यामध्ये असून, आता मला या विषयाच्या संदर्भातील नोट मंत्रिमंडळापुढे सादर करावयाची आहे. शासनाने वेतनेतर अनुदान देण्याच्या बाबतीत निश्चितपणे 100 टक्के सकारात्मक भूमिका घेतलेली आहे. याबाबत टक्केवारीची लिस्ट ठरवून दिलेली आहे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : कायम विनाअनुदानाच्या बाबतीत काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, कायम विनाअनुदानाच्या तत्वासंदर्भात सांगावयाचे तर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी म्हटल्याप्रमाणे आम्ही कोणालाही निमंत्रण दिलेले नाही. आम्ही कोणाच्याही बाबतीत आग्रही भूमिका घेतलेली नाही. पण त्यांनी स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेले आहे. अशा अवस्थेमध्ये त्यांना अनुदान द्यावयाचे की नाही ही बाब अजूनही निश्चितपणे शासनाच्या विचाराधीन नाही. जर कायम स्वरुपी संस्था असेल तर त्या त्यांनी स्वत:च्या भरवशावर चालविल्या पाहिजेत अशी मी या सदनाच्या माध्यमातून विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : पगाराबाबत काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, संबंधित संस्थेने पगार देखील द्यावा असा निर्णय आहे. जर त्याप्रमाणे देत नसतील, एक्सप्लॉयटेशन होत असेल तर आम्ही निश्चितपणे उचित कारवाई करु अशी मी ग्वाही देतो. सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेमध्ये ज्या-ज्या सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला आणि अतिशय पोटतिडकीने समस्या मांडल्या आहेत, त्या सर्व सन्माननीय सदस्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो आणि माझे उत्तराचे भाषण संपवितो.

----

. . . .4 एक्स-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय शिक्षण मंत्र्यांचे भाषण अतिशय लक्षपूर्वक ऐकलेले आहे. गेल्या आठवडयामध्येच आमच्या कॉलेजचा सुवर्ण महोत्सव झाला. त्यावेळी तेथे आमचे प्राध्यापक भेटले होते. ते ज्या नोटस् घेऊन आम्हाला शिकवत होते, त्याच नोटस् घेऊन ते आजही शिकवत आहेत. तसे माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांच्या बाबतीत आहे. यापूर्वी त्यांची जी दोन वेळा भाषणे झालेली आहेत, ती भाषणे आणि आजचे भाषण यामध्ये काहीच अंतर नाही. आमचे स्पेसिफिक दोन प्रश्न होते. आम्ही माननीय मंत्री महोदयांना पहिला प्रश्न विचारला होता की, काही निर्णय एप्रिल-मे महिन्यामध्ये होतात आणि त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होत असताना गोंधळ निर्माण होतो. तर यापुढे कोणतेही शैक्षणिक निर्णय घ्यावयाचे असतील तर ते पहिली टर्म संपण्यापूर्वीच घेतले जातील आणि त्याची येणाऱ्या टर्ममध्ये अंमलबजावणी होईल असा शासन निर्णय घेणार आहे काय ? दुसरा प्रश्न असा विचारला होता की, पाठ्यपुस्तक मंडळाच्या चुकांच्या बाबतीत "मारु पैजारा, मारु लाठया" वगैरे सगळे झाले. पण याबाबतीत कोणावर कारवाई केली ? याबाबतीत कोणाला काही कळले काय ? तर नाही कळले. इतका मोठा गोंधळ झाला पण याबाबतीत कोणावर कारवाई केली याचे ठोस उत्तर मिळालेले नाही. किमान या दोन प्रश्नांची जरी उत्तरे मिळाली तरी आम्ही जी चर्चा उपस्थित केली आणि बाकीचे जे . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, परसेंटाईल सिस्टीम बाबत काय ? जर उद्या परसेंटाईल सिस्टीम कोर्टाने रद्द केली तर आपण विद्यार्थ्यांचे प्रवेश कशा प्रकारे करणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी तीच-तीच उत्तरे दिली जात आहेत अशी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेसाहेबांची तक्रार आहे.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

आता आपले सर जर दोन गुणिले दोन चार म्हणत असतील तर त्यांचा नातू सुध्दा गणित शिकवताना दोन गुणिले दोन चारच म्हणणार. गणित कसे बदलणार ? प्रश्न जर तेच असतील तर उत्तर सुध्दा तेच राहील. तेच ते प्रश्न सन्माननीय सदस्य विचारत आहेत. आजार जर तोच असेल तर ..

श्री. विनोद तावडे : गेल्या वेळी परसेंटाईल नव्हते. आपण आता सभागृहात आला आहात. आपण या चर्चेच्या वेळी उपस्थित नव्हता.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, खरे म्हणजे सन्माननीय सदस्यांना तेव्हाच कळावयास पाहिजे होते. महाराष्ट्रीयन मुलेही चांगल्या कॉलेजमधील प्रवेशापासून वंचित राहतात हे आपल्याला तेव्हा का दिसले नाही ? मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, निर्णय घेताना आम्ही पूर्वसूचना देऊ, ते जाहीर करु. परंतु परसेंटाईल सिस्टीमच्या संदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्याबाबत जो निर्णय येईल त्यानंतर या कोणत्याही मुलांचे नुकसान होणार नाही अशा प्रकारचा आम्ही निर्णय घेऊ. पुस्तकाच्या संदर्भात देखील नम्रपणे सांगू इच्छितो की, नवीन पुस्तक छापण्याच्या बाबतीत जबाबदार कोण, चुका किती घडल्या, किती पैसे वाया गेले यासंदर्भात खऱ्या अर्थाने निर्णयाप्रत येण्यासाठी पहिल्यांदा महाराष्ट्राच्या विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांची समिती गठीत केली आणि त्या समितीमध्ये आम्ही निर्णयाप्रत आलेलो आहोत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सुध्दा त्या समितीमध्ये आहेत. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल आणि सन्माननीय सदस्य जे काही ठरवतील त्या निर्णयासोबत मी असणार आहे. खरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनीच मागणी केली होती म्हणून याबाबतचा कालावधी वाढलेला आहे. माझा कालावधी वाढविण्याचा अजिबात हेतू नाही. सभागृहात देखील त्यांना निलंबित करण्यास तयार होतो. पण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांच्या सूचनेप्रमाणे कोणाचाही बळी देता कामा नये म्हणून ही समिती गठीत केली. त्या ठिकाणी निर्णय अंतिम टप्प्यात आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : मी माझ्या भाषणामध्ये मराठी विषयाच्या बाबतीत मुद्दा मांडला होता. एन.ओ.सी. देताना आम्ही राष्ट्रगीताच्या बाबतीत कठोर भूमिका घेतली तसेच एन.ओ.सी. देताना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जितेंद्र आव्हाड .....

मराठी विषयाच्या बाबतीत सुध्दा तसे केले पाहिजे. तामिळनाडूमध्ये, आंधप्रदेशमध्ये, केरळमध्ये तसेच इतर सगळ्या राज्यांमध्ये आयसीएसई, सीबीएसई या सगळ्यांमध्ये त्यांच्या राज्याची भाषा कंपल्सरी आहे. मग मराठीच कंपल्सरी का होत नाही ? आपण आम्हाला सभागृहामध्ये आश्वासन दिले आहे की, आम्ही ते करणार.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, त्या निकषामध्ये हे देखील घालण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक

**मु.शी.**: सन 2005 चे, वि. स. वि. क्र. 89- महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्याची मुदत वाढविण्यासंबंधी प्रस्ताव

श्री. चंद्रकांत हंडारे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सन 2005 चे. वि. स. वि. क्रमांक 89 - अंधविश्वास आणि अज्ञानावर पोसल्या जाणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांपासून सामाजातील सर्वसामान्य लोकांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने, तसेच समाजातील सर्वसामान्य लोकांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक शोषण करुन त्यांचे नुकसान करण्याच्या, व त्याव्दारे समाजाची घडी विस्कटून टाकण्याच्या दुष्ट हेतूने वैदू व भोंदूबाबा यांनी सामान्यत: जादूटोणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तथाकथित अतींद्रिय किंवा अतिमानुष शक्ती किंवा चमत्कार करुन भूतपिशाच्च यांच्या नावाने जनमानसात रुजवलेल्या अंध विश्वासापोटी निर्माण होणाऱ्या अनिष्ट व दुष्ट प्रथांचा व अघोरी रुढींचा मुकाबला करुन त्याचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने यासंबंधात समाजामध्ये जागृती व जाणीव निर्माण करण्याकरिता तसेच निकोप व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याकरिता, आणि तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक यावर विचार करण्याकरिता दिनांक 17 एप्रिल, 2007 रोजी नेमण्यात आलेल्या संयुक्त समितीने आपला अहवाल सादर करण्यासाठी नेमून दिलेली मुदत विधान परिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत वाढविण्यात यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक

**मु.शी.**: सन 2005 चे, वि. स. वि. क्र. 89-महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावरील संयुक्त समितीचे पुनर्गठन

श्री. चंद्रकांत हंडोरे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, सन 2005 चे वि. स. वि. क्रमांक 89- महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक यावर विचार करण्यासाठी दिनांक 17 एप्रिल, 2007 रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीवरील रिक्त झ ालेल्या जागांवर पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

1) ॲड. प्रितमकुमार शेगांवकर, माननीय राज्यमंत्री, सामाजिक न्याय
2) श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्ष नेता, विधान परिषद
3) श्री. गुरुनाथ कुलकर्णी, वि. प. स.
4) श्री. मुझफ्फर हुसैन, वि. प. स.
5) डॉ. दीपक सावंत, वि. प. स.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

----

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIV OF 2008.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' SALARIES AND ALLOWANCES ACT)

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. प. वि. क्रमांक 14 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, मैल भत्त्याच्या संदर्भात शासनाकडे अनेक प्रस्ताव आले होते. सन्माननीय सदस्यांना दूरध्वनी, लेखनसामग्री आणि टपालखर्च इत्यादींसाठी ठोक रक्कम देण्यात येते, त्याप्रमाणे दौ-याच्या प्रयोजनार्थ मैल भत्ता म्हणून दरमहा पंचवीस हजार रुपये एवढी ठोक रक्कम देण्याचे प्रयोजन या विधेयकाद्वारे करण्यात आले आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, हे विधेयक सभागृहाने एकमताने मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.भास्कर जाधव ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, वि.प.वि.क्रमांक 14 यावर मी थोडक्यात माझे विचार मांडू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना वाहन भत्त्यासाठी दरमहा 25 हजार रुपये देण्याची तरतूद असलेले हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. सदस्यांना त्यांच्या मतदार संघात जाण्यासाठी जिल्हाधिका-यांकडून 15 दिवसांसाठी उपलब्ध होत असलेली गाडी त्यांनी घेतली नाही तर त्यांना तशाप्रकारचे प्रमाणपत्र द्यावे लागत होते. सदस्यांच्या लेखनसामग्री, दूरध्वनी व टपालखर्चावर अनेकदा टीका केली जाते, बाहेर आरडाओरड होते. या विधेयकाच्या निमित्ताने मला हे स्पष्ट करावयाचे आहे की, दरमहा 2500 कि.मी.प्रवास गृहित धरला जातो. परंतु या सभागृहातील असे एक तरी सदस्य दाखवावे की, ज्यांचा दरमहा 2500 कि.मी.प्रवास होतो. आज कोणत्याही मतदार संघात जाण्यासाठी कोणाची कितीही चांगली गाडी असली तरी 4 हजार कि.मी.पेक्षा कमी प्रवास होत नाही. एक लिटर डिझेलमध्ये 10 कि.मी.पेक्षा जास्त ॲव्हरेज मिळत नाही. मुंबई-पुणे एक्सप्रेसवे वरुन गेलो तरी एक लिटर डिझेलमध्ये 6-7 कि.मी.पेक्षा जास्त ॲव्हरेज पडत नाही. सध्या एक लिटर डिझेलचा दर 40 रुपये आहे, पेट्रोलचा दर 50 रुपये आहे. जर दरमहा 4 हजार रुपये गाडीचे रनिंग होत असेल तर आणि कितीही काटकसरीने गाडीचा वापर केला तरी महिन्याला डिझेलसाठी 14 हजार रुपये खर्च येतो. आज 10 लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीची गाडी घ्यावी लागते. गाडीसाठी शासनाला 10 टक्के दराने व्याज द्यावे लागते. 12 ते 14 लाख रुपये किंमतीच्या गाडीसाठी 5 वर्षाकरिता दरमहा 28 हजार रुपयांचा हप्ता द्यावा लागतो. त्याशिवाय आज 10 हजार वेतन दिल्याशिवाय वाहन चालक काम करीत नाही. गाडीच्या मेंटनन्ससाठी, सर्व्हिसिंगसाठी महिन्याला 10 हजार रुपये खर्च येतो, गाडी कितीही चांगल्या प्रकारे वापरली तरी व्हील बलन्सिंग, अलाईनमेंटसाठी 5 हजार रुपये खर्च येतो. म्हणजे सदस्यांना दरमहा एकूण 50 हजार रुपये खर्च येतो. सदस्यांना प्रामाणिकपणे मतदार संघामध्ये काम करावयाचे असेल तर हा पैसा त्यांनी कोठून आणावयाचा ? म्हणून माझे म्हणणे आहे की, नेहमी बाहेर जी टीका होता ती अनाठायी आहे. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना मतदार संघात प्रामाणिकपणे काम करण्यासाठी आता हे जे विधेयक आणलेले आहे त्यामध्ये दरमहा 50 हजार रुपये देण्याची तरतूद करावी. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी सभागृहासमोर वि.प.वि.क्रमांक 14 मांडलेले आहे. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी एक मुद्दा उपस्थित केला आहे, त्यासंबंधी बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मतदार संघामध्ये जाण्याकरिता जिल्हाधिका-यांकडून महिन्याला 15 दिवस 2500 कि.मी.इतका प्रवास करण्यासाठी गाडी उपलब्ध करुन दिली जात होती. परंतु त्यांनी गाडी वापरली नाही तर तशाप्रकारचे प्रमाणपत्र सादर केल्यावर त्यांना दरमहा 25 हजार रुपयांचा क्लेम करता येत होता. त्याऐवजी आता सदस्यांना दरमहा 25 हजार रुपये इतकी ठोक रक्कम दिली जाणार आहे. त्यामध्ये बदल केलेला नाही. विधानमंडळाची वेतन व भत्ते समिती आहे. या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत जरुर चर्चा करता येईल. तथापि, आज हे विधेयक सभागृहाने मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 14 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.प.वि.क्रमांक 14 संमत झाले आहे.

---------

नंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे धार्मिक ग्रंथाच्या विटंबनेतून झालेली दंगल

**मु.शी.**: यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे धार्मिक ग्रंथाच्या विटंबनेतून झालेली दंगल या विषयावर श्री. पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उपसभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय विरोधी पक्षनेते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"यवतमाळ जिल्हयातील दिग्रस येथे दिनांक 18 जुलै 2008 रोजी धार्मिक ग्रंथाची कथित विटंबना होणे, धार्मिक ग्रंथाची विटंबना झाल्यामुळे दोन गटात झालेली दंगल, धार्मिक ग्रंथाच्या विटंबनेच्या निषेधार्थ सर्व पक्षांच्या तसेच व्यापारी संघटनांच्या वतीने दिनांक 19 जुलै 2008 रोजी काढलेला निषेध मोर्चा, मोर्चा कच्छी चौकात येताच त्या मोर्चावर काही समाजकंटकांनी केलेली दगडफेक, राजकीय नेते व नागरिक जखमी होणे, दिग्रस शहरात उसळलेला हिंसाचार काबूत आणण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एका व्यक्तीचा झालेला मृत्यू, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, या विषयावर विधानसभेमध्ये विस्ताराने चर्चा झालेली असल्यामुळे मी थोडक्यात महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. 18 जुलैला दिग्रस मधील मुख्य बाजार पेठेत मशिदीच्या ठिकाणी पायरीवर कुराणाच्या प्रतीची विटंबना केल्याचे आढळले आणि दंगलीला तेच निमित्त झाले. आग पसरावी तशी दंगल पसरली. खरे म्हणजे वर्तमानपत्रांनीच ती बातमी सर्व शहरामध्ये पसरवली. सर्व व्यापारी संकुलांना आगी लावण्यास प्रारंभ झाला. आगी लावण्यात आलेल्या दुकानांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. ही अफवा जिल्ह्यामध्ये पसरली. खरे म्हणजे दिग्रस येथे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

काहीही न घडता त्याचे पडसाद पुसद येथे उमटले. गुजरी चौकातून काही समाजकंटक हातात नंग्या तलवारी घेऊन रस्त्यावर उतरले, ते पुसदच्या बाजारपेठेत घुसले. बाजारपेठेमध्ये ज्या दुकानदारांनी दुकाने बंद करण्याचा प्रयत्न केला त्यांना मारहाण करण्यात आली. हा जमाव नंतर रस्त्यावर गेला आणि त्या जमावाने 50 वाहनांची मोडतोड केली. दिग्रसमध्ये घडलेल्या घटनेचे पडसाद नेर, पुसद, दारव्हा, आर्णी या भागात उमटले. सभापती महोदय, या प्रकाराला दंगल म्हणता येणार नाही. एका पायरीवर कुराणाची प्रत आढळली, त्या प्रतीखाली चप्पल सापडली आणि त्यानंतर हा सारा प्रकार सुरु झाला. ही दंगल दुतर्फा नव्हता तर एकतर्फी हल्ला करण्याचा प्रकार घडलेला आहे. पुसद या ठिकाणी शांतता मोर्चा काढण्यात आल्यानंतर त्या मोर्चावर दगडफेक करण्यात आली, नंग्या तलवारीने त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. शांतता मोर्चा काढणारे सर्वसामान्य नागरिक होते. त्यांना मारण्यात आले. निरपराध लोकांना पोलिसांनी पकडले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये एक जण ठार झाला. गोळीबार करुनही जमाव थांबत नव्हता, तो आक्रमक झाला होता, पोलीसांना देखील मार लागून ते जखमी झाले. अशा प्रकारच्या प्रवृत्ती वाढायला लागलेल्या आहेत. या प्रवृत्ती रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

दंगलीचे पडसाद संपूर्ण जिल्हयात उमटावेत, जिल्हयामध्ये अशांतता निर्माण व्हावी, सर्वसामान्य नागरिकांना त्रास व्हावा, म्हणून घटना जाणीवपूर्वक घडविल्या जात आहेत, जे कोणी अशा घटना जाणीवपूर्वक करीत असतील त्यांच्यावर वचक बसविला पाहिजे. घटना घडविणारी गुंड प्रवृत्तीची माणसे आहेत त्यांना वेळीच आवर घातला गेला पाहिजे अशी माझी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे. माझी माहिती अशी आहे की, त्या ठिकाणी नव्याने पोलीस अधीक्षक बदलून आले होते, त्यांनी संपूर्ण जिल्हयातील दोन नंबरचे धंदे बंद केले. त्यामुळे त्या भागातील गुन्हेगारी घटकांनी पोलीस यंत्रणेस बदनाम करण्यासाठी एका जमावाला वेठीला धरले, समाजाला वेठीला धरले आणि अशा प्रकारची घटना जाणीवपूर्वक घडवून आणली. या घटनेमुळे पोलीस यंत्रणा बदनाम झाली, परंतु सर्वसामान्य जनतेला त्रास सोसावा लागला. म्हणून या घटनेची संपूर्णपणे सखोल चौकशी करुन याप्रकरणी जे गुंड असतील त्यांचे विरुध्द तातडीने कारवाई करावी अशी माझी मागणी आहे. सभापती महोदय, या ठिकाणी पोलिसांनी काही निरपराध असलेल्या 24 लोकांविरुध्द केसेस भरलेल्या आहेत, त्यांच्यावरील केसेस त्वरित मागे घेण्यात याव्यात अशी माझी शासनास विनंती आहे. तेथील पोलीस अधीक्षकांमुळे ज्या गुंडाचे क्रिमनल धंदे बंद झाले आहेत, त्या सर्व क्रिमिनल लोकांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यात यावी, तसेच निरपराध लोकांवर पोलीस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत, त्या केसेस त्वरित मागे घेण्यात याव्यात अशी मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सांगलीच्या घटनेच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जशी भूमिका मांडली तशी भूमिका या घटनेच्या बाबतीतही घेतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. तेथील जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अवैध धंदे बंद केल्यामुळे त्या व्यवसायिकांनी ही घटना घडवून आणली अशा प्रकारची माहिती पूर्वीच प्रसिध्द झाली आहे. तेथील पोलीस अधीक्षकांनी कायदा व सुव्यवस्था अतिशय चांगल्या पध्दतीने हाताळली त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी तेथील कायदा व सुव्यवस्था चांगल्या पध्दतीने हातळली नसती तर या दंगलीमध्ये तीनशे ते चारसे माणसे मृत्यूमुखी पडली असती. ही घटना घडल्याबरोबर मी स्वत: त्यांच्याबरोबर दूरध्वनीवरुन बोललो. त्यांनी मला सांगितले की, तुम्ही इकडे येऊ नका. येथील कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती मी व्यवस्थितपणे हाताळतो आहे. एक वेळ हिंदुची भगवत गीता रस्त्यावर मिळेल परंतु कुराण रस्त्यावर कधीही आढळून येणार नाही. त्यांच्या धर्माबद्दलच्या भावना अतिशय तीव्र आहेत, म्हणून त्यांना आपण धर्मांध म्हणतो. आम्हाला तुम्ही जातीयवादी म्हणता. धर्माच्या बाबतीत ते कधीही कॉम्प्रोमाईज करीत नाहीत. सभापती महोदय, कोणी तरी पायरीच्या खाली कुराण आणून ठेवले ही गोष्ट मुळात माझ्या मनाला पटतच नाही. कदाचित तसे घडले असेल. मी जिल्हा पोलीस अधीक्षकांना सांगितले की, पायरीजवळ श्वॉन स्क्वॉड घेऊन त्या श्वानाला तेथील जागेचा, वस्तुंचा वास घेऊ द्यावा. श्वानपथकाच्या माध्यमातून तुम्हाला आरोपी निश्चितपणे सापडेल. मुंबई येथे महमंद अली रोडवर मोठया प्रमाणात मुस्लीम समाजाची वस्ती आहे, तशीच वस्ती त्या ठिकाणी आहे. त्या ठिकाणी शांतता मोर्चा काढण्यात आला होता, त्या शांतता मोर्चावर होणारा हल्ला थांबविण्याचे काम जिल्हा पोलीस अधीक्षकांनी केलेले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी नोंद घ्यावी असे काम केले आहे. कोणी कोणाला जाणीवपूर्वक मारत नाही. तेथील उप जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अरविंद गांदेवार यांच्यावर एका जमावाने सहा-सात वार केले. या घटनेच्या संदर्भातील दोन गोष्टी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. विदर्भात सीमी संघटनेच्या कारवाया वाढत चालल्या आहेत ही गोष्ट यापूर्वीच मी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यावेळी सदरच्या कारवाया तातडीने बंद करण्यात येतील अशी माहिती माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली होती. "देशोन्नती" या वृत्तपत्रात बातमी छापून आलेली आहे. ती बातमी मी मुद्दाम या ठिकाणी वाचून दाखवितो. दारव्हा येथे

3...



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 19:20

श्री. दिवाकर रावते....

कंबलकोष बाबा, सैलानी बाबा अशी असंख्य पवित्र स्थाने आहेत. ती स्थाने हिंदु आणि मुस्लीम समाजाची श्रध्दास्थाने आहेत. पुसद, दारव्हा, यवतमाळ,दिग्रस येथे सीमी या दहशतवादी संघटनेचे कार्यकर्ते सक्रीय झालेले आहेत. गेल्या अनेक वर्षापासून या गोष्टीकडे डोळेझाक करीत असलेली प्रशासकीय यंत्रणा यास जबाबदार आहे. एक प्रकारे या यंत्रणेकडून सदर संघटनेस आतापर्यंत अभय मिळत आलेले आहे. दिग्रस, पुसद दंगलीत अनेक कुविख्यात प्रवृत्तीचे लोक सहभागी आहेत असे निष्पन्न झाले आहे. हेच समाजकंटक समाजात जातीय तेढ निर्माण करुन दंगली घडवितात. अमरावती येथे अशाच पध्दतीने दंगल घडवून आणली गेली होती. एका मोहल्ल्यात एक व्यक्ती बैठक घेते आणि दुस-या दिवशी दंगल घडली. हा काही योगायोग नाही. वर्धा येथे दंगल झाली, त्या दंगलीत ज्या व्यक्तीचा मोठा सहभाग होता, ज्या व्यक्तीच्या घरात बॉम्ब सापडले, दुर्देवाने त्या व्यक्तीच्या घरी आमचे आमदार पुत्र जातात, ती व्यक्ती सीमी संघटनेची जिल्हा प्रमुख निघते हा देखील काही योगायोग नाही. सक्रीय झालेली यंत्रणा आहे, ती संपूर्ण समाजाला भडकावते आहे. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी शासनास विनंती करतो की,....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

ज्यांना अटक करायची आहे त्यांना जरुर अटक करा. परंतु नंग्या तलवारी घेऊन विशिष्ट समाजाचे लोक बाहेर पडतात. मला डॉ.फुफाटे यांचा फोन आला. त्यांनी सांगितले की नंग्या तलवारी घेऊन मुस्लीम समाज रस्त्यावर उतरला आहे. कुठे तरी धर्मग्रंथाची विटंबना झाली म्हणून धाकदपटशा दाखविला जात आहे. आमच्याकडून जरासे खुट् झाले तरी लगेच बोंब होते. मला वाईट याचे वाटते की हे एकतर्फी आहे. ही दंगल नाही. मुस्लीम समाजाची तथाकथित धार्मिक भावना दुखावल्या म्हणून केलेला हा हल्लाबोल आहे. जे घडले आहे त्याची छाननी करण्याऐवजी अखिल भारतीय अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष येऊन बसतात ? एवढी त्या समाजाची काळजी वाहण्यासाठी कर्फ्यू असताना येतात. दंगल करणारे तेच, मारणारे तेच. एवढ असताना आता पोलिसांची चौकशी होणार आहे. म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की यासंदर्भात योग्य ती भूमिका घ्या. दिग्रसमध्ये अनैतिक धंदे चालतात असे छापून आलेले आहेत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, आंदोलन करणारे तेच, मारणारे तेच, दंगल करणारे तेच असे जे माननीय सदस्य म्हणत आहेत ते सरकारने जाहीर केले आहे काय ?

सभापति महोदय, अभी सम्माननीय सदस्य श्री रावते जी ने मुस्लिम समाज का नाम लिया है. वे किस आधार पर मुस्लिम समाज का नाम ले रहे हैं, क्या सरकार ने ऐसा डिक्लेयर किया है ?

श्री दिवाकर रावते : हां, यह सही है. मुस्लिम समाज के लोग नंगी तलवार लेकर रास्ते पर उतरे थे. सब मुस्लिम रास्ते पर उतरे थे. आपके कुरान पर रोने के लिए हम क्यों आएंगे ? रास्ते पर मुस्लिम समाज के ही लोग थे.

श्री पांडुरंग फुंडकर : उन्होंने ही दंगा किया.

श्री दिवाकर रावते : वे धर्मांध मुसलमान थे.

यानंतर श्री सय्यद जामा यांचे भाषण.

5C-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा (विधानसभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, यवतमाल जिले में दिग्रस में जो घटना घटी है, उसके संबंध में विरोधी पक्ष नेता श्री फुंडकर जी ने यहां पर अपना मत रखा है. इस घटना के बारे में सभी पक्षों के लोगों को जानकारी है. वहां की घटना की जानकारी सभी ने ली है. मैं भी नागपुर का रहने वाला हूं, मैंने भी इस घटना की पूरी जानकारी ली है. यवतमाल, वणी ये मेरे कार्यक्षेत्र हैं. मैं यह कहना चाहता हूं कि इस घटना के संबंध में हिन्दू और मुस्लिम की बात करने से कोई फायदा नहीं है. किसी समाज को बदनाम करने से कोई फायदा नहीं होगा. अभी सम्माननीय सदस्य श्री फुंडकर जी ने कहा कि वहां जो नये एस.पी. आए हैं उन्होंने गलत काम करने वाले अपराधी तत्वों की गतिविधियों को बंद करवा दिया इसलिए किसी एक समाज के लोग एस.पी. के खिलाफ हो गए हैं और इसी वजह से ये घटना घटी है. इस संबंध मे मैं यह कहना चाहता हूं कि जब तक इस घटना की जांच पूरी नहीं हो जाती है तब तक इस तरह से कोई निष्कर्ष निकालना उचित नहीं होगा. दूसरी बात यह है कि कुरान के अपमान की जो घटना हुई है, उसकी जांच की जाए और सच्चाई क्या है वह सामने रखी जाए. तीसरी बात यह है कि जो घटना हुई है, वह जिस कारण से हुई है, वह कारण जांच होने के बाद ही पता चलेगा. इसलिए इस घटना को सिमी से जोड़ना उचित नहीं है.

श्री दिवाकर रावते : क्या आप समर्थन कर रहे हैं ?

श्री सय्यद जामा : आप मुझे मेरी बात पूरी कहने दीजिए. मैं आपको यह भी बताता हूं कि हम आपसे ज्यादा सिमी के विरोधी है. हम धर्मनिरपेक्षवादी है. हम मुस्लिम है, इसका भी हमें गर्व है. हम इस सदन में मुस्लिम प्रतिनिधि के रुप में यहां भेजे गए हैं. हमें अपनी बात कहने का पूरा अधिकार है. आप मुझे बोलने से रोक नहीं सकते. मैं आपको यह बताना चाहता हूं कि सिमी के बारे में जितनी तीव्र भावना आपके मन में है, बीजेपी के सदस्यों के मन में है वही भावना हमारी भी है, एनसीपी की भी है. हम लोगों ने सिमी का कभी समर्थन नहीं किया है. हमारी पार्टी ने ही सिमी पर पाबंदी लगाई है. इसलिए मैं यह कह रहा हूं कि इस घटना की जांच पूरी होने दीजिए. जांच के बाद निष्कर्ष सामने आएगा कि घटना कैसे घटी, घटना का कारण क्या था, किसने किया, कुरान के पन्ने के साथ क्या हुआ, इन सब बातों की जानकारी जांच में मिलेगी. मैं यह भी मानता

...3



श्री सय्यद जामा....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हूं कि इस घटना के बाद वहां पर तीव्र प्रतिक्रिया हुई है. कुछ समाज के लोगों ने गुण्डागर्दी की है. गोली चली और उसमें एक व्यक्ति मारा गया. दूसरे दिन पुसद में भी आंदोलन हुआ. वहां पर भी एक व्यक्ति के सीने में गोली लगी. मैं यह कहना चाहता हूं कि हम सब वहां नहीं थे, हम सब इस घटना को दूर से देख रहे थे. मैंने इस घटना के बारे में जानकारी हासिल की है. मैं आपको यह बताना चाहता हूं कि इस घटना के बाद बीजेपी के लोगों ने वहां अच्छा काम किया है. आज भी 500-600 मुस्लिम डर की वजह से दूसरी जगह जाकर छुपे हैं. हिन्दू लोगों ने ही उनकी सहायता की है और उन्हें सुरक्षित रखने का काम किया है. कुछ मुस्लिमों को यवतमाल में रखा गया है. उनको हिन्दू खाना खिला रहे हैं. एनसीपी के लोग भी वहां काम कर रहे हैं. दोनों तरफ के लोग एक दूसरे की मदद कर रहे हैं. मैं माननीय उप मुख्यमंत्री जी को यह बताना चाहता हूं कि वहां पर दहशत हावी है. 100-150 लोगों को गिरफ्तार किया गया है. दोनों पक्षों की मदद से नागरिकों के मन से दहशत की भावना दूर करनी होगी. नागरिकों के मन में सुरक्षा की भावना फैलनी चाहिए. इसलिए इस दिशा में माननीय उप मुख्यमंत्री जी कारगर कदम उठाए ताकि सभी समाज के लोगों में सुरक्षा की भावना पैदा हो. दोनों समाज में समन्वय स्थापित हो. समाज में तनाव दूर करके शांति बनाये रखना हम सब लोगों का काम है. इतना कहते हुए मैं अपनी बात समाप्त करता हूं.

......................................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(पूर्वी हिंदी भाषण श्री.तालेवार यांच्याकडे......

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अशा प्रकारच्या घटना राज्यामध्ये विविध ठिकाणी घडत असतात. त्यावेळी दोन्ही समाजाच्या लोकांवर पोलीस गुन्हे दाखल होतात. काही राजकीय पक्षाकडून ताकदीने बाजू मांडल्यानंतर त्या पक्षाशी संबंधित समाजाच्या लोकांवरील गुन्हे मागे घेतले जातात आणि अन्य समाजाच्या लोकांना पोलीस कोठडीत ठेवले जाते. असे प्रकार घडू नयेत म्हणून माझी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, बाजू मांडल्यानंतर खटले मागे घेण्याच्या संदर्भात जो काही निर्णय घेतला जाईल त्यावेळी दोन्ही समाजाच्या लोकांवरील खटले मागे घेऊन त्या ठिकाणी शांतता कशी राहील यादृष्टीने काळजी घ्यावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मैंने यह बोला है कि निरपराध लोगों को पकड़ा गया हैं । मैंने यह नहीं बोला है कि हिन्दू लोगो को पकड़ा है ।

(नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, दिनांक 18.7.2008 रोजी दिग्रस, जिल्हा यवतमाळ येथे पाकिजा इंटरप्रायझेस या दुकानाच्या पायरीवर एक पवित्र धर्मग्रंथ खुला ठेवून त्यावर चहाचा कप, लिंबू आणि एक चप्पल ठेवल्याचे आढळून आहे. या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावली. नमाज अदा झाल्यानंतर 500 ते 600 लोकांचा जमाव दिग्रस पोलीस ठाण्यामध्ये गेला. आपल्या धर्मग्रंथाचा अवमान झाल्याबद्दल चिडलेल्या काही लोकांनी पोलीस ठाण्यावर देखील हल्ला केला. पोलीस सदर जमावाला हुसकावून लावत होते. त्यावेळी या जमावाने जाताना काही दुकानांची मोडतोड केली. ही घटना दिनांक 18.7.2008 रोजी घडली. पवित्र धर्मग्रंथाची बदनामी केली गेली. त्याची प्रतिक्रिया पुसदमध्ये त्याच दिवशी आली. तिथेही काही लोक जमले. घोषणाबाजी करण्यात आली. या घटनेचा निषेध करण्यात आला. थोडीशी दगडफेक करण्यात आली. याचे पडसाद यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी उमटले. पुसद येथील प्रक्षुब्ध जमावाला पांगविण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्यात एक माणूस जखमी झाला. तेथे कर्फ्यु पुकारला गेला. पुसदमधील परिस्थिती दिग्रसच्या तुलनेत फार बिघडली नव्हती. या घटनेचा परिणाम म्हणून दिनांक 19.7.2008 रोजी, दिनाक 18 तारखेला ज्या व्यापाऱ्यांची दुकाने फुटली होती, काचा फुटल्या होत्या, दुकानावंर दगडफेक झाली होती, असे सगळे व्यापारी एकत्र आले. हे व्यापारी पोलीस ठाण्यामध्ये एकत्र आले होते. त्यांनी पीएसआयला निवेदन दिले. त्यांनी मागणी केली की आम्ही मोर्चाने जाऊन तहसीलदारांना निवेदन देणार आहोत. 500-600 जमाव कोणतीही पूर्वसूचना न देता गेला तर पहिल्या दिवशी जे घडले त्यापेक्षा आणखी काही तरी घडू शकते म्हणून पोलिसांनी त्यांना मोर्चाने जाण्यासाठी परवानगी नाकारली. पोलिसांच्यावतीने असेही सांगण्यात आले की, तहसीलदारांना निवेदन द्यायचे असेल तर आम्ही तहसीलदारांना येथे बोलावून घेतो. त्यांच्याकडे आपण निवेदन द्यावे. पहिल्या दिवशी दगडफेक केली म्हणून त्यांनी आग्रही आणि हट्टी भूमिका घेतली की तुमच्या परवानगीची गरज नाही. आम्ही मोर्चाने जाऊनच तहसीलदारांना निवेदन देणार. हा समाज एका बाजूने जात होता. दुसऱ्या बाजूने हा समाज आपल्यावर चाल करून येईल अशा प्रकारचे भीतीचे वातावरण दुसऱ्या समाजामध्ये निर्माण झाले

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ भोगले... 19:35

श्री.आर.आर.पाटील...

होते. याचा परिणाम समोरासमोर आल्यानंतर झाला. शिवसेनेच्या उप प्रमुखांना तलवारीने मारहाण करण्यात आली. त्यावेळी सहा लोक जखमी झाले. या घटनेमध्ये एकूण 18 पोलीस जखमी झाले आहेत. पोलिसांनी ही परिस्थिती हाताळण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण दोन्हीकडचे जमाव प्रक्षुब्ध झाल्याने, लाठीचार्जने जमाव नियंत्रणात येत नसल्याने शेवटी पोलिसांना गोळीबारही करावा लागला. गोळीबार करताना प्राणहानी होऊ नये म्हणून पोलिसांनी शिकस्त केलेली आहे. या घटनेच्या वेळी पोलिसांनी 10 फायर राऊंड केल्या आहेत. त्यापैकी तीन गोळ्या लागल्या. दोन पायावर लागल्या. या गोळीबारात एकाचा जागेवर मृत्यू झाला आहे. गोळीबारामध्ये जीवित हानी होऊ नये म्हणून शासन आता नव शस्त्र विषयक धोरण आणणार आहे. काही माणसे ही काही काळापुरतेच प्रक्षुब्ध झालेली असतात. ते गुन्हेगारी प्रवृत्तीचे नसतात. पुढचे अधिकचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागतो. त्यात जीवित हानी होते. हे टाळण्यासाठी नव शस्त्रविषयक धोरण आणण्याचा विचार सुरू आहे. अशा वेळी रबरी गोळ्यांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच गोळ्या आहेत, त्यांचा देखील वापर करण्यात येणार आहे. जमावाला नियंत्रणामध्ये आणण्यासाठी रबरी गोळ्यांचा वापर करण्यात येणार आहे. दरोडेखोरांसाठी, नक्षवाद्यांसाठी, गँगस्टरसाठी आज प्रस्तावित असलेली शस्त्र वापरण्याबाबत आम्ही नव्या शस्त्र विषयक धोरणामध्ये नमूद केलेले आहे. लवकरच बजेटमध्ये तरतूद करून तशा प्रकारची शस्त्र आणि गोळ्या पोलिसांना उपलब्ध करून दिल्या जातील. मी दोन्ही लोकांशी संपर्क साधला असता त्यावेळी पोलिसांना गोळीबार करण्याखेरीज पर्याय नव्हता असे मला सांगितले.

यानंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

हे समाजातील दोन्ही बाजूंनी सांगितले जाते. पण पोलिसांनी हा गोळीबार अनाठायी केला नव्हता तर त्यांनी सुरुवातीला प्रयत्न केले परंतु नाईलाजाने त्यांना गोळीबार करावा लागला होता. त्या दिवशी पोलिसांनी बळाचा वापर करण्याचे टाळले असते, जमावाला कंट्रोल केले नसते तर आणखी दोन्ही बाजूंनी, दोन्ही समाजाचे फार मोठे नुकसान झाले असते. कदाचित तहसीलदारांना निवेदन देण्यासाठी चाललेले दोन्ही समाज शांतपणे गेले असते की नाही याबाबत भीती होती. जाणाऱ्या समुदायाला वाटत असते की आपल्यावर दुसऱ्या बाजूने हल्ला होईल काय आणि येत असलेला जमाव आपल्याकडे कशावरुन येत नसावा, अशी भीती दुसऱ्या बाजूला असते, ही परिस्थिती होती. अशा वेळी या दोन्ही समाजाला एकत्र येऊ न देणे हीच त्यावेळची आत्यंतिक गरज होती. त्यावेळी दिग्रस मध्ये सुध्दा पोलिसांनी कर्फ्यु लावला त्यावेळी बेसिकली भीतीचे वातावरण निर्माण करण्यासारखी परिस्थिती होती, ही गोष्ट नाकबूल करता येत नाही. पण प्रामुख्याने जातीय दंगली म्हणजे छोट्या छोट्या कारणांवरुन वेगवेगळ्या जातीतील लोक एकमेकांसमोर येऊन होत असतात. म्हणून अशा प्रकारे हे दोन समाज एकमेकांसमोर येऊ नये, तसेच धर्मातील कोण गुन्हेगार आहेत हे माहीत नसताना एकत्र येणे ही गोष्ट सर्वच बाजूंनी टाळली पाहिजे. कारण या जातीय दंगली म्हणजे एक प्रकारे महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यावरील कलंक आहे. ज्यावेळी अशा दंगली होतात त्यावेळी समाजकंटक अशा गोष्टींचा फायदा घेतल्याशिवाय राहत नाही. या निमित्ताने सांगलीमध्ये झालेल्या घटनेचा तपास केला आणि अशी माहिती मिळाली की, भिडे गुरुजी, जे छत्रपती शिवाजी महाराजांचे तत्वज्ञान लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम करतात. त्यांची भाषणे मी ऐकलेली आहेत. तसेच त्यांच्या भाषणातून प्रेरणा घेतली नाही असा माणूस असणार नाही. एका बाजूने त्यांचे देशप्रेमाचे काम चालू असताना ज्यावेळी त्यांच्यावर लाठीचार्ज झाला त्यावेळी काही प्रक्षुब्ध्द जमाव पुढे आला आणि त्या जमावाने बसेस तोडल्या, दुकाने फोडली, दुकाने लुटली अशा प्रकारे दंगलसदृश्य परिस्थिती संपूर्ण सांगलीत निर्माण केली. या घटनेची अधिक खोलात जाऊन चौकशी केली असता त्यावेळी ही गोष्ट स्पष्ट झाली की, भिडे गुरुजींचे जे कार्यकर्ते होते त्यांची नावे निष्पन्न झाली तर ती सगळी जवान मंडळी पुढे आली आणि म्हणाले की, आमची जर या दंगलीत नावे असतील तर आम्हाला अरेस्ट करा, असेल ती शिक्षा भोगण्याची आमची तयारी आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

परंतु ज्या एरियामध्ये त्यांचे कार्यकर्ते नव्हते, ज्या भागातील दुकाने फुटली या घटनेचा तपास करीत असताना असे समजले की, सांगली एस.पी. ने मटका बंद केला, दारु बंद केला, वेश्याव्यवसाय बंद केला, अशा प्रकारे अवैध धंदे बंद केल्यामुळे त्यातून पोलिसांबद्दलची नाराजी होती ती व्यक्त करण्यासाठी चांगली संधी आहे म्हणून या समाजकंटकांनी या आंदोलनाच्या आड असे अवैध धंदेवाले घुसवले. माझी आजही खात्री आहे की, भिडे गुरुजींच्या कार्यकर्त्यांनी दुकानांवर दगडफेक केलेली नव्हती, पण या लोकांनी त्या घटनेचा फायदा घेतला आणि जे नुकसान होत होते त्यातून गुरुजींची बदनामी होत होती व पोलिसांवर देखील सूड उगविण्याची नामी संधी त्यांच्यासमोर चालून आली होती. त्या भागात काम करणारे गुत्तेदार, मटका चालविणारे जे लोक आहेत त्यांच्या संदर्भात कारवाई करणे म्हणजे एक प्रकारचे आव्हानच होते. कारण यासंदर्भात आपले अस्तित्वात असलेले कायदे अत्यंत तोकडे आहेत. मी मटका बंद करण्यासाठी अनेक वेळा प्रयत्न केला होता परंतु प्रस्थापित जुगार प्रतिबंधक कायद्यात किरकोळ स्वरुपाच्या शिक्षा आहेत. अशा लोकांना अरेस्ट केले तरी ताबडतोब त्यांना कोर्टाकडून जामीन मिळतो. पण योगायोगाने जामसंडेकर खून खटला ज्यावेळी ओपन झाला त्यावेळी गवळी टोळीचा त्यात हात अडकला असल्याचे उघड झाले. त्यांना जे विविध लोक मदत करीत होते त्यामध्ये मटक्यावाले असल्याचे निष्पन्न झाले आणि पोलिसांना या केसच्या निमित्ताने या आरोपींवर मोका नुसार कारवाई करण्याची संधी प्राप्त झाली. अशा प्रकारे मागील 27 दिवसांपासून वरळी आणि कल्याणमधील मटका, जो मटका सन 1963 पासून सुरु झालेला आहे, दुर्देवाने माजी पंतप्रधान इंदिरा गांधींचा मृत्यू झाला त्या दिवशी सुध्दा मटक्याचे आकडे बंद नव्हते, आणीबाणिच्या परिस्थितीत सुध्दा मटक्याचे आकडे न चुकता निघत होते. अशा प्रकारे खालपासून वरपर्यंत इतके पध्दतशीर रॅकेट पक्के होते की ते कितीही प्रयत्न केला तरी रोखता आले नव्हते.

यानंतर श्री. जुन्नरे .......

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

देशातील मटका वरळी आणि कल्याण नावाने चालतो परंतु मागील 27 दिवसामध्ये ओपन आणि क्लोजचे आकडे निघू शकले नाहीत. एका बाजूने या मर्डर केसमध्ये सावळा ग्रुप अडकला तर भगत मर्डर केसमध्ये दुसरे लोक अडकले. 27 दिवस मटका निघू शकला नाही. माझी आजची माहिती अशी आहे की, जयपूर व मध्यप्रदेश मधून मटका चालवता येईल का या दृष्टीने काही लोक प्रयत्न करीत आहेत परंतु महाराष्ट्राचे पोलीस त्यावरही लक्ष ठेवून आहेत. मटका बंद झाल्यामुळे गोरगरीब माणसांची लुबाडणूक थांबेल. मटका चालविणा-यांचे उत्पन्न बघितले तर हप्ते आणि पैसा देऊन सुध्दा एक कोटी रुपये एकाला आणि दुस-याला 75 लाख रुपये असे त्यांचे दिवसाचे उत्पन्न, कमाई आहे. आतापर्यंत जे रेकॉर्ड पकडले गेले आहे त्यामध्ये 350 कोटी रुपयांची मालमत्ता उघड झाली आहे. गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात मालमत्ता घेण्याची यांच्याकडे ऐपत आलेली आहे. गावपातळीपर्यंत यांच्या लिन्क्स आहेत. यामध्ये साईटवर जो एक आरोपी सापडला त्याच्यावर 2 पाने गुन्हे आहेत. याला काही दिवसापूर्वी मटका प्रतिबंध कायद्याखाली अटक करण्यात आली होती. सांगलीमध्ये या संधीचा फायदा घेऊन भिडे गुरुजींच्या आंदोलनामध्ये जसे गुन्हेगार घुसले होते तसाच फायदा घेऊन या ठिकाणीही गुन्हेगार घुसले होते. हिंदू किंवा मुस्लीम असू दे, छत्रपती शिवाजी महाराजांचे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे किंवा कुराणाचे कोणी विडंबन केले, विटंबन केले तर प्रत्येकाला राग येणे स्वाभाविक आहे. येथे कोणी विटंबन केले हे बघण्यास कोणी गेले नव्हते. फक्त "झाले" एवढयावरच कुठल्याही समाजात नाराजीची भावना पसरु शकते. मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, अशा आंदोलनात जे लोक पुढे येतात ते सर्वच गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात असे नाही. आपल्या धर्माबद्दल श्रध्दा दाखवावी हा सुध्दा त्यांचा विचार असतो. परंतु अशा आंदोलनामध्ये दोन्ही बाजूने जे पुढे येतात तेही सर्वच चांगले असू शकत नाही तसेच वाईटही असू शकत नाहीत. चांगल्या विचाराने चाललेल्या आंदोलनामध्ये, चांगल्या विचाराने काढलेल्या निषेध मोर्चामध्ये कधी कधी गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घुसु शकतात. पोलीस या सर्व घटनेचा तपास घेतील परंतु एक गोष्ट आपण बघितली तर मग ती घटना पुसदची असू दे, दिग्रजची असे दे किंवा रायगड जिल्हयामधील असू दे. कामगार मोर्चा घेऊन गेले त्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला. हा मोर्चा सेनेचा होता. पोलिसांनी केलेली कारवाई योग्य होती असे त्या जिल्हयातील सेनेचेच लोक सांगतात. मोर्चा असंघटित कामगारांचा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

होता. केमिकल फॅक्टरीवर जर दगडफेक झाली असती, आग लागली असती तर खूप मोठी हानी होऊ शकली असती. पोलिसांना गोळीबार करतांना फार समाधान वाटते अशातलाही भाग नाही. पण गरज वाटेल तेथे पोलिसांना आपली कारवाई करावी लागते. पोलिसांचे दुर्दैव आहे की, कुठलीही कारवाई केली तरी त्याला एक वेगळा रंग लावण्याचा प्रयत्न केला जातो. मागील अधिवेशनात चोपडयाला घटना घडली त्यावेळी त्या ठिकाणच्या पोलीस गोळीबारात दोन हिंदू मेले होते. तेथील पोलिसांना मुस्लीम धार्जिणे ठरवण्यात आले, हिंदुवर हल्ले होतात म्हणून पोलिसांवर टीका झाली. आज या ठिकाणी एक मुस्लीम तरुण मेलेला आहे आता येथील पोलिसांना हिंदुत्ववादी ठरवले जात आहे पण ते योग्य नाही. मी इतकेच सांगतो की, पोलिसांच्या वर्दीचा रंग खाकी आहे. त्यांच्या वर्दीचा रंग हिरवा किंवा भगवा नाही. पोलीस दल कायद्याचे रक्षण करण्यासाठी बांधील आहे. पोलीस दल धर्मनिरपेक्ष दल आहे. पोलिसांच्या भूमिकेला कायम त्याच भूमिकेत ठेवावे, पोलिसांना आरोपीच्या पिंज-यात उभे करण्याची भूमिका कधीही व्यक्त होता उपयोगाची नाही. मी एवढेच सांगेन की, या पुढील काळामध्ये मग हिंदू असे दे, कुठल्याही धर्माचे लोक असू दे, अल्पसंख्यांक असू दे, कुठल्याही जातीचे असू दे कोणाच्या जिवितावर किंवा मालमत्तेवर जमाव एकत्र जमून येत असेल तर पोलिसांना आवश्यकतेप्रमाणे आपल्या बळाचा, कायद्याचा वापर करावाच लागेल. या ठिकाणी प्रसंग इतका अडचणीचा असतांना सुध्दा पोलीस दलातील जवानांनी रात्रीचा दिवस करुन लवकरात लवकर येथील परिस्थिती शांततेत यावी यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.. . एखाद्या ठिकाणी दंगल झाल्यानंतर कोण दंगल बघत होता वा कोण घरी चालला होता वा कोण दंगल करणारा होता याबाबतीत अत्यंत कमी वेळात अंदाज धेणे पोलिसांना शक्य होत नाही. लोकांवर जरब बसावी म्हणून त्या ठिकाणी जे कोणी लोक असतील त्यांना पकडले जाते परंतु त्यातील काही लोक या दंगलीमध्ये सहभागी नसतात. या दंगलीमध्ये आतापर्यंत 151 लोकांना अटक करण्यात आलेली आहे त्यातील दंगलीशी सबंधित लोक किती आहेत हे पुन्हा एकदा तपासून पाहिले जाईल. त्याचबरोबर अटक करणा-यांमध्ये जर काही निरपराध आणि निष्पाप लोक असतील तर कोणत्याही निरपराध आणि निष्पाप व्यक्तीला त्रास देण्याची भूमिका पोलीस दलाची असणार नाही. यामध्ये कोणाला चुकीने अटक करण्यात आली आहे किंवा नाही हे पुन्हा तपासून पाहिले जाईल. या दंगलीच्या वेळी पोलिसांनी जी कारवाई केली होती ती योग्य पध्दतीची होती व त्या कारवाईचे समर्थनही केले पाहिजे त्याचबरोबर त्या ठिकाणी इतका उद्रेक असतानासुध्दा तेथील वातावरण पूर्ववत करण्यात पोलीस दलाला यश आलेले आहे. या दोन घटनामधून महाराष्ट्रातील सर्व जनतेने बोध घेतला पाहिजे की एकत्र येऊन क्षणासाठी गुंडा गर्दी केली तर ती टीकू शकत नाही, शांततेने आणि कायद्याप्रमाणे आपले हक्क मानण्यात सर्वाचे हित आहे हे सर्वच धर्माच्या व सर्व पक्षाच्या नेत्यांनी आपल्या लोकांना सांगावे अशा प्रकारचे आवाहन मी या निमित्ताने करु इच्छितो.

सभापती महोदय, आता तेथील परिस्थिती जवळजवळ पूर्णंपणे निवळलेली आहे. या गुन्हयामध्ये जे नव्हते त्या व्यक्तींनी पुन्हा गावामध्ये येण्यास घाबरण्याचे काहीही कारण नाही. ज्यांनी स्वत: होऊन गावे सोडून दिलेली आहेत त्यांनी आपल्या गावामध्ये यावे आणि जे गुन्हयामध्ये सामील होते त्यांनी अत्यंत निर्भीडपणे आपण केलेल्या कृत्याची शिक्षा भोगण्यासाठी स्वत: होऊन पोलिसाकडे जाण्याची भूमिका घ्यावी. कोणी गावाबाहेर रहावे इतका पोलिसांनी दबाव निर्माण केला आहे, पोलीस लाठयांनी मारहाण करीत आहेत, पोलिसांची दादागिरी सुरु आहे अशी स्थिती त्या ठिकाणी निश्चितपणे नाही. त्या ठिकाणी खूप मॅच्युअर्ड अधिकारी आहेत. अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष देखील तेथे गेले होते. जी घटना घडली होती ती अत्यंत दुर्देवी होती परंतु ज्या पध्दतीने पोलिसांनी ती हाताळली त्यामुळे लवकरच तेथील वातावरण पूर्ववत झाले होते अशा प्रकारचा अभिप्राय त्यांनीही व्यक्त केला होता त्यामुळे या विषयाच्या सदर्भात आणखी वेगळी चर्चा करणे बरोबर नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : कर्फ्यू उठविण्यात आला नाही.

श्री.आर.आर.पाटील : आज संध्याकाळ पासून उठविण्यात येईल. दिवसभर काही काळासाठी कर्फ्यू उठविण्यात आला होता त्यामुळे तेथील लोक एकमेकामध्ये मिसळत आहेत. तेथील दोन धर्माच्या लोकांमध्ये भांडण नाहीत.

श्री.दिवाकर रावते : एकाच धर्मियामध्ये भांडणे आहेत.?

श्री.आर.आर.पाटील : तेथील दोन धर्मियाच्या लोकांमध्ये भांडणे नाहीत. दोन्ही बाजूच्या लोकांमध्ये दोष असू शकतात त्यामुळे कोणालाही एकाला दोष देता येणार नाही. त्यामुळे एक बाजू साधूपणाची आहे असेही म्हणता येणार नाही.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी विचारु इच्छितो की "आम्ही पाचपुते " या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी बॉम्बस्फोट करणारे सनातनचे लोक होते हे आपल्या बुध्दिला तरी पटते काय ?

श्री.दिवाकर रावते : त्या संदर्भात उद्या चर्चा करण्याची आमची तयारी आहे.

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, सनातनचे लोक त्या बॉम्ब स्फोट करणा-यांमध्ये आहेत हे आता स्पष्ट झालेले आहे त्यामुळे दोन्ही बाजूला गुन्हेगार असू शकतात. आपल्या धर्मातील लोकांना 100 टक्के क्लिनचीट कोणीही देऊ शकत नाही आणि तशी ती कोणी देताही कामा नये. गुन्हेगारांना जात आणि धर्म नसतो हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे गुन्हेगार हा गुन्हेगारच असतो. तो कोणत्याही जाती धर्माचा असला तरी तो प्रथम गुन्हेगारच आहे. काही वेळा चर्चेतून सुध्दा वातावरण बिघडण्याची शक्यता असते त्यातून वेगळे संकेत समाजामध्ये जाण्याची शक्यता असते म्हणून या विषयावर माफक चर्चा करुन हा विषय लवकर थांबविण्यात यावा अशा प्रकारची शासनाची इच्छा होती. त्याला माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मान्यता दिली. त्याबद्दल मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मानापासून धन्यवाद देतो. तसेच दंगल योग्य पध्दतीने हाताळल्याबद्दल पोलिसांच्या योग्य कृतीचे समर्थन करुन मी माझे भाषण संपवितो.

**उपसभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

या नंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी अशासकीय विधेयक मांडावे.

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**अशासकीय कामकाज - विधेयके**

**पृ.शी.**: (नागरी क्षेत्र) ईलेक्ट्रॉनिक कचरा (नियमन, नियंत्रण आणि विल्हेवाट) विधेयक

**L. C. BILL NO.V OF 2008.**

**(A BILL TO PROVIDE FOR REGULATION AND CONTROL AND SYSTEMS FOR DISPOSAL OF ELECTRONIC WASTE BY MAKNG THEIR REGISTRATION COMPULSORY WITH AN APPROPRIATE AUTHORITY AND PRESCRIBING NORMS AND STANDARDS FOR E-WASTE GENERATORS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO IN THE STATE OF MAHARASHTRA.)**

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 5 समुचित प्राधिकरणाकडे नोंदणी अनिवार्य करुन आणि ई-कचरा निर्माण करणाऱ्यांसाठी प्रमाणके आणि मानके विहित करुन ईलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी यंत्रणा, नियमन आणि नियंत्रण करण्यासाठी आणि तत्संबंधित तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, गेल्या दहा वर्षात वेगवेगळया प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांमुळे कॉप्युटरमुळे, फ्रीजमुळे, टी.व्ही.मुळे हजारो मेट्रीक टन कचरा तयार झाला आहे. त्याचे नियमन कसे करावे आणि त्याची विल्हेवाट कशी आणि कोणत्या प्रकारे लावावी याबाबत कोणत्याही प्रकारचा कायदा आज अस्तित्वात नाही. त्यामुळे या कचऱ्याचे नियंत्रण व नियमन करण्यासाठी कायदा असावा याकरिता हे विधेयक आणले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 5 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविलेले उर्वरित अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

सभागृपुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 26 जुलै 2008 रोजी सकाळी 9.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 9.30 ते 11.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 57 मिनिटांनी शनिवार, दिनांक 26.7.2008 रोजी च्या सकाळी 9.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही